UNIVERSAL
LIBRARY
OU_196034
UNIVERSAL
LIBRARY

वऱ्हाड सरकारच्या विद्याधिकाऱ्याकडून इनाम ठरून

(दोनशें रुपये बक्षीस मिळालेला निबंध)

# सगुणोपासना

अथवा

# मूर्तिपूजा.

(धर्माच्या तुलनात्मक दृष्टीनें लिहिलेला निबंध.)

लेखक.

सिताराम महादेव फडके, बी. ए.
'वेदान्तनिदर्शन' कर्ते

प्रकाशक
दामोदर सांवळाराम आणि मंडळी
बुकसेलर्स, पब्लिशर्स व एजंटस्, ठाकुरद्वार–मुंबई नं. २.

सन १९१९ इ०

किंमत दीड रुपया.

हें पुस्तक नं. ३८८, ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २ येथें 'इंदुप्रकाश' इलेक्ट्रिक प्रिंटिंग वर्क्समध्यें रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

या पुस्तकासंबंधाचे सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपणाकडे ठेविले आहेत.

# लेखकाची प्रस्तावना.

I do not expect every body
to agree to what I say.

Sir Oliver Lodge.

'वेदान्तनिदर्शन' हें पुस्तक छापवीत असतां त्यांत आलेल्या 'मूर्तिपूजा' या विषयावरील २।१ पानाच्या मजकुरापेक्षां अधिक कांहीं तरी लिहावें असें मनांत आलें. असले विचार द्रव्याच्या अभावीं जागच्याजागींच जिरण्याचा प्रसंग नेहमींप्रमाणें येणार असें वाटलें. परंतु श्रीमंत बडोदें सरकार यांचे विद्याधिकाऱ्यांच्या सहीची सन. १९११ सालांत 'सगुणोपासना–मूर्तिपूजा' या विषयावर निबंध लिहिण्याविषयीं जाहिरात आल्यामुळें ते विचार अंकुर धरूं लागले. इतर धर्मांच्या अभ्यासाची आवश्यकता दिसूं लागली, व त्या दृष्टीनें सामुग्रीची जुळवाजुळव केली. अनेक धर्मांतील गोष्टींची तुलना करण्याची संवय वेदान्तनिदर्शनानें लाविली होती. शेवटीं मजकूर किति गाळावा हाच प्रश्न पुढें उभा राहिला. विषयाचें पूर्ण विवेचन होण्यापुरतासुद्धां मजकूर दिलेल्या मर्यादेपेक्षां ह्मणजे फूलस्केप १०० पानांपेक्षां अधिक होऊं लागला. पुढें मुदतींत निबंध लिहून गेला, व तो पसंत होऊन सर्वांत उत्तम ठरल्याचा निकाल १९१५ सालीं झाला.

२. हिंदुधर्मांतच मूर्तिपूजा आहे, तेव्हां ती भूषण आहे कां दूषण आहे, अलंकार आहे, किंवा डाग आहे, शोभा आहे अगर कलंक आहे, ती टाकणें बरें, किंवा आहे तशीच राहूं देणे बरें, हा प्रश्न अनेक वेळां पुढें आलेला आहे. परंतु इतर धर्मांत मूर्तिपूजा कां नाहीं, ह्यांचें कारण समजण्यासाठीं त्या धर्मांचा इतिहास वाचणें जरूर पडलें. ख्रिस्ती धर्मांत मूर्तिपूजा वरचेवर शिरे व कायद्यानें किंवा धर्मसुधारकांकडून तिचें उच्चाटण होई; परंतु पूजाभावना मनुष्याच्या अंगभूतच असल्यामुळें सगुणोपासना या बड्या नांवाखालीं त्या भावनेस लपण्यास सांपडे. मूर्तिभंजकाचें काम जितकें महंमदानुयायांनीं केलें तितकें इतर कोणीं केलें नाहीं. तेव्हां हा गुण त्या धर्मांत उपजतच कसा आला, ह्याचा इतिहास पाहिल्याशिवाय कांहीं उलगडा पडणार नाहीं. सारांश, या विषयाचा एक भाग 'ऐति-

हासिक, करणें जरूरच झालें. ह्या भागांत मला उपलब्ध झालेल्या ग्रंथांशिवाय इतर पुस्तकांत कांहीं निराळी माहिती असेल तर ती कोणी दाखविल्यास मी त्याचा आभारी होईन; परंतु त्या त्या धर्मांच्या विवेचनांत मी दिलेली माहिती जागेच्या अभावामुळें अपुरी राहिलेली असेल, किंवा एखादें वाक्य संक्षिप्त केल्यामुळें अर्थांत दुर्बोधपणा आला असेल किंवा तद्धर्मीयास वाटेल असा संभव आहे. त्याची दुरुस्ति मी हा ग्रंथ छापवितांना पाहिला असता किंवा प्रुफें तपासलीं असतीं तर कदाचित् झालीही असती; परंतु ती गोष्ट तशी न घडून आल्यामुळें व प्रस्तावना लिहिण्यापूर्वी सर्व छापील मजकूर मी न पाहिल्यामुळें राहिलेल्या अवगुणाबद्दल कोणीही मजवर रागावूं नये, अशी सर्व धर्मांच्या अभिमान्यास सविनय प्रार्थना आहे. कांहीं आधार प्रसिद्ध करावयाचे राहिल्यामुळेंही कोणास कांहीं वाटल्यास त्याबद्दलही मला क्षमा करावी, अशी विनंति आहे.

३. पूजेच्या प्रकारासंबंधीं माझें वर्गीकरण असें कां आहे, ह्याबद्दल ग्रंथांत खुलासा आहे; तथापि तें कोणास सदोष वाटल्यास व त्याबद्दल कोणी साधार माहिती दिल्यास त्याजबद्दल माझें म्हणणें मी कळविण्यास तयार आहे. हिंदुधर्मांतर्गत वेदान्तभागाच्या शिखरावर उभें राहून हा ग्रंथ लिहिलेला आहे, चिकित्सक दृष्टीनें लिहिलेला आहे. जेव्हां आपले दोष झांकून ठेवावे व गुणच पुढें आणावे, नाहीं तर आपल्या प्रतिपक्षीयास आपण शस्त्रास्त्रें पुरविल्यासारिखें होईल, अशा समजुतीच्या मनुष्याला या ग्रंथांतील कांहीं गोष्टी अक्षेपार्ह वाटतील; परंतु सत्य पुढें मांडण्याच्या हेतूमुळें ही एक पक्षीय दृष्टि महत्वाची वाटली नाहीं, येवढें सांगितलें ह्मणजे पुरें आहे.

४. मूर्तिपूजेवर आक्षेप आज कांहीं नवे नाहींत. ज्ञानेश्वरींत, दासबोधांत व इतर अनेक साधूसंतांच्या उक्तींत तिचा निषेधच केलेला आहे, परंतु तिचें उच्चाटण करण्यांत कांहीं महत्व आहे असें हिंदुधर्मीयास कोणास वाटलें नाहीं. निषेधानें तिचा नायनाट झाला नाहीं, किंवा निंदेनें ती बंद पडली नाहीं. इतकेंच नव्हें तर जुलमी अधिकाऱ्यांच्या हुकमाला तिनें जुमानलें नाहीं, किंवा राजकानूंना दाद दिली नाहीं. केवळ ईश्वरप्रसादावरच ज्या धर्मांची किंवा ज्या पंथाची भर आहे, त्यांना दुसऱ्या गोष्टी खपत नाहींत. त्यांच्या ईश्वरप्रेरित वाक्यांत कांहीं सुधारणा त्यांना इष्ट नसते; आणि मनुष्याच्या ज्ञानाची वृद्धि होत असतां त्यामुळें जर त्यांच्या मूळ सिद्धांताला हरताळ लागेल किंवा वैगुण्य येईल असें वाटेल, तर तें ज्ञानही नको ह्मणण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली आहे. ह्या निबंधाचा विषयच एक नको, धर्माबद्दलची कोणचीही गोष्ट घेतली तरी तिच्या उणेपुरेपणामुळें तद्धर्मीयांच्या ऐहिक नफातोट्याचा संबंध येऊं लागतांच त्या लोकांचा मस्तकशूळ उठतो; परंतु ह्या पोटापाण्याच्या दृष्टीनें न पाहणाऱ्या लोकांना मात्र त्याचें अन्वेषण करावेसें वाटतें.

५. माझें संकरण पूर्ण आहे, असें मी केव्हांच म्हणणार नाहीं. कित्येक ग्रंथ माझ्या कानीं आले असून मला मिळाले नाहींत, कित्येक वाचण्यापुरता अवकाश मिळाला नाहीं व कित्येक ग्रंथांतील माहिती देण्याइतकी जागाच उरली नाहीं. शिवाय मला ठाऊक झाले नाहींत, असेही कित्येक ग्रंथ राहिले असतील. ही पूजाभावना मनुष्याला प्रकृतिजन्य आहे, ती इतर धर्मांत किति गुणांनीं दृष्टीस पडते आणि हिंदुधर्मांतील ह्या विषयाचे शंभर गुण धरले तर अगदीं कोरा कागद असा कोणच्या तरी धर्मास दाखविता येईल किंवा कसें, येवढेंच पहाण्याचा माझा प्रयत्न होता. त्या त्या धर्मांच्या अभिमान्याजवळून याबद्दल माहिती घेण्यास पाहिजे होती; परंतु इतक्या विस्तृत दृष्टीनें ह्या विषयाचा अभ्यास केलेले गृहस्थ मला सुसाध्य नव्हते, व तितका मला अवकाशही मिळाला नाहीं.

६. ग्रंथ छापण्याचें काम बडोदेंसरकारानीं मजला पतकरण्यास सांगितलें होतें; परंतु माझ्या अटी पसंत न पडल्यामुळें तें काम तसेंच पडून होतें. पुढें परभारें तें छापविण्याचें काम दिलें गेलें; प्रुफें तपासण्याचें काम निबंध रचणाऱ्याकडे न आल्यामुळें ज्या अनेक चुका राहिल्या आहेत, त्या समजून घेऊन वाचकांनीं विषयाचें मनन करावें. दुर्बोध स्थलीं आणि विशेषतः इंग्रजी अवतरणांत इंग्रजी शब्दाचें स्पेलिंग चुकविलेलें किंवा अवतरित ग्रंथकर्त्यांच्या नांवाचा विपर्यास झालेला असावा, अशी शंका घेऊनच तें स्थल सोडून द्यावें, अशी विनंति करणें भाग आहे.

७. कसें कां होईना, माझ्या परिश्रमाचें हें फल छापून प्रसिद्ध होण्याची स्थिति ज्या जगन्नियंत्याच्या प्रेरणेनें झाली, त्याची नम्र भावानें प्रार्थना करून दोषाची माफी मागून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करतों.

पुणें. सदाशिवपेठ.
भाऊमहाराजाचाबोळ,
करंदीकराचा वाडा.
ता. १।१२।१९१९,

सिताराम महादेव फडके.
निबंध रचणार.

उत्पत्ति केव्हां व कशी झाली, यासंबंधीं सप्रमाण इतिहासरूपानें माहिती निबंधांत दिलेली असून निरनिराळ्या धर्मांत मूर्तिपूजेस अनुकूळ व प्रतिकूळ अभिप्राय कसकसे आहेत, याविषयींही त्यांत अंतर्भाव झाला पाहिजे. ह्या कलमांतील दोन शब्द " सृष्टि " आणि " मुख्य धर्म " हे बरेच संदिग्ध आहेत; कारण सृष्टि म्हणजे भूत आणि वर्तमान घ्यावयाची किंवा फक्त वर्तमानच घ्यावयाची ? आणि मुख्य म्हणजे लोकसंख्येच्या मानानें मुख्य किंवा राष्ट्राच्या शिक्षणस्वरूपावरून मुख्य ? तेव्हां ह्या दोन्ही शब्दांचा सर्वांत व्यापक अर्थ घेऊन विवेचन करण्याचें ठरविलें आहे; आणि अधिक स्पष्टीकरणांत ही गोष्ट नमूद केली आहे. कारण बुद्ध, ख्रिस्त आणि महंमद ह्यांनीं काढलेले किंवा ह्यांच्या नांवानें मोडणारे धर्म त्यांच्या पूर्वींच्या धर्मांचें त्यांच्या मतानें परिणत आणि शुद्ध स्वरूप असल्यामुळें त्यांत मूर्तिपूजा आहे किंवा नाहीं, वगैरेबद्दल ऐतिहासिक माहिती द्यावयाची तर, ते ज्या धर्मापासून निघाले, त्यांतील मूर्तिपूजेचें वर्णन दिल्यावांचून विषय नीट समजणार नाहीं.

" सृष्टींतील लोकांच्या अनेक वर्गांपैकीं तीन वर्ग मुख्य गणले आहेत; काकेससवाले, मंगोल आणि शिद्दी. " " काकेससवाल्यांचे तीन पोटभेद मानतात; आर्य, सेमिटिक आणि हामिटिक. आर्यांत युरोपांतील लोक, पार्शी आणि हिंदु मोडतात; सेमिटिकमध्यें असीरिया व फिनीशिया ह्या दोहोंतील लोक येतात; परंतु त्यांचा हल्लीं नष्टांश आहे, आणि यहुद्दी आणि आरबी लोक त्यांतच येतात; हामिटिक वर्गांत चाल्डीया आणि इजिप्तमधील लोक येतात, " पण ह्या दोन्ही लोकांच्या धर्माचा तरी

1. The numerous varieties ( of people are, by the ablest investigators, reduced to three principal stems viz. the Caucasian or Europo-Arabic, the Mongol and the Negro or Aethiopic. p. 4. Outlines of history By Thomas Keightley.

2. The Caucacian race divided into the Aryan, the Semitic and the Hamitic.........To the Aryans we, ourselves belong, and so do the Persians and Hindoos. The semitic race includes the Assyrians, the Phœnicians, the Hebrews and the Arabs. The Assyrians and the Phœnicians have disappeared. To the Hamitic race belonged the Chaldeans and the Egyptians. P 2. 143-144. The story of man By J. W. Buel.

नामशेषच उरला आहे. मंगोल लोकांत पूर्व आशिया आणि अमेरिका ह्यांतील लोक येतात. शिद्दी लोकांच्या धर्माचा अंतर्भाव आफ्रिकेंतील लोकांत होणारा असल्यामुळें आम्ही त्यांचा निराळा निर्देश करणार नाहीं. तेव्हां इतक्या राष्ट्राच्या धर्मांतील मूर्तिपूजेचा इतिहास द्यावयाचा म्हणजे पुष्कळ श्रमाचें काम तर आहेच; परंतु त्यायोगानें निबंधाचा विस्तार फार होईल, यासाठीं प्रथम ह्या देशांतील राष्ट्रांच्या धर्माचें स्वरूप थोडें सांगून हिंदुस्थानांतील मूर्तिपूजेचें वर्गीकरण करण्याचा हेतू आहे, आणि त्या वर्गवारींत उदाहरणें देतांना इतरधर्मांतील तत्सदृश प्रकार, किंवा आचार-शेष देण्याचा विचार आहे. आतां वर दिलेल्या विद्याधिकाऱ्यांच्या पत्रकांतील खुलाशाप्रमाणें मूर्तिपूजेच्या कल्पनेचा आरंभ, आणि विस्तार द्यावयाचा, तो हिंदुधर्मांतील विशेष बारीक प्रकारानें दिला आहे; आणि खिस्ती धर्मांतील थोडासा नमूद केला आहे; परंतु इतर राष्ट्रांतील धर्म आणि इतर धर्म ह्यासंबंधानें माहिती ह्या दोन्ही धर्मांपेक्षां संक्षिप्त रीतीनें दिली आहे.

**सगुणोपासना.**

ईश्वर ' पुरुष ' ( Personal ) किंवा देहविशिष्ट साकार व्यक्ति आहे. आणि म्हणून मानवी गुणांचा पूर्ण विकास त्याच्या ठिकाणीं आहे, अशी भावना असल्या शिवाय सगुणोपासना शक्यच नाहीं. साकार आणि निराकार किंवा सगुण आणि निर्गुण ह्या सापेक्ष्य भावना आहेत. उपासनेची मीमांसा केली असतां ती सर्वत्र पसरली पाहिजे, तिचें स्वरूप व्यापक होऊन उपास्य वस्तु कोठें नाहीं, अशी जागाच नाहीं असें वाटूं लागलें पाहिजे. हाच अर्थ मथा-ळ्यांतील ब्राउनिंग कवीच्या उद्गाराचा होत आहे. " मनुष्याला[1] जेव्हां कांहीं आपल्यामध्यें उणीव आहे असें वाटूं लागतें, तेव्हां धर्माची अवश्य-कता त्यास भासते, आणि ही आशा जितक्या मानानें ज्या धर्मांत पूर्ण होईल, त्या मानानें त्या धर्माचा श्रेष्ठपणा ठरत असतो. " असली मूर्ति हिंदुधर्मांतच आहे. " मनुष्यानें निंद्य किंवा दुर्गुणी कामांत कालव्यय

---

1. Each religion of the world is a manifestation of a human want; and the value of each religion consists in showing how far that want was supplied by the partial truth contained in it. P. 112 Is God knowable? By the Rev. J. Everach.

करण्यापेक्षां त्यानें पूर्वजांचे आचार विचाराचें अनुकरण करण्यास आरंभ केला तरी तेवढ्यानें त्याचें कल्याण होणार आहे; ह्याच्यापेक्षां वरिष्ठ विचाराची पायरी सगुणाची भक्ति होय; आणि त्याहून निर्गुणाचें अनुष्ठान श्रेष्ठ होय." हें पंचदशीकारांनीं ग्रथित केलेलें मथाळ्यांतील उताऱ्यांतलें तत्त्व त्या मूर्तीची साक्ष आहे. सगळ्यांमध्यें उत्तम मार्ग म्हणजे आपलें स्वरूप ओळखून त्या आनंदांत रहावें. परंतु "अशीप्रकारच्या विचाराची खुबी ज्याला साधली नाहीं, आणि ईश्वर सर्वांच्या हृदयांमध्यें रहात आहे, अशी भावना दृढ झाली नाहीं, तोंपर्यंत उत्तम भक्तिच्या साधनानें सगुणोपासना करावी." अशाप्रकारें "जनाची निरनिराळी आवड पूर्ण करण्यासाठीं सरळ, वाकडें, अज्ञानपूर्ण, अर्धवट सर्व मार्ग एकत्र करण्याची खटपट करणाऱ्या परंतु सर्वांचें ध्येय एकच परमेश्वर आहे; आणि पाणी कोठेंही पडलें आणि कोणच्याही नदीच्या ओघानें वाहूं लागलें तरी अखेर समुद्रासच मिळणार, ही भावना कायम ठेवणाऱ्या" हिंदुधर्मामध्यें मूर्तिपूजा शिरली आहे. जगांतील सर्वप्रकारच्या मूर्तिपूजा ह्या एका धर्मांत आल्यामुळें ह्याची स्थिति रामायणांतील अशोकाखालीं विरहानें दुःखित रहात असलेल्या सीतादेवीच्या स्वरूपाप्रमाणें दिसत आहे. श्रीरामचंद्राचा निरोप, आशीर्वाद आणि मुद्रिका घेऊन सीताशुद्धीसाठीं आलेल्या वायुसूत हनुमंताची जी स्थिति झाली, तीच हिंदुधर्माचें स्वरूप पहावयास निघालेल्या परधर्मीय चिकित्सकांची होत असते. आपल्या शक्तीच्या बलावर समुद्रोल्लंघन करणाऱ्या हनुमंताप्रमाणें संस्कृतासारख्या कठीण भाषेचें अध्ययन करणाऱ्या पंडितास ह्या धर्माचें स्वरूप कळत नाहीं. मातोश्री सीतादेवीनें वेणीफणी कित्येक दिवसांत केलेली नव्हती, अंगावर अलंकार नव्हते, त्यामुळें एखाद्या शब्दाचें शुद्ध व्याकरण स्वरूप

१. तया हृदस्थाच्या ठायीं । दृढ दृष्टी जंव बसली नाहीं । तंव सगुणमूर्ती हृदयीं । भजावी पाही सर्वात्मभावें । एकनाथी भागवत ॥ ३ ॥ ५५३ ॥

२. रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां । नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥ महिम्नस्तोत्र ॥

३. दुःखेन बुबुधे चैनां हनुमान्मरुतात्मजः । संस्कारेण यथा हीनां वाचमर्थान्तरं गताम् ॥ तिष्ठन्ती मनलङ्कारां दीप्यमानां स्वतेजसा ॥

बदललें असतां, त्याचा निराळा अर्थ होऊं लागतो, त्याप्रमाणें हनुमंताला सीतेची ओळख सहज पटली नाहीं, परंतु तिच्या अंगच्या मूळच्या तेजावरून मारुतीनें हीच सीतामाई असें ओळखलें. " त्याप्रमाणें हिंदुधर्माच्या अंगच्या विशिष्ट गुणांनीं, त्यांतील उपनिषद् सिद्धांताच्या तेजानें चमत्कार वाटून ओळख पटते; तरी कित्येक शतकांत त्या धर्माला कोणी पुरस्कर्ता न मिळाल्यामुळें त्याच्या स्वरूपाबद्दल विद्वानांत मतभेद माजत आहे. पौराणिक काळांतील सूर्य, विष्णु आणि शंकर ह्यांची सगुणोपासना ऋग्वेदापासून चालत आलेली दाखविली तरी देवी आणि गणपति ह्यांस त्या कालीं स्थल नव्हतेंच असें म्हणावें लागणार. सूर्यपूजा पार्शांतील मग लोकांनीं आणिली, ख्रिस्ताच्या अनुकरणानें कृष्णचरित्र रचिलें, आणि हिंदुस्थानांतील मूळ रहिवाशांमधील लिंगपूजा हिंदुधर्मांत आली असा पुरावा कित्येक मांडणार. पंढरीचा विठोबा ' युगें अठ्ठावीस विटेवरी उभा " असें वारकरी म्हणणार तर ऐतिहासिकरीत्या विवेचन करणारे दाखविणार कीं बाराव्या शतकापूर्वी ' पंडरिगें ' गांवाचें कांहींच माहात्म्य नव्हतें. यात्रेच्या चार धामांपैकीं पूर्वेकडील पुरीचा जगन्नाथ असें यात्रेकरू सांगणार, तर बुद्धाचा दंतशेष जगन्नाथाच्या मूर्तीखालीं आहे, किंवा होता असें दुसरे पंडित सिद्ध करणार. महार, मांग वगैरे अस्पृश्य जातींच्या म्हसोबा किंवा जोगाई वगैरेची पूजा कोणी मूर्तिपूजेंत घेऊन ती सुद्धां सगुणोपासना म्हणणार तर हें अज्ञानाचें कार्य म्हणून कांहीं लोक तिकडे काणाडोळा करणार. सारांश, ह्या हिंदुधर्मांतील सगुणोपासनेला असलें कांहीं विचित्र रूप आलें आहे कीं, ज्या कोणच्याही एका स्थलावरून ह्या विषयाकडे पहावें, तेथें अव्याप्ति किंवा अतिव्याप्ति हा दोष आल्यावांचून रहाणार नाहीं.

आचार आणि विचार ह्यांची सांगड हिंदुधर्माइतकी दुसऱ्या धर्मांत दृढ झालेली नाहीं. विचार कमी असला तरी व्यवहार अडत नाहीं, शुद्ध आचार असला म्हणजे तो धर्म होय, असें हिंदुधर्माचें बीज असल्यामुळें उपासनेबरोबर जातिभेदाचाही प्रश्न त्यांत आला. सुधारणा किंवा प्रगति उर्फ ऐहिक उन्नति न झाली तरी पतकरली; परंतु समाजांत शांतता राहिली पाहिजे; आणि प्रत्येक व्यक्तीला शक्य तेवढें सुख मिळालें पाहिजे

ह्या हेतूनें समाज रचना होतां होतां जातिबंधन दृढ झालें; त्याप्रमाणेंच ईश्वराविषयीं पूज्य बुद्धि बाळग; आणि तुझ्या आवडीला येईल त्या मूर्तीच्या द्वारानें त्याचें भजन कर, तें पतकरेल, पण हिंदुधर्म सोडूं नको असा उपदेश करण्याच्या उपक्रमानें आलेली मूर्तिपूजा आतां इतकी हिंदुधर्माला खिळली आहे कीं, जातिभेद मोडण्यानें हिंदुत्व नष्ट होण्याच्या भीतीप्रमाणें मूर्तिपूजेच्या अभावीं हिंदुधर्माचें एक अंग लंगडें पडेल, असें वाटत आहे. मनाच्या शुद्धतेबरोबर शरीराची स्वच्छता ठेविली पाहिजे, हा कटाक्ष हिंदुधर्माचा, तर देहदंडणांत कांहींच अर्थ नाहीं; विषयोपभोगापासून पराङ्मुख झाल्याशिवाय धर्म पाळतां येत नाहीं, किंवा ईश्वराराधन होत नाहीं, हें म्हणणें चुकीचें आहे. असले विचार इतर धर्मांचे. धर्मक्रांति किंवा धार्मिक समजुतीची उत्क्रांति ह्याबद्दलचा इतर धर्मांचा उपलब्ध इतिहास पाहिला तर पहिली अनेक देवतांची कल्पना होती, तिच्या जागीं एकेश्वरी मताची स्थापना झाली असें दिसतें; पण हिंदुधर्मांत चक्रनेमिक्रम झाला आहे. एक देवाच्या कल्पनेनंतर पंचमहाभूतांच्या अंतर्गत देवतांच्या स्तुतीचे लेख पहाण्यास मिळतात; व त्यांतून पुनः एकेश्वरी मताची वाट निघाली; पण ती तेथें न थांबतां सर्वभूतीं परमेश्वर, जगीं जनार्दन ह्या मुक्कामाला पोहोंचली. "हीं सर्वभूतें जेथून उत्पन्न होतात, ज्याच्या सामर्थ्यानें हा सर्वसृष्टीचा पसारा झाला, त्याची आराधना आपण स्वतः केलीलीं सर्व कर्में त्याला अर्पण करून चालविली असतां कल्याण होईल, मोक्षसुख मिळेल." असा उपदेश करून " अभिमान, शक्तिमद, काम, क्रोध, दुसऱ्यावर उपजीविकेसाठीं अवलंबून रहाणें, ह्या सर्व गोष्टी सोडून मी आणि माझें हा द्वैतभाव विरसल्यास आनंद भोगावयास सांपडेल, आणि ब्रह्मपदाची वाट हातीं येईल असला निर्गुण निराकाराचा पंथ निघाला. "देवत्व" या कल्पनेंतच हिंदु लोकांना गौण प्रकार न्यून भासूं लागले, सर्व सत्ताधीशत्व कोणच्या देवाकडे, निराळ्या व्यक्तीकडे देण्यांत दोष दिसूं

१. यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततं । स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ भगवद्गीता ॥ १८ ४६ ॥

२. अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहं । विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ भगवद्गीता ॥ १८ ॥ ५३ ॥

लागला. ( सत्ताप्रकारांत द्वैत येतें, अपपरभाव येतो, तो समतेच्या आड आल्यामुळें खपेना. ) ज्याला आपण देवतात्व देतों, तें देवत्व ( प्रकाश ) देणारा ( उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मा—देवाचाही देव ) निराळाच आहे; त्याच्या शोधाला हिंदु लागले होते; मनुष्याच्या मनांत वावरणारी प्रगतीच्छा आणि दोषभावना प्रार्थनेच्या आणि उपचार—अर्पणाच्या मिषानें बाहेर पडतात, त्या भावनांच्या उगमाकडेच त्यांची धांव जाऊं लागली[1]" चालता बोलता देव उणा वाटूं लागून आत्मा तोच परमात्मा, ही भावना उत्पन्न झाली, तशी हिंदुधर्माशिवाय इतर कोठें आढळत नाहीं.

आचाराचें प्राधान्य होतें, तें विचाराचें झालें; परंतु इतक्या खोल विचारांचें गृहण करण्याची शक्ति सर्व मनुष्यमात्रांत असत नाहीं. आचारांत अधिकाराचें माजलेलें खूळ नाहींसें करून "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः" बायका, वैश्य, शूद्र इत्यादिकांना मोक्षमार्ग खुला करण्याच्या हेतूनें ज्ञानमार्ग निघाला; परंतु तो इतरांस झेपेना. तेव्हां त्यांच्यासाठीं उपासना, सगुणोपासना हा मार्ग काढावा लागला. परंतु इतक्यांत बुद्धानें पुढें मजल मारून इतर लोकांस आपल्यांत घेतलें होतें, तेव्हां त्याच्या त्या अज्ञ समजुतीसुद्धां हिंदुधर्मांत घेऊन त्यांना इष्ट तसला प्रकार—मूर्ति पूजेचा—हिंदु धर्माचा एक भाग करावा लागला. ह्याचें अधिक विवेचन शिवपूजा प्रकरणांत दिलें आहे, तें पुढें येईल.

अज्ञलोकांची समजूत एरव्हीं होत नाहीं. त्यांची कल्पनाशक्ति कोती असते. त्यांना गुण व गुणी ह्या जोडीची ताटातूट करण्याचें मनांत आणवतच नाहीं. "कोणच्याही[2] वस्तूचें—आणि त्यांत ईश्वर येणारच—वर्णन करावयास जों जों विशेषणांची, गुणांची संख्या वाढवावी, तों तों त्या

1. Dr. Harold Haffding observes "With the Hindus there was no God who claimed sole sway; they went back to the power which makes all Gods what they are, to the inner aspirations and needs which find vent for themselves in prayer and sacrifices" P. 482 The Indian year book (1914) By Stanley Reed.

2. The greater the number of attributes that attach to a thing, the more real that thing is. Lotze, Metaphysics. ( para ) 49.

वस्तूचें चित्र बरोबर डोळ्यांपुढें उभें राहून समजूत पटते. " " साधारण जनसमाजाचा भावच ह्याच्यापेक्षां अधीक नसतो; त्यांना देव खरोखरच जवळ आहे; आकारानें आहे, असेंच वाटतें, इतर विचाराला ते कुतर्क म्हणणार. " तो परमार्थ त्या प्रत्येकाच्या " हृदयांत वास करीत असूनही बाहेरच्या बाजूस मूर्ति–साकार–रूपानें प्रत्यक्ष आहे–किंवा असला पाहिजे " " ही त्यांची भावना नाहींशी होणें शक्य नाहीं. असला प्रकार सगळीकडे कमीजास्त प्रमाणानें असतोच. परंतु त्याचा निषेध हिंदुधर्मानें केला नाहीं; आणि राजसत्ता बऱ्याच शतकांत हातीं नसल्यामुळें ह्या अज्ञानी लोकांवर जुलूम केला गेला नाहीं, येवढेंच नव्हें तर तसल्या प्रयत्नानें त्यांची श्रद्धाच मुळीं उडेल, हें धोरण बांधून ते सर्व प्रकार हिंदुधर्मानें आपल्यांत ठेविले आहेत. त्यामुळें अमुक एक प्रकार हिंदुधर्मांत नाहीं, असें म्हणवत नाहीं. असली समजूत सर्वत्र झाली आहे. " गैवताच्या काडीपासून प्रत्येकवस्तूची पूजा ह्यांत सांपडेल, ती अखेर योगी केवळ ब्रह्मानंदांत निमग्न झालेले, आणि ईश्वरावाचून व्यवहार अडत नाहीं, असें म्हणणारे सांख्य ह्यांतच येतात." असाच प्रकार टासमानियाच्या धर्माचा आहे म्हणतात. " धर्माचा अमुक एक प्रकार टासमानियांच्यांत नाहीं, असें दाखवितां येणार नाहीं, आणि असेंही सिद्ध करण्यास पुरावा सांपडेल कीं, टासमानियांतील लोकांत धर्म विचार किंवा आचार कांहींच नव्हते. "

मूर्तिपूजाप्रकार.

---

१. तरी ह्या लोकांचा भावार्थ । भाविका देव पदार्थ । अनेक कल्पना वेर्थ । कुतर्कांची ॥ दासबोध ॥ १० ।७।७.

२. सांठवीला राहे हृदय संपुष्टीं । बाहेर धाकुटी मूर्ति उभी ॥ तुकाराम.

३. तृणार्चिकादि योगांता ईश्वरे भ्रांतिमाश्रिताः ॥ पंचदशी ॥ चित्रदीप ॥ २१६ ॥

4. There is hardly any kind of religion which could not be proved to have been the origianl religion of the Tasmanians. And it is even added that the evidence would severe equally well to show that the Tasmanians were without any religion, ideas or ceremonial usages. Extract from Nature dated 18th September 1890.

सर जॉन लबक ह्यांनीं खिस्त धर्माच्या क्षितिजावरून धर्मसमजुतीच्या पायऱ्या लावल्या आहेत, त्या देऊन तसले लोक हिंदुस्थानांत आहेत किंवा नाहींत, एवढें सांगूं म्हणजे ह्या मूर्तिपूजेचे प्रकार नमूद केल्यासारखेंच होईल. धर्मबाबतींत सर्वांत खालची पायरी लबकसाहेबांनीं आस्त्रेलियांतील लोकांस दिली आहे. त्यांच्या धर्माला देऊळ नको, पूजाविधान नाहीं, कर्मकांड नाहीं, सृष्टि निर्माण कोणीं कशी केली, ह्याचा विचार नाहीं, आणि त्रासदायक भूतपिशाच्चयाशिवाय दुसरी देवता आहे, असें त्यांना वाटत नाहीं. ह्यांना ते साहेब एथीस्ट ( Atheist ) अनीश्वरभावी म्हणतात, त्यांच्या मतानें हे देशशत्रु ( Anti-theist ) किंवा निरीश्वरप्रतिपादक नव्हेत. असल्या लोकांची गल्या ( १९११ च्या ) खानेसुमारींत १६०८'५'५६ गणति झाली असून ते सर्व संस्थानिकांचे हद्दींत धरले आहेत.

दुसरा टप्पा फेटिशिजम ( Fetishism ) म्हणजे वशीकरणसाधन ह्या प्रकाराचा. अमूक वस्तु जवळ बाळगली म्हणजे देव पावतो, इतक्यावरच ह्या मनुष्याची भावना थांबते. ह्यांत पूजाविधान नसतें, असलें तरी फार स्वल्प असतें. वस्तु सजीव किंवा निर्जीव असली तरी चालते; परंतु बहुधा निर्जीव जड असते. भक्तांची भावना अशी असते कीं त्या वस्तूच्या साधनानें पूज्य देवतेवर सत्ता चालवून तिला आपल्या म्हणण्याप्रमाणें वागवितां येईल. भालदोरे, ताईत, पंजे ह्यांत येतात. लबक साहेबांच्या मतानें हें वशीकरण वरच्या अनीश्वर भक्तांपेक्षां एका अर्थी वाईट, ह्यानें धर्माला हरकत येते. हे मत खिस्ती धर्माच्या भूमिकेवरून दिलेलें आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

हीं वशीकरण साधनें वरील प्रकारांत विशेष असतात, म्हणजे मंतरलेला दोरा किंवा ताईत हारवला तर दुसरा मंतरून आणल्याशिवाय

---

1. The Australian is an atheist but not an anti-theist. He is not in opposition to the idea of God but wholly destitute of any such conception. p. 488 the story of man By J W. Buel.

2. In one sense fetichism is much more decidedly anti-religious than even atheism. Ibid.

उपयोगी पडत नाहीं; परंतु तीच वस्तू सामान्य झाली म्हणजे उदाहरणार्थ शालिग्राम–घरांतला हारवला तर त्याच्या जागीं दुसरी गंडकी शिला न मिळाल्यास वाटेल तो काळा गुळगुळीत दगड चालूं लागला; म्हणजे तो प्रकार वस्तूपूजनांत येईल; पण वशीकरण साधन होत नाहीं, हा भेद विसरतां कामा नये.

धर्मबाबींत ह्याच्या पुढची पायरी टोटेम ( Totem ) ची लबक-साहेबानीं दिली आहे, परंतु ह्या वर्गांत सर्व सृष्ट पदार्थ, सूर्य, चंद्र तारे ते घेतात; ते बरोबर नाहीं. टोटेमची व्याख्या पुढें येईल; कुलदैवत-पूजा हें त्याचें भाषांतर होय. लांछनपूजा ह्या शब्दानें त्याचें भाषांतर बरोबर होत नाहीं. नर्मदेंतील गोटे तेवढे गणपति, दगडाला शेंदूर फांसला कीं म्हसोबा होतो. खंडोबाचा टांक वाटेल त्या सोनारानें वठविलेला चालतो. असल्या वस्तूंची पूजाही टोटेममध्यें येत नाहीं, असें असून त्यांत घ्यावयाची असेल तर मात्र टोटेममध्यें वस्तूचे वर्ग येतात, आणि फेटिश-मध्यें विशिष्ट वस्तू येते असें म्हणतां येईल.

ह्याच्या वरचा वर्ग शामेनिजमचा ( Shamanism ) म्हणजे श्रमण-पंथाचा. ह्या पंथांत अंगांत येणारा मांत्रिक लागतो; त्याच्या मार्फतीनेंच ईश्वर किंवा देवता बोलतात. स्वर्गासारख्या एखाद्या विशिष्ट ठिकाणीं देव रहातात, आणि जगांत काय चाललें आहे ह्याच्याकडे लक्ष पुरवीत नाहींत; परंतु ह्या देवऋषीमार्फत त्यांना प्रश्न विचारिला किंवा कौल लावला तरच ते आपल्या मनांत काय आहे, हें प्रश्न करणाराला सांगतात. हा प्रकार चीन देशांत फार आहे. आमच्या इकडे असले लोक असतात; पण ते म्हसोबा, खंडोबा, पीर वगैरे कोणाची तरी मूर्ति पुढें मांडून स्वतः चालते बोलते देव होतात.

ह्याच्या वरची पायरी मूर्तिपूजेला लबकसाहेब देतात. ह्या सर्व मूर्त देवांना सृष्टि करण्याचें सामर्थ्य नसलें, तरी त्यांना मनुष्यासारखे आकार असतात, त्यांना मानवशक्तीपेक्षां अधिक शक्ति असते, तथापि भक्ताला त्यांच्या सन्निध जातां येतें. संकटसमयीं त्यांची प्रार्थना केली, त्यांच्या नांवानें हविर्भाग दिला म्हणजे ते संतुष्ट होतात.

वशीकरणसाधन, कुलदैवतपूजन, श्रमणाश्रितविधान ह्या पंथाच्या लोकांना एका निसर्गधर्मी ( animist ) ह्या सदराखालीं घालून त्यांची खानेसुमारी १,०२,९५,१६८ इतकी दिली आहे. ब्राह्मणीधर्माचे म्हणजे मूर्तिपूजक २१,७३,३७,९४३ वेदांत मूर्तिपूजा नाहीं म्हणून ती न करणारे आर्यसमाजवाले २,४३,४४५ आणि मूर्तिपूजा वाईट म्हणून ती टाकणारे ब्रह्मो यांची संख्या ५,५०४ इतकी दिली आहे. एकंदरीनें पहातां मूर्तिपूजकांचीच संख्या मोठी आहे; आणि त्यांच्यांत निसर्गधर्मी धरले तर मग इतर लोक फारच अल्प रहातात.

वरीलवर्गीकरण देण्याचा हेतू इतकाच कीं, कोणी तरी पुरुष ( personal ) सृष्टिकर्ता, दयाघन मानून कोणातरी साधूच्या, प्रेषिताच्या, ईशपुत्राच्या मार्फतीनें, वशिल्यानें त्या परमेश्वरास शरण जाणें, ही जी धर्माची शेवटची व उच्च पायरी लबकसाहेबानीं कल्पिली आहे, ती लक्षांत ठेविली म्हणजे ह्या वर्गीकरणांतील चूक समजेल. भक्तीचा अंतर्भाव ज्यांत नाहीं, श्रद्धापूरीत अंत:करणानें शरण जाणें, ही कल्पना जेथें नाहीं तो धर्मच नव्हे असा त्यांचा समज आहे. त्याच्या व्याख्येप्रमाणें मुसलमान, पार्शी, हिंदूमधील भागवतधर्मी येवढेच लोक धार्मिक ठरतील; पण बुद्ध, जैन, वैदिकधर्मी, कनफ्युशियसचे अनुयायी आणि लाओट्झचे भक्त अधार्मिक म्हणावे लागतील. धर्माची व्याख्या करण्याचा उद्देश ह्या निबंधाचा नसल्यामुळें मूर्तिपूजा भेद येवढ्याच पुरतें हें वर्गीकरण पतकरून ह्या सगुणोपासनेस अवश्य जी श्रद्धा, भक्ति, तिची हल्लीं काय काय स्थिति आहे ती पाहूं.

रसायनशास्त्रांतील आणि इतर शास्त्रांतील शोध, यंत्रकलेची प्रगति, सरकारी नोकरांना आणि इतर व्यवसाय करणारांस पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या श्रमानें फुरसत मिळण्याचा अभाव, आगगाडी वगैरेच्या योगानें सुलभ प्रवास झाल्यामुळें होणारे परिणाम, ह्या सर्वांचा समुच्चय होऊन श्रद्धाळूपणाला तडाखे बसत आहेत; आणि मुसलमानी अमलांत किंवा पोर्तुगीज वगैरे आद्य मिशनरीनांही जें कार्य साधलें नाहीं, तें घडण्याचा म्हणजे वरिष्ठ जातींनीं जो धर्म संभाळावयाचा तेच त्या हिंदुधर्मास कंटाळल्या-

सारखा काल आल्याचीं लक्षणें दिसत आहेत. इतकेंच नव्हें तर मुळींच धर्म नको किंवा ही भक्तीनें होणारी मूर्तिपूजा नको, आणि भजनही नको असे विचार उद्भवले आहेत. खिस्ती धर्माच्या आगरांतही तसलीच लाट उत्पन्न झाल्याचें ड्रेपरसाहेब म्हणत आहेत. " इंग्लंड आणि अमेरिका येथील धार्मिक मंडळीला विस्मय होण्यासारखी स्थिति आलेली आहे. ह्या युगांतील परिस्थितीमुळें धर्मश्रद्धेचा बौद्धिक पायाच पोंखरल्यासारखा झाला आहे. "

असले प्रसंग भरतखंडावर मागें आले होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्राह्मणकाळांतील कर्मकांडाच्या जखडबंदीमुळें धर्माचे आचार विचारवंत पुरुषांस असह्य झाले असावेत आणि म्हणून ऋग्वेद ऋचांतील अनेक देवतांच्या प्रार्थनेचें स्वरूप एकेश्वरी मतासारखें करावें व त्यांतल्या देवाहून निराळेंच एक ब्रह्म म्हणून उपास्य काढावें; व त्याला ज्ञानाच्या अधिकाराशिवाय दुसरी कोणचीही आडकाठी असूं नये, असला प्रयत्न उपनिषत्काळीं झाला; परंतु ह्या ब्रह्मचिंतनांत सगुणोपासनेच्या पलीकडे मजल गेल्यामुळें साधारण जनसमाजाच्या श्रद्धेवर गदा घालण्याचें श्रेय त्या ज्ञानमार्ग्यांच्याच पदरीं आलें. सांख्य, चार्वाक वगैरे एक एक अनास्तिक नास्तिक पंथ निघतां निघतां बुद्धानें मूळ वेदांवर आणि देवांच्या कल्पनेवरच घांव घातला; आणि निराळाच मठसंप्रदाय काढून त्यांत येण्याचें द्वार सर्वांना सर्व जातींना बहुतेक खुलें ठेविलें. तेव्हां हिंदुधर्माच्यानें त्यांना आवरण्याचें काम कठीण होऊन 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी स्थिति होऊन बुद्धानें तुमच्या मूर्तिपूजेस जागा दिली आहेना, तीच योजना आम्हीं आमच्यांतही केली आहे, तुम्हांला ज्ञानमार्ग झेपत नाहीं तर राहूंद्या; पण बुद्ध होऊन देवहीन बनूं नका, असें स्त्रीशूद्रादिकांना ते सांगूं लागले व त्यामुळें ही मूर्तिपूजा हिंदुधर्मास पतकरावी लागली.

महंमदाचा कटाक्ष ह्या मूर्तिपूजेवर अत्यंत होता. खिस्तानेंही प्रथम तसाच उपक्रम केला, परंतु रोमनक्याथलिक पंथांत तरी कुमारी मेरीची

1. In England and America religious persons perceive with dismay tnat the intellectual basis of faith has been undermined by the spirit of the age p. 328 The History of Conflict between Religious and Science By John William Draper.

पूजा राहिली आहे. बुद्धाच्या उदयापूर्वी हिंदुस्थानांत मूर्तिपूजा असती तर तिचा निषेध केल्याशिवाय तो राहिला नसता; आणि पुढें त्याच्या अनुयायांनींच बुद्धाची पूजा सुरू करून ती पतकरण्याचा प्रसंग हिंदुधर्मावर आणिला. दक्षिणेमध्यें मूर्तिपूजेच्या आरंभाला कारण ख्रिस्ती मिशनरी झाले, असें रामतीर्थांनीं आपल्या व्याख्यानांत सांगितलें आहे; व दुसऱ्या कित्येकांचें तेंच म्हणणें आहे, परंतु त्यापूर्वींच आरब लोकांशीं तें दक्षिणेंत सुरू झालें होतें; व त्यांच्या सहवासानें मूर्तिपूजेस आरंभ झाला असें ए. बार्थ वगैरे ख्रिस्तभक्त म्हणतात. महाराष्ट्रांतील भक्तिमार्गाची वाढ महंमदीयांच्या सहवासाच्या कालापासून झालेली आहे; आणि तुकारामानें पंढरीचें महात्म्य जितकें वाढविलें इतकें पूर्वी नव्हतें. मठस्थापनेचा प्रकार श्रीमच्छंकराचार्यांनीं काढिला; आणि दरमठाला आदिदैवत अंबिकेचें करून ठेऊन, पंचायतनापुरती मूर्तिपूजा आकुंचित केली, तथापि संन्यासदीक्षेमुळें शिवपूजेला अग्रस्थान दिल्यामुळें, त्यांच्या पाठीमागें वैष्णवांनीं जोर केला. रामानुज, मध्व, रामानंद, वल्लभ व यांचे अनुयायी ह्यांनीं अनेक पंथ, पूजामार्ग उत्पन्न केले, हा कारभार अकराव्या शतकाच्या पूर्वींचा नाहीं, ह्यांत संशय नाहीं.

सारांश, राजकृपेच्या अभावीं संकटप्रतिकारार्थ जे जे उपाय हिंदुधर्मानें केले, ते तेच त्याच्या अंगावर चढून आले. बहुजनसमाज संतुष्ट राखण्यासाठीं सवलत देतेवेळीं कांहीं अनिष्ट प्रकार डोळे मिटून पतकरावे लागले, परंतु त्याच्यांत विचाराची सतेजता असल्यामुळें तो पुनः पुनः सांवरून कायम राहिला आहे. पाऱ्याची गोळी फुटली तर त्याचे कण विखुरतात; पण ते एकत्र करणारा भेटला कीं, त्याची पुनः गोळी बनते; पण त्याबरोबर मातीचे कण मिश्र होऊन, त्याचें बाह्यरूप किंचित् अंधक होतें. त्याप्रमाणें हल्लीं हिंदुधर्मांतील मूर्तिप्रकार इतके वाढले आहेत कीं, देश, भाषा, जात, पंथ, संप्रदाय, धंदा, मत, आणि आवड इतक्या निरनिराळ्या कारणांनीं निरनिराळे देव, प्रत्येक देवाच्या चारित्राप्रमाणें निरनिराळ्या अवस्थेंतील मूर्ति प्रचारांत आल्या आहेत. इतर धर्मांचा इतिहास इतका जुना नाहीं; आणि जे धर्म किंवा राष्ट्रें नष्ट झालीं, तीं इतर

लोकांशीं किंवा धर्मांशीं टक्कर देण्यास समर्थ झालीं नाहींत. "[1] असा हा नैसर्गिक नियमच दिसतो कीं, जें कांहीं चांगलें व सुंदर असेल तें सदोदित यशस्वीच होतें, किंवा रहातें असें नाहीं. ज्या नियमानें त्याला प्रफुल्लता आली, तोच त्याच्या नाशास कारण झाला." परंतु असा नाश सनातन हिंदुधर्माचा मात्र झाला नाहीं.

सगुणोपासनेचें बीज आस्तिकपणांत, श्रद्धेंत, अंधविश्वासांत, विचाराच्या खालच्या प्रकारांत आहे. मुसलमान म्हणणार कीं, प्रत्यक्ष ईश्वरानें जीं वाक्यें महंमदाला सांगितलीं, त्यांची मीमांसा करण्याचें कारण नाहीं; तीं खरीं धरून पुढें चाला. ख्रिस्ती म्हणणार कीं, ईश्वराच्या अपूर्व कृपेनें कुमारी मेरीच्या पोटीं ईश्वराच्या पुत्रानें जन्म घेतला, ह्या गोष्टीची चिकित्सा करूं नका; आणि वारकरी म्हणणार कीं, विठोबाची मूर्ति कधीं झाली, हा इतिहास पहाता कशाला; त्याची भक्ति करा, त्याला शरण जा म्हणजे ऐहिक व पारमार्थिक कल्याण होईल. चालता–बोलता देव मानल्याशिवाय हा उपासना प्रकारच येत नाहीं. ही उपासना, ही भक्ति द्वैताच्या पायावर उभारलेली आहे. हा भक्ति शब्द उपनिषदांत आढळत नाहीं, तेथें उपासना; आणि ती ओंकाराची सांगितली आहे. ऋग्वेदसूक्तांत तर त्याच्या समानार्थक श्रद्धा शब्द येतो. "[2] भक्ति–अंतःकरणवृत्ति रूपधर्म, अंतःकरणोत्पन्न धर्म असें आम्ही ( ख्रिस्तभक्त ) ज्यास म्हणतों, त्याचा बहुतेक अर्थ ज्यांत आहे, असा 'भक्ति' हा शब्द लौकिक संस्कृतांत आहे; तो भज् धातूपासून निघाला आहे. त्या धातूचा मूळचा अर्थ 'विभागणें, देणें' असा आहे. भज् धातूचा आत्मनेपदीं प्रयोग केला म्हणजे आपल्यालाच कांहीं देणें म्हणजे वरणें, धारण करणें, त्याजवर प्रीति करणें, त्याची पूजा-

**भक्ति.**

---

1 By a natural law of human development there is no unbroken persistence of the good and the beautiful. The very law of blooming it is that leads to decay. P. 21 Lang's history of materialism. By E. C. Thomas.

२–१. पानें ४८–४९. धर्म मीमांसा. प्रो. म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

करणें, असा झाला; आणि त्यावरूनच भक्त ह्या कृदंताचा अर्थ श्रद्धालु, पूजक असा झाला. कोणा एका देवाविषयीं प्रीतियुक्तश्रद्धा अशा अर्थी भक्ति हा शब्द कांहीं उपनिषदांत मात्र आला आहे, इतर वेदांत नाहीं. उत्तरोत्तर त्या शब्दाचें प्राबल्य होत गेलें आहे, आणि भगवद्गीतेंत कृष्ण-भक्तीचें महात्म्य आलें आहे. तेथला त्याचा अर्थ आणि ख्रिस्तीधर्मांतील प्रीति आणि श्रद्धा यांची कल्पना यांचें....साम्य आहे.....आतां असें खरें कीं भारतांत देवांची भीति बाळगितात, तथापि देवांना मित्र असेंही म्हणतात; पिता जसा पुत्राला तसा तूं मला असें उद्गार ऋग्वेदांत अति प्राचीन सूक्तांतही पुष्कळ वेळां येतात. ऋग्वेदाच्या पहिल्याच (१-१-९) सूक्तांत पहा. उपनिषदांत इतर देवांच्या स्थानीं ईश्वराचें महात्म्य आहे, तेथें ईश्वराची भक्ति वर्णिली आहे," परंतु भक्ति सांगणारीं उपनिषदें बहुतेक अर्वाचीन आहेत, हें विसरतां कामां नये. कृष्णयजुर्वेदीय श्वेताश्वतरोपनिषदांत[1] भक्ति शब्द आला आहे; आणि भगवद्गीतेंत त्याला परिणत स्वरूप[2] प्राप्त झालें आहे. तथापि श्रद्धा शब्दही कायम आहेच. श्रद्धा नसेल तर यज्ञ, दान, तप व्यर्थ[3] होतें, श्रद्धा असली म्हणजे ज्ञानप्राप्ति[4] होण्यास वेळ नाहीं, असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरानीं तर श्रद्धेवांचून केलेलें कृत्य व्यर्थ श्रमाचें होईल, अशी बोळवण केली आहे. तुकाराम, रामदास, एकनाथ वगैरे भक्तमालिकेंतील अनेक संतांनीं उपासनेचें, भक्तीचें, मोठेंच प्रस्थ माजविलें, तें महाराष्ट्रांत झालें; उत्तर हिंदुस्थानांत तुळसीदास, कबीर वगैरे साधुपुरुषांनीं सगुणोपासनेचे पोवाडे गायिले, आणि चैतन्यानें नामसंकीर्तन रूपानें 'कांतभाव' देऊन भक्तीला पतिपत्नीच्या प्रेमातिरेकाला नेऊन पोंहोंचविलें. परा, आणि अपरा, भक्ति किंवा सगुणोपासना आणि मूर्तिपूजा, पूर्वभक्ति आणि ज्ञानोत्तर भक्ति असा

---

१. यस्य देवे परा भक्ति र्यथा देवे तथा गुरौ ॥ अ० ६ । श्लो० २३ ॥

२. ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहं ॥ अ० ९ । श्लो० २९ ॥

३. अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् । असादित्युच्यते ।
भ० श्लोक ॥ १७॥२८ ॥

४. श्रद्धावाँल्लभते ज्ञानम् ॥ भगवद्गीता ॥ अ० ४ । श्लो० ३९ ॥

भेद निघाला. " ब्रह्मज्ञान झाल्याची खूण अशी कीं, तो मनुष्य शांत चित्ताचा होतो आणि त्याला कोणच्याही गोष्टीची आशा उरत नाहीं; सर्व प्राणिमात्राविषयीं त्याचा जीव कळकळतो, अशा स्थितींत त्याला माझी उत्तम भक्ति प्राप्त होते. " असें भगवान् सांगतात आणि त्याच श्लोकावरील ज्ञानेश्वरी टीकेंत तर भक्ति आणि ब्रह्मज्ञान एकच म्हटलें आहे. " ज्याला ज्ञानी लोक स्वसंवेद्य ब्रह्मज्ञान म्हणतात, ज्याला शिवभक्त शक्ति हें नांव देतात, त्यालाच भगवंताची उत्तम भक्ति म्हणावी. " तथापि हें विसरतां कामां नये कीं, भक्ति हें पुण्यकारक एक कर्मच होय; आणि ' faith ' फेथ ह्या इंग्रजी शब्दानें खिस्त भक्ताच्या मनांत जी कल्पना येते ती भक्ति शब्दांत नाहीं. "

श्रद्धा शब्द फार प्राचीन आहे. "तेजस्वी इंद्र जेव्हां वज्रानें ( शत्रूंचा ) नाश करितो, तेव्हां त्याच्यावर लोकांची श्रद्धा बसते." " हे इंद्रा, आमची श्रद्धा बसावी म्हणून चंद्रसूर्य नियमानें फिरतात " " श्रद्धायुक्त होऊन आहुति दिली तर ती पोहोंचते." ह्या उदाहरणांतील; आणि ऋग्वेद ( २, १२–५; १–१५–५; ७–३२–१४ ) ऋचांतील श्रद् म्हणजे

१ ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते परां ॥
भगवद्गीता ॥ १८ ॥ ५४ ॥

२ ज्ञानी इयेते स्वसंविति । शैव म्हणाते शक्ति ।
आम्ही परमभक्ति । आपली म्हणों ॥
ज्ञानेश्वरी ॥ १८ ॥ ११३३ ॥

3 It must be borne in mind that Bhakti is really a kind of 'meritorious work' and not equivalent to 'faith' in the Christian sense. P. 63 Brahmanism and Hinduism By Sir Monier Williams.

४ अधाचन श्रद्दधाति त्विषीमत इंद्राय वज्रं निधनिघ्नते वधं ।
ऋग्वेद ॥ १ । ५५ । ५ ॥

५ अस्मे सूर्याचंद्रमसाभिचक्षे श्रद्धे कमिंद्र चरतो वितर्तुरं ॥
ऋग्वेद ॥ १ । १०२ । २ ॥

६ आहुतीः प्रतिपादयेत् श्रद्धया हुतं ॥ मुण्डक ॥ २।२ ॥

हृदय, विश्वास ह्या अर्थापासून श्रद्धा शब्द दूर जातां जातां " ओमच्या सर्व इच्छा सत्य ( खऱ्या, पूर्ण ) कर " असा अर्थ ऋग्वेदांतच होत गेला. पहिल्या अर्थी श्रद्धा शब्दाचें इंग्रजी ' Creed ' क्रीड—( विश्वास ) ह्या धात्वर्थाशीं साम्य आहे. वाजसनेयसंहितेंत ( १९–७७ ) श्रद्धा म्हणजे सत्य आणि अश्रद्धा म्हणजे खोटेपणा, लबाडी असा अर्थ झाला; सांख्यायन गृह्यसूत्र ( २, ७; २, १० ) आश्वलायनगृह्यसूत्र (३–९–१) वगैरे ठिकाणीं श्रद्धा म्हणजे शहाणपण, ज्ञान असा पर्याय आला; अथर्व-वेदांत (६–१३३–४) श्रद्धा शब्दानें तीव्र संवेदना असा अर्थ उत्पन्न झाला; ह्यानंतर तैतिरीय ब्राह्मण ( ३, १२; ३–१–२; २–८–८ ) ह्यांत श्रद्धा हीच एक देवता बनली; आणि नंतर दीक्षा, दान, बक्षीस असा अर्थ त्या शब्दाचाच झाला; परंतु पुनः परत भक्तीचा पर्यायार्थ त्याला आला नाहीं.

निष्ठा ह्या शब्दाचा अर्थ निदान मराठींत भक्ति, दृढश्रद्धा ह्या अर्थानें होतो. भगवद्गीतेंत तो शब्द जेथें आला आहे, तेथें त्याचा अर्थ मार्ग, मोक्ष-मार्ग असा केला आहे. " जगांत[2] निष्ठा ( मोक्षाची वाट ) दोन प्रकारची आहे. एक सांख्याचा ज्ञानयोग; आणि दुसरी योग्यांचा कर्मयोग." पहिल्या वाटेनें जाणाऱ्यास " ओळखी[3] पटल्याबरोबर, ज्ञान होतांच ब्रह्म-स्वरूप प्राप्त होतें; आणि दुसरा मार्ग पतकरणारास " अखेरें[4] मोक्ष मिळतोच, परंतु त्याला वेळ लागतो." ह्याच मार्गांना विहंगममार्ग; आणि पिपीलिकामार्ग असें म्हटलें आहे, म्हणजे कर्ममार्ग; आणि ज्ञानमार्ग एवढेच दोन सांगितले आहेत; उपासना, भक्ति ह्या तिसऱ्या मार्गाचा उल्लेख या अध्यायांत नाहीं, ही गोष्ट मनन करण्यासारखी आहे.

१ अद्भिश्वा वार्या कृधी ॥ ऋग्वेद ८–७५–२ ॥

२ लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनां ॥ भगवद्गीता ॥ ३।३ ॥

३ वोळखीसवें पाविजे । तद्रूपता ॥ ज्ञानेश्वरी ॥ ३।३६ ॥

४ साधकजन निपुण । होऊनिया निर्वाण । पावती वेळें ॥ ३।३७ ॥

हिंदुधर्माची जी वाढ ज्ञानमार्गाची झाली ती मागील इतिहास पहातां इतर धर्माचीही दिसते, मग कोणतें ज्ञान बुद्धिबलानें मिळविलें आहे, कोणास उपजत तर कोणास ईश्वरसाक्षात्कारानें प्राप्त झालें आहे; पण त्या धर्मांत जेव्हां मतभेदानें पंथ उत्पन्न झाले, तेव्हां त्या धर्माला त्यांनीं मनोभावनेचें, हृदयाच्या विकाराचें रूप दिलें;" असल्या धर्मस्वरूपाचा वाङ्मयाशीं कांहींतरी निकटसंबंध आहे असें दिसतें. बुद्धाच्या पराजयासाठीं ज्ञानमार्गावरून खालीं उतरून मूर्तिपूजेचा अंगिकार हिंदुधर्मानें केला. त्यावेळीं संस्कृत वाङ्मयाला भर आला होता. शंकराचार्यांनीं अद्वैत मत स्थापन केलें, पण त्याला पुन: खालीं ओढून द्वैतपंथी अनेक गुरु होऊं लागले, त्यावेळींही असेच संस्कृतभाषेंत पुष्कळ ग्रंथ झाले आहेत, आणि महाराष्ट्रांत भक्तिमार्गाच्या संचाराबरोबर मराठी वाङ्मय वाढून संतमंडळींनीं मराठीभाषेंत अनेक ग्रंथ रचिले आहेत. " अशाप्रकारें ( युरोपांतील ) वाङ्मयाच्या काळांतही जनतेच्या विचारसमुद्रांत जी खळबळ उडाली असते, त्यांचें सांत्वन करण्याचें सामर्थ्य काय तें धर्माच्या अंगीं असतें. त्या वेळीं लोकांस धैर्य देणारा आणि त्यांचें सांत्वन करणारा, एवढेंच कार्य धर्माचें नसतें; तशा प्रसंगीं धर्म हाच काव्याचा विषय, नीतिचा उगम आणि शास्त्रीय शोधास उत्तेजक होत असतो. "

पण आतां तिकडच्या लोकांनाही अशी भीति पडली आहे कीं "इतिहासांची पुनरुक्ति होण्याचा प्रसंग येऊन पुन: खिस्तधर्मानें ज्या दुसऱ्या

1. All antiquity had in the end resolved religion into matter of knowledge, either rational, insenitive or revealed; the sects resolved it into matter of feeling. P. 219 the religions of India By A. Barth.

2. During the classic times religion appears as the sole, concentrated form under which all demands of the mental life find satisfaction; religion as such is not only succour and consolation, but also poetry, morals and science Pp. 173-74. The problems of philosophy By Herold Hoffing translated by Galen M. Fisher (1906.)

3. History repeats itself and it is not without reason that many dread a renewal of paganism in our midst—not indeed in the details of its religious faith, but in its conception of the tone, the rule and the aim of life. P. 183, Religion of ancient Greece. By the Rev. William Milligan. In the faiths of the world.

समजुतीचें उच्चाटन केलें, त्या पुनः आपला अम्मल बसविणार कीं काय कोण जाणे ! आतां येवढें मात्र होईल कीं, कदाचित् पहिल्यासारखे अनेक देव किंवा त्यांची उपासना सुरु होणार नाहीं; परंतु इहलोकच्या यात्रांचें ध्येय, आचार आणि संस्कार पूर्वीच्यासारखेच वाटूं लागणार आहेत." हिंदुस्थानांतली भक्तिही निराळ्याप्रकारची आहे, देवापाशीं कांहीं तरी नित्य मागण्याचा धडा ख्रिस्ती मुलांबाळांना शिकविला जातो. तर हिंदुतील श्रेष्ठ भक्त ईश्वरापाशीं कांहींच न मागण्याचा निश्चय करितात. "ईश्वराची ओळख किंवा आठवण होण्याला कांहीं तरी चमत्कार व्हावा लागत असतो; म्हणजे सृष्टीच्या नियमाप्रमाणें किंवा हळूं हळूं होणाऱ्या गोष्टीशिवाय, एखादा प्रसंग यावा लागतो." आमच्या इकडच्या देवाच्या तोंडीं असे शब्द येतात कीं, जो कोणी या भावनेची किंवा आकाराची आवड धरितो; आणि विश्वासानें त्याची उपासना करूं लागतो, त्याला मी त्याच्याच मनाप्रमाणें होण्याला मदत करून ती भक्ति दृढ होईल असें करतों." आणि बायबलांतील आज्ञा अशी आहे कीं "इतर सर्व देवांपेक्षां आमच्या परमेश्वराची थोरवी मोठी आहे असें जो म्हणणार नाहीं, त्याला मोठें पातक लागेल." ह्या धार्मिक अनुशासनाला राजाज्ञेचें पाठबळ मिळालें; आणि "एकापेक्षां अधिक देव मानले तर तो गुन्हेगार होईल" असलें विशिष्टमत 'Creed' ठरवून टाकल्यावर ईश्वरांत आणि मनुष्यांत द्वैत कायमचें ठेवण्याचेही प्रयत्न झाले. तुकारामासारखे भक्त ईश्वरापाशीं बोलतात इतकेंच नव्हें, तर देव निरनिराळ्या

---

1 God is recognised only when something happens which seems not to appear gradually or under natural law. P. 35 Philosophy of theism. By A. C. Frazer.

२ यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहं ॥

भगवद्गीता ॥ अ. ७ ॥ श्लोक २१ ॥

3. It is blasphemy to deny that the Lord is greater than all gods (Ex. XVII 16)

4. It is blasphemy to say there are more gods than one. Statute of William III.

रूपानें भक्ताच्या घरीं संसारांतलीं कामें करतो, असला अगदीं घरोबा हिंदुस्थानांतल्या भक्तीचा; आणि ख्रिस्ती किंवा मुसलमान अथवा यहुदी यांची तऱ्हा निराळी. त्यांच्याकडे " प्रत्यक्ष देवाशीं बोलणें चालणें कोणत्याच भक्ताचें व्हावयाचें नाहीं. तो परमेश्वर गुप्त रहातो. तो अत्यंत पवित्र आहे; आणि म्हणूनच ( त्याला विटाळ होईल यासाठीं पापी मनुष्याला ) त्याच्या सन्निध जातां येणार नाहीं. ( तो अगोदर कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं; आणि असा साक्षात्कार कोणाला झालाच तर ) तो मरेल, हें जग सोडून जाईल ( किंवा ह्या जगांतल्या व्यवहारास निरुपयोगी होईल.....मुसलमानी धर्म एकेश्वरी कडकडीत आहे; आणि त्यामुळें ही ईश्वराजवळ जाण्याची बंदी इतर सर्व पवित्र स्थळासंबंधानेंही त्यांत आली आहे.....त्या ठिकाणीं म्हणजे देवाच्या पवित्र जागीं देवाचें दर्शक कांहीं सजीव किंवा निर्जीव गुप्त खूण चिन्ह असतें, किंवा मूर्ति असते; आणि असली ती वस्तू फार प्राचीन किंवा अत्यंत पवित्र असते, ती मनुष्याकृति नसून आकाशांतून पडलेली असते, ) असला दगड मक्केस आहे. आतां जरुसलेम येथील देवळांत कोणचीच मूर्ति नाहीं खरी; परंतु तेथील लोक असें स्पष्ट सांगतात कीं याहवे देव आंतल्या गाभाऱ्यांत, अत्यंत पवित्र जागीं, आहे, तेथें जी पवित्र नौका तुम्हास दिसते, तिचे राखणदार ( जयविजय ) त्या देवाच्या दोन्ही बाजूस आहेत." असला एक प्रकारचा गोषा आमच्या इकडे दक्षिणेकडच्या देवालयांत आहे. रामे-

१. भक्त काम करी । न सांगता ॥ तुकाराम.

2. No one is now in direct communion with him. The theocratic god dwells in secret. He is holy which originally meant unapproachable. The man who sees Him must die.........In Islam, the most theocratic of all religions, these prohibitions are even extended to the whole region of the holy places.........There he is represented either by mystic symbols, dead or living, or by an image, and in this case usually by the oldest and most sacred in existence, which has been made by no mortal hand, but has fallen from heaven itself......Where no image of the deity is admitted, as in the case of the temple of Jarusalem, there it is expressly said that Ye have dwells in the holiest of the holies, between the Cherubim who guard the sacred ark. P. P. 172-173 the Science of religion. By C. P. Tiele.

श्वराच्या गाभाऱ्यांत कोणाही यात्रेकरूस जाऊं देत नाहींत; आणि पुजाऱ्याशिवाय दुसऱ्याला देवापाशीं जाण्याची बंदी आहे. महाराष्ट्रांतील शिवालयांत मराठे, स्त्रिया वाटेल त्यांनीं जाऊन देवाला पाणी घालून फूल, बेल वहाण्यास मोकळीक असते. असो. असला गुप्त प्रकार सुरू झाला कीं, तेथें असहनशीलतेची वाढ होणारच. स्पर्शेंद्रियांत कांहीं बिघाड झाल्यावर मंद मंद वहाणारी वाऱ्याची झुळूकही अंगावर शहारे आणते, त्याप्रमाणें ज्या धर्मानें किंवा धर्मपंथानें आपला ठेवा गुह्य ठरविला, तो इतरांचा तिट्कारा करण्याला प्रवृत्त होतो. ह्या सेमेटिक ( Semitic ) तऱ्हेच्या धर्मांचें प्रस्थ इतर धर्म बुडविल्यावांचून नीट बसतच नाहीं. "ईस्लामी धर्मानें जशी तरवार हातीं घेतली तशी ख्रिस्ती धर्मानेंहीं जर्मनींत ( तरी ) घेतली होती." ह्याकारणामुळें धार्मिक कल्पनेचा इतिहास लिहावयाचा असेल तर त्याचीं साधनें इतर देशांतील नाहींशीं झालीं आहेत.

देव नाहीं म्हणणारा बुद्धधर्म, मुसलमानी धर्म आणि ख्रिस्तीधर्म हे हिंदुस्थानाशिवाय इतर ठिकाणीं गेले तेथें कायम होऊन बसले; परंतु बुद्धधर्म कांहीं शतकें प्रबल झाला तरी शेवटीं हिंदुधर्मांत बुडून गेला. मुसलमानी धर्माचा जोर येथें कमी पडला; आणि हीं दोन्हीं उदाहरणें पाहून व पोर्तुगीज लोकांनीं आरंभाला केलेल्या प्रकारांचा परिणाम लक्षांत आणून आतां ख्रिस्तीधर्मानें जुलमाचें काम सोडून दिलें आहे. हिंदुस्थानांतल्या धर्मरूपी वटवृक्षाच्या जाळ्याच्या आंत प्रवेश केल्यास गुरूकडून नाहींसें होण्यांपेक्षां दूर राहून प्रसंगानुसार बाहेरच्या कांहीं खांद्या तोडाव्या किंवा वाळून पडल्यास उचलाव्या, येवढ्यावरच संतोष मानण्याचें काम उरलें आहे. ह्या कारणामुळें धर्मविचारक्रांतीचा इतिहास लिहिण्यास हिंदुस्थानासारखी दुसरी जागा नाहीं.

उत्क्रांतितत्त्वाचे जनक मानले गेलेले डार्विनसाहेब ह्यांच्यापुढें पशुपक्ष्यांच्या नाना जाति नसत्या, तर त्यानीं आपला अनुभव लिहून ठेऊन त्यावरून सिद्धांत कसा बांधला असता ? खाण्यासाठीं, सौख्यासाठीं, चैनी-

1. The sword and the Gospel went together in Germany as the sword and the Kuran in Asia. P. 185 outlines of history By Thomas Keightley.

साठीं कितीतरी पशुपक्ष्यांचा संहार होत असला तरी तिर्यग्विद्याशास्त्राला उदाहरणांची उणीव पडली नाहीं, ही सृष्टीची देणगी अपूर्व आहे; परंतु इतर खंडांतल्या कांहीं जाति नामशेष झाल्या आणि धर्मांचें उच्चाटन झालें तरी जणूं काय धर्मशास्त्राच्या शोधकांना हिंदुस्थान ही भूमि याबाबतींत तशीच राहिली आहे. " धर्माचा इतिहास लिहिण्यास उपयोगी सामुग्री इतर देशापेक्षां हिंदुस्थानांत अधिक आहे. धर्माचें कोणतेंही स्वरूप त्या देशांत नाहीं असें नाहीं. " युरोप वगैरे इतर ठिकाणीं धर्माचा अभ्यास करावयास जाणें म्हणजे वनस्पतिशास्त्राच्या शोधकानें सहाराच्या वाळवंटाकडे धांव घेण्यासारखें आहे. " " ह्या ( धर्म ) शास्त्रांतील पंडित क्लपरॉथ, ( Klaproth, ) रेमूसाट ( Remusat ) आणि कस्टोरेन ( Castoren ) ह्यांना जे परिश्रम पडले, त्यांच्यापेक्षां कितीतरी थोड्या श्रमानें शोध लावण्याची सामग्री हिंदुस्थानांत सांपडणार आहे. आमच्या ह्या भरतभूमीच्या सुपिकपणाची ख्याति तशीच आहे. येथें कसलीही फांदी, रोप कोणी लावो, चांगलें कलम करो, तें रुजतें, जीव धरतें; परंतु जर कां ती विषारी वल्ली असली; आणि कांहीं दिवस परस पोषणानें फोंफावल्यासारखी वाढून अंबरवेलीप्रमाणें मूळच्या खांदीस झांकून टाकणारी झाली, तर अंबर ( अमर ) वेलीप्रमाणेंच ती गलितपत्र, फिक्कट होऊन रहाते; किंवा इकडे तिचा वाढून कोळ होऊन ती खताप्रमाणें मूळ वृक्षाच्या वाढीस कारण होते. " हंटर साहेब म्हणतात कीं, हिंदुस्थान हें सर्व जातींचें ( आणि म्हणूनच त्या त्या धर्मांचें किंवा धर्मविचारांचें मोठें थोरलें प्रदर्शन आहे; आणि ज्ञानाच्या अभ्यासाला उपयुक्त सर्व तऱ्हा--खालच्यापासून तो सर्वांत वरच्या पायरीपर्यंत येथें सांपडतात."

**१. पान १३ पितृमूलक धर्म. म्याक्समुल्लर साहेबांच्या व्याख्यानांचें रा. दिक्षित यांनीं केलेलें भाषांतर.**

2. Europe is, in fact, no more the place for the study of religions than the desert of Sahara for the study of Botany P. 332. Hindu castes and sects By Jogendra Nath Bhattacharya

3. Vide P. 168 The annals of Rural Bengal By W. W. Hunter.

4. '.India " writes Mr. Kunter forms a great museum of races, in which we can study men from the lowest to the highest stages of culture. P. 287 Vedic India By Zenaide A. Rogozin.

हाचप्रकार मूर्तिपूजेचा आहे. इतर धर्मांपेक्षां हिंदूंची सगुणोपासना निराळ्या तऱ्हेची आहे; आणि असली निर्गुणोपासना दुसरी कोठेंच नाहीं. टीलेसाहेब ज्याला (Theocrati) ईशनिष्ट किंवा दैववादी धर्म म्हणतात, त्यांचा शास्त्रीय ज्ञानाशीं विरोध येणारच. "सत्य काय आहे, ह्याचा उलगडा नवीन होऊं लागला म्हणजे तसल्या धर्मावर कठीण प्रसंग येत असतो. ह्या निराळ्या मार्गानें मिळत चालल्लेल्या ज्ञानार्जनापासून ते धर्म प्रथम दूर रहातात, पण मग तें ज्ञान पचवून पहिल्या गुह्य गोष्टींच्या उलगड्यासाठीं त्याचा उपयोग होतो." पण तसला प्रकार हिंदुस्थानांत झाला नाहीं. येथील धर्मविचाराचें क्षेत्र कधींच आकुंचित नव्हतें. इतर धर्म जमिनी-वरून चालतात म्हटलें तर अद्वैत धर्माच्या पायावर उभारलेल्या किंवा अद्वैत तत्वाच्या वाफेच्या जोरावर आकाशांत संचार करणाऱ्या हिंदुधर्माची दृष्टिच बरोबर आहे, असें कित्येक विचारी पुरुषास वाटूं लागलें आहे. "नोव्हेलिस[2] म्हणतो कीं ह्या लांकडाच्या, दगडाच्या मूर्तींत वृक्षवेलींत, हत्यारांत, पशुपक्षांत ईश्वराचें अधिष्ठान ओळखण्या इतकी ज्याची दृष्टि विकास पावली नाहीं, त्याला ईश्वराचा पुत्रच ईश्वर होऊन पूज्य झाला, हें तरी कळणार कसें?"

मूर्तिपूजा हा भक्तीचा गौण प्रकार आहे, आणि तो तसा असल्या-बद्दल धर्मस्वरूपाला नांवें ठेवणें बरोबर जें कोणचें नांव ईश्वरास द्यावें तें अपुरें आहे; ईश्वर पिता, माता, पुल्लिंगी, स्त्रीलिंगी आहे, असला वाद वेडेपणाचा आहे. वास्तविक "निषेधे कृते नेतिनेतीति वाक्यैः[3]" म्हणजे

1. The most striking religious crises proceed from new conceptions of reality. Religion has in these cases usually held herself aloof from knowledge developed in other ways, but has afterwards sought to absorb it and use it for her own symbolic purposes Pp. 183-184. The problems of philosophy By Herald Hoffding translated by Galen M. Fisher.

2. We are reminded of a well-known saying of Novalis to the effect that whoever cannot see God in stocks and stones and implements and trees and animals, surely cannot see him incarnated as the Divine man, P. 550 Brahmavadin. April 11, 1898

३ आत्मबोध.

जें कोणाचें स्वरूप मांडाल त्याच्या अपुरेपणामुळें ईश्वर तसा नाहीं, असें मात्र खास सांगता येतें; हा वेदान्ताचा सिद्धांत खरा ठरणार आहे. "[१]आपण कांहीं केलें, आपली भाषा कितीही शुद्ध आणि केवलार्थक असली तरी एका अर्थी आम्ही सगळे मूर्तिपूजक आहों. ईश्वराविषयीं आमचे विचार अपुर्ते आहेत. त्याला भिन्नभिन्न अर्थाचीं नांवें आम्हीं दिलीं आहेत; आणि योगानें आम्हीं जणूं काय त्याची मूर्ति बनविली आहे." परंतु " ह्या द्वैतेवादी धर्मांना हें बोलणें रुचत नाहीं. त्यांचा देव कोणच्याना कोणच्यातरी प्रकारचा सार्वभौम सत्ताधीश होतो.....त्याचे आपण 'सेवक' आहों, किंवा 'गुलाम' सेवकाचे सेवक आहों असें भक्त बहुधा म्हणवितात, कित्येक वेळां ते आपल्याला प्रेषित किंवा कूळ म्हणवितात, फार झालें तर देवाचा लाडका ('देवानां प्रियः') म्हणजे एखाद्या एकछत्री आणि जुल्मी बादशहाच्या अंतरंगांतले आपण आहों, येवढेंच भक्त म्हणतात. "असल्या देवाला दुसरा देव खपत नाहीं, आणि ते इतर देवांचा, पूज्य वस्तूचा निषेध, नायनाट करावयास पहातात.

**मूर्तिपूजानिषेध.**

"[३]मनुष्यानें कृतीनें केलेली, व्यक्तीची किंवा वस्तूची, काल्पनिक किंवा खरी, कोरीव किंवा रेखीव, चित्राची किंवा पुतळ्याची, जी आकृति असेल तिचा उपयोग पूजाविधींत प्रत्यक्ष होत असला म्हणजे ती मूर्तिपूजा होय." यहुदी लोकांत ही मूर्तिपूजानिषेधाची कल्पना प्रथम निघाली, त्यांत धर्मापेक्षां राजकीय

१ पान ४१ पितृमूलकधर्म, प्रो. म्याक्समूल्लर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

2. In the theocratic religions are the gods are, in one way or another mighty exalted rulers......The worshipper most commonly calls himself their 'servant' or 'slave' *ebid*, abdu, or sometimes their 'protege' or client or at most their 'favourite' *nirgir*, *naram* like the favourites of arbitrary rulers and absolute sovereigns. P. 157 Science of Religion By C. P. Tiele.

3. Mage worship denotes any artificial representation, whether pictorial or scalpturel, of any person or thing, real or imaginary, which is used as a direct adjunct of religious services. P. 716 Encyclopædia Britanica.

हेतूच अधिक दिसतो. ज्या सात जातींच्या लोकांची जमीन काढून इस्रायल लोकांना द्यावयाची होती, ते तर हाकलून द्यावयाचेच होते; पण यहुदी लोकांच्या देवाच्या काननप्रांतांतील सर्व लोक हाकलून दिले. " जे इस्रायल लोक मूर्तिपूजक असतील ते ठार मारावे; परंतु इतरांना त्रास देऊं नये किंवा त्यांच्यावर जुलूम करूं नये, अशीं वाक्यें एकाच ठिकाणीं आढळतात.[1]" ह्यावरून केवळ मूर्तिपूजानिषेधच त्यांत नव्हता हें स्पष्ट आहे. " मूर्ति ह्याचा अर्थसुद्धां परकेदेव असा त्या वेळीं केला होता. बायबलांतील ( मूर्तिपूजा ) निषेधपर आज्ञेचा हेतू परकेदेव नाहींसे करण्याचा आहे. विधर्मी ग्रीक लोकांप्रमाणेंच प्यालेस्टाईनच्या भोंवतालचे लोक मूर्तिपूजक होते, आणि इस्रायल लोक आपल्या देवास सोडून बालदेव आणि अस्टरथ म्हणजे शुक्र ह्यांच्या मूर्तींचे उपासक बनत. " त्यामुळें आपली संख्या कमी होऊं लागलेली

**यहुदी धर्मांतील मूर्तिनिषेध.**

पाहून मूर्तिपूजक यहुद्यांस देहान्त शासन ठेवण्यांत आलें. " आब्राहीमचा बाप टेरा हा होमच्या थोरल्या[3] देवाची पूजा टाकून इतर देवांची सेवा करी; लाबनजवळ मूर्ति ( इ. स. पूर्वी १७३९ ) होत्या; आणि एडोमाइटांची कत्तल

1. In the very same place where it is ordered ' that an Israelite that was an idolater should be put to death, there it is provided that strangers should not be vexed or oppressed. ' ( Exod. XXII ) P. 25 Letters on toleration By John Locke.

2. In the Thora the idols are called foreign Gods The order of the Bible refers only to the abolition of foreign Gods. The nations round Palestine were idol worshippers like the heathen Greeks and the Isralites often rebelled against God by worshipping the idol of Baal and the idol of Ashtaroth i, e. venus. P, 37 Alberunis' India By Dr. Edward C. Sachan.

3. Terah, the father of Abraham had obscurd the worship of the Lord God of Shene " and " served other Gods " Joshna XXIV. 2); Laban (B. C. 1739) had images; and Amaziah ( B. C. 820 ) after the slaughter of the Edomites, brought away "the gods of the children of Seir. " (2. Chron XXV. 14) P. 29 Islam & its founder By J, W. H, Stobast.

केल्यावर अमेझियानें सीरच्या लोकांचे देव बरोबर ( इ. स. पूर्वी ८२०) आणले होते. "

ह्या यहुदी लोकांचा हा जेहोवा ( Jehovah ) देव काय होता हें आपण पाहूं. त्याचा दुष्ट स्वभाव, अनाचार वगैरे सांगण्याचें काम या निबंधाचें नाहीं. रेवरेंड टी. रोंडा वुईल्यम्स ( Rev. T. Rhondda Williams ) हे आपल्या ' बायबलचा खरा अर्थ आम्हांस कळेल काय ? " Shall we understand the Bible " नामक पुस्तकांत जेहोवाच्या स्वभावाचें वगैरे वर्णन दिल्यानंतर म्हणतात कीं, "[1] ह्यावरून असें दिसतें कीं, जाहवे ह्यासारखे दुसरे देव होते; आणि ते सारेच खरे वाटत असत. इस्रायल लोकांचा समज होता कीं, आपल्या जाहवे प्रमाणें मोबाईट जातीचा शेमोश हाही खराखुरा देव आहे; आणि आपल्याला जशी जाहवेनें जमीन, गांवें दिलीं, तशींच शेमोशनें आपल्या भक्तांना दिलीं असें ते म्हणत. " अशींच आणखीं उदाहरणें बायबल ( जजेस III. 15–30; IV 17–24; V 24–31 ) मधून देऊन वुईल्यमसाहेब म्हणतात कीं, बायबलमधील ही कल्पना आतां कोणी कबूल करणार नाहीं. ग्रांट एलनसाहेब आपल्या ' ईश्वराच्या कल्पनेची उत्क्रांति ' ' The evolution of the Idea of God ' नांवाच्या आपल्या पुस्तकांत म्हणतात कीं, "[2] जेहोवा देव कांहीं [illegible] वस्तू असून तो स्थलांत-

1. All this shows that at one time Jahweh was one of many Gods; other Gods were real Gods. The Israelites themselves believed, for example, that Chemosh was as truly the God of the Moabites as Jahweh was theirs, and they speak of Chemosh giving territory to his people to inherit, just as Jahweh had given them territory (Judges XI. 24)

2. Jehovah was an object of portable size for he was carried from Shiloh in his ark to the front during the great battle with the Philistines at Ebenezer, and the Philistines were afraid, for they said "A God is come into the camp." But when the Philistines captured the ark and restored the sacred object, it rested for a time at Kirjath jearim till David, on the capture of Jarusalem from the Jebusites, went down to that place to bring up from thence the ark of the god...The children of Israel in early times carried about with them a tribal god, Jahweh, whose presence in their midst was intimately connected with a certain ark or chest containing a stone object or objects. They did not know the origin of the object in the ark with certainty; but they regarded it emphatically as "Jahweh their god, which led them out of the land of Egypt."

राला नेतां येण्यासारखा होता; कारण एबेनेझर येथें फिलिस्टाईन लोकांबरोबर जें मोठें युद्ध झालें, त्या वेळीं तो (देवपदार्थ) नौकें (सारख्या पेटीं) त घालून शिलोहून सैन्याच्या जिलभीस चालविला होता; तें पाहून फिलिस्टाइन लोक घाबरले, आणि म्हणूं लागले, देव लढाईला आला; आतां कसें होईल ? पुढें फिलिस्टाईन लोकांच्या हातीं ती नौका लागली; पण त्यांनीं त्यांतली पवित्र वस्तू (देवता) परत दिली, तरी ती कीरजाथ–जीरीम येथेंच कांहीं दिवस पडलेली होती. नंतर जेबुसाईट लोकांपासून जरुसलेम परत घेतल्यावर डेव्हिड त्या गांवीं गेला; आणि देवाची नौका घेऊन परत आला....इस्त्रायल लोकांचें कुलदैवत जाहवे त्यांच्याबरोबर असे; आणि त्याचा संबंध ह्या असल्या नौकेशीं किंवा पेटीशीं होता. त्या पेटींत काय होतें, एकच दगडाची वस्तू होती कां दोन–चार होत्या कोणास ठाऊक ? ती वस्तू येथें कशी आली तेंही कोणास ठाऊक नाहीं; परंतु तो आपला जाहवेदेव आहे, आणि त्यानें इजिप्तमधून आपली सुटका केली खास, असें त्यांना वाटत असे.

"असल्या[1] पुराव्यावरून पुढील विधान करण्यास काय हरकत आहे कीं, यहुदी लोकांचा मूळचा जाहवेदेव ज्याचें पुढें उच्च व दिव्य स्वरूप बनून ख्रिस्तीधर्माचा जो देव बनला, तो इस्त्रायल लोकांच्या पूर्वजांपासून आलेला पवित्र दगड होता; आणि तो कशाही तऱ्हेनें घडलेला असला तरी दगडच होता किंवा पूर्वीच्या कोणा सेमिटिक शेखाचा, राजाचा बिघडलेला स्मारक दगड होता." "रेव्हरेंड[2] सी. इ. बीबीनें आपल्या

1. I do not see, therefore, how we can easily avoid the obvious inference that Johweh, the God of the Hebrews, who lately became sublimitated and etherealized into the God of Christianity was, in his origin, nothing more nor less than the ancestral sacred stone of the people of Israel, however, sculptured, and perhaps, in the very last resort of all, the unhewn monumental pillar of some early semitic sheik or chieftain. P. 50. God and my neighbour by Robert Blatchford.

2. It was inecd, as the Rev. C. E. Beeby says, in his book creed and life, a sad mistake of St. Augustine to take this fetish in his box on to the Christian religion as the All Father and Creator of the Universe. Ibid.

" इहलोक आणि विश्वास " नामक पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें ही वस्तू पेटींत असलेली-तशीच सेंट आगस्टाईननें पतकरली; आणि तिला जगाचा कर्ता आणि पिता म्हणून ख्रिस्तीधर्मांत आणली, ही मोठीच चूक केली." "[1] जुन्या करारांत जेहोवाबद्दल हा-एल असा शब्द योजिला आहे, त्याचा अर्थ खरा देव असा आहे. सेमेटिक राष्ट्राच्या पूर्वजांमध्यें देवतेचें पुरातन नांव एल असें आहे. ब्याबिलोनियांतील शिलालेखांत त्याचा इलु ( देव ) शब्द झाला. यहुदीमध्यें बेथ एल म्हणजे एलचें ( देवाचें ) घर असा अर्थ होतो. फिनिशियन लोक बिब्लस येथें एलची पूजा करीत. फिलो म्हणतो कीं, एलचाच इलोहिम झाला. आरबी भाषेंत इलोचा इला ( देव ) झाला आणि त्यापासून महंमदाच्या देवाचें नांव अलइला किंवा अल्ला झालें, हाच अब्रहामचा देव आणि हाच मोझेसचाही देव होता. "

ह्याप्रकारचें मूळस्वरूप असलेला देव अनेकवचनीं होता असें न दिसावें, म्हणून बायबलाच्या भाषांतरकारांनीं प्रयत्न केले आहेत; परंतु "[2] ह्या अलीकडच्या भाषांतरकारास यावें तसें यश आलें नाहीं, आणि अनेक देवांच्या अर्थाच्या खुणा अगदींच नाहींशा झाल्या नाहींत. ज्या कित्येक वाक्यांत २ साम. ७-२३; १ क्रोना. १७-२१; एक्स.

1. In old Testament Ha-El is used for Jehovah the true God One of the oldest names of the duty among the ancestors oi the semitic nations was *El*. Babylonian inscriptions have it as *Ila* God. In Hebrus Beth-el is the house of God. El was worshipped at Byblus by the Phœnicians. Philo connected Elohim with El. In Arabic Eloah is Ilah, God and Al-Ilah or Allah becomes the name of the God of Mahomed as it was the name of the god of Abraham and of Moses. Pp. 177-179 Abridged Lectures on the Science of Religion By Prof. F. Max Muller.

2. The latest revisers of the scripture did not succeed in so effacing every trace of polytheism as to exclude some striking marks of it...In some parallel passages 2 sam VII 23; and, Chron XVII 21: Ex. XXXVII 4-8; and neb. IX 18 the more ancient translations make the word agree with Elohim ( in the plural ) while the more modern write it in the singular. P. 32 The Religion of Israel By Jules Sourey.

३७–४–८; आणि नेह. ९–१८–सारखाच संबंध आला आहे, तेथें पूर्वीच्या भाषांतरांत इलोहिमचा अर्थ अनेकवचनींच ठेविला आहे. पण नवीन पुस्तकांत त्याचें एकवचन करून अर्थ जुळविला आहे. ''

असो. हे ब्याबिलोनियांतील देव किंवा त्यांच्या मूर्ति हिंदुस्थानांतून गेल्या असाव्या, अशाबद्दल ठाणें ग्याझिटियरच्या पान ४०५ वरील टीपेंत आधार दिला आहे, त्याच्याशीं आपल्या विषयाचा फारसा संबंध नाहीं, म्हणून तो उतारा न देतां ह्या जहोवाभक्तांनीं मूर्तिपूजाबंदीचा जो हुकूम काढला, त्याचें अवतरण देऊन ख्रिस्तीधर्मांतील मूर्तिपूजेचें विवेचन करूं. '' तुंमच्यापैकीं जर कोणी इतर देवाला शरण गेला असेल आणि त्याची पूजा करीत असेल, इतर देव म्हणजे सूर्य, चंद्र, किंवा आकाशांतील आणखी कोणी–तर त्यांचा प्राण जाईपर्यंत त्याला दगडांनीं ठेंचा. ''[1]

अनेक देवांच्या उपासनेला आळा घालून एकेश्वरी मन प्रचलित करण्याबद्दल धर्माचें स्वरूप निर्मेळ करण्यासाठीं यहुदी लोकांचा प्रयत्न नवीन नव्हता. '' ईसवीसनापूर्वीं[1] चौदाव्या शतकांत चौथा अमेनोताप ह्या फारोहानें नवीन एकेश्वरी धर्म काढण्याची खटपट केली होती, आपल्या राज्यांतील सर्व लोकांनीं एका सूर्यदेवाची भक्ति करावी, असें त्यानें फर्माविलें होतें. '' त्याप्रमाणेंच यहुदी लोकांना राजकारणांसाठीं इतर देव नाहींसे करून आपली सत्ता स्थापन केली, आणि आपला देव मुख्य ठरविला. '' अशाप्रकारें[3] बनविलेल्या एकेश्वरी यहुदी धर्मांत

1. If there be found among you......that hath gone and served other gods and worshipped them, either the sun or moon or any of the host of heaven......thou shalt stone them with stones till they die. Deut. XVII. 2-5.

1. About 1400 B. C. one of the Pharaohs-it was Amenhotep IV. tried to create a new religion, in which only one God should be worshipped-the sun, a divinity which should be equally adored by all poeple within his kingdom. P. 61 Vol. I. The Historian's History of the world.

3. The Hebru religion, nominally monotheistic retained a large infusion of polytheism. Archangels exercising powars in their respective spheres, and capable even of rebellion, were practically demi-gods; answering in fact, if not in name to the inferior deities of other pantheons. P. 747 Ecclesiatical institutions By Herbert Spencer.

दुसऱ्या रूपानें अनेक देवतोपासनेचें मिश्रण राहिलें आहे. त्यांत मुख्य देवदूत म्हटले आहेत, त्यांना नेमून दिलेल्या अधिकारांत ते स्वतंत्र आहेत आणि त्यांना बंड करण्याचें–देवाचा अधिकार झुगारण्याचें सामर्थ्यही आहे. हे अर्धे देवच नव्हेत तर काय ? इतर धर्मांतील खालच्या दर्जाच्या देवतामंडळांची यांनां नांवें नाहींत येवढाच कायतो फरक. "

या जहोवानें कबूतराचें रूप घेऊन ख्रिस्ताच्या बाप्तिस्माचे वेळीं साक्षात् दर्शन दिलें होतें ( पहा. माथ्यू. III. १६; मार्क १–१०; ल्यूक ३–२१,२२ ). यहुदी लोकांनीं मूर्तिपूजेची बंदी केली त्यावेळीं मूर्तिपूजेची व्याख्या करितांना दुसरे सोळा पदार्थ त्यांत येतात, असें ठरविलें होतें; आणि त्या सर्वांना यहुदीलोक " विलक्षण पूजाप्रकार म्हणत असत; त्या मूर्तिपूजाप्रकाराची कान्स्टाइननें बंदी करून कायद्यानें मूर्तिपूजकांस शिक्षा ठरविली. ख्रिस्ती धर्मांत अशी आज्ञा आहे कीं, " तूं आपल्याकरितां कोणत्याही प्रकारची मूर्ति कोरूं नको. वर

**ख्रिस्तीधर्मांतील मूर्तिपूजा.**

आकाशांत खालीं पृथ्वीवर अथवा पृथ्वीच्या खालच्या पाण्यांत असणाऱ्या कोणत्याही वस्तूची प्रतिमा तूं करूं नको'. पण ही आज्ञा वरचेवर मोडण्यांत आलेली आहे. राजा ज्या मताचा येईल त्याप्रमाणें ह्या पूजाप्रकारांतही फेरबदल झालेला दिसतो. " इ. स. ३०६[3] मध्यें स्पेनमधील एलव्हिया येथें भरलेल्या

1. Cod. Theiod XVI. 10–1; 6–12.

२. पान १२० भौतिकधर्म, प्रो. म्याक्समूलर साहेबांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षीत यांनीं केलेलें भाषांतर.

3. In the year 306 A. D. the synód of Elvia (Spain) decreed (can. 36) that pictures ought not to be in a church, but that which is worshipped and adored be painted on walls......At the Council of Trent (Session XXV) the Church of Rome finally formulated the doctrine on the subject of images which is still of authority within its communion. This doctrine is avowedly based on the decree of the second council of Nice. It is declared that images of Christ, the Virgin Mary, and other saints are to be set up and retained, especially in Churches, and that "due" honour and veneration are to be accorded them by kissing and prostration. Warnings are appended, however, against their superstitious abuse somewhat in the spirit of Gregory the Great's letter and of the decision of the Frankfort Synod. Image worship in Encyclopædia Britanica.

परिषदेंत ठरलें कीं, देवळांत चित्रें ठेवूं नयेत, परंतु ज्याला आपण सन्मान देतों; आणि आदरणीय समजतों त्याच्या आकृती भिंतीवर काढल्यास हरकत नाहीं. ट्रेंट येथें जी मंडळी जमली होती त्यांत रोमच्या धर्माध्यक्षांनीं ह्या मूर्तिपूजेबद्दल जीं मतें ठरविलीं तींच हल्लीं त्या पंथाच्या ख्रिस्तीधर्मांत मान्य आहेत. त्या मताला आधार नाईस येथील दुसऱ्या सभेंत झालेला ठराव आहे, हें उघड आहे. त्यांत असें ठरलें कीं ख्रिस्त, कुमारी मेरी, आणि इतर साधू ह्यांच्या प्रतिमा करून बसविण्यास हरकत नाहीं. त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालणें, त्यांचें चुंबन घेणें असला योग्य मान देऊन त्यांचा आदर दाखवावा. ह्याचा अतिरेक होऊन धर्मभोळेपणानें भलते प्रकार शिरूं नयेत म्हणून ताकीद देण्यांत आली आहे, तिचें स्वरूप थोरला ग्रेगरी याचें पत्र आणि फ्रांकफर्टच्या सभेचा ठराव यांच्याप्रमाणें दिलेलें आहे." हल्लीं "रोमनकॅथालिक[1] पंथांत कुमारी मेरीची प्रार्थना होते; आणि तिचेंच स्वरूप त्यांच्या मनामध्यें प्रबलतर असतें. देवमाता तिला म्हणण्यांतच एकप्रकारचें तिचें वर्चस्व मान्य केल्यासारखें आहे; आणि हल्लीं पोपच्या वाड्यांत एक चित्र आहे, त्याच्यांत त्रिमूर्तीच्यापेक्षां उच्च स्थानीं तिचें चित्र दाखविलें आहे."

प्रथम[2] प्रतिमेचा उपयोग पूजाप्रकारांत नव्हता आणि ख्रिस्ती देवळांत प्रतिमांची बंदी होती. अलेक्झांडर सेव्हेरस ह्याला ख्रिस्ताचे ठिकाणीं

1. Among Roman Catholics the Virgin habitually addressed in prayers, tends to occupy the foreground of consciousness; the title "Mother God" dimly suggests a sort of supremacy; and none in the Vatican may be seen a picture in which she is represented at a higher elevation than the persons of the trinity. P. 747 Ecclesiastical Institutions by Herbert Spencer.

2. The use of images was originally unknown to the worship and excluded from the churches of the Christians. Pagans like Alexander Severus, who recognised something of a divine nature in Christ, and sects which combined heathenism and Christianity together, were the first to introduce images of Christ; as for instance the gnostic sect of the Carpocratians, who placed his image beside the busts of Plato and Aristotle.........It was not in churches, but in private houses, that religious images first came into use among the

कांहीं दैवी तेज वाटल्यामुळें त्यानें आणि अर्धवट ख्रिस्ती बनलेल्या कांहीं पंथांनीं प्रथम ख्रिस्ताची प्रतिमा उपयोगांत आणिली; उदाहरणार्थ कारपोक्रेटिअन पंथ, ह्यांनीं प्लेटो आणि अरिस्टाटल ह्यांच्या शेजारीं ख्रिस्ताचा मुखवटा मांडिला. प्रथम देवळांत मूर्ति आल्या नाहींत, ख्रिस्ती लोक आपल्या घरीं प्रतिमा करूं लागले. बायबलांतील वाक्याप्रमाणें जो पापी परत ख्रिस्ताकडे येईल, त्याला तो मुक्ति देतो, ह्याचें चित्र म्हणून खांद्यावर मेंढरूं घेतलेला मेंढपाळ भांड्यावर कोरूं लागले. अलेक्झांड्रियाचा क्लेमंट यानें ख्रिस्ती लोकांच्या हातांतील आंगठावर अमूक चित्रें असावीं म्हणून सांगितलीं तीं अशीं; पवित्रात्म्याचें दर्शक कबूतर, मासा, स्वर्गाकडे निघालेलें ( मोक्षार्थी प्राणी ) गलबत, ( परमानंद दर्शक ) सतार, ( मोक्षाशेचें चिन्ह म्हणून ) नांगर. असलीं धर्मपुस्तकांतील, चरित्रांतील चित्रें तिसऱ्या शतकांत देवळांतील भिंतींवर झळकूं लागलीं. इ. स. ३०३ मध्यें एल्व्हिरा येथें भरलेल्या सभेनें ह्यांचा निषेध करून भिंती चित्रविण्याचें बंद केलें.

---

Christians. They were fain to put on their goblets the figure of a shepherd carrying a lamb on his shoulder, as the symbol of the saviour who, according to the parable of the Gospel, saves the sinner that returns to him. And clement of Alexandria says, in reference to the signet rings of the Christians. "Let our signet be a love (the symbol of the Holy Spirit) or a fish, or a ship sailing towards heaven;( the symool of the Christian Church of the individual Christian soul) or a lyre (the symbol of Christian joy) or an anchor (the symbol of Christian hope)......Religious paintings passed, as early as the ends of the third century, from domestic use into churches, the walls of them being adorned in this manner.......The Council of Elvira in the year 303 opposed this innovation as an abuse and forbade "the objects of worship and adoration to be painted on the walls." Pp. 402-05 Vol I General History of the Christian Religion and Church translated from the German of Dr. Angusthus Mander By Joseph Torry.

"इ. स. ३२४ चे सुमारास साधूंच्या पूजेचा प्रसार ख्रिस्ती लोकांमध्यें झपाट्यानें झाला. ज्या सत्पुरुषानें जेथें आयुष्य घालविलें, किंवा ज्याला जेथें पुरलें तेथें त्याची प्रार्थना वगैरे सुरु झाली, आणि त्यामुळेंच यात्रांचा प्रचार निघाला." इ. स. ३६१ मध्यें ज्युलियननें पूर्वीच्या देवांचीं देवळें उघडून पूजा सुरु केली आणि त्यांचे पुजारी वगैरे पूर्ववत् आले. असल्या तऱ्हेच्या प्रतिमा, चिन्हें अमलांत येण्याचें कारण ख्रिस्ताची खरी प्रतिमाच नव्हती."

"चौथ्या शतकांत हळुहळू देवळांमध्यें चित्रें काढून शोभा आणण्याचा क्रम सुरू झाला, परंतु तें शतक संपायचा सुमार येईपर्यंत हा प्रचार सर्वत्र पसरला नाहीं. चित्रांतील व्यक्तींना मान देण्यासाठीं त्यांच्या पुढें दंडवत् घालण्याची वहिवाट ग्रीक देवळांतून सहाव्या शतकांत सुरू झाली. पूर्वीच्या काळीं प्रत्येक गांवाची आणि प्रांताची अधिष्ठात्री देवता असे, त्याप्रमाणेंच आतां धर्मासाठीं जीव देणाऱ्यांचें प्रस्थ माजलें.

---

1. About 324 A.D. the worship of saints was speedily disseminated through the Christian world. Each saint was held to be most easily propitiated at the place where his reliqueslay or his life had been spent and hence the origin of pilgrimages. P. 133 Outlines of History By Thomas Knightly.

2. In the reign of Julian (361) the temples of the gods were again opened and the priests restored to their ancient dignity. The very reason why men resorted so much to symbolism and parabolical representations in reference to the saviour and his work was that they were conscious of possessing no genuine image of his person. P, 138 Outlines of History by Thomas Keightley.

3. In the course of the fourth century, men began, by degrees, to decorate the churches also with images a practice, however, which did not become general until near the close of this century......In the course of the sixth century it was already a ruling custom in the Greek church for persons to prostrate themselves before images as a token of reverence to those represented by them......As, under paganism, every province and city had its tutelary deity, so now the martyrs were converted into these tutelary beings. The fable of Castor and Pollux was transferred to Phocas, a martyr, into a patron saint of sailors. Pp. 413, 416, & 475 Vol III Neander's Church history.

क्यास्टर आणि पोलक्सची गोष्ट रद्द झाली तर फोकस ह्यालाच खलाशांचा कुलाभिमानी साधू म्हणूं लागले. ''

फ्रान्सैमधील लोकांमध्यें ख्रिस्ती धर्माचें वर्चस्व झाल्यानंतर चिल्डेबर्टे राजानें इ. स. ५५४त कायदा करून जे लोक आपल्या जवळच्या मूर्ति काढून नेण्याला हरकत करूं लागले त्यांना शिक्षा ठरविली. ह्या मूर्ति असलेलीं सर्व देवळें पाडून टाकावीं असा ग्रेगरीचा हेतू प्रथम होता; आणि त्याप्रमाणें एथलबर्ट राजाला त्यानें पत्र लिहिलें; परंतु आणखी विचार केल्यावर त्याचें मत पालटलें आणि त्यानें मेलिटन उपाध्यायाच्या म्हणण्याप्रमाणें दुसरें पत्र पाठविलें, त्यांत लिहिलें कीं, मूर्तींचीं देवळें चांगलीं बांधलेलीं असलीं तर तीं पाडूं नयेत तर त्यांच्यावर पवित्र पाणी शिंपडून पुण्यकारक चिन्हें मांडून तीं शुद्ध करून घ्यावीं; आणि तींच देवळें आपल्या चालत्या बोलत्या प्रत्यक्ष देवांचीं करून सोडावीं, म्हणजे आपल्या रोजच्या जागीं लोकांना जमण्यास अवघड पडणार नाहीं.

' इकडे धर्मगुरु पोप तर प्रतिमा पूजेचें मंडण आठव्या शतकापर्यंत करीतच होते....ग्रीक पंथांत देवळें व प्रार्थना पुस्तकें यांजवर ख्रिस्त, मेरी

---

1. When Christianity had already assumed the form of a dominent religion among the Franks, King Childebert in the year 554, was obliged to pass a law against those who would not allow idolatrous images to be removed from their estates.........At first it was Gregory's intention, which he intimated to King Ethelbert ( L. XI. cp. 66 ) to have all the temples of idolatry destroyed; but on maturer reflection he altered his mind and despatched a letter after the abbot Mellitus ( L. XI cp. 76 ) in which he declared that the idol temples, if well built, ought not to be destroyed, but sprinked with holy water and sanctified by holy relics, should be converted into temples of the living God; so that the people might be the moie easily induced to assemble in their accustomed places. pp. 11 & 20 Neander's. Church History Aol. V.

2. The popes had already, down to the opening of the eighth century, become zealous defendors of 'miage worship.........In the Greek church, not only the churches and church books were ornamented with pictures of Christ, of the Virgin Mary and of saints, but these objects were to be seen fronting the palaces of the emperors and

आणि सत्पुरुष यांची चित्रें झळकूं लागलीं, येवढेंच नव्हे तर राजाच्या वाड्यासमोर, इतर लोकांच्या घरांच्या भिंतीवर ह्या सर्वप्रकारचीं चित्रें दिसूं लागलीं, आणि घरांतल्या भांड्यांवर आणि कपड्यांवर त्यांच्याशिवाय शोभा नाहीं, असें वाटूं लागलें. प्रत्यक्ष तारक प्रभूनें अगबार राजास नजर केलेलें खिस्ताचें चित्र आपल्याजवळ आहे; म्हणून एडेसा शहरास अभिमान वाटूं लागला; आणि मनुष्याच्या पापी हाताचा स्पर्श न झालेली देवमातेची मूर्ति ह्याच शहरांत दिसूं लागली.'

"इसौरियांचा लियो ह्या राजानें ह्या प्रतिमापूजेवर पहिलें शस्त्र उचलिलें; त्यानें ७२५ त पहिला कायदा करून मूर्तीपुढें दंडवत घालण्याची आणि गुडघे टेंकण्याची चाल बंद केली. सन ७३० मध्यें त्यानें असें फर्माविलें कीं, धार्मिक कारणांसाठीं कोणच्याही प्रकारच्या प्रतिमेचा उपयोग करूं नये. सन ७५४ मधल्या कुस्तुंतुनियाच्या सभेनें ठरविलें कीं, ह्या निंद्य चित्रकलेनें काढलेली प्रतिमा कशावरही असली तरी ती खिस्ती देवळांत येतां कामां नये. कुस्तुंतुनियांतील प्रत्येक इसमाकडून आपण प्रतिमेची पूजा करणार नाहीं, अशी शपथ वेवविण्यांत आली."

नाइस येथील सभेच्या सातव्या बैठकींत पुनः प्रतिमापूजा कबूल झाली तर इरेनीचा मुलगा कान्स्टंटाईन याच्या नांवानें ७९० मध्यें ती

---

on the walls of private houses; and even household furniture and wearing apparel were ornamented with them......The city of Edessa possessed its famous *ancite* in the pictures of Christ, sent to King Agbar, as it was pretended by our Saviour himself; and in an image of the mother of God made without hands. pp. 277 & 278 Ibid.

1. The First from whom this war against imageworship began was the Emperor Leo the Isanrian......His first ordinance in 726 was directed against such signs of an idolatrous homage as the custom of prostration and kneeling down before them. In the year 730 he issued an ordinance where by all images for religious purposes were forbidden. The Council of Constantinople in 754 settled that every image of whatever material, produced by the wretched art of printing, should be banished from the Christian Church.........Every citizen of Constantinople had been placed under oath never again to worship an image. Pp. 279, 281, 288, 299, 307 Vol. V Neander's Church History.

सभाच नाकबूल करण्यांत आली. ७९४ मध्यें फ्रांकफर्ट येथें भरलेल्या सभेनें मूर्तिपूजेचा निषेध केला. हीं भांडणें विकोपास जातां जातां दुसऱ्या अनेक कारणसमुच्चयानें प्राटेस्टंट पंथ फुटून निघाला; आणि त्याच्यावर अगदीं शुद्ध म्हणून क्वेकर पंथ निघाला. खिस्ती धर्माची दीक्षा आणि मूर्तिपूजेचा त्याग ( निदान पूर्वींच्या इतर मूर्तिंचा त्याग ) ह्या गोष्टी समानार्थक असल्यामुळें युरोपांतील निरनिराळ्या लोकांनीं केव्हां खिस्ती धर्म स्वीकारला येवढें नमूद केलें म्हणजे मूर्तिपूजा कोठें कोठपर्यंत उघड उघड होती हें लक्षांत येईल. "गॉथलोकांनीं चौथ्या शतकांत खिस्तमत पतकरिलें. सातव्या शतकापर्यंत ब्रिटनमध्यें त्याची डाळ शिजली नाहीं. फ्रांक, सॅक्सन, डेन, नार्वेजियन आणि आइसलॅंडर यांनीं अनुक्रमें ७ व्या, ९ व्या, १० व्या व ११ व्या शतकांत खिस्तदीक्षा स्वीकारिली. स्वीडनमधील मूर्तिपूजा बाराव्या शतकापर्यंत पूर्ण विलयास पावली नव्हती. फिन आणि लिथुआनियन लोक तेराव्या व पंधराव्या शतकापर्यंत जुन्या धर्माचेच होते."

बायबलांतील ईश्वरीसाक्षात्कार नांवाच्या भागांतील कांहीं वाक्यांचें भाषांतर पुढें दिलें आहे, त्यावरून ती मूर्तिपूजा आहे, असें सहज लक्षांत येणार आहे. "सांत मेणबत्त्यांच्यामध्यें एक ईशपुत्राप्रमाणें सजलेला होता, त्यानें पायघोळ कपडा घातलेला होता; आणि मध्यावर सोनेरी पट्टा घातला होता, त्याचें डोकें आणि केंस बर्फाप्रमाणें पांढऱ्या लोंकरीसारखे

1. Vide page 324 & 335 Ibid.

2. P. 254 Tuetonic and Scandanavian Religions. By the Rev. George Stuart Burns in the faiths of the world.

3. 13. And in the midst of the seven candle sticks one like unto the son of man, clothed with a garnment down to the foot, and girt about the paps with golden girdle. 14. His head and his hair were white like wool, as white as snow; and his eyes were as a flame of fire: 15. And his feet like unto the fine brass, as if they burned in a furnace and his voice as the sound of many waters. 17. And when I saw him, I fell at his feet as dead, and he laid his right hand upon me, saying unto me, fear not; I am the first and the last. 18. I am he that liveth and was dead and behold I am alive for ever. Revelation.

होते, व त्याचे डोळे विस्तवाच्या ज्योतीप्रमाणें होते. झगझगीत पितळे-सारखे त्याचे पाय असल्यामुळें, ते भट्टींत तापत असल्याप्रमाणें वाटत; आणि त्याचा आवाज पुष्कळ पाण्याच्या (समुद्राच्या) शब्दाप्रमाणें (गंभीर) होता. त्याला पहातांच मी मेल्यासारखा होऊन त्याच्या पाया-पाशीं पडलों, त्यानें मला उजव्या हातानें कुरवाळून म्हटलें भिऊं नको; (जगाचा) आदि आणि अंत मी आहें. मीं जन्म घेतला, मेलों होतों आणि आतां पहा पुनः आलों, तों नेहमीं जिवंतच राहीन." अशाच अर्थाचा उतारा ड्यानियेल[1] (९.) मध्यें आहे.

ह्या ख्रिस्तीमतांतील निरनिराळ्या गोष्टी कशा ठरत गेल्या तें सांगण्यानें विषयांतर होईल; परंतु यहुदीधर्माच्या देवाची जशी मीमांसा आम्हीं केली; तशी ह्यांतील त्रिमूर्तींची कल्पना सांगितल्याशिवाय विषयाची पूर्तता होत नाहीं; म्हणून तेवढा भाग सांगून महंमदीधर्माकडे वळूं. "ह्या त्रिमूर्तीं-[2]पैकीं "पुत्रा' ची योग्यता काय हें ठरविणें हाच मुख्य वादाचा विषय होता....रोम येथील क्याथलिक आणि ईशप्रतिनिधि पोप जसे शासन देत त्याच्या अनुकरणानेंच नीसीयाच्या सभेंत ठरलें कीं, ईश्वराचा पुत्र अमुक एका वेळीं नव्हता; आणि तो जन्मास येण्यापूर्वीं त्याचा अभाव होता, असें जो कोणी म्हणेल त्याला अनेक पातकें लागतील;" आणि ह्या ठरावाची अम्मलबजावणी कान्स्टंटाईन (राजा) नें केली." परंतु "ईशपुत्र[3] आणि

1. 9. I beheld the thrones were cast down and the Ancient of days did sit, whose garment was white as snow and the hair of his head like the pure wool, his throne was like the fiery flame and his wheels as burning fire &. Daniel.

2. The chief point in discussion was to define the position of "the son"......The Council of Nicca attached an anathema as the Holy Catholic and Apostolic church anathematizes those who say that there was a time when the son of God was not and that before he was begotton, he was not &c. and Constantine enforced this decision—P. 53 History of conflict between religion and science. By John William Draper.

3. It took two centuries and half to determine the relation of the son of God to the Father. For three centuries more it remained unsettled whether Christ had more than one nature and one will. How

पिता ह्यांचा संबंध ठरण्याला अडीचशें वर्षें गेलीं; पुढें तीन शतकेंपर्यंत ख्रिस्ताचें स्वरूप एकच, आणि त्याची इच्छाही एकच आहे किंवा अनेक आहेत हें अनिश्चितच राहिलें; आणि नीशियाला सभा भरून अनेक मुद्यांचा खल होऊन पन्नास वर्षें झालीं तरी त्रिमुर्तींपैकीं तिसरी व्यक्ति पवित्रात्मा ह्याच्याबद्दल कसा मतभेद राहिला होता, हें ग्रेगरी नाझिनझेनच्या शब्दानींच सांगितलें तर असें होईल. आमच्या विचारवंत पुरुषांचीं मतें पाहिलीं तर कोणी म्हणतात पवित्रात्मा ही एक क्रिया किंवा स्थिति आहे, कोणी म्हणतात तो प्राणी आहे, कोणी म्हणतात ईश्वरच तो; बायबलांत ह्या विषयाचा कांहींच निश्चय दिला नाहीं; म्हणून काय म्हणावें तेंच सुचत नाहीं, असें म्हणणारे कांहींजण आहेत." पुत्रापासून जितक्या प्रमाणानें तितक्याच प्रमाणानें बापापासून पवित्रात्मा झाला, असें वाक्य उच्चारण्याची परवानगी ५८९ पर्यंत मिळाली नाहीं; आणि तीसुद्धां फक्त स्पेन देशांतच मिळून तसा प्रचार सुरू झाला." हेगेल साहेब म्हणतात कीं, आज १९०० वर्षें झालीं तरी पवित्रात्मा ह्याचा संबंध पित्यापुत्राशीं कसा लावावयाचा हें अद्याप निश्चित नाहीं! येशूख्रिस्तानें सर्व मानवजातींच्या पापाबद्दल दंड भरून आपला स्वतःचा बळी दिला, पण हा बळी कोणी घेतला, दंड कोणाला भरला ह्याचें उत्तर अनसलेम ( मृत्यू ११०९ त )

---

little concord had been reached respecting the Third Person of the Trinity, more than fifty years after the Council of Nicaca, Gregory Nazianzen tells us in these words: "Of our thoughtful men some regard the Holy Spirit as an operation, some as creature, some as God; while others are at a loss to decide, seeing that scripture determines nothing on the subject," and not till the year 589 and then only in Spain, was the racital introduced, that the Holy Spirit proceeded from the Son as well as from the Father. Abridged from Pp. 134–35 Seat of Authority in Religion. By James Martinean.

1. The Holy Ghost, a mystical being, over whose incomprehensible relation to the Father and the Son, millions of Christians theologians have racked their brains invain for the last 1900 years. P. 98 the Riddle of the Universe.

पर्यंत ठरलें नव्हतें. " पुढें इरेनियस आणि आरिजन, आगस्टाईन आणि निसाचा ग्रेगरी ह्यांनीं त्या प्रश्नाचें उत्तर दिलें कीं दंड सैतानाला भरला." आणि ह्यामुळेंच कीं काय कोण जाणें पण क्लाड साहेब म्हणतात कीं, " हा सैतान खिस्तभक्तांनीं खरा मानलाच पाहिजे, नाहीं तर मग खिस्त-मताचा पाया ज्याच्यावर उभारला तो पापविमोचनविधीच लंगडा पडणार आहे." सैतान, भूत खरें मानलें नाहीं, तर पापविमोचन करणार कोणाशीं?

सारांश गंगेचें मूळ आणि ऋषीचें कूळ शोधूं नये, हाच आमच्या पुराणांतील सिद्धांत ह्या खिस्तीधर्माच्या तत्त्वाला, उत्पादकाला वगैरे लागू करणें भाग आहे. बाप्तिस्मा देण्याबद्दलच्या विधीबद्दलही तो कसा द्यावा वगैरेप्रकाराचा नियम पीटर्लांबर्टच्या हातूनच घातला गेला, तरी त्यांत कोणचीं नांवें उच्चारावीं ह्याबद्दल निरनिराळी वहिवाट आहे. बल्गेरियन लोकांना बाप्तिस्मा देतेवेळीं पोपनिकोलला एका खिस्ताचें नांव पुरेसें वाटलें. दमास्कसच्या जानला दोन सक्रामेंटें आवडलीं, डायोनिशनच्या पुस्तकांत त्याचीं सहा झालीं. आमच्याकडे " नाथाच्या घरची उलटीच खूण " वगैरे जें पद आहे, त्यासारखाच एक ग्रंथ लार्ड बायरननें १६४८ मध्यें केलेला आहे. त्यांतील ह्या त्रिमूर्तीचा तेवढा उतारा देतों " खिस्तभक्त म्हणविणारा जे तीन आहेत त्यास एकमानतो, आणि एक आहे, तोच तीन समजतो. पुत्रापेक्षां पिता वयोवृद्ध नाहीं, आणि पुत्र हा पित्याच्या समान आहे; आणि ह्या दोघांपासून झालेला एक ( तिसरा ), ह्या दोघांच्या बरोबरीचा आहे, हा विश्वास खिस्तभक्ताचा आहे."

1. When we ask to whom he paid it (ransom) Irenæus and Ori. gen, Augustine and Gregory of Nyssa, reply, that it was paid to the devil. P. 135 Seat of Authoriiy in Religion By James Martinean.

2. Giving up belief in the devil is practically giving up belief in the atonement, the central doctrine of the Christian faith. P. 30 Pioneers of Evolution from Thales to Huxly By Edward Clodd.

3. Vide P. 136 Seat of Authority in Riligion By James Martinean.

4. He believes three to be one, and one to be three; a Father not to be older than his Son, and the Son to be equal to his Father; and one proceeding from both to be equal to both. Quoted at P. 177 Ibid.

पण " ह्या खिस्तीधर्मांत आणि मुसलमानी धर्मांत ईश्वराच्या विषयींची कल्पना निर्मल करून आपण त्याला केवल भावना देऊन बनविली आहे. ( म्हणजे त्यांतील सगुणपणा काढूनही तो देव पुरुष, प्रत्यक्ष दिसणारा ठरविला आहे. ) तो मूळ मोलाक देवाच्या भयंकर आणि राक्षसी पूजा कल्पनेंतूनच उत्क्रमण पावला आहे काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर होय असें ड्यानमर, मुव्हर्स, वेनन, टील, फिएन्सी, डन्कर्क म्हणतात. "

आतां मुसलमानी धर्म घेऊं. जानसन म्हणे कीं, धर्म काय ते दोन, खिस्ताचा आणि महंमदाचा. मूर्ति फोडण्याबद्दल ह्या धर्माचें नांव जितकें गाजलें, तितकें खिस्तीधर्माचें नाहीं. ह्या धर्माची आज्ञा फार कडक असते. " तुम्ही मूर्तींची पूजा कां करितां ? पण ह्या मूर्ति म्हणजे काय ? त्या तुमच्या पुढें अगदीं दुबळ्या आहेत; त्यांना डोळे आहेत काय ? त्यांना ऐकतां येतें काय ! मग त्यांच्या नादीं कां लागता ? "

**मुसलमानी-धर्मांतील मूर्ति-पूजा.**

हा सपाटा त्याचा. क्वेकरपंथाप्रमाणें चित्रांचा मुद्धां तिट्कारा ह्या धर्मानें दाखविला. त्यांची समजूत अशी आहे कीं, " सजीव प्राण्यांचीं चित्रें खोलींत असतांना जर प्रार्थना केली तर ती व्यर्थ जाते, इतकेंच नव्हे तर त्या खोलींत कोणी मृत्यू पावेल तर त्या ठिकाणीं अल्लाच्या कृपेची आणि दयालुत्वाची ग्वाही देणारे देवदूतांस येण्यास हरकत होते. जस्टिस अमीर अल्ली म्हणतात कीं, मूर्तिच्यावर इतका कडक निर्बंध ठेवला नसता तर आरंभीं मुसल्मान झालेले लोक पुनः मूर्तिपूजक बनले

1. Has the purified and spiritualized idea of God of Christianity and Mahomedanism emerged, by evolution, from the sanguinary and sinister worship of Moloch? It is not only Danmer, who has thought that it is so, but Movers, Kvenen, Tiel, Finzi, Dunckerk, all hold the same belief, P. 40 The Religion of Israel By Jules Souray.

२. कुराण. सुरा ७ वा.

3. Presence of pictures of animated objects in a room not only vitiates prayer performed in that room, but is believed to prevent the entrance of Allah's angels of grace and mercy, if a death takes place in the room........Mr. Justice Amir Ali ( Life and teachings of Mahomed 1. 573 ) observes......this deeply implanted iconoclasm saved them (early Moslems) from relapsing into idolatory. P. 93 Footnote. Gujarat Gazetteer.

असते." असल्या धर्माची उत्पत्ति झाली त्या वेळची हकीगत दिल्याशिवाय ह्या मूर्तिपूजाद्वेषाचें कारण बरोबर समजणार नाहीं; आणि तसें करण्यानें हा निबंध अमर्याद वाढेल; यासाठीं या द्वेषाचें मूळ कोठून निघालें, तें प्रथम सांगतों; आणि तें शक्य तितक्या संक्षिप्तप्रकारचें करणें भाग आहे.

ग्रीस राष्ट्रांच्या अमदानींत, इ. स. पूर्वी ८० या शतकापासून ख्रिस्ती-शकाच्या पांचव्या शतकापर्यंत जी कांहीं सुधारणा झाली, तिला धुळीस मिळविण्याला अलरिक ( Alaric ) चे स्वारांची धाड कारण झाली, त्याप्रमाणेंच ग्रीसपेक्षां अधिक जोमाच्या रोमराष्ट्राच्या प्रगतीचा परिणाम महंमदानुयायांच्या वीरांच्या समशेरीपुढें नाहींसा झाला. "येशू हो ईश्वराचा पुत्र असें ख्रिस्ती म्हणतात; आणि मुसलमान म्हणत नाहींत; ह्याशिवाय त्या दोन्ही धर्मांचा मुख्य तत्त्वाविषयीं वाद नाहीं. मानवसमाजामध्यें पारमार्थिक विचाराच्यामुळें जी खळबळ उडते, त्यापासूनच ह्या दोन्ही धर्मांचा जन्म आहे. यहुदी आणि रोमन लोकांमध्यें जी निष्ठूर ऐहिक उपभोगाची लालसा वावरत होती, तिचा प्रतिकार एकानें केला; आणि आरब लोकांत ज्या दुष्ट चाली आणि रूढी पडल्या होत्या; आणि त्यांच्यांत जी नीच प्रकारची मूर्तिपूजा वाढली होती तिच्यावर दुसऱ्यानें हल्ला चढविला."

"हे अरबें मूर्तिपूजक होते; प्रथम त्यांच्यांत सूर्य, चंद्र वगैरे खगोलस्थ देवतांची उपासना होती, आणि पुढें त्याला हीनत्व येऊन केवळ वस्तुपूजनाचा प्रकार सुरू झाला. मक्केच्या देवळांत रोजची पूजेची मूर्ति निराळी, ह्याप्रमाणें ३६० मूर्ति गोळा झाल्या होत्या." दक्षिण अरबस्था-

1. Excepting for the conception of the sonship of Jesus, there is no fundamental difference between Christianity and Islam. Both are the outcome of the same spiritual forces working in humanity. One was a protest against heartless materialism of the Jews and Romans; the other a revolt against the degrading idolatry of the Arab, their ferocious customs and usages. Pp. 157-58 The Spirit of Islam By Ameer Ali Syed.

2. The religion of the Arabs was idolatrous-originally salian or the worship of the heavenly bodies, it had degenerated into gross fetichism. In the temple of Mecca, there was a collection of 360 idols, (one for each day) P. 364 Mahomadanism By the Rev. James Cameron Lees. In the faiths of the world By John Caird.

नांत असतारिता ( Astarte ) देवीची पूजा होती. " अरबस्थानांत तैफ येथें अल्लाची बायको अल्लाट हिचें प्रसिद्ध देऊळ होतें, व त्याला मक्केच्या मशिदीच्या खालोखाल मान असे, त्याचा नाश महंमदानें करविला. " " मक्केस येणारे लोक तेथील पवित्र पंचक्रोशींतील दगड बरोबर नेत आणि कब्बा दगडाची जशी पूजा वगैरे करावयाची तशीच त्या उचलून नेलेल्या दगडाची करीत; आणि त्यापासून पुढें कसल्याही ओबडधोबड दगडाची पूजा सुरू झाली असावी. " मक्केचें कुलदैवत होबाल होता; त्याची मूर्ति कब्बा दगडाच्या आसपास होती; त्याची प्रार्थना केली असतां पाऊस पडतो, अशी समज होती. " ह्या होबाल भोंवतीं तीनशें साठ मूर्ति होत्या आणि तसेंच दोन गजले सोन्यारुप्याचे असून अब्रहाम आणि त्याचा पुत्र ह्यांच्या मूर्ति होत्या. " बनु असाद लोक बुधाची, जोधान लोक गुरुची, बनुताज आणि केस आयलन ताऱ्यांची, कोरेश जातीपैकीं कांहींजण आललाट, आल मनाट आणि आलउझ्झा ह्या तीन चंद्रस्वरूपांची, पुजा करीत; बनुकठाम जातीचे झूल खुलासा देवाचें देऊळ येमेन येथें, बनीरबीया जातीचे रोठाचें देऊळ नजद येथें, झूल सबतचें देऊळ इराक येथें आणि मनाटचें देऊळ समुद्र-काठीं कोदायद येथें होतें.

1. Allat, feminine of Allah had her famous temple at Taif in Arabia, was second only in importance to the sanctuary at Mekka and was destroyed at the command of Mahomed. P. 181 Lectures on Science of Religion by F. Max Muller.

2. The worship of rude unshapen stones may have arisen from the practice of carrying away to distant parts stones from the sacred enclosure at Mecca and of paying to them the ceremonial observances usual at the Kabba. P. 32 Islam and its founder by J. W. H. Stobart.

3. About the Kabba was the famous idol Hobal, the tutelary deity of Mecca, supposed to have the power of granting rain. P. 32 Ibid.

4. Round the great god Hobal were 360 idols, the two gazālas of gold and silver and the images of Abrham and his son. P Liii Introduction; the Spirit of Islam by Amir Ali syed.

5. PLV & LVI Ibid.

" थ्रेसमधून[1] आलेल्या आणि अरबस्थानांत वसाहत करणाऱ्या कांहीं बायका कुमारी मेरीची पूजा करीत असत. त्या आपल्याला मेरीच्या आराधिणी म्हणवीत; तिच्या उत्सवाच्या दिवशीं रथ निघे आणि मेरीला अर्पण केलेल्या पदार्थांचा नैवेद्य दाखवून ते पदार्थ त्या खात. " कोणी म्हणतात कीं सीरीस ( Ceres ) च्या पूजेचीच अनुकृति ही होती. " असल्या-तऱ्हेचा मूर्तिपूजेचा प्रकार महंमदाच्या दृष्टीस पडत होता; आणि व्यापारासंबंधानें बोझरा येथें त्याला वारंवार जाण्याचे प्रसंग येत. ह्या वेळीं तेथील मठांत नेस्टोरियन पंथाचा बहिरा नांवाचा संन्यासी होता, त्याच्याशीं महंमदाच्या पुष्कळ भेटी होत. " ह्यां[2] भेटींचा परिणाम असा झाला कीं, पूर्वेकडील खिस्ती लोकांच्यामध्यें शिरलेल्या मूर्तिपूजेच्या प्रकाराविषयीं, नव्हे सर्वप्रकारच्या मूर्तिपूजेविषयीं त्याच्या मनांत तिटकारा भरला; आणि त्यामुळें तो येशू हा देवाचा पुत्र असें न म्हणतां, मेरीचा मुलगा असें बोलूं लागला. "

अशा शिक्षणानें तयार झालेला आणि कांहींतरी अपूर्व गोष्ट करून दाखविण्याची इच्छा बाळगणारा महंमद यानें " जो मूर्तिद्वेष[3] प्रगट केला,

---

1, Among a small set of women, who come from Thrace and settled down in Arabia, the superstition had already advanced to an idolatrons worship of the Virgin Mary. On a day, consecrated to her festival, they conveyed about in chariots, cakes or wafers consecrated to Mary, which they presented as offerings to her and then ate themselves P. 482 Vol I General Histry of the Christian Religion and Church translated from the German Dr. Augustus Neander By Joseph Torrey.

2. It was these interviews which engendered in Mahomed a hatred of the idolatrous practices of the Eastern Church, and indeed all idolatry, that taught him to speak of Jesus " the son of Mary." P. 79. History of the Conflict between Religion and Science By J. W. Draper,

3. One of Mahomet's characteristics, is unlimited implacable zeal against idolatry. It is the grand theme of Prophets. Idolatry, the worshipping of dead idols as the Divinity is a thing they cannot bear away with, but have to denounce continually, and brand with inexpiable reprobation; it is the chief of all the sins

त्यांतील जोम अमर्याद आणि सहज तृप्त न होणारा असा होता, ही महंमदाची विशेष कीर्ति आहे. ही मूर्तिपूजा, ईश्वरत्व वसत असणारे पदार्थ मृतवत झाल्यावर, त्यांतील गुण गेल्यावर त्याची पूजा हाणून पाडणें हा तर देवांचे प्रेषित म्हणविणाऱ्या सर्वांचा आवडीचा विषय होय. त्या मूर्ति कोणत्याही धर्मस्थापकाला किंवा धर्म सुधारकाला सहन झाल्या नाहींत. त्यांची अत्यंत निंदा त्यांनीं केली आहे; येवढें दुसरें पातक नाहीं, असें ते म्हणत; आणि त्या पातकाची शुद्धि दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं असें त्यांचें प्रतिपादन असे........प्राटेस्टंट मत स्थापन करणारा लुथर हा सुद्धां ह्या दृष्टीनें मूर्तिभंजकच होता; कोरेश लोकांचे देव लांकडाचे आणि ( शेणा ) मेणाचे केले होते, ते पाहून महंमदाला तिटकारा येई, त्याप्रमाणेंच बोकडाच्या चर्मावर शाईनें लिहिलेलीं टेटझेलचीं पापविमोचन पत्रें लुथरच्याही दृष्टीला असह्य झालीं होतीं."

मुसलमानी धर्म हा ज्वालामुखी पर्वतासारखा[1] आहे. त्याच्या योगानें इतर धर्म भूमीचे प्रस्तर पार फुटून जाऊन त्याच्यावर उगवलेल्या लता वृक्षांची जाळून खाक करण्याची कामगिरी त्यानें जेथें पेट घेतला तेथें केली आहे. " ओमारनें[2] ग्रंथसंग्रहालय जाळलें ( आणि हमामखान्यांत पाणी तापविलें ) हें खरें; तो म्हणे ते ग्रंथ निरुपयोगी असावेत किंवा धर्मबाह्य असतील. पण तीस लक्ष ग्रंथ होते, ज्यांत म्हणतात त्या त्रिपोलीच्या पुस्तकालयाला आग क्रूसेडर ( ख्रिस्ती धर्मयोद्धे ) यांनींच लावली ना ? "

they see done under the sun. This is worth noting.........I find Luther to have been a Breaker of Idols, no less than any other Prophet The wooden gods of Koreish, made of timber and bees-wax, were not more hateful to Mahomed than Tetzel's Pardons of Sin, made of sheep skin and ink, were to Luther. Carlyle.

1. Islam is a force of the Volcanic Sort. P. 208 the People of India By Robert Rislay.

2. There can be no more doubt that Omar did secure the destruction of the library, under an impression of its uselessness or its irreligious tendency than that the Crusaders burnt the library of Tripoli, fancifully said to have consisted of three millions of volumes. P. 104 History of the Conflict between Religion and Science by John William Draper.

"हे जेवढे नवीन धर्मकर्ते झाले त्यांचें लक्षणच हें. ते उपदेश करण्याविषयीं आतुर झालेले उपदेशक असोत, किंवा महमूद, आलि शार्लेमेनप्रमाणें दुसऱ्या लोकांना तरवारीच्या धारेवर धरणारे असोत, त्यांचा हेतू जुनें पार नाहींसें करून टकावें; आणि नवें जशाचें तसें लोकांस कबूल करण्यास लावावें, असा असतो; हा तर त्यांचा पहिला मुद्दा. त्यांच्या मतानें इतर देव खोटे म्हणून ते ते फोडून टाकीत; त्यांचीं स्थंडिलें बाटवीत आणि पवित्र क्षेत्रांची धूळदाण करीत."[1]

अमीर अल्लीनीं केलेल्या पुस्तकांत इस्लाम हा धर्म इतर धर्मांशीं विरोध करणारा नाहीं, असें दाखविण्याकरितां आधार दिले आहेत. सुरा[2] ५–७३; ५–४६; २–२५७. ह्यावरून आपल्याच एकट्या धर्मानें मुक्ति मिळेल, असा आग्रह महंमदाचा नाहीं, असें ते म्हणतात; परंतु तसें कांहीं नाहीं. सुरा[3] ( ९–३५ ) ह्यावरून यहुदी, ख्रिस्ती आणि कदाचित् मगी म्हणजे जे जे लोक पुस्तकीधर्म पाळतात ते असू द्यावे; परंतु इतरांचा नाश झाल्याशिवाय दुसरा उपाय नाहीं; त्यांच्यावर उपसलेली तरवार पुनः म्यानांत घालावयाची त्या वेळीं एक त्या सर्वांची कत्तल झाली पाहिजे किंवा जो महंमदी धर्म सर्वांहून श्रेष्ठ होणार, तो त्यांनीं पतकरिला पाहिजे. सुरा[4] ( २–१८९ ) सांगतो कीं, एक त्या परमेश्वराचा धर्म

1. Those who promulgate a new religion whether as zealous apostles by preaching or like Mahomed or Charlemagne by the sword demand the total abjuration of the old and the unconditional acceptance of the new. They overthrow what they believe to be false gods, they descreate the altars and defy the holy places. P. 44 Vol. I Science of Religion By C. P. Tiele.

2. Sura 257; V. 73; V. 46 prove that Islam does not confine salvation to the followers of Mahomed. P. 154 Footnote the Spirit of Islam By Ameer Ali Syed.

3. The Jews and Christians and perhaps the Magians—"people of the book" are to be tolerated but for the rest, the sword is not to be sheathed till they are exterminated or submit to the faith which is to become "superior to every other religion" ( Sura IX. 35)

4. Fight against the idolators until the religion be Lord's alone (Sura ii 189)

पाहिजे, बाकीच्या मूर्तीपूजकांवर शस्त्रच चालवावें. धर्मासाठीं युद्ध करणारांस उत्तेजन येण्यासाठीं सुरा ( III. १३; ११९ ) येथें म्हटलें आहे कीं, मुसल्मानांच्या पक्षाला तीन हजार देवदूत लढाईचे वेळीं मदत करीत होते. ह्याप्रमाणें धर्मासाठीं युद्ध करण्यास उत्तेजन मिळालेले आरब वीर अगोदरच फार कडवे, अज्ञानामुळें नायकाच्या अर्ध्या वचनांत रहाणारे असल्यामुळें त्यांनीं अर्धे युरोप खंड पादाक्रांत करून येशूची जन्मभूमि जरुसलेम आपल्या ताब्यांत घेतली, ती अजूनही त्यांच्याकडेच आहे.

मक्केच्या मूर्तिपूजकांनीं तरी महंमदाची डाळ प्रथम शिजूं दिली नाहींच; " त्यांनीं जी होनेत येथें शेवटची लढाई दिली, तिला मूर्तीची लढाईच म्हणतात " त्यांत अपयश आल्यामुळें महंमदाचे म्हणणें त्यांना मान्य करावें लागलें, तथापि महंमदानें त्यांच्या कांहीं गोष्टी कबूल केल्या. कब्बा दगडाची पूजा अजून होते. यात्रेकरू त्याचें चुंबन घेतात. त्याच्यावर जे दरवर्षी नवे रेशमी कापड चढविण्यांत येतें, त्यांचे म्हणजे ' किशव्याचे तुकडे फार लाभदायक समजतात. जादूचा अम्मल आपल्यावर चालूं नये, अशी सुरा ११३ ह्यांत प्रार्थना आहे. सुरा ( XII-६४; १५-७; ३७-७ ) ह्यांत सैतानापासून संरक्षणाबद्दल प्रार्थना आहेत. सुरा ( ५१-५-६ ) ह्यांत म्हटलें आहे कीं ईश्वरानें आपली स्वतःची सेवा करून घेण्यासाठीं जिनी उत्पन्न केले, ते सुरा ( १५-२७ ) ह्यावरून केवळ अग्नितत्वाचे बनविले असें होत आहे.

" एक देवें आहे त्याची भक्ति सर्वांनीं करावी, ह्या हेतूनें मुसलमान लोक लढाया करितात; आणि आपल्या रक्ताचा आणि दुसऱ्याच्या रक्ताचे

1. 3000 angles fought for the Moslems (Sura III. 13–119)

2. The last great effort in the sinking cause of the idols was made in the valley of Homain in the war called that of idols P. 172. Outlines of History By Thomas Keightley.

3. Though the followers of Mahomet shed their own blood and the blood of others, to establish everywhere the worship of one God, worship of minor gods has grown up a fresh among them. Not the only do ihe Badouins make sacrifices at Saint's tombs, but among more civilized Mahometans there is worship of their deceased holy men at shrines erected to them. P. 748 Ecclesiastical institutions By Herbert Spencer.

पूर वाहविण्यास कमी करीत नाहींत, तरी त्यांच्या मध्यें खालच्या दर्जाच्या देवांची पूजा शिरलीच आहे. बदौनी लोक साधूसंतांच्या कबरीपुढें बळी देतात; तें सोडून दिलें तरी अत्यंत सुधारलेले मुसलमान सुद्धां पीरांच्या मशिदी बांधून त्यांना माळा घालणें वगैरे पूजेचे उपचार अर्पण करितात."

इतकेंच नव्हें तर प्रत्येक मुसलमानाचा कोणीतरी पीर असावाच लागतो. बेपीर ही तर त्यांच्यांत शिवी होते. ( Fetichism ) वशीकरण साधन, वीर ( हसन हुसन यांचे डोले ) पूजा, साधुपूजा ( हा पितृ पूजेचाच भाग आहे ) वगैरे प्रकार त्यांच्यांत आहेतच. जादूटोण्याचे पुष्कळसे मंत्र आरबी किंवा उर्दू किंवा फारशी भाषेंत आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. उपस्थाची शुद्धि असल्याशिवाय देवापाशीं जाणें किंवा देवाची प्रार्थना करणें व्यर्थ जाते, ह्या समजुतीचा परिणाम सुंता आहे; ह्या सुंतेचा प्रकार कुराणांत सांगितला नाहीं; पण ती चाल पूर्वी आरबांत होती; आणि आब्राहामनें सुरू केलेली ही चाल म्हणून ती पाळण्यांत येत असते. मोरोक्कोमधील बरबर लोकांत ही चाल नाहीं. "खुद्द महंमदाला[1] सुद्धां आपण आपला धर्म इब्राहींमपासून घेतला, असें म्हणण्याची हौस असे. इब्राहीम म्हणजे देवाचा सखा. त्याला महंमद ज्यू किंवा ख्रिस्ती न म्हणतां मोसलीम म्हणे ( कुराण–iii ६० पहा. ), आणि त्यानेंच मक्केची मशीद बांधली, असें त्याचें सांगणें असे." "देवाचीं ९९ पवित्र नांवें किंवा विशेषणें आहेत, आणि तीं म्हणणें, त्यांचा जप करणें, 'झिकर'

1. Even Mahomed insisted on tracing his faith back to Ibrahym i. e. Abraham, the friend of God, whom he called a Moslim and not a Jew or Christian (Koran III 60) and who he maintained had founded the temple at Mekka. Pp. 49 and 489 Vol. III Mahomed By Sprenger.

2. The Mahomedans reckon 99 names and epithets of God and make the repitition of them a work of enormous merit. In the same way the Jews attach great efficacy to the repetition of the Divine epithets. Christianity recknons, I believe, about 90 epithets of Christ.........Arristotle, I think, enumerates more than a hundred names aud epithets applicable to Zeus. P. 103 Foot-note Religious Thogught and Life in India By Monier Willims.

करणें हें फार पुण्य जोडण्याचें कर्म आहे, ही समजूत मुसलमानांची आहे. यहुदी लोकांतही ईश्वराच्या नांवाच्या जपाचें मोठें पुण्य सांगतात. ख्रिस्ताची ही ९० नांवें आहेत. झ्यूस देवाचीं शंभरावर नांवें अरिस्टाटलनें दिलीं आहेत." ह्या माळा जपणें, मणी ओढणें हा प्रकार मुसलमानांपासून आम्हीं घेतला असावा, ह्यांत संशय नाहीं. प्रत्येक देवाचीं निदान शिव, विष्णु, देवी, गणपति ह्यांचीं सहस्रनामें झालीं आहेत.

**पार्शीधर्मांतील मूर्तिपूजा.**

पार्शी धर्म हा एकेश्वरी धर्म म्हणून समजतात; आणि ते लोकही मूर्तिपूजेचा द्वेष करितात. इतर धर्मांतील लोक आपल्या धर्मांत घेण्याची मुभा ह्या लोकांतही आहे. ह्या लोकांत अग्निपूजा प्राधान्य आहे, तरी सूर्य, समुद्र, पृथ्वी, गाय वगैरे पूजार्ह मानण्यांत येतात. "काश्मीरचा मोहसन फानी यानें केलेल्या दाबिस्तानमध्यें पार्शांचीं देवळें, मूर्ति, त्यांच्यापुढें जाळण्याचे धूपाचे प्रकार यांचें सविस्तर वर्णन केलें आहे." हल्लीं हिंदुस्थानांतल्यासारखी अग्निपूजा पार्शांची नसली तरी स्टीलींगफ्लीट साहेबांच्या मताप्रमाणें अग्नीची पूजा किंवा सूर्याची उपासना हा मूर्तिपूजेचाच प्रकार आहे. "व्हासियस म्हणतो कीं; अगदीं पहिल्या प्रथम अग्नीला पार्शी लोक देव म्हणत नसतील, तर नसोत; परंतु ते लोक अग्नि हें देवाचें चिन्ह मानीत होते." "होशंगच्या वेळेपासून जेवढे कांहीं शहाणे थोर लोक झाले ते अग्नि हा ईश्वरीतेजाची खूण आहे, असें म्हणून ज्योतीचें ध्यान करीत असत."

1. The Dabistan by Mohan Fani of Kashmir minutely describes many Persian idols, their temples, the different kinds of incense offered to them. P. 110 Travels By Sir William Onsley.

2. Vide P. 44 Origines Sacræ.

3. Vassious allowed that in early ages fire was though not God to the Parsis and Gabras (or Bahdin & Mazdiconan) but as a symbol of God. From the time of Hoshang all those illustrious personages are represented as contemplating a Sacred flame the symbol of divine light. Pp. 114 and 124 Ibid.

हिंदुस्थानांत आलेल्या पार्शी लोकांनीं मूर्ति फोडणें, आपल्या धर्मांत दुसरे लोक घेऊन त्याचा प्रसार करणें वगैरे प्रकार प्रथम केले; ग्रीसमधील मूर्तिपूजेवर इराणी लोकांचा मोठा कटाक्ष होता. " भलत्याच देवांच्या मूर्ति पार्श्यांनीं केल्या नाहींत; आणि ग्रीक लोकांप्रमाणें ईश्वर मनुष्यरूपानें पृथ्वीवर येतात, असें त्यांनीं मानिलें नाहीं. त्याच मीडी व इलेमाईट लोकांनीं सीरसच्या स्वारींत ब्याबिलोन मधील मूर्ति फोडिल्या आणि झर्सिसच्या स्वारींत ग्रीसमधील देवांस बंदींत टाकणाऱ्या देवळांचा विध्वंस केला. " राजानें अन्यधर्मी लोकांस राहूं देऊं नये, त्यांचे हाल करावे असें भाईन्यो. इ. खर्डमध्यें लिहिलें आहे. चांगला धर्म देवानें सांगितला तो पिताकी होय; तो माश्य आणि माश्योई यांस प्रथम सांगितला, तो धर्म एकच आहे ( ऐवाकदीनो. दिनकार्ट ४–१५० पहा ); बाकीचे धर्म खोटे; यहुदी, मानशी आणि ख्रिस्ती धर्मावर हल्ला केला पाहिजे, अशी त्यास आज्ञा आहे.

पार्शी लोकांचा राजाश्रय सुटला आणि त्यांचा नायनाट होण्याची वेळ आली, तेव्हां कांहीं लोक हिंदुस्थानांत आले, त्यांना येथें गुजराथेंत आश्रय मिळाला, परंतु हिंदूंच्या कांहीं चाली कबूल करण्याचें त्यांना भाग पडलें. हल्लीं जें त्या धर्माचें स्वरूप आहे तें पहिलें राहिलें नाहीं. " पार्शी

1. Gujarat Gazetteer., Population.

2. Those were the ancient Persians who 'erected not Statues' to any vain deities: nor believed like the Greeks, that Gods were clothed in human forms. They wêre the Mides and Elemites, under Cyrus broke all "graven images of Babylon" and under Xerxes destroyed the Grecian temples in which mortals had imprisoned the Gods. P. 104 Travels By Sir William Onsley.

3. Vide M. K. XV. 22–25. Mainys-i-Khard.

4. P. 171 The Philosophy of Mazdayasnians By L. S. Casartelli.

5. Before the Indians and Iranians separated a polytheist i. e. nature worship of Indra, Mittra, Vayu, Agni, and Hima existed ( Hang. Essays Pp. 245–247.) This was the first stage of the religion; belief in Ormazd as the supreme creator the second; Dualism the third; fusion with Magism the fourth; purification of the religion by Darius after Magophonia the fifth. E. Rahtseck in Vol XII. J. B. R. A. S. B. B.

आणि हिंदु आर्य फुटेपर्यंत इंद्र, मित्र, वायु, अग्नि, सोम यांची पूजा म्हणजे निसर्गपूजा पार्श्यांतही होती, हें त्या धर्माचें पहिलें स्वरूप; नंतर एक देव आरमझद हा सृष्टीकर्ता आहे, ही सुधारणा झाली; ईश्वराच्या बरोबरीनेंच सैतानाचें सामर्थ्य आहे, ही तिसरी स्थिति; मगी लोकांच्या धर्माशीं ऐक्य झालें, ती चवथी अवस्था; आणि मगोफोनियानें सांगितल्या प्रमाणें डरियसनें जी धर्माला शुद्ध स्थिति आणली ती पांचवी पायरी होय."

हिरोडोटस[1] ( खि. श. पूर्वी १५० ) म्हणतो कीं पार्शी लोक उंच डोंगरावर जाऊन जूनोच्या नांवानें बळी देतात, आणि त्याप्रमाणेंच, सूर्य, चंद्र, पृथ्वी, अग्नि, पाणी, आणि वायू यांच्या नांवानें आहुति टाकतात. डारियसच्या सैन्याचें वर्णन देतांना क्विन्टस[2] करटियस म्हणतो कीं, सैन्याच्या पुढें रुप्याच्या स्थंडिलामध्यें अक्षय पेटत ठेवलेला अग्नि चालवीत असत. हीच तऱ्हा यहुद्यांची येहोवाबद्दल होती हें मागें सांगितलेंच आहे. वेंदिदादच्या पुष्कळ वाक्यांत अहूर-हे-मझदाऊ पोथ्र—म्हणजे अग्नि हा अहुरमझदचा मुलगा आहे असें म्हटलें आहे. त्यांचे अग्नि दोन प्रकारचे असतात, एक आतिश बहिराम आणि दुसरा आति अदरान. पहिला सिद्ध करण्याला १०१ घरचा अग्नि आणावा लागतो. आणि दुसऱ्याला सातच ठिकाणचा पुरतो. यामुळें दुसऱ्याच्या अग्यारी—अग्न्यालयें—पुष्कळ आहेत, पण बहिरामच्या सहाच आहेत, त्यांपैकीं १ उदेपुरास, १ नवसरीस, २ सुरतेस आणि मुंबईस आहेत. परंतु " हा अग्यारी[3] किंवा अग्नीचीं देवळें बांधण्याचा प्रचार इराणला बुद्धाचा संस्कार लागेपर्यंत नव्हता, तथापि हा अक्षय जळत ठेवलेला बहिरामचा अग्नि राहण्याचे कुंडाभोंवतीं कांहीं तरी आवार वगैरे असेलच असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

1. P. 64 Taylor's Herodotus.

2. Quintus Curtins. Lib. III, cap. 3.

3. Ere Budhism spread into Iran, Mazdaism had no temples, though some enclosure there must have been wherein to maintain the everlasting Behram fire. P. 135 Religion of Persia By the Rev John. Milne. In the faiths of the world.

" भोंवतालीं मूर्तिपूजेचा प्रचार असूनही पार्शीधर्मांत ती शिरली नाहीं. परंतु ह्या खऱ्या देवाचा पूजा प्रकार केवळ आचारांत येऊन बसला. त्यासंबंधानेंही नियम घालून अडविण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ह्या आचारांना शांतीचें रूप आलें, आणि स्वातंत्र्याच्या धुमाकुळानें भूत पूजा शिरून गोमेझ विधीनें सैतान ह्या जगांतून घालवून देण्याचा विधी सुरू झाला. "[1] वेंदिदादच्या आठव्या फरगार्डमध्यें निशोष पिशाच्याला शरीरांतून काढून टाकण्यासाठीं डोक्यापासून खालपर्यंत तें पिशाच्य उतरीत नेण्याच्या संस्कार सांगितलेला आहे, आणि पांचव्या फरगार्ड मधील एका वाक्यांचा[2] अर्थ असा होतो कीं अग्नींत टाकलेला पदार्थ अग्नि भक्षण करीत नाहीं, त्यांत मनुष्याला टाकल्यास अष्टगोवध नांवाचें पिशाच्य त्याचा श्वास बंद करतें, आणि नेव्यतर ( सैतान ) त्याचा प्राण घेऊन जातो. ह्या भीतीनें तर प्रेतें न जाळण्याचा प्रघात पडला नसेलना ?

" पार्शी[3] लोकांची स्वर्गाची कल्पना म्हणजे एखाद्या एकछत्री राजाच्या अंमलासारखी दिसते. " " त्यांच्यांत[4] जे जीनी किंवा देवदूत आहेत, त्यांचा सर्व प्रकार फ्रवशी ( पितृदेव ) यांचा उत्तमतऱ्हेचा संतोष होण्यावर अवलंबून आहे. ह्या पितृदेवांची पूजा पार्शीलोकांत बरीच

1. Proof for centuries against all allurements to idolatry—they turned spiritual truth into visible ceremony. Helpless liberalism soon changed religion's visible part into little else than an attempt to purge the devil out of the universe with *gomez*. Pp. 132-133 Ibid.

२. दातारे आतरस नरेम जंते व ऑद मरोद अहुरो मझदाऊ आतरस नरेम नोएद जीयंते आस्तो विदोतोस देव बंदियेति वरोदेथ वसतेम नैते ॥

3. Among the Iranians the idea of heaven developed into Monarchy. P. 110 Religion of Persia By the Rev. John Milne.

4. In the case of genii of the Zoroastrian religion, much depends on the satisfactory propitiation of the *fravashis* (Yt.13-49). There cannot be any doubt that the *fravashis* played an important part, though perhaps more in private than in public. P. 810 the principles of Sociology By Herbert Spencer.

आहे, ह्यांत शंका नाहीं; पण त्यांतील बराच विधि घरोघरींच होत असतो. "

" ब्याक्ट्रिया–बल्क–बलिख[1] ह्यांत हा धर्म फार पूर्वीपासून आहे. येथील अर्चकांच्यामध्यें मूर्तिपूजक अरेमियन अर्चक येऊन मिळाले; परंतु अरेमिया किंवा बाबिलोन हें राष्ट्र बुडाल्यावर फेरिदूनच्या कारकीर्दीत पुन: पहिला धर्म उजळ माथ्यानें वावरूं लागला. राजे बदलले तरी मीडी त्याणि पार्शी ह्यानीं धर्म कायम ठेवला; पण मुसलमानांनीं रक्ताचे पाट वाहवून तो बुडविला. ह्यांच्यांत जरी मूर्तिपूजा किंवा वेदान्त हिंदूंसारखा नाहीं तरी पण त्यांचें राज्य गेलें, ह्यांत धर्माचा कांहीं दोष नाहीं.

ह्या तिन्हीं व्यक्ति विशिष्टधर्मांत किंवा टीले साहेबांच्या मनाप्रमाणें ईशाधिष्ठित ( theocratic ) धर्मांत हिंदुधर्मासारखी मूर्तिपूजा नाहीं; तथापि थोड्या बहुत प्रमाणानें वशीकरणसाधन, वृक्ष निवड, प्राणीगणांचा आदर, पितृपूजा, पिशाच्चभीति हीं सर्व आहेत; ह्या गोष्टी पुढील भागांत त्या त्या पूजाभेदांच्या वर्णनाबरोबरच्या उदाहरणांत नमूद केल्या आहेत. " ल्यूबो[2] म्हणतात कीं ( ह्या पूजाप्रकारभेदांचे ) ह्या विषयांतील इंगित

---

1. Its chief seat was Bactria. The idolatrous Aramæan priesthood united itself with that of Bactria but when the Aramæan or Babylonian dominion sank, the old religion recovered and revived in the person of Feridoon. Changes of dynasty affected it not; it passed to Medes and Persians and still was flourishing when the disciples of Mahomed extinguished it in blood. The simple religion of Zoroaster has not the debasing effects of the intricate idolatry and metaphysics of India and if Iran fell beneath foreign conquerors, the fault was not in her system of religion. Pp. 12–13 Outlines of history By Thomas Keightley.

2. The truth of the matter can be put " says Leuba " in this way: *God is not known, he is not understood, he is used* sometimes as meat-purveyor, sometimes as moral support, sometimes as friend, sometimes as an object of love. If he proves himself useful the religious consciousness asks for no more than that Does God really exist ? How does he exist ? What is he ? are so many irrelevant questions. Loc. Cit. Pp. 571–72 abridged.

असें आहे कीं, ईश्वराचें ज्ञान कोणाला झालें नाहीं. ईश्वराची खरी कल्पना कोणाला आलेली नाहीं; परंतु त्या ईश्वराकडून सर्वजण आपआपल्यापरीनें काम करून घेत आहेत. कोणी त्याला मांसादि खाद्य पदार्थ पुरविण्याचें काम सांगतो, कोणी त्याला नीतीच्या मार्गानें जातांना संकट आलें असतां, धीर देण्यास बोलावितो, कोणी त्याला आपला सखा म्हणतो, कोणी त्याला प्रेमाचें अधिष्ठान समजतो. सारांश, तो ईश्वर व्हवहारांतल्या कामाला उपयोगी पडला म्हणजे पुरे, धर्मश्रद्धा स्थिर रहाण्याला आणखी कशाची जरूर लागत नाहीं. ईश्वर खरोखर आहे काय? तो कसा रहातो? त्याचें स्वरूप कसें आहे? ह्या प्रश्नाच्या भानगडींत कोण पडतो, तें विपयांतर समजलें जातें. "

असो. ह्या ख्रिस्ती, मुसलमानी आणि पार्शी धर्माप्रमाणेंच बुद्ध धर्म सुद्धां व्यक्तिविषयक म्हणतां येईल; म्हणजे ख्रिस्त, महंमद आणि झोऱ्यास्टर ह्या उपदेशकांना कबूल करण्या न करण्यावर हे धर्म अवलंबून असतात, त्याप्रमाणेंच बुद्ध या व्यक्तीला मान देणें हेंच बुद्ध धर्माचें तत्व आहे; परंतु बुद्धधर्म ईश्वराच्या ठिकाणींच बुद्धाची स्थापना होईपर्यंत तरी निदान ईश्वर मानीत नव्हता. बुद्धाच्या अगोदर हिंदुस्तानांत मूर्तिपूजा असती तर त्यानें तिच्यावर हल्ला केला असता ह्यांत संशय नाहीं. बुद्धानें देवच जर नाकबूल केला, निदान देवानें आम्हांस कांहीं दिलें नाहीं, आणि आपलें त्याच्याशीं कांहीं काम नाहीं, असें बुद्ध म्हणत असे, तेव्हां मूर्तिचा संभवच त्या धर्मांत प्रथम नव्हता. वाटेल त्याला बुद्ध होता येत होतें. बुद्ध निर्वाणास गेल्यावर त्याच्या गोष्टी आणि त्यानें केलेले उपदेश ह्यावरून धर्म पुस्तक बनविण्याबद्दल वाद पडून ज्या अनेक सभा झाल्या, त्यांमध्यें बुद्धाच्या पवित्रतेबद्दल शंका घेणारास आणि संशय काढणारास त्या सभेंतून अर्धचंद्र मिळत असे. इतर मतवाल्या धर्माधिकाऱ्यांनीं सभेला हजर राहूं नये, असा ठराव[1] करण्यांत आला होता. पुढें बुद्ध हाच देव असें

१ नानेहि वत्रब्बं इति महावंश.

बुद्धधर्मांतील मूर्तिपूजा

मानूं लागले, त्याच्या मूर्ति होऊन, त्यांची पूजा सुरू झाली. " बुद्धाच्यी मूर्तीइतक्या जुनाट मूर्ति दुसऱ्या सांपडलेल्या नाहींत. बुद्धपीठकामध्यें मूर्तिपूजेसंबंधानें कांहींच उल्लेख नाहीं. " बुद्धाच्या देवळांत देवी, इंद्र, सूर्य इत्यादि देवांच्या मूर्तीसाठीं कोनाडे करण्यांत आले, आणि बुद्धाचें महत्त्व वाढविण्या-साठीं ते देव बुद्धाचे नोकर, सांगकामे, मदतगार असें दाखविण्याच्या हेतूनें, इतर धर्मीयांस लाजविण्यासाठीं, अनेक मूर्ति बुद्धदेवळांत मांडण्याची सुरवात झाली असावी. " अजंटाच्या लेण्यांत कोरीव मूर्ती-वरून तर्क केला तर असें अनुमान निघतें कीं तेथल्या मूर्तींतील ज्या मूर्ति अत्यंत पुरातन वाटतात त्या एकेरी, बुद्धाच्याच फक्त आहेत; त्यांच्या जोडीला हळूहळू इंद्र, काली, सरस्वति वगैरे हिंदुदेवांच्या मूर्ति एक एक येऊं लागल्या आहेत; हीच तऱ्हा वेरूळच्या लेण्यांतही दृष्टीस पडते; पुढें कांहीं कालानंतर घडलेल्या हिंदु देवांच्या मूर्तींच्या गर्दींत, पूर्वी ज्यांच्यावर अधिकार गाजविण्याच्या स्थितींत बुद्ध झळकत होता त्यांच्या दाटींत, बुद्ध कोणता हें लवकर ओळखण्याची बहुतेक पंचाईत पडून, कांहीं शतकांनंतर बुद्ध हाच विष्णूचा नववा अवतार होऊन बसला आहे. " विष्णूच्या नवव्या म्हणजे बुद्धअवताराबद्दल अग्निपुराण (१७-५), भागवत ( १-३-२४ ), गीतगोविंद ( १-१३ ) येथें उल्लेख आहे, परंतु तें वर्णन गौतमबुद्धाच्या वर्णनाहून निराळें आहे, असें विचारांतीं दिसून

---

1. Nor have any images of Gods been found which are so ancient as Budhist images. At the sametime nothing is said of image worship in Budhist Pitkas. Pp. 465-66 Budhism By Sir Monier Williams.

2. At first Budha is represented as alone, or nearly so, as in the most ancient temples of Ajunta; then gradually he appears in oompany with Brahman gods, Indra, Kali, Saraswati &c as is to be seen in the Budhistic temples of the Ellora series of monuments. Completely lost a little later in the crowd of gods that he had at first dominated, he comes, after a few centuries, to be regarded as nothing more than an incarnation of Vishnu. P. 535 Vol. II Historian's History of the World.

येईल. " ह्या दोन्ही बुद्धांच्यामध्यें नामसादृश्यापेक्षां दुसरी कांहीं साम्यता नव्हती " असें कर्नेल केडीसाहेब प्रतिपादन करितात, तें योग्य आहे.[1]

**जैनधर्माची मूर्तिपूजा.**

जैनधर्माची गोष्ट घेतली तर तो धर्मबुद्ध धर्मासारखा मागाहून मूर्तिपूजक बनलेला नाहीं. बुद्धांना शून्यवादी म्हटलें तर जैन हे स्याद्वादी आहेत. "[2] बुद्धाच्या मागच्या व पुढच्या अवतारांच्या मूर्ति झाल्या, त्याप्रमाणेंच जैन लोकांच्या चोवीस तीर्थकारांच्या मूर्ति देवाच्या बनून त्यांची प्रत्यक्ष पूजा होऊं लागली. त्यांच्या शेजारीं शासन देवी, देवता त्यांच्या मूर्ति असतात, त्या देवता तीर्थकारांचा हुकूम बजाविणाऱ्या सेवक आहेत असें जैन मानितात. ब्राह्मणांमध्यें देवीची उपासना शिरून शक्तींचीं अनेक रूपें भक्तांना आवडूं लागलीं. त्यांची आणि उत्तरेकडील बुद्धांच्या तारा वगैरे नेपाळांतील संस्कृत ग्रंथांत आढळणाऱ्या देवतांची ह्या जिनांच्या देवी पाहून आठवण होते. पारसनाथाच्या मूर्ति, विशेषतः महाराष्ट्रांत फारच मोठाल्या आहेत. जिनांच्या म्हणजे तीर्थकारांच्या खालोखाल त्यांचे शिष्य गणधर पूज्य मानतात, आणि ते आपले कल्याण करणारे साधू असे गणतात, आणि त्याप्रमाणेंच हिंदूंच्या इतर पुष्कळ देवतांचीही जैन पूजा करितात," त्या हिंदुदेवता वर्गांतून एक एक त्यांनीं घेतल्या आहेत, पण वास्तविक त्यांच्या धर्म पुस्तकांत त्यांचा अढळ होत नाहीं."

---

1. Colonel Kennedy (P. 248 Hindu Mythology) argues that the Buddha of the Puranas and the founder of Buddistic system of religion has nothing in common but the name.

2. Like the Budhas, the Jinas became veritable dieties and the direct objects of worship. They have at their sides the Shasan Devis, goddesses, who execute their Commands and who remind us of the Shaktis of the Neo—Brahmanic religion and the like of which we meet with also among the Budhas of the North, in the persons of Tara and the other goddesses of the Sanskrit books of Nepal. Their images, which are at times colossal, especially in the Deccan, are to be seen in great numbers in the sanctuaries of the sect. Next to the Jinas rank their immediate disciples, the Ganadharas, who receive homage in the character of guardian saints and a great number of deities which the Jains have borrowed one by one from the Hindu Pantheon but wnich have no space in the regular cultus. P. 143 Religions of India By. A. Barth.

वेद न मानणारे लिंगायत हे लिंगपूजा करीत असल्यामुळें मूर्तिपूजकांतच मोडतात, आणि खानेसुमारीच्या वेळीं वीरशैव लिंगी ब्राह्मण म्हणवून घेण्याविषयीं त्यांच्यांतील आग्रह पाहून ते हिंदुधर्मांत शिरूं पहात आहेत, असें दिसतें. भूताबद्दलचा विश्वास त्यांच्यांत आहेच. गुरूचें बंड आणि श्राद्ध वगैरे पितृपूजेचा संस्कार त्यांना नाहीं तरी मृताच्या गळ्यांत गुरूच्या हातची परवानगी चिट्ठी बांधल्याशिवाय त्याला शिवस्थानांत जागा मिळत नाहीं, ही त्यांची समजूत आहेच.

**लिंगायतधर्मांतील मूर्तिपूजा.**

हिंदु व मुसलमानी धर्म मिळून एक पंथ काढण्याची कबीरानें काढलेली युक्ति जास्त विकास पावल्याचें फळ शीखधर्म आहे. "आम्हीं[1] मूर्तिपूजेला आपल्या धर्मांत घेतली नाहीं, ह्याबद्दल शीख लोकांना अभिमान वाटत असतो; परंतु त्यांनीं आपल्या धर्मपुस्तकाचीच मूर्ति बनविली आहे. हिंदूलोक आपल्या मूर्तीस षोडशोपचार अर्पण करितात, त्याप्रमाणेंच ते करतात. त्याला पोषाख घालतात, शृंगार करितात, पंखे, चवऱ्या, मोर्चलें वारतात, रात्रीं शय्यागृहांत पोहोंचवितात. सारांश, ( उत्तर हिंदुस्थानांतील किंवा गुजराथेंतील ) कृष्णाच्या मूर्तीची जशी तालेवारी ठेवितात, तशीच शीख लोक आपल्या ग्रंथसाहेबाची ठेवितात." अमृतसर येथील सुवर्णदेवायतनाला शीख लोक दरबारसाहेब किंवा हरिमंदीर म्हणतात. लाहोर येथील रणजितसिंहाच्या दरवाज्यावर गणेश आणि ब्रह्मदेव यांच्या मूर्ति आहेत. पाटणा येथील गुरुगोविंदाच्या मशिदींत आदिग्रंथ आणि गोविंदग्रंथ यांच्याप्रमाणेंच कांहीं तरवारींची

**शीखधर्मांतील मूर्तिपूजा.**

1. The point on which they (Sikhs) pride themselves is the prohibition of imageworship. Yet they make an idol of their own sacred book, worshipping it as truly as the Hindoos do their idols. dressing it, decorating it fanning it, putting it to bed at night, and treating it much in the same manner as the idols of Krishna are treated. P. 172 Religious Thought and Life in India By Monier Williams.

समाजपंथांतील मूर्तिपूजा.

पूजा होत असते. हिंदुधर्मांतील मूर्तिपूजेविरुद्ध बंड करणारे आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्रह्मोसमाज वगैरे पंथ निराळे फुटले आहेत; पण त्यांतही दयानंदजीला देवासारखा मानतात. "बालपूर[1] येथें असणाऱ्या चिटीम वृक्षाला देवेंद्रनाथाचे अनुयायी बुद्धगयेंतील बोधीझाडाप्रमाणेंच मानितात." "ब्रह्मोधर्मांत जो नवीन पंथ निघाला[2] त्याचें एक निशाण आहे, त्याची पूजा हिंदु देवतांच्या मूर्तिप्रमाणेंच होत असते."

चीन आणि जपान ह्या देशांतील मूर्तिपूजा सांगावयाची म्हणजे तेथील धर्मांतील आचारविचारावर कनफ्यूशस, लाओट्झ आणि बुद्ध या तिघांच्या मतांची जी अवशेष तऱ्हा दिसते, त्याचें वर्णन केलें पाहिजे.

चीनदेशांतील मूर्तिपूजा.

चीनमध्यें बुद्धधर्म इ. स. ६८ मध्यें गेला; परंतु लीवंगनें कन्फ्युशसचा धर्म जो एकदां सुरू केला, तोच हल्लीं मुख्य असून सर्वत्र आहे. कन्फ्युशस इ. स. पूर्वी ५५० चे सुमारास जन्मास आला. त्याच्यापूर्वी ५० वर्षें तरी लाओट्झ होऊन गेला असावा. तो मेल्यावर त्याचा तारा झाला अशी त्याच्या भक्तांची समज आहे. लाओट्झ धर्म विशेष विचाराचाच होता. कन्फ्यूशसच्या धर्माबद्दल बराच मतभेद आहे. ब्युएलसाहेब म्हणतात, "कन्फ्यूशस[3] हा पुरुषाविशिष्ट देव मानीत नसे; परंतु मृतांना योग्य मान देण्याविषयीं त्याचा उपदेश असल्यामुळें चिनांत घरोघर पित-

---

1. The Chittim tree at Balpur is in the belief of Debendra nath's followers destined to become in after years as famous as the Bodhi tree at Budha Gaya. P. 115. The Brahmins, theists and Moslems af India By John Campbell Oman,

2. In a word the Banner of New Dispensation was worshipped as Hindu idols are worshipped any day in India. P. 139 Ibid.

3. Confucius believed in no personal god. He inculcated the necessity of acts of homage for the dead and hence arose the Chinese custom of providing each house with the hall of the ancestors. P. 315, The story of man By J. W. Buel.

रांची एक खोली असते." शूकींग ( ३-११ ) ह्या चिनी धर्मपुस्तकांत म्हटलें आहे कीं, टीन ( आकाश ) हेंच शंगटीन ( अत्युच्च स्वर्ग ) होय, आणि त्याचाच अर्थ शंगटे म्हणजे सर्वेश्वर असा होतो. "ह्या[1] शंगटेची मूर्ति कन्फ्यूशियसच्या पंथवाल्यांनीं कधीं बनविली नाहीं; परंतु टाओसे पंथाचे लोक आपल्या याहवंगची म्हणजे शंगटीची मानवी आकृति करितात." कांहीं शोधकांच्या मताप्रमाणें ह्या कन्फ्यूशसनें खऱ्या देवाची भक्ति केली, ती सर्व धर्मांपेक्षां[2] अगोदरची आहे; परंतु दुसरे कांहीं लेखक म्हणतात कीं, चिनी लोक जड वस्तू, कोरींव लेख, आपले पितर, आणि इतर बुद्धिहीन प्राण्यांची उपासना करितात." "चीन[3] देशांतील देवळांना जोस गृहें म्हणण्याचा पाठ आहे. त्या देवळांत एका उच्च सिंहासनावर देवांच्या मूर्ति मांडलेल्या असतात, व त्यांच्या पुढें नेहमीं धूप जळत असतो. चिनी लोकांचीं देवळें म्हणजे ( आमच्या हिंदूंच्यासारख्या ) देव पूजेच्या जागा म्हणतां येणार नाहींत; तीं कौल लावण्याचीं ( प्रश्न पहाण्याचीं ) स्थलें पूर्वी युरोपखंडांत होतीं, तशीं समजलीं पाहिजेत; खरें पाहिलें तर रानटी लोकांतील वशीकरण साधनांप्रमाणेंच चिनी लोक आपले देव समजतात. "कोणाला कांहीं

1. The confucians never made any image of Shangte but the Tao-sse represented their (Yah-hwang) Shang-te under the human form. Medhurst. Inquiry P. 46.

2. Le comte, Fonquet, Premare and Bomut thought it undeniable that Confucious has sacrificed to the true God in the most ancient temple of the earth. According to Maigrot, Navarette, on the contrary, and even according to the Jesuit Longobardi, the adoration of the Chinese was addressed to inanimate tablets, meaningless inscriptions or in the best case, the coarse ancestral spirits and beings without intelligence. Abel Ramusat. Melanges. P. 162.

3. The Chinese temples are known to us better as Joss houses. The Chinese seem to regard their temples in the light of ancient oracles than as a place of worship; in fact, the Gods are to the Chienese not very radically different from the fetishes of the barbarous people P. 316-317 The Story of Man By J. W. Buel.

कार्य करावयाचें असलें म्हणजे तो देवळापाशीं जातो. ( आंत जाण्याला परवानगी नसते, ) तेव्हां पूजाद्रव्यें अर्चकाच्या स्वाधीन करतो, आणि हात जोडून उभा रहातो, आणि इष्ट हेतूपूर्तीसाठीं कौल किंवा प्रसाद मिळेपर्यंत थांबतो. त्यांच्या मूर्तीमध्यें तीन वर्ग आहेत. टीनशीन म्हणजे आकाशांतील सूर्य वगैरे, टीकी म्हणजे वृक्ष, पर्वत इत्यादि, आणि जीनक्काई म्हणजे पितर.

जपानमध्यें मुख्य दोन धर्म आहेत, एक शिंटो धर्म आणि दुसरा बुद्ध धर्म. शिंटो धर्माबद्दल बराच मतभेद आहे. कोणी म्हणतात शिंटू म्हणजे देव. हा एक मुख्य असून त्याला मदत करणारे अनेक देव व देवता आहेत. शिंटू देवळाला मिया म्हणतात. देवळाच्या दरवाज्यापासून भक्त दूर उभा रहातो, आणि झरोक्यांतून कांहीं पैसे आंत टाकतो, प्रार्थना म्हणतो आणि चालता होतो. देवाची मूर्ति प्रत्यक्ष पहात नाहीं, येवढाच काय तो फरक. बाकीचा विधी हिंदूंच्या सारखाच नाहीं काय? बुद्धाला तिकडे अमिदा म्हणतात. जयदेव अमीद ही हाक पुष्कळदां ऐकूं येत असते. त्याच्या खालोखाल भक्तवत्सला कृपा देवी कनान आहे. तिला देवमाता असेंही म्हणतात. तिच्या मूर्ति पुष्कळ दृष्टीस पडतात. डाईगाक नांवाचा काल देव ह्याचीही पूजा फार होते; तो कुबेर, धन देणारा आहे, अशी समज आहे. ह्याची मूर्ति लहान असून खांद्यावर पोतें असतें; आणि हातांत कित्येक वेळां हातोडा असतो. ह्याची स्थापना बहुतकरून स्वयंपाक घरांत चुलीजवळ झालेली दृष्टीस पडते. जोन्ससाहेब म्हणतात कीं, 'जपानामध्यें फार पुरातन कालांपासून हिंदूंसारखीं किंवा इजिप्तांतल्या-प्रमाणें मूर्तिपूजा आहे, आणि बंगालमध्यें देवळांत असल्या मूर्ति दृष्टीस पडतात तसल्याच मूर्ति तेथें आहेत.' शिंटू म्हणजे सूर्यपूजकांचा धर्म असेंही कांहींजण म्हणतात; आणि अद्यापही शिंटू देवळांत एक आरसा किंवा

**जपानमधील मूर्तिपूजा**

1. My principal argument is that the Hindu or Egyptian idolatry has prevailed in Japan from the earliest ages and among the idols worshipped, according to the Kæmp for we find many of those which we see every day in the temple of Bengal. P. 109 Vol, I Works of William Jones.

चकचकीत पत्रा लावलेला असतो. कियाटोपासून तीस मैलांवर नारा गावीं एक फार मोठें बुद्धाचें देऊळ आहे, त्यांतील बुद्धाची मूर्ति त्रेपन फुट उंच आहे. देवळाच्या वरच्या मजल्यावर मूर्तींची गर्दीच झालेली आहे. दारापाशीं दोन ( जयविजयासारख्या ) मूर्ति आहेत, त्या वीस वीस फुट आहेत. ह्या मूर्ति म्हणजे पहिलवान, मल्ल यांचे देव होत. ह्या देवांच्या प्रार्थना कागदाच्या तुकड्यावर लिहून काढून तोंडांत घालून चावून त्याच्या गोळ्या करितात आणि त्या थुंकून देवाच्या अंगाला चिकटतील इतक्या जोरानें फेंकतात, हा त्यांचा पूजाविधी होय. ह्यांत दमछाकीची परीक्षाच असते म्हणावयाची !

**मंगोलियामधील मूर्तिपूजा.**

" मंगोलियामध्यें देवळांत बूखन देवाच्या तांब्याच्या मूर्ति असून त्यांना मुलामा चढविलेला असतो. ह्या बुखन आणि राघिनी देवांपेक्षां वरच्या दर्जाच्या देवतांना तेंगिन म्हणतात. ह्यांचीं सुमारें बारा देवळें आहेत. सर्वांत पुढें एका उंच सिंहासनावर तीन गुरबन एदेनी म्हणजे ' सर्वोत्कृष्ट त्रिमूर्ति ' असते, त्यांतील मधली मूर्ति शाक्यमुनि, बुद्ध याची असते. चेंगिसखान येईपर्यंत मंगोलियामध्यें श्रमणधर्मच होता, पण आतां त्याच्या जागीं लामाचा धर्म आला आहे. "

ह्या शामिनिझम किंवा श्रमणधर्मामध्यें मूर्तिपूजा सर्वप्रकारची असते. त्यांत विशेष येवढाच कीं, देवऋषी किंवा पंडा, गंगापुत्र वगैरे कोणी मध्यस्थ यांचेमार्फत सर्व कारभार चालत असतो. आतां लामाचा धर्म म्हणजे ह्या श्रमणधर्माची आणि शैवपंथाची सांगड आहे, आणि रोमन-

1. Mongol temples contain images of the principal Bookhans. The statues of gods are of cast copper, gilt. The superior duties are called Tengins and their number exceeds that of Bookhans and Raghinis. In front is placed, on an elevated pedestal, three images called Goorban erdeni or " the three precious ones. " The middle represents Shakya Muni. Vol. VIII & X of the Asiatic Journal.

2. Down to the time of Genghis Khan, Shamanism was the denominating religion of the Mongols but it was then replaced by Lamaism. P. 317 the Story of Man By J. W. Buel.

क्याथलिक लोकांच्या पूजेंतल्या प्रमाणें धूप, दीप, आरति घंटानाद, मृतांची प्रार्थना ह्या सर्व लामाधर्मांत आहेत. त्यांचीं देवळें चौकोनी असून सभामंडप आणि ओऱ्या बांधलेल्या असतात. दाराच्या समोर देवाची पवित्र जागा, स्थंडिल आणि साधूंच्या मूर्ति असतात. ट्सीन घराणें ( इ. स. पूर्वी २४८—२०६ ) राज्य करीत असतां प्रथम बुद्धधर्माचे शिक्षक चिनांत गेले होते, पण त्यांची छाप त्यावेळीं पडली नाहीं. चिनांतील राज्यकारभाराच्या ठराविक वाक्यांशीं जमवून घेण्याचें बुद्ध भिक्षूंना साधलें नाहीं. पुढें तो बुद्धधर्म तिबेटांत शिरून त्याचें रूप लामाधर्माचें झाल्यावर फोचा धर्म ह्या नांवानें तो चिनांत सुरू झाला.

**तिबेटमधील मूर्तिपूजा.**

ह्या प्रमाणें पान दोनवर सांगितलेल्या लोकांपैकीं हल्लीं हयात असलेल्या राष्ट्रांतील धर्मांतल्या मूर्तिपूजेचा उपलब्ध इतिहास दिला आहे. आतां मागें होऊन गेलेल्या राष्ट्रांतील मूर्तिपूजेचें दिग्दर्शन करून हा भाग संपवूं. मेक्सिको, मध्य आणि दक्षिण अमेरीका येथें इ. स. १५१९ मध्यें कोरटेस स्वारीच्या वेळीं अझटेक लोक होते. त्यांच्यांत सूर्य, चंद्र, तारे यांची पूजा होती, कांहीं माशांच्या जातींची पूजा होती; ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकिलें त्यांचे देवही त्यांनीं आणून आपलेसे करून ठेवले होते. पेरू देशांत इंकाचें राज्य होतें, ते सूर्यपूजकच. कूझिओ येथील प्रसिद्ध मोठें देऊळ अतुलवैभवाचें दर्शक असून त्यांत सूर्याची मूर्ति होती, आणि त्याच्या बाजूला सोन्याच्या सिंहासनावर इंकाच्या मूर्ति होत्या. ब्याबिलोनियन लोकांत मूर्तिपूजा होतीच; त्यांचे अकरा शतकें राज्य झाल्यावर असीरियन लोकांनीं त्यांना जिंकलें. असीरियन लोकांतील इतर मूर्तींमध्यें सूर्य, चंद्र, तारे यांची पूजा होतीच. ब्याबिलोनियांतील बेलसचें देऊळाच्या खालीं बत्तीस एकर जमीन होती असें म्हणतात.

फिनिशियन लोकांतील धर्मविधि लिहिण्यानें लेखणी बाटेल, असें ख्रिस्ती लोकांस वाटतें. त्यांना परमेश्वराची कल्पनाच नव्हती. त्यांच्यांतील देवांचीं नांवें बेल, बेलस, अष्टोरथ किंवा अष्टार्ति. बालदेवाची पूजा बहुतकरून

झाडीमध्यें असे; पण डोंगरावर, गुहेंत किंवा देवळांतूनही त्याच्या मूर्ति असत. ऐतिहासिक कालच्या पूर्वीपासून इजिप्त देशांत मूर्तिपूजा व मूर्तींच्या मिरवणुकी होत्या. राजा आसिरिस हा मेल्यावर त्याच्या इसिस राणीनें त्याचा नंदी बनवून पूजा सुरू केली होती. पुढें तिचा प्रधान थात राज्यपदास चढल्यावर त्यानें प्रथम शनि, डेगन, गुरु, हनमवन वगैरेंची पूजा सुरू केली. सूर्य, चंद्र, तारे, दिवसरात्रीचा होरा ह्या देवता इजिप्तमध्यें होत्या. हथार, इशतर, अष्टार्ति ह्या इजिप्तमधील देवतांचे उत्सव कांहीं कांहीं नामभेदानें सगळीकडे व त्याप्रमाणेंच ग्रीसमध्यें चालू होते. प्रत्येक गांवाला ग्रामदेवता होती; आणि मोठ्या शहरांत देवतात्रय आसिरिस व होरस यांचें होतें.

ग्रीसच्या राष्ट्राचे देव होमर आणि हीसिआड ह्यांनीं दिले, असें कोणी म्हणतात. हिंदुलोक समुद्राची पूजा करितात तर त्याऐवजीं समुद्राची अधिष्ठात्री देवता नेप्च्यून ह्याची मूर्ति ग्रीक लोकांनीं केली होती. झ्यूस, पासिडान, अपोलो, हीरा, पालस वगैरे देवता त्यांच्या असून फिनिशियन लोकांचे कांहीं देव त्यांनीं घेतलेच; आणि इजिप्तबरोबर दळणवळण सुरू होतांच त्यांच्याही मूर्ति, पूजाविधि, धर्मसिद्धांत ग्रीक लोकांनीं आपलेसे केले. रोमन लोकांनीं धर्मसंबंधानें ग्रीक लोकांचेंच सर्व उचललें. जूलियससीझरनें लोकरंजनासाठीं मोठाले आखाडे तयार करविले; आणि अज्ञसमाजाला दिपवून, नादीं लावून राजकारस्थान साधिलें. “ चाल्डिया देशांतील तुराणी लोकांतील जुना श्रमणपंथ धर्म गुरुराज कर्त्यांनीं आपल्या सेमिटिक धर्मांत मिळवून घेतला, ह्यांत सुद्धां त्यांनीं जनमनरंजनच केलें होतें.

अशाच धर्तीवर जाऊन बुद्धधर्माशीं तोंड द्यावें लागलेल्या हिंदुधर्मपुरस्कर्त्यांनीं मूर्तिपूजा प्रकार वाढवून घेतला; इतका चालू काळांत सुधारलेल्या कोणत्याही राष्ट्रांत नाहीं, असें म्हणण्यापेक्षां ज्ञानसूर्याचा झग-

---

1. We have seen something of this kind in the fusion of the old Shamanism of Turanian Chaldea with the nobler religion of the Semitic priestly rulers actuated most probably by a policy of Conciliation P. 174 Story of Chaldea.

झगीत प्रकाश पडलेल्या पश्चिमेकडील राष्ट्रांत नाहीं असें पुष्कळांचें मत झालेलें आहें. परंतु ह्याचें कारण मुख्य एक आहे. आचारप्रभवो धर्मः किंवा शास्त्राद्रूढिर्बलीयसी म्हणजे आचार हा धर्माचें मुख्य अंग आहे; किंवा शास्त्रांतील नियमापेक्षां रूढीचें महत्व जास्त धरावें लागतें. असा प्रकार आमच्याकडे आहे; पण त्यांच्याकडे धर्मविचार आणि समाज नियम ह्यांचें पृथक्करण ख्रिस्तीधर्माच्या प्रभावाचें फल आहे. मनुष्य आणि देव ह्यांच्यामध्यें अत्यंत अंतर मानल्यामुळें लोक समाजावर तसाच परिणाम झाला आहे. त्यामुळें ख्रिस्तीधर्मानें मूर्तिपूजेवर कटाक्ष ठेविला नसता तर ज्या चाली धर्मांत आल्या असत्या त्या अद्यापहि आहेत, परंतु त्यांना निराळें स्वरूप दिलें आहे. तो प्रकार कसा काय आहे, ह्याचें विवरण करण्यासाठीं मूर्तिपूजा प्रकाराचे जे निरनिराळे भेद आहेत, त्या त्या वर्गाखालीं कसे कोणते आचार येतात, ह्याचें संकलन पुढील भागांत केलें आहे. ज्या त्या धर्माच्या सदराखालीं पूजाप्रकाराची मालिका देण्यापेक्षां पूजाप्रकाराच्या मथाळ्याखालीं उदाहरणें प्रत्येक धर्माखालीं नमूद केल्यामुळें, हिंदुधर्माचा सदृश भाग इतर धर्मांत कसा कितपत हें चटकन् लक्षांत येणार आहे; आणि मनुष्यस्वभावाचा हा भेद आहे, कायद्याच्या बंदीचा येथें थोडासा परिणाम झाल्यास स्वरूप मात्र बदलेल; पण भावना नाहींशी होणार नाही, हा सिद्धांतही स्पष्ट होणार आहे.

## भाग २ रा.

## मूर्तिपूजाप्रकार.

१ अंतर्यामिणमारभ्य स्थावरांतेशवादिनः ।
संत्यश्वत्थार्कवंशादेः कुलदैवतदर्शनम् ॥

पंचदशी ॥ चित्रदीप ॥ १८१ ॥

2 The only limit to man's subjection
of the world to himself is his ignorance.
P. 144 An outline of Philosophy By John.

३ बाणतांदळे तांब्रनाणें । स्फटिक देव्हारा पूजणें ॥
ऐसे देव कोणं जाणे । खरे कीं खोटें ॥
देव रेसिमाचा केला । तोहि तुटोनिया गेला ॥
आतां नवा नेम धरिला । मृत्तिकेचा ॥

दासबोध ॥ ६।६।४०-४१ ॥

मूर्तिपूजा प्रकाराचें वर्गीकरण एकोणिसाव्या शतकांतील विद्वान् लोकांनीं केलें आहे, त्याप्रकारचें विद्यारण्यांनीं मागेंच लिहून ठेवलेलें आहे, हें पाहून आश्चर्य वाटेल ह्यांत शंका नाहीं. सर्वांच्या अंतर्यामीं, वस्तु मात्राच्या ठिकाणीं परमात्मा आहे, येथून आरंभ करून तो जडपदार्थांत सुद्धां आहे, झाडें वगैरेच्या ठिकाणीं देव आहे, आपलें कुलदैवत देव आहे, असें म्हणणारे लोक दृष्टीत पडतात, असें मथाळ्यांत दिलेल्या पंचदशींतील अतवरणांत सांगितलें आहे. वाट्सनसाहेब म्हणतात, हा अज्ञानाचा प्रकार आहे; मनुष्यानें सर्व जग आपलेंसें करून घेतलें असतें, आणि आपल्या सामर्थ्याबद्दल अभिमान बाळगून येथें देवच नाहीं, असें तो म्हणाला असता, पण त्याच्या ज्ञानाच्या वाढीबरोबर त्याचें अज्ञानही त्याला समजूं लागतें; आणि त्यामुळें तो हिर्मुष्टी होतो. त्या वर्गीकरणांतलीं उदा-

१. हृदयांत रहाणारा परमेश्वर याच्यापासून जडसृष्टींतही देव आहे, असें म्हणणारे पिंपळ वगैरे वृक्षांची, कुलदेवतांची पूजा करितात.

२. मनुष्यानें सर्व वस्तूंवर सत्ता चालविण्यास हरकत एक येते; कांहीं ठिकाणीं त्याची मति कुंठित होते.

हरणें समर्थांनीं आपल्या दासबोधांत दिलीं आहेत, त्यावरून इतर देशांतल्या विद्वानांना ज्या वर्गीकरणासाठीं अनेक देशांतल्या धर्मस्वरूपांची माहिती करून घ्यावी लागली, ती येथेंच आयती तयार आहे; हा प्रकार कसा आला, ह्याबद्दल हल्लीं प्रचलित मत असें आहे कीं, बुद्धधर्माशीं जी टक्कर हिंदुधर्माची लागली, त्यांत जी कांहीं इजा झाली, ती ही होय. ह्या धर्माचा पाया वेदांतमतावर असल्यामुळें तो खंबीर झाला आहे; व त्याची इमारत इतक्या शतकेंपर्यंत कायम राहिली; ह्याचें नवल इतरांस वाटतें, कारण प्राचीन व अर्वाचीन धर्मांचा इतिहास पाहतां, राष्ट्राच्या विलयाबरोबर पृथ्वीवरील इतर धर्म लयास गेले आहेत. हिंदुधर्माच्या इमारतीवर आणखी मजले चढविले तरी त्याचा पाया खचणार नाहीं व खालचा मजला ढासळणार नाहीं. जी मूर्तिपूजा हिंदुधर्माच्या तिसऱ्या मजल्याच्या ठिकाणीं दिसत आहे, ती बुद्धधर्मांतील त्याप्रकारची अनुकृति आहे, ती कायम टिकली; पण त्यापूर्वीं बुद्धधर्मानें ती आपल्यावर उभारतांच त्या धर्माचा पाया खचला आणि निदान हिंदुस्थानांतून त्याची उचलबांगडी झाली. हें मूर्तिपूजेचें ओझें किंवा अनेक भिन्नमतांच्या इमारती इतर धर्मांवर उभारून न दिल्यामुळेंच ते धर्म अद्याप कायम आहेत. "ख्रिस्तेधर्मानें जर पोपाचें ( धर्मगुरूंचें ) बंड वाढूं दिलें नसतें, आणि त्या धर्माधिकाऱ्यांनीं इतर पंथ, मतभेद काढणाऱ्यावर करडी नजर ठेऊन आपल्या वजनानें ते दडपून टाकले नसते तर ख्रिस्तीधर्म नाहींसाच झाला असता."[1]

धर्म हा ईश्वराचें ज्ञान करून घेण्याचा आणि ईश्वराच्या पूजेचा एक पंथ आहे, असें धर्माचें लक्षण बहुतेक ख्रिस्ती धर्ममीमांसा-ग्रंथांत आढळतें.[2] ह्या पूजाप्रकारच्या भिन्न स्वरूपामुळें त्यांतील धर्मभावनेचा दर्जा लावण्याचा प्रयत्न विद्वानांनीं केलेला आहे; परंतु तो चुकीचा आहे. ब्रह्मोपासना,

1. Dr. Waddington in Ecclesiastical History Chap. XII observes "Christianity would have been swept away, had it not been rescued by an established body of ministers or had that body been less zealous or less influential." P. 16 Lectures on the present position of Catholics in England. By John Henry Newman.

२. पानें ११–१२ नैसर्गिक धर्म. प्रो. म्याक्समुलर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

किंवा सत्, चित् आणि आनंद अशा प्रकारच्या परमात्मस्वरूपाचें ज्ञान मिळविण्याचा मार्ग धरून त्याच्या सहाय्यानें येणारी वृत्तीची तन्मयता ही निराळी आणि " ज्ञानाच्या अभावामुळें केवळ (चमत्कार पाहून) आश्चर्य-मूक झाल्यानें उत्पन्न होणारा पूज्यभाव, किंवा वशीकरणसाधनानें दैविक किंवा अमानुष शक्तीचा प्रकार पाहून भयभीत होऊन देवापुढें दंडवत घालण्याची क्षुद्रभावना " ही निराळी. ईश्वराची भक्ति करणाराचे जे चार वर्ग भगवद्गीतेंत सांगितले आहेत, त्यांतील आर्त, जिज्ञासु आणि अर्थार्थी, ह्या तिघांच्या भक्तीमध्यें काम्यतेचा गौणपणा आहे, आणि चवथा जो ज्ञानी भक्त तोच श्रेष्ठ आहे, असें अर्जुनास बजाविण्यांत आलें आहे. देवा मला

**विषयप्रवेश.**

कांहीं दे असें म्हणणें ही खरी प्रार्थना नव्हे; आणि म्हणून फिचसाहेबांनीं म्हटलें आहे कीं, आमच्या वासना पूर्ण करणारा जो देव तो तिरस्कणीय होय. पण ही दृष्टि ज्ञान्याची आहे; " विवेकें, विचार न करितां, अंधश्रद्धेनें जी पूजा वगैरे करणें, ती भक्ति नव्हे; प्रतिमा हीच देव म्हणणारा अज्ञानी समजावा. विचार करूं लागल्यावर ज्याच्या ठिकाणीं भक्ति रहाणार नाहीं, तो देव नव्हे; ही गोष्ट जरी खरी आहे, तरी सामान्य लोक आपलाच धोपट मार्ग चालवितात, त्याला उपाय नाहीं. " तेव्हां असल्या पूजाप्रकारावरून मूर्तिपूजेचें वर्गीकरण पुढें देण्यांत एक हेतू आहे, तो असा कीं, मागील भागांत धर्माधर्माच्या विवेचनांत मूर्ति-पूजाप्रकार सर्व सांगतां आले नाहींत, ते आतां ह्या प्रकाराखालीं त्या त्या

1. Far removed is the reverence from the mere dumb wonder of ignorance or the grovelling awe of the supernatural which as it is exhibited in the fetish worshi,p P. 28 An introduction to the philosophy of Religion By John Caird.

२. चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन । आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ । तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।। भगवद्गीता अ. ७ श्लो. १६-१७

३. विवेकेवीण भाव । तो भावचि अभाव । मूर्खस्य प्रतिमादेव । ऐसें वचनें । दासबोध ।। १८।७।२ ।।

विचार पाहतां रगेना । त्यास देव ऐसें म्हणावेना । परंतु जन राहेना । काये करावें । दासबोध अ. २०।६।८

धर्मांच्या सदरांत देतां येतील. जोगेंद्रनाथ भट्टाचार्य ह्यांनीं आपल्या " हिंदुजाति व पंथ " ह्या अर्थाचा इंग्रजी ग्रंथ केला आहे, त्यांत त्यांनीं पूजाप्रकाराची वर्गवारी दिली आहे. तिला त्यांनीं कांहीं आधार दिला नाहीं; परंतु विद्यारण्यांनीं पंचदशीमध्यें चित्रदीप प्रकरणांत जी वर्गवारी दिली आहे, तिच्याच धोरणानें ती केली असावी, असें वाटतें; निदान तिच्यासारखी ती आहे. भट्टाचार्य ह्यांनीं दिलेली वर्गवारी अशी आहे:—१ ( अ ) भूतखेतांची पूजा १ ( ब ) मनुष्येतर सृष्टपदार्थपूजा ( नदी, पर्वत, वृक्ष, पाषाण, पशु, पक्षी, सूर्य, चंद्र वगैरे ); २. नरपूजा. ह्यांत ( अ ) कल्पित देवांची पूजा ( शिव, विष्णु, ब्रह्मदेव वगैरे ), (ब) धर्मप्रवर्तक ( बुद्ध, जिन वगैरे ), (क) ईश्वर दूत ( येशू, महंमद, नानक ), (ड) वीरपुरुष ( राम, कृष्ण ); ३. कल्पना ( निर्गुण देव ). ह्यांपैकीं तिसरा वर्ग मूर्तिपूजेंत येत नाहीं; २ (क) ह्यालाही तद्धर्मी लोक मूर्तिपूजा म्हणत नाहींत, आणि तिसरें पितृपूजा ह्याचा समावेश कोठेंच केलेला नाहीं; ह्यामुळें हें वर्गीकरण दूषित आहे. " धर्माच्या[1] उत्पत्तीचीं साहजिक कारणें हाब्ससाहेबानीं चार दिलीं आहेत, तीं अशीं:—भूतयोनीविषयीं खरेपणावर विश्वास, निमित्त कारणाचें अज्ञान, ज्याची भीति वाटते त्याच्याविषयीं पूज्यता दाखविण्याची भावना आणि काकतालीय न्यायानें घडलेल्या गोष्टी भविष्यसूचक मानण्याची बुद्धि. " त्यांपैकीं पहिलें व तिसरें कारण जवळजवळ सारखेंच आहे आणि दुसऱ्या कारणाचाच पोटभेद चवथें कारण आहे, असें ध्यानांत येणार आहे. असो आम्ही जें वर्गीकरण देणार आहों त्यामध्यें मुख्य परीक्षा पूजाविधीच्या कमी अधिक प्रमाणाची आहे, एखाद्या उपचारापासून आरंभ करून षोडशोपचार पूजाही अखेर करून आमचें वर्गीकरण आहे. आतां ह्यामध्यें कांहीं ' आपडी थोपडी '

**पूजाप्रकारची वर्गवारी.**

---

1. Hobbes in the Leviathan says " In those four things opinion of ghosts, ignorance of second causes, devotion towards what men fear, and taking of things causal for prognstics, consisteth the natural seed of religion. " P. 316 Vol, II Asiatic studies by Sir Alfred Lyall,

होणार नाहीं असें म्हणवत नाहीं कारण " कांहीं (पूजा प्रकार आणि) जुन्या चाली कालाच्या वेगामुळें नष्ट झाल्या, कांहींनीं भिन्नरूप धारण केलें, आणि कांहींचे तुटक अवशेष राहिले आहेत, त्यांचे धागे जुळवून एकत्र दोरी वळून दाखवितांना बरोबर जम बसला नाहीं, किंवा कित्येक ठिकाणीं दोरे तसेच राहिले तर त्याबद्दल दयार्द्रदृष्टीनें पाहून वाचकांनीं क्षमा केली पाहिजे.[1]

**फेटिशपुजा किंवा वशीककरणसाधन.**

मनुष्याचा निसर्गाशीं संबंध येऊं लागला म्हणजे पदार्थांचे धर्म, व जड वस्तूंत होणारीं रूपांतरें त्यांचीं कारणें न समजल्यामुळें, " अचेतन पदार्थांवर कर्तृत्वाचा आरोप मनुष्यानें केला. ही गोष्ट त्यानें कांहीं हेतुपूर्वक केली असें नाहीं; ती अपरिहार्य होती; परंतु ही कल्पना झाल्यावर एक नवीन जग उत्पन्न झालें."[2] ही स्थिती रानटीलोकांत, किंवा मनुष्याच्या बाल्यावस्थेंतच दिसतें असें नाहीं. सुशिक्षित म्हणविणाऱ्या देशांतील अज्ञानी लोकांत आणि इतर उपाय हरल्यामुळें आर्त झालेल्या सुशिक्षितांतही हा प्रकार दृष्टीस पडतो. ह्या जड[3] वस्तूंच्या उपासकांना तेथें देव असावा, असा भ्रम होतो. ज्या बाह्यसृष्ट पदार्थांपासून सुख वाटेल तो हवासा वाटावा, ज्याच्यापासून दुःख होईल तो टाकून द्यावा, पहिला मित्र समजावा, दुसरा शत्रू मानावा म्हणजे " आपणं जसे स्वतंत्र आहों, तशाच ह्या जड वस्तूही

1. To use the words of Brand " in joining the scattered fragments that survive the mutation of ancient customs, we must be forgiven if all parts are not found closely to agree. P. 239 Vol. II Essays and Lectures on the Religion of the Hindus By H. H. Wilson.

२. पान २५८ नैसर्गिक धर्म. प्रो. म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

3. Fetishism largely consists in attributing to inanimate objects the spontaneity which he (man) finds in himself. P. 22. The foundations of belief By the Right Hon'ble Sir James Balfour.

४ तृणार्चिकादियोगांता ईश्वरे भ्रांतिमाश्रिताः । पंचदशी । चित्रदीप । २१६ ॥

असतील असें वाटणें" ह्याला बाल्फर साहेब फेटिशिजम म्हणतात. येवढीच भावना मनुष्याची असती तर Fetishism ( फेटिशिजम ) ह्या इंग्रजी शब्दाचें भाषांतर रा. शं. बा. दीक्षित ह्यांच्याप्रमाणें विशिष्टवस्तु पूजा असें आह्मीं केलें असतें. परंतु Fetish ह्या इंग्रजी शब्दाची पीठिका पहातां तसें जमत नाहीं. हा शब्द मूळ Fetico फेटिको किंवा (Fetisso) फेटिसो ह्या पोर्तुगीज शब्दापासून निघाला आहे, आणि त्याचा मूळ अर्थ ताईत, भालदोरा असा आहे. गोल्डन कोस्ट ( Golden Coast ) म्हणजे सुवर्णतीरावर रहाणाऱ्या नीग्रो लोकांवर पोर्तुगीजांनीं स्वारी केली, त्या वेळी त्या निग्रो लोकांतील पूजाप्रकाराला फेरिसो हा शब्द पोर्तुगीज लोकांनीं सोळाव्या शतकांत लावण्यास सुरुवात केली; त्याचा विशेष प्रसार करणारा बर्गंडीच्या पार्लमेंटचा प्रेसिडेंट चार्लस डी ब्रोसेस हा होय. सन १८०५ मध्यें बासथोलम ह्यानें फेटिशशब्दानें ज्या कोणच्याही नैसर्गिक किंवा कृत्रिम वस्तूंची पूजा होत असेल, त्या सर्व वस्तूंचा बोध होतो, असें म्हटलें; आणि सूर्य, चंद्र, पृथ्वी, वायु, अग्नि, जल, पर्वत, नद्या, वृक्ष, पाषाण, मूर्ति आणि देव म्हणून मानलेले पशुपक्षी, ह्या सर्वांचा समावेश त्यांतच केला. अनेक देवतांचीं पूजा ज्या कोणच्या धर्मांत असेल, त्यांत प्रथम फेटिशपूजा–विशिष्टवस्तुपूजा–असलीच पाहिजे, असें आगस्टस कामटे ह्यानें ठरविलें. बासथोलमप्रमाणेंच प्रो. फ्रिट्झ शलदझ साहेबांनीं सर्व वस्तूंचा अंतर्भाव फेटिश शब्दांत केला. "[1] बीचाम म्हणतो कीं फेटिश हे बुद्धिविशिष्ट अमानुष जीव आहेत. बेस्टिअनच्या म्हणण्याप्रमाणें कांगो लोक म्हणतात कीं आमचा बांबा फेटिश ( देव ? ) झाडावर असतो." येथें तर फेटिशचा अर्थ पिशाच्चच झाला; परंतु रिस्लेसाहेब म्हणतात कीं, " आतां जी [2]माहिती उपलब्ध झाली आहे, त्यावरून फेटिशपूजा म्हणजे ज्या स्पृश्य

1. Beecham says " the fetishes are believed to be spiritual intelligent beings." Bestian says about Congo people " the natives say that the great fetish of Bomba lives in the interior of the bush. P. 315 The data of Sociology By Herbert Spencer.

2. In the light of our present knowledge Fetichism may be defined as the worship of tangible inanimate objects believed to possess in themselves some kind of mysterious power. P. 210 The People of India By Sir Herbert Risley.

जडवस्तूच्या अंगीं कांहीं तरी अद्भूत शक्ति आहे असें वाटत असेल, तिचें पूजन होय. " ह्या व्याख्येंत जडवस्तू म्हणून झाडें, पर्वत, आणि नद्या येतील. झाडें जंगम नाहींत, पण तीं निर्जीव नाहींत, अशीं हिंदूंची प्रथमपासूनच समज होती, आणि त्यास सुखदुःख ज्ञान आहे, असें हल्लीं बोस साहेबानीं सिद्ध केलें आहे. पर्वत आणि नदी जड आहेत; तरी त्याच्यावर स्वामित्व भक्ताचें रहात नाहीं; आणि फेटिशिझममध्यें भक्ताच्या स्वाधीन त्याचा देव असतो. पंचदशीकारांनीं "वास्याः कुद्दालकादयः" म्हणजे सुताराचें किकरें, शेतकऱ्याची कुदळ वगैरे उदाहरणें दिलीं आहेत तीं बरोबर आहेत. म्हणजे ज्या कोणच्या वस्तूच्या द्वारानें त्या (अदृश्य) देवाला वश करून घेतां येत असेल, तें साधन फेटिश होय. ह्या वशीकरणसाधनांचीं जी पूजा होत असते, ती दररोज नसते, येवढेंच नाहीं तर त्या साधनांपैकीं कांहींची एकदांच पूजा झालेली असते व कांहींची मुळींच करावी लागत नाहीं. ताप बरा होण्याचा गंडा मांत्रिकानें एकदां धूपदीप दाखवून मंत्रून हातांत किंवा गळ्यांत बांधिला म्हणजे नंतर पुनः त्याची पूजा करावी लागत नाहीं. शनीचा खडा नुसता आंगठींत बसवून आंगठी बोटांत घातली, म्हणजे शनीची पीडा होणार नाहीं, ही समजूत असते; त्या खड्याची पूजा वगैरे कांहींच नसते. एक अज्ञानी, अडाणी लोक हा प्रकार करितात; वैद्य, डाक्तर आणण्यापुरतें द्रव्यसाधन नाहीं, किंवा खेडें गांवांत असला उपाय करणें शक्य नसतें, ते गंडेदोरे बांधतात; किंवा औषधोपचार सर्व करून कंटाळलेला, त्रासलेला सुशिक्षित मनुष्यही अखेर नशिबावर हवाला ठेऊन असलीं साधनें उपयोगांत आणण्यास कबूल होतो. "असला वेडेपणा किंवा चूक कांहीं लोकांनीं केली, म्हणून देवाच्या उपासनेला दोष कसा लावावा? ह्याप्रकारानें मूर्खपणाची सीमा होऊन मंत्रतंत्र, वशीकरणप्रयोग, अज्ञानी लोक करोत,

---

१. पंचदशी ॥ चित्रदीप ॥ श्लोक २०८.

२. पुरुषस्यापराधेन किमुपास्तिः प्रदुष्यति ॥ इतोप्यतिशयं मत्वा मंत्रान्वश्यादिकारिणः । मूढा जपंतु...॥ पंचदशी ॥ ध्यानदीप ॥ श्लोक ६६-६७ ॥

करणारे त्याच्यावर तुम्ही इलाज काय करणार ? " अमेरिकेंतील[1] मूळच्या रहिवाशांची जडी बुट्टी, साउथसी बेटांत रहाणाऱ्या लोकांचे ' टाऊ,' कांगो लोकांचे ' मोकिसो ' आणि नीग्रो लोकांचे ' फेटिश ' ह्या सर्वांची कल्पना मूळांत एकच--वशीकरणाची आहे. " ह्या वशीकरणसाधनांत[2] आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट असते ती अशी कीं, हें वशीकरणसाधन स्वतः देव नसतें, किंवा विभूतियुक्त सत्त्व नसतें; म्हणजे त्याच्यांत कांहीं देवत्व नसतें, परंतु कांहीं कालपर्यंत किंवा कांहीं आकस्मिककारणानें त्या वस्तूंत कांहीं विशिष्ट गुण आलेला असतो. " दुसरी खूण अशी आहे कीं " तें साधन[3] ज्या कारणास्तव केलें, त्याला तें उपयोगी असेल तोंपर्यंत त्याला आपण देव म्हणून जपतों, आणि तें काम त्या साधनाच्या हातून होत नाहींसें दिसलें म्हणजे आपण फेंकून देतों; परंतु देवाची प्रतिमा म्हणून दगड जरी असला तरी तो भक्ताला पावो किंवा न पावो, तो देवच्या देवच रहातो, आणि म्हणून वेताळाचे दगड वशीकरणसाधन म्हणतां येत नाहीं." " ह्या वशीकरणसाधनाची[4] कल्पना

1. The so called 'medicine' of the natives of America, the Taou of the South Sea Islanders, are substantially identical in conception with the Mokisso of the Congo and Fetish of the Negro. From Waitz. Anthropologie der naturvolker II. 174. Quoted at P. 217 The Evolution of Religion By Edward Caird.

2. The peculiarity of a fetish consists in the fact, not that it is itself a spirit, still less a god, but that it is the temporary or accidental embodiment of a spirit. P. 76 Vol. III Science of Religion by C. P. Tiele.

3. Vetal is not a fetish; for a fetish is a god as long as he is being regarded as useful, and when shown to be useless, he is flung away; but a god stone is always divine, whether it grants prayers or not. P. 538 Foot note. Religion of India. By E. W. Hopkins.

4. The essential point of what is called fetichism is just this that the worshipper has no thought of really devoting himself to ends which are represented as belonging to his god but desires only, by propitiation if propitiation is necessary, by magic if magic will avail-either in other words, by begging and bribing or by fraud and force-to use the god to his own purposes. P. 225 The Evolution of Religion By Edward Baired.

बरोबर मनांत आणण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ह्या देवाचे जे गुण सांगतात, त्याच्या नादीं पूर्णपणें किंवा नेहमीं लागण्याचा ह्या आर्त मनुष्याचा हेतू नसतो, तर साधल्यास उपचारदानानें, किंवा मंत्राचा उपयोग होत असेल तर त्यानें म्हणजे देवापाशीं पदर पसरून, लांच देऊन, किंवा देवाला फसवून किंवा त्याच्यावर अम्मल चालवून, देवाकडून ह्या साधनानें आपलें काम करून घ्यावें, म्हणजे कार्य संपलें, असें भक्त म्हणत असतो."

हिंदुलोकांत अग्नीची पूजा आहे, त्याची मूर्ति कोठें नाहीं, त्याचें निराळें देऊळ नाहीं, तेव्हां ह्या पूजेला कोणचा वर्ग द्यावा, ह्याची पंचाईत पुष्कळ पडते; टायलर साहेबानीं हे पूजेचे दोन प्रकार ठरविले, एक वशीकरण साधनांत ढकलला आणि दुसरा अनेक देवपंथांत गोंवून दिला. ल्यालसाहेबे म्हणतात कीं, अग्निपूजाच कशाला, होमहवन किंवा बलिदान असलें कीं समजावें, ह्याच्या पूर्वीचें स्वरूप कुलदैवतपूजा होय. भाद्रपद महिन्यांत शुक्लचर्दशीला शेषनारायणाची म्हणून अनंताची पूजा करून तो विशिष्ट गाठी दिलेला रेशमी गोप मनगटांत, दंडांत बांधितात, किंवा डबींत घालून देव्हाऱ्यांत ठेवितात, हें सर्पपूजेचें स्वरूप असेल; विशिष्टपदार्थपूजाही होईल, परंतु तो अनंत वशीकरण साधन आहे, असें निदान आतां कोणी समजत नाहीं. गुरुचरित्रांतील अनंताच्या कथेंत हा रक्तदोरा पत्नीच्या हातांत पाहून तें वशीकरणसाधन असावें, असें ऋषिवर्याला वाटलें, पण तसें आम्हास वाटत नाहीं. एकलव्यानें धनुर्विद्या शिकण्यासाठीं द्रोणाची मूर्ति केली होती, असें भारतांत (१–१३२–३३) आहे. ही मूर्ति म्हणजे आकृति होती; किंवा द्रोण म्हणजे पानांचा केलेला द्रोण होता, ह्याचा स्पष्ट खुलासा नाहीं, तरी पण तें वशीकरण साधन म्हणावें, असें कित्येकांचें मत आहे.

---

1. The real and absolute worship of fire falls into two great divisions, the first belonging rather to fetichism, the second to polytheism proper. Tyler quoted in Webster Dictionary.

2. The mere existence of sacrifice is an indication of the former existence of totemism P. 267. Vol. II Asiatic studies by Sir Alfred Lyall.

अथर्ववेदांत ( १८-४-५ ) यज्ञांतील स्रुवा, बळी, कुश ( ४,३५, १९-३२-९ ) आणि यज्ञसामुग्रीचा अवशेष, हे सर्व पुण्यदायक पदार्थ समजून त्यांच्यांत ईश्वरी शक्ति आहे असें म्हटलें आहे, ह्यावरून ती वस्तूची पूजा होईल, पण वशीकरण साधन नव्हे. मुलाच्या गळ्यांत वांकडा तांईत, वाघनखाचा ताईत, जिवती, विजेची पुतळी, सरी; स्त्रियांच्या गळ्यांत सवतीची प्रतिमा, दूड, नानाप्रकारच्या माळा, बिंदी, तापाची माळ, गंडा, दोरा; आंगठीवरचे खडे, शनीचा खडा, अहिन्याचा खडा, विंचवाचा खडा, नागाचा मणी, नवग्रहांचे टांक, सूर्याचें विधान; कान्होबा, खंडोबा, सुपलीची माय गोसावीण, नेवाशाचा मोहनीराज वगैरे टांक हीं सर्व वशीकरणसाधनांचीं उदाहरणें होत.

वशीकरणसाधन[1] म्हणून रत्नांचा उपयोग करीत असत, ह्यांत शंका नाहीं. आयुष्यवर्धन, आरोग्य, स्त्रीपुरुषधर्म, संततिदान आणि दुसरे पुष्कळ गुण रत्नांच्या अंगीं आहेत, अशी समजूत पूर्वी होती. इजिप्त मधील जुन्या पापिरीपत्रांवर आणि सुमरो-असिरीया काळच्या मातीच्या पाट्यावर रत्नांचे मंत्र सांपडतात. पूर्वींच्या ग्रीक देवांचे खिस्ती साधू बनवून रत्नांचा उपयोग मध्ययुगांतही होत असे; अंगावर भूषणें घालणें

1. Of the early use of stones as fetishes, there is no doubt' life, sex, powers of reproduction and many extraordinary virtues and inflvences were ascribed to them at the dawn of history. Magic formulae concerning stones are found alike in the clay tablets of Sumero-Assyrian age and in Egyptian papyri of very early date. In middle times gems were made serviceable by the representations of Greek deities being regarded as those of Christian saints, liturgies being composed by means of which—the old love of ornament and mysticism remaining—the heathen relics were consecrated for Christian use.

Nepolean, when in Egypt, found a carnelian seal engraved with Arabic characters, which he wore as a talisman until his death and it was treasured and carried at all times by Nepolean III. Curious of Lores of precious stones By Dr. G. F. Cunz, Revie w of Nature April 2, 1944.

आणि अद्भुत सामर्थ्य समजणें ह्या दोन्ही गोष्टी कायम असल्यामुळें प्रार्थना तयार होऊन हीनधर्मीयांचीं रत्नें खिस्ती लोकांच्या उपयोगी पडलीं.

इजिप्तमध्यें नेपोलियन गेला तेव्हां आरबी अक्षरें खोदलेली एक आंगठी त्याला सांपडली, ती मरेपर्यंत त्यानें आपल्याजवळ 'राखण' म्हणून बाळगली होती, ती तिसऱ्या नेपोलियननें संभाळून नेहमीं जवळ ठेविली होती."

**वशीकरणाचीं उदाहरणें.**

शहा आणि सुनी ह्या दोन्ही मुसलमानी पंथांत पंजाची पूजा आहे, ( P. 526 Footnote Sholapur Gazetteer ) ही वशीकरणपूजा होय. "शीख[1] लोक सर्वलोहंती म्हणून देवतेचें नांव समजून कांहीं वशीकरणासारख्या ( पांच 'क'नें आरंभ होणाऱ्या ) पदार्थांस जवळ बाळगितात; हा वशीकरण प्रकार होय. "मोझर आणि इतर अरबलोक हीं वशकरणसाधनें पूजीत असत, असें अमीरअल्ली म्हणतात ( P. IV Spirit of Islam )

"इटली[2] देशाच्या दक्षिण भागांतील लोक हाताच्या पंज्याच्या आकृतीचा पोंवळ्याचा दागिना घालितात; त्या पंजाचें एक बोट जमिनीकडे खालीं दाखविल्यासारखें पुढें केलेलें असतें; ह्या दागिन्यामुळें पापी दृष्टी बाधत नाहीं, अशी समजूत अद्याप आहे." "असलीच समजूत इंग्लंडच्या कांहीं भागांत बेडकाच्या डोक्यांतल्या खड्याबद्दल इकडच्या नागमण्यासारखी आहे.[3]" "घोड्याच्या नालांत कांहीं विशेष गुण आहे, अशी समजूत आहे. भोंक पडलेली अर्ध पेनी भाग्यदायी आहे, अशी पुष्कळांची

1. Among the Sikhs, the deity himself received the name of Sarba Lohanti and by this means certain observances of fetishism crept into this iconolastic religion. P. 247 The Religion of India By A. Barth.

2. In Southern Italy a coral ornament with a finger pointing downwards is to this day used as a charm against the evil eye. P. 254 Religious Thought and Life in India By Sir Monier Williams.

3. A similar superstition exists in some parts of England in regard to supposed stones in the heads of toads P. 325 Ibid.

समजूत असते. स्वतः मांझी ( प्रो. म्याक्समूलर यांची ) पुष्कळ वर्षे तशी समजूत होती. " वाटेंत सांपडलेली दहिली किंवा फुटकी कवडी अशीच भाग्यदायी समजून संग्रह करितात. अकबरी मोहोर किंवा निदान तसल्या ठशाची मोहर घेऊन दैवशाली म्हणून त्याची आंगठी इकडील सवाष्ण आणि विधवा बायका हातांत घालतात. शाळेंत मार बसूं नये, म्हणून पिंपळाचें पान लहान मुलें टोपींत घालून ठेवितात. " फकीर लोकांच्या थडग्यापासून उचलून घेतलेले दगड सांधे दुखीवर औषध समजतात. " कुराणांतील वाक्यें लिहिलेले कागद किंवा कांहीं शब्द किंवा चिन्हें, कोरलेले दगड जवळ बाळगणें, भिंतीला लावणें, मशिदींत बसविणें हा प्रकार वशीकरणाचाच आहे. रोमनक्याथलिक पंथाचे लोक क्रॉस ( Cross ) गळयांत घालितात, त्याचेंच स्वरूप बदलून कपड्याचा गळेबंद (necktie) झाला; पंढरीचे वारकरी गळ्यांत तुळशीची माळ घालतात, शैव रुद्राक्ष धारण करितात. आपल्याकडच्या दैवशाली नीळखड्याप्रमाणें " प्यॉरिस मधील शिंप्याच्या दुकानच्या कामकरी मुली एक खडा वापरतात. "

" वस्तूंचे खरे गुणधर्म न समजल्यामुळें सहजगत्या आलेलें फळ त्या वस्तूपासूनच आहे, अशा मूर्ख समजुतीला संवादि भ्रम म्हणतात, " त्याचें फलही वशीकरणसाधन पूजा होय. पुणें शहरांत जे अनेक म्हसोबा आहेत, ते जरी जंगम म्हणजे एका जागेवरून दुसऱ्या जागीं नेण्यासारखे, जवळ बाळगण्या सारखे नाहींत तर त्यांचा उपयोग असाच वशीकर-

१. पान ७६ पितृमूलक धर्म. प्रो. म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

2. Stones taken from the tombs of Fakirs are an excellent cure for rheumatism, P. 62 Jhelum District Gazetteer.

3. Parisians and perticularly workgirls in dressmaking establishments and factories profess to believe in lack compelling properties of magnet worn on may day.

४. अयथावस्तुविज्ञानात्फलं लभ्यत ईप्सितं । काकतालीयतः सोऽयं संवादिभ्रम उच्यते ॥ पंचदशी ॥ ध्यानदीप ॥ १२ ॥

णाचा आहे. त्यांच्या नांवावरून हा बोध कित्येक वेळां होतो. लोखंड्याच्या तालमीपासला उसण बरी करणारा म्हसोबा, विघ्नहारक म्हसोबा वगैरे पुष्कळ आहेत. येथें देवास वशीकरणाच्या जवळ जवळ भूत पिशाच्य-वशीकरणही येतें, आणि त्यामुळें बहुतेक अवघड घाटांत एखादा म्हसोबा असतोच. वाईकडून महाबळेश्वराला जाण्याच्या घाटांत वागजाईपाशीं प्रत्येक गाडीवाला नारळ फोडतो; तेथें असलेला पुजारी, देवराख्या कोणी महार, मांग असतो, तो इतर लोकांजवळ पै पैसा मागतो. " असला प्रकार इंग्लंडांतही आहे; ( स्टांटनजवळील ) भूताचा फांसा, ( सरे परगण्यांत ) भूताची उडी ( ससेक्स मधील ) भुताचा वाडगा वगैरे ठिकाणीं लोक कचरतातच; पण ल्यालसाहेब म्हणतात कीं, त्याठिकाणीं हिंदूनीं पूजा केली असती; " पण तो पूजक ब्राह्मणेतर आणि पूजाविधि तसलाच तुटपुंजा असता, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

पुण्यांतील चतुःशृंगीच्या पायवाटेवर दगडाचे ढीग दृष्टीस पडतात; आणि नवरात्रांत यात्रेकरू त्या दगडांचीं 'घरें' बांधल्याशिवाय पुढें जात नाहींत. ह्या घरांमुळें पुढच्या जन्मीं घर मिळतें, अशी समज आहे. फ्रेजर साहेब म्हणतात कीं, असले दगडांचे ढीग (cairn) कांहीं विशेष वृत्तांताचें किंवा पुरुषाचें स्मारक असतें. हल्लीं " स्वीडनमध्यें असल्या ढीगांवर एखादी काडी किंवा पैपैसा किंवा दगड टाकतात " " लौओस-मध्यें एक लहान खडाच टाकतात आणि तो " वाटच्या हिऱ्या " देवाला पावो म्हणतात. तिबेटांत लामापंथी स्तोत्र म्हणतो. " घराच्या उंबऱ्यावर नाल ठोकला म्हणजे पिशाच्य शिरत नाहीं असें मागचे लोक म्हणत,

1. It survives in England. In any district of India such subjects or local configurations as the Devil's Quoits (near stanton), the Devil's Jumps ( in Surrey ) or the Devil's Punch Bowl (in Sussex) would be worshipped. P. 22 Vol. I Asiatic Studies By Sir Alfred Lyall.

2. In Sweeden a piece of money is sometimes thrown on a cairn instead of a stick of stone. P. 12 Vol. III the Golden Bough By M. Fraser.

3. In Laos a pebble is thrown beside a path to the Lord of the Diamond......Tibetian travellers mutter a prayer. P. 12 Vol. III the Golden Bough By Mr. Fraser.

आतां वीज येत नाहीं, अशी समज आहे. "[1] इस्लेमधील पोर्टचार्लोटी जवळील ग्लेनमूरच्या माथ्यावर गुळगुळीत गोट्यांचा असाच उपयोग करितात. हे गोटे इटलीमध्यें स्वयंपाक घराच्या दारांत बसवितात." "[2] ब्रन्सविकमधील एव्हसेन येथील निंबाच्या झाडांच्या खोडांत खिळे ठोकलेले आहेत, त्यांत कांहीं पेंचाचे खिळे ( स्क्रू ) ही आहेत; दांत किंवा दाढ दुखत असल्यास त्याच्यावर हा तोडगा आहे, अशी समजूत आहे." शालग्रामशिळा अशा झाडांत ठोकलेल्या उत्तर हिंदुस्थानांत आढळतात. सर्प चावला असतां त्याला मांत्रिकाच्या नांवाची शपथ घालून दगड पदरांत बांधला म्हणजे तो दगड न सोडतां मांत्रिकाकडे जाईपर्यंत मनुष्य दगावत नाहीं, असें म्हणतात. आमच्या इकडे चिंध्यांचें किंवा कणकेचें, विलायतेकडे चरबीचें बाहुलें करून त्याचे हाल करावे, तसे शत्रूचे हाल होतात, असला मांत्रिक प्रयोग करितात, तो ह्यांतलाच प्रकार.

बाळंतीण अडली, अपचन झालें, गळवें उठूं लागलीं, तर तरसाचें नाक कापून आणून ठेवण्याचा तोडगा कडप्पा प्रांताच्या कडिरी तालुक्यांत करितांत.[3]

गालिवेड येथील वेशीच्या बाहेर एक दगड आहे, त्यावरील अक्षरें कोणी एका साधूनें कोरविलीं, आणि त्या तोडग्यानें त्या गांवाची तापाची साथ बंद झाली.[4] "[5] फिलिस्टाईन लोकांत मूळव्याध आणि उंदरांची साथ ह्यांचा उपद्रव झाला तर त्यांच्या प्रतिमा तोडगा म्हणून करीत

1. At the head of Glenmoor, near Port Charlotte in Islay, a Camder is used...In Italy the kitchen door is so used P. 33 Ibid.

2. An old lime tree in Evessen in Brunswick is studded with nails, which have been driven into by persons who suffered from aching teeth. P. 31 Ibid.

3. P. 292 Cuddapah Manual By J. D. B. Gribble.

4. P. 284 Cuddapah Manual By J. D. Gribble.

5. The method of cure when the Philistines were smitten with emerods and mice was to make images of the same (1. Sam VI, 5) P. 42 The Map of Life By W. E. H. Leckey.

असत." " यहुदी लोकांत गृहदेवता करून बसवीत त्या असाच तोडगा किंवा वशीकरण असत; त्यांची पूजा आणि देव्हारे मोझेसचे वंशज डेव्हिडच्या वेळेपर्यंत करीत होते." " पंचवीस नोव्हेंबरला क्याथ-राईनची पुण्यतीथ येते, त्या दिवशीं थानेटच्या बेटांतील गाडीवाले गाडीच्या तट्टयापुढें एका चाकावर त्याची एक प्रतिमा बसवितात."

हिंदुलोकांमधील पंचायतनपूजा म्हणजे शाळग्राम, बाण, नर्मदा गणपति, सूर्यकांत आणि देवीचा खडा ह्या मूर्ति नव्हेत, पण यांची षोडशोपचारानें पूजा होते; तथापि त्या दगडाच्या सहाय्यानें दुसऱ्या कोणास वश करण्याचा हेतु नसल्यामुळें ही वस्तूपूजा झाली, तरी वशी-करण साधनें होत नाहींत. " लिबियैा, डेल्फी, कार्थेज, ग्रीस, सायप्रस येथें दगडच देवाचें चिन्ह समजत."

" होडेल आणि खोझाए जातीचे लोक ' माना ' नांवाच्या दगडाची पूजा करीत; आणि मोलाक देवाच्यासारखेच त्याला बळी देत. हनीफा लोकांचा देव कणकेचा करीत. येथें वशीकरण साधन आणि मूर्तिपूजा हीं अगदीं जवळजवळ आल्यासारखीं दिसतात." " ज्यूएडीला स्तंभ

1. The Seraphim were also magical and were worshipped and served by the descendants of Moses down to the time of David (Judges XVIII. 18. 21) P. 18 Ibid.

2. On St. Catherine's day (November 25) in the Isle of Thanet, the carters place a small figure on a wheel on the front of their cartsheds. P. 428. British Popular Customs. Past and Present By T. F. Thistleton Dyer.

3. In Lybia, at Delphi amidst the ruins of Carthage, in Greece, in Cyprus, the stone is to be found used as a symbol. P. 171 The Story of Man By J. W. Buel.

4. The tribes of Hodhail and Khozaah worshipped a large stone called Manah and offered to it the same oblations as were made to Maloch. Finally the God of the tribe of Hanifa consisted simply of dough, so that at this point idolatry was but one step removed from fetichism. P 350 The Story of Man By J. W. Buel

5. It was a stone which Juede took for a piller and afterwards consecrated it by pouring oil upon it (Gen. xxviii 11-18) The early Semites and reactionary, idolatrous Israelites called such stone Bethels

वाटला तो दगडच होता; त्याच्यावर तेल ओतून त्याची शुद्धि करून घेतली ( जीन २३-११-१८ ). पर्वीचे सिमाइट व नंतर पुन: परत जुन्या चालींत शिरलेले मूर्तिपूजक इस्रायल लोक ह्या दगडांना बेथेल—देवांचीं देवळें—देवांचीं स्थानें म्हणत. हे जुने दगड कायम ठेऊन त्यांना पूर्वकालच्या इतिहासाचें स्मारक करून ठेवण्याचा प्रयत्न जेहोवा भक्तांनीं पुष्कळ केला, तथापि त्यांची पूजा पुष्कळ दिवस निदान कोनाकोपऱ्यांत होत होतीच." जोहोवा देव दगडच होता, हें मागें दाखविलेंच आहे. "[1] वाटरफोर्डपासून सात मैलांवरील ट्रानमोर येथील नवरदेवाचा खांब तिकडे प्रसिद्ध आहे. विवाहेच्छु मुलीनें त्याला लंगडीनें सात प्रदक्षिणा घातल्या म्हणजे एका वर्षांत नवरा मिळतो अशी समजूत आहे. ह्याचा अनुभव पहाण्यासाठीं अविवाहित मुलींची आणि बायकांची तेथें गर्दी जमत असते." विजगपट्टणापासून दहा मैलांवरील सिंहचलंच्या देवळांत कप्पेस्तंभ ( बेडकाचा खांब ) आहे, ह्या खांबाच्या आलिंगनानें वांझ स्त्रिया गर्भवती होतात, अशी समजूत आहे.

ह्या वशीकरण साधनांचा प्रयोग करणारा मांत्रिक कांहीं नेमधर्म पाळतो, देवपूजेला सोंवळें पाहिजे, ताईत मंत्रायला धूप वगैरे लागतो, मंत्र उच्चारतांना अपवित्रवस्तू जवळ नको, वगैरे प्रकारापासूनच तबू ( taboo ) विटाळ निघाला. विटाळाचें स्वरूप आमच्या इकडे इतर आचारा बरोबर धर्माला चिकटून राहिलें. ख्रिस्ती देवळांत अत्यंत पवित्र स्थान

---

houses of El (the early Semitic word for God ) In spite of the efforts of tha 'Jehovists who desired to convert these ancient fetishes into memorials of patriarchal history (Comp Gen xxxi 45–62) the old heathenish use of them seems to have continued especially in secluded places. Rev. T. K. Cheyne. The Prophesies of Issiah a new translation with commentary and appendices. (1882) Vol11 p. 72

1 Local tradition has it that an unmarried woman who succeeds in hopping round the Natoal Man piller at Tranmore about 7 miles from Waferfoed, will get a husband within a year. Many lady visitors are attrrcted to test the value of the legend. Extract from the Times of India February 1911.

2. p71 A Manual of the District of Vizagapatam By T. F. Carmichael.

(Holy of holies) असतें, तेथें विटाळ चालत नाहीं. आमच्या इकडे अकरा दिवस बाळंतिणीला शिवत नाहींत, आणि बाळंतीण उठून हिंडू लागण्यापूर्वी देवीला जाऊन येते. " इंग्लंडच्या ठरविलेल्या धर्माच्या देवळांत ह्याबद्दल पूर्वी शुचिकरण विधि असे, आतां बाळंतीण सुरक्षितपणें उठून हिंडू फिरूं लागली म्हणून आभार मानण्याचा ( किंवा स्त्रियांचा देउळी करण ) विधि होत असतो. " विटाळशीचा विटाळ, बाळंतिणीचा सोयर ज्यू लोकांत असे (Lev XII & XV). आलास्काच्या एस्किमो लोकांत आणि उत्तर अमेरिकेंतील इंडियन लोकांत हा विटाळ धरतात. " अदितवारी नवे किंवा परटीचे कपडे घालून ( सोवळ्यानें ? ) देवळांत जाण्याची चाल ह्यांतलीच." " राबिनेसच्या म्हणण्याप्रमाणें भलतेसलतें हात लावल्यानें पवित्र पुस्तक विटाळतें. " " न्यूझीलंडमध्यें प्रथम टबू–टपूचा अर्थ पवित्र वस्तू होता, त्याचा पुढें अस्पृश्य असा झाला. बास्टियन सांगतो कीं, कांगोलोक चोर येऊं नयेत म्हणून वशीकरणाचा उपयोग करतात. तशीच गाबूनच्या नीग्रोलोकांची कथा त्यानें सांगितली आहे."

अवर्षण पडण्याची भीति वाटूं लागली म्हणजे पर्जन्यसूक्तें म्हणणें, शृंगऋषी करणें, शंकराची पिंडी पाण्यांत कोंडणें, शंकरावर रुद्राभिषेक सततधार धरणें हे प्रकार हिंदुस्थानांत करतात. हें वशीकरणच होय.

---

1. In the Church of England service what is called Thanks giving of women after child birth ( Churching of Women)was formerly known as the order of Purification p. 60 The Map of Life By William Edward Harthole Leckey.

2. Custom of wearing Sunday clothes is remnant of clothe taboo. P. 261 The Map of Life By W. E. H. Leckey.

3. According to the Rabbins handling of scriptures defiles the hands. Ibid.

4. In New Zealand tapu from being originally a thing made sacred, has come to mean a thing forbidden.........Bastian tells us that the Congese make use of the fetish to protect their houses from thieves and he makes a like statement of the Negroes of the Gaboon. Po Ecclesiastical Institutions By Herbert Spencer.

नेपाळांत बेडकांची प्रार्थना करतात. जपानांत ऱ्हाका गांवीं आणि फेल्लूप लोकांत ग्रामदेवता व घरचे देव ह्यांना खालीं ओढून ठेवितात; चिनांत कागदाचे नाग करून आकाशांत उडवितात; न्यूसाउथवेल्समधील टाटार्थी आणि करमेन लोक आणि मध्य आफ्रिकेंतील वाकुंजी लोक मेघराजाचे दगड मांडतात. ब्रिटनी मधील गेवेझ जवळच्या सेंटमानीच्या देवळांतील आणि बारंटोन येथील हौदांत पावसासाठीं क्रूस बुडवून ठेवितात. फ्रान्सांत एका साधूच्या मूर्तीला असलीच शिक्षा होते. Translated and abridged from p. 104 III Vol I The Golden Baugh ).

प्लेग होऊं नये म्हणून इग्नेशिया बीन हातांत बांधतात, हें वशीकरणच होय. "ह्या बीमध्यें स्ट्रिक्निया आहे आणि ती औषधी आहे; परंतु फिलिपाईन बेटांत ती तोडगा म्हणून बांधितात आणि तिच्यापासून अनेक चमत्कारिक गुण येतात, असें समजतात." " नीग्रोलोकेंांची समज आहे कीं इंग्लिशांचें निशाण ( युनियनजाक ) आणि अमेरिकेचें ( तिरंगी ) निशाण हीं वशीकरण साधनेंच आहेत." आणि प्रारंभीं असाच कांहीं तरी निशाणाचा हेतु असावा, निदान शत्रूच्या जादूटोण्याचा, पिशाच्याचा प्रतिकार निशाणाच्या फडफडण्यानें होतो, हा समज आरंभीं असावा.

इ. लोबेट साहेबांनीं लंडनच्या दुकानांत विक्रीस असलेल्या वस्तूंची मीमांसा करून असल्या तोडग्याबद्दल पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. चेटूक चालू न देणारे कांचेचे गोळे, भोंकागणिक गिनी देणारे दगड, एका बाजूस मिकायल साधू व दुसऱ्या बाजूस खिस्त वठवलेली समुद्रांत बुडूं न देणारी पुतळी, मेलेल्या माणसाचे किंवा वासराचे दांत घातलेली पिशवी, मुलांच्या गळ्यांत दांत सुलभ जाण्यासाठीं बांधतात ती, इकडच्या वज्रबट्टूसारख्या जांभळ्या मण्यांची माळ तिकडील पुष्कळ बायका गळ्यांत

1. At the present time in the Philipne Islands, the Ignatia bean which contains strychnia and is used as a medicine, is worn as an amulet and held capable of miracles. P. 310 Data of Sociology By Herbert Spencer.

2. Your Union Jack and our Tricolour are looked upon by the Negroes as sacred fetishes. P. 77. Elements of Science of Religion By C. P. Ticele.

बाळगितात, त्या माळा पेनीला एक मिळतात त्या, वगैरे उदाहरणें दिलीं आहेत. सारांश—मनुष्याला दुःखाचा झपाटा झाला कीं सजीव, निर्जीव वाटेल त्या वस्तूला शरण जाण्याइतका देहस्वभाव विसरतो. ( कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु; मेघदूत ).

आतां सर्व धंदेवाले लोक आपल्या हत्यारांची पूजा करितात, ती ह्या वशीकरणांत जरी पूर्ण येत नसली तरी त्यांत कांहीं तसा भाग असतो. ऋग्वेद IV-57-5-8 येथें नांगराच्या फाळाची स्तुति आहे. शतपथ ब्राह्मण II-6-3-5 येथें त्याला हविर्भाग दिला आहे. सुताराचीं किकरें वगैरे, सोनाराची शेगडी, शिंप्याचा गज, वाण्याचीं वजनें, ब्राह्मणाची लेखणी, शिपायाची तरवार, व्यापाऱ्याचें वहीपूजन, शेतकऱ्याचा नांगर गुजराथ ग्याझिटीयरमध्यें दिल्याप्रमाणें भंग्यांचा खराटा ह्यांच्या पूजनानें ज्यास्त बरकत येते अशी समज आहे. " कोळी लोक आपल्या जाळ्याची पूजा करीत " ह्याचें कारण अज्ञान आणि अंधविश्वास होय; परंतु तसें असतें तर जुअंगी, अंदमानी, फुएजी, आस्ट्रेलियन, तसमालियन, आणि बुशमन ह्यांच्यांत ही पूजा पाहिजे होती, तशी नाहीं; आणि हिंदुस्थानांत नको होती ती आहे, ह्या कारणावरून हें कारण स्पेन्सरसाहेबांना कबूल नाहीं, आणि त्यांनीं आपला प्रिय सिद्धांत भूतभावना हीच वशीकरणसाधनाचें मूळ धरली आहे. वरील उदाहरणावरून हेंच एक कारण सर्वांच्या मूळाशीं आहे, हें दाखविणें कित्येक वेळां अशक्यच होईल. गुढी पाडव्याच्या गुढ्या, देवळांपुढचीं निशाणें हीं आनंददर्शक चिन्हें किंवा वर्षारंभाचें मंगलकृत्यानें सर्व वर्ष सुखांत जाण्याची इच्छा दाखविणारें चिन्ह फार झालें तर म्हणतां येईल. असो.

ह्या वशीकरणसाधनाच्या पुढचा वर्ग " कुलदैवतदर्शन " ह्याप्रमाणें कुलदेवता दर्शन हें होय. वरच्या वर्गांतली उदाहरणें घेतांना धंद्याच्या हत्यारांची पूजा ही नुसती हळद कुंकु वहाण्या पुरती आणि

1. Vide the Times of India dated 16th May 1914 under the Heading " London Chambers. "

2. Hackack 1-16. " Therefore they sacrifice into this net. " Vide P. 20 Footnote Vol. 1 Asiatic Studies By Sir Alfred Lyall.

कित्येक वेळां दर्शन नमस्कार करण्यापुरतीच होत असते, हें विसरूं नये. तोच पूजाप्रकार ह्या कुलदेवतेसंबंधानें येतो. इंग्रजी शब्द Totem ह्याचें हें भाषांतर आह्मीं केलें आहे. लांछन असें भाषांतर रा. दीक्षित यांनीं केलें आहे परंतु त्यानें पूर्ण बोध होत नाहीं, हें उघड आहे. वेबस्टरच्या इंग्रजी कोशांत Totem ( टोटेम ) ची व्याख्या दिली आहे ती अशी:—" ऐखादा[1] पशु किंवा पक्षी आपल्या कुलावर कोणच्या तरी अद्भुतरीतीनें कृपादृष्टि ठेऊन त्याचें संरक्षण करतो, अशी समज असली म्हणजे त्या कुलाचें तें टोटेम–दैवत होय." द्विजामध्यें संध्येच्या शेवटीं गोत्राच्या ऋषींचा उच्चार करावा लागतो, तो प्रकार टोटेमच्या जवळ जवळ येईल; परंतु टोटेममध्यें मनुष्य धरीत नाहींत. भारतामधील योध्यांच्या निशाणावर असलीं पशुपक्ष्यांचीं चित्रें वगैरे असावीं असें दिसतें, त्याचा कदाचित् ह्याच्याशीं संबंध येईल. देशस्थांत आणि मराठ्यांत जीं आडनांवें आहेत त्यांत अशीं पशूंचीं नांवें पुष्कळ आहेत; परंतु त्यांची मूळपीठिका समजत नसल्यामुळें हे पशू त्यांचें कुलदेवतच असतील, असें सिद्ध करण्यास सबळ आधार नाहीं. हिंदुधर्मांत ज्या पशुपक्ष्यांचीं पूजा होते, त्यांचीं नांवें मनुष्यांना दिलेलीं फारशीं आढळत नाहींत. " ह्या टोटेममध्यें–कुलदैवतपूजनांत–सर्व[2] मानवजातींचा, किंवा विशिष्ट जातींचा किंवा कुलाचा आद्यपुरुष कोणी तरी पशू असावा, अशी समजूत असते; परंतु असला प्रकार हिंदुधर्मांत फारसा आढळत नाहीं." " अमेरिकेंतील[3] मूळ रहिवाशांच्या डोडेम ' दैवत ' शब्दापासून टोटेम

(margin: कुलदैवतपूजा.)

1. Totem—the clan deity; beast or bird whom some supernatural way attends to the clan and watches over tt. Bagehot.

2. Totemism is founded on the belief that the human race or more frequently that human clans and families derive their descent from animals; but I have never been able to discover that it has any considerable bearing upon the ancient religion of India. Pp. 138-39. The Religion of the Veda By Maurice Bloomfield.

3. Totem being derived from the American Indian word *dodaim* which signifies the patron or typical animal of the tribe. P. 314 Religious Thought and Life in India By M. William.

शब्द निघाला आहे, त्याचा मूळ अर्थ कुळाभिमानी किंवा विशिष्ट पशू असा आहे." मांजरे, कोल्हे, लांडगे, वाघ, मेंढके, बोके, गाढवे, शेळके, कुंजर, घोटके, मावशे, इंगळे वगैरे आडनांवांतील पशू बोधावरून असला कुलदैवताचा संशय येतो; परंतु तसल्या पशूंचें पूजन ह्या लोकांच्या घरीं हल्लीं होतच असतें, असें सांगण्यास आधार नाहीं, कारण पूर्वी कोठें असलें तरी त्या विषयीं आतां लाज वाटून तसले टांक त्यानीं देव्हाऱ्यांत राहूं दिले नाहींत. "ओरांवन[1] किंवा धनगर जातींत मूषक ( उंदीर ) हें कुलदैवत आहे. संताळ लोकांत हंस कुलदैवत आहे; आणि कूर्म वगैरे अवतारांतले पशू गरोस, क्रासोस वगैरे लोकांतही आहेत. अमेरिकेंत हें कांसव (कूर्म) कुलदैवत असल्याचें प्रसिद्धच आहे." "मोंगोल[2] लोकांच्या राजघराण्याचा आद्य पुरुष लांडगा होता; आणि त्यांचें कुलनांव लांडगे आहे. उत्तर अमेरिकेंत अशीं पुष्कळ नांवें आहेत." गरअबिंग (विरोळा) हा गरुरच्या मुंडा लोकांचें, गरुड हा रावटिया आणि माळ लोकांचें, गारी ( माकड ) आणि गारवे ( बगळा ) हा उरावन लोकांचें, कुलदैवत[3] आहे. छोटानागपूर प्रांतांतील नाग जातीच्या लोकांच्या निशाणावर पूर्वी तीन सर्प असत, हें कुलदैवतपूजन होय. "ऋग्वेदामध्यें[4] 'मत्स्य' 'शुनः' अशाप्रकारें कांहीं लोकांचीं नांवें येतात, त्यावरून कुलदैवतपूजा

---

1. It is among the Oraons or Dhngars that the Mouse totem is found. The Santhals have a goose totem and the Giros and Krassos together with many other tribes have totems, some of them Avatars as in the case of tortoise. The totem form of tortoises well known in America. P. 532, 163 Footnote. The Religions of India By Edward Washburn Hopkins.

2. The ancestors of the Mongal royal house has a wolf and their family name was wolf–Animal names borne by North Americans are to be associated with totem system P. 684. Ecclesiastical Institutions By Herbert Spencer.

3. Risley. Tribes and Caste of Bengal. Vol. I. Pp. 271, 274.

4. Even totemism as a survival may be suspected in the 'fish' and 'dog' people of the Rigwed, as has been recently suggested by Oldenberg. P. 537 Religions of India By E. W. Hopkins.

त्या वेळीं असावी, असें ओल्डनबर्ग साहेबांचें म्हणणें आहे." "तिर्यक्-योनिदर्शक जातीचीं नांवें बायबलांतील सोधलीं तर तीं १८० च्या वर भरतील. कुत्रा, मासा अशा अर्थाचींच तीं नांवें आहेत." युरोपामध्यें प्रत्येक जमीनदाराचें व राजकुळाचें सुद्धां कुलरक्षक दैवत मानलेलें असे; त्याप्रमाणेंच त्या त्या कुळाच्या निशाणावर आणि ढालीवर कित्येक श्वापदांचीं व पक्ष्यांचीं चित्रें असत. " अरबस्थानांतील पुष्कळ जातींचीं नांवें अशींच प्राणिवाचक आहेत. असाद ( सिंह ), अवस ( लांडगा ), गाराड ( टोळ ), बेनीहमामा ( कबुतरपुत्र ), गाहश ( गर्दभसूत ), हिडा ( गरुड ), काब ( कुत्रा ), अशीं अनेक नांवें होतीं. " " उत्तर अमेरिकेंतील कुलदैवत पूजेसारखी पण कांहीं अंशीं तिजहून निराळी अशी एक चाल आस्ट्रेलियाच्या लोकांत आहे. सर जार्ज ग्रे लिहितो कीं, प्रत्येक कुळांत एखादा प्राणी किंवा वृक्ष पूज्य मानिलेला असतो. त्याला ते कोबोंग म्हणतात " " भॉर किंवा भारत लोक बांबू, बेलवृक्ष, कांसव आणि मोर या चार गोष्टी पूजार्ह समजतात " म्हणून ते कुलदैवत असावें, असा बार्थसाहेबांनीं प्रश्न काढिला आहे; पण हे प्रकार त्यांतले नाहींत.

सर वुइल्यम आउस्लेसाहेबांच्या प्रवासवृत्तांत Travels in varions countries of the East पान् २१ येथें म्हटल्याप्रमाणें (Fetenism) कुलदैवतपूजन हा जर पशुपूजेचा पोटभेद मानला तर भारतयुद्धांतील

1. No less than 180 Bible names have a zoological signification. Cabb the dog tribe. Dog=the fish tribe. P. 59 The Map of Life. By William Edward H. Leckey.

2. Prof Robertson Smith in his essay on 'Animal Worship and Animal Tribes' shows how extensive is the rise of animal tribes in Arabia. Asad (lion), Aws (wolf), Gârâd (locusts) Beni Hamama (sons of the dove) Gahsh (calf of an ass), Bida (a kili), Kalb (dog) tribe &c. P. 79 Vol. IX Journal of Philology.

३. पान ७७ पितृमूलक धर्म. रा. दीक्षित यांनीं प्रो० म्याक्समूलरच्या व्याख्यानांचें केलेलें भाषांतर.

4. The Bhars or Bharats' Sacra ( totem ! ) are the bamboos, bel-tree, tortoise and peacock. P. 536 Footnote. The Religion of India By A. Barth.

वीरांचा ध्वज, केतु, लांछन यांवरून त्यांना जीं नांवें पडलीं होतीं, त्यांवरून ते पशुपूजन होतें म्हणतां येईल काय ? अर्जुन हा कपिध्वज होता, द्रोणाचार्यांच्या निशाणावर घटा ( घागरी ) चें चिन्ह होतें, मदन हा मकरकेतु, मीनध्वज, मीनकेतन म्हणत, शंकर वृषभध्वज होते; विष्णूच्या निशाणावर गरुड असे.

**वृक्षपूजा.**

ह्यापुढचा वर्ग वृक्षपूजन होय. वृक्षवनस्पति ह्यांचें गौरव त्यांच्यांतील औषधी गुणधर्मामुळें झालें आहे, व कांहींचा परिणाम आरोग्यकारक होतो; म्हणून त्याविषयीं आदर दाखविला जातो. वृक्ष जड तर खराच; परंतु त्यांची वाढ होऊन, त्यांना फुलें फळें, येतात, वगैरे त्यांचा आयुष्यक्रम कांहीं अंशीं मनुष्याच्या सारखा वाटतो. वशीकरण साधनांत भोळसरपणा, किंवा आतुरता किंवा कार्यकारण-संबंधाचा गैरसमज प्राधान्य असतो; वृक्षपूजनांत कारण चिकित्सा पूर्ण नसली तरी कांहीं अंशांनीं लाविलेली असते. ऋग्वेद (५-४१-८; १०-८१-४; १०-१३५-१ ) आपस्तंब ( २-२-३-२२ ), मनु ( ३-८८ ) वगैरे ठिकाणीं वनस्पतींना आव्हान आहे. सोमपूजनाचा उल्लेख ( ६-४७-३; ३-९-२६-३; ८-४८-३; ३-२६-४ वगैरे ) इतर मंडळांत असून त्यासाठीं एक सबंध नववें मंडल गुंतलें आहे. हल्लीं हिंदूलोक पूज्य मानतात तीं झाडें वनस्पति खालीं दिल्या आहेत:—

**तुळस**—विष्णूला प्रिय आहे. वरिष्ठ वर्णाच्या व मराठ्यांच्या बायका हिला हळदकुंकु, फूल, पाणी घालून प्रदक्षिणा घालितात. अस्पृश्य-जातींत बहुतेक घरीं तुळशीवृंदावन असतें. ही स्त्री समजून शालिग्राम मूर्तिबरोबर किंवा कृष्णमूर्तिबरोबर कार्तिक शुद्ध १२ पासून १५ पर्यंत तिचें लग्न लावण्याची चाल सर्व ज्ञातींमध्यें आहे. ब्रह्मवैवर्तपुराणांत तुळशीचें महात्म्य दिलें आहे.

**बिल्व** (बेल)—शंकराला प्रिय आहे. बेलाचें त्रिदळ शंकराच्या पिंडीवर वाहतात. महाबळेश्वर येथें ( आणखी दुसऱ्या कांहीं ठिकाणीं ) बेल मिळत नाहीं; म्हणून निर्गुडीचें त्रिदळ चालतें. बेल गणप-

तीलाही वाहतात. बेलफळ औषधीं आहे, परंतु बेलाच्या झाडाची पूजा कोठेंही होत नाहीं.

**दूर्वा:**—देवी, गणपती आणि सूर्य ह्या तिघांना वहातात. दूर्वा औषधी आहेत. गर्भाधान संस्कारांत पत्नीच्या नाकांत दूर्वारस पतीनें पिळावा लागतो.

**शमी**—गणपतीला प्रिय आहे. आश्विन शुद्ध १० ( दसरा ) ह्या दिवशीं ह्या शमीची पूजा करितात. त्याच्या अभावीं आपट्याची पूजा करून ' सोनें ' म्हणून त्याचीं पानें एकमेकांस देतात.

**अर्क**—मांदार गणपति व मारुति ह्यांना प्रिय आहे. मांदाराचीं फुलें आणि पानें ह्यांची माळ मारुतीला घालतात.

**दवणा**—ह्यांची फुलांसह झाडें राम मारुती ह्यांच्या जन्मोत्सवाच्या दिवशीं म्हणजे चैत्र शुद्ध नवमीस आणि पौर्णिमेस देवाला वहातात; शिवरात्रीला शंकरालाही वाहतात.

**औदुंबर**—दत्तात्रयाला प्रिय आहे. ह्या झाडाखालींच बहुतेक दत्तपादुकांची स्थापना करितात. ह्यांचीं पानें कोणत्याही देवांला वहात नाहींत. गणेशचतुर्थीला, अनंतचतुर्दशीला, मंगळागौरीला पत्री गोळा करितात त्यांत पुष्कळ झाडांचीं पानें वाहतात, त्यांत औदुंबराचीं असतात. ह्याच्या समिधा लागतात.

**वड**—ह्याच्यावर त्रिमूर्तींची वस्ति आहे अशी समज आहे. ज्येष्ट पूर्णिमा (वटपूर्णिमा) ह्या दिवशीं सर्व वरिष्ट जातींच्या आणि मराठ्यांच्या बायका ह्याचें पूजन करितात. ह्याला पार बांधण्यांत पुण्य समजतात.

**पिंपळ**—( अश्वत्थ ) ह्याच्याखालीं मारुतीची, कित्येकठिकाणीं म्हसोबाची स्थापना केलेली असते. अश्वत्थाखालीं देव रहातात, असें अथर्व वेदांत (५—४—३) आहे. 'अश्वत्थ सर्व वृक्षाणां' म्हणजे वृक्षांमधील मी ( देव ) अश्वत्थ आहें, असें भगवद्गीतेंत ( अ. १० श्लोक २६ ) म्हटलें आहे. वांझ बायका पुत्रप्राप्तिसाठीं ह्याला प्रदक्षिणा घालितात. पिंपळाची मुंज लावतात.

**आंवळी**—कार्तिक शुद्ध चतुर्दशी ( वैकुंठचतुर्दशी ) ह्या दिवशीं ह्याची पूजा करितात. आणि त्याच्या सावलींत, स्नान भोजन वगैरे करितात.

**आंबा**—ह्याचा मोहोर ( फुलें ) महाशिवरात्रीला शंकराला वाहतात.

याशिवाय मुंजा गवताची मुंज वळून मुंजीच्या वेळीं बांधतात, दर्भ श्राद्धपक्षाला लागतात, अशोक झाडाखालीं सीतेला रावणानें ठेविली होती वगैरे गवत, झाडें निरनिराळ्या कामाला लावितात. स्थान महात्म्या-मुळें कांहीं झाडांस पुज्य मानतात, तीं झाडें:—गोरखचिंच, मदुराप्रांतांतील लाजाळू, गयेंतील अक्षय्यवट, गौरिबिदनूरजवळ उत्तरपेन्नारच्या कांठचा विदुरानें लाविलेला अश्वत्थ,कानडा जिल्ह्यांतील हनसूर येथील निंबाचें झाड, पळसाचा दंड क्षत्रियाच्या मुंजीला लागतो म्हणून पळस, कोंकणांत नारळी, भार्त वगैरे.

गोंडलोक एका झाडास आपला आद्य पुरुष समजून पूजा करितात. सिंगा झाडाखालीं शपथ घेणें येवढाच लग्नविधि भिल्लांचा असतो. होल-कोल लोकांच्या देवाला पळसाचें झाड प्रिय आहे. हाडसन (Hodgson) साहेब म्हणतात कीं, बंगालच्या पूर्वसीमेवरील कचुरी जातीचा बाथो नांवाचा जो देव आहे तो सिज म्हणजे एरंड होय ( आमच्या इकडे कुक्कुट होळीला एरंड किंवा पोपयाचें झाड लागतें ); ह्याच झाडाची पूजा ओरिसा आणि छोटानागपूर प्रांतांतील कांहीं जातींत आढळते; कालो जातीच्या लोकांत सालवृक्षाची आणि टिपेराव गारो ह्या लोकांत बांबूची पूजा करितात. ( Pages 85 & 110Descriptive Ethnology of Bengal By Edward Trite Dalton )

हमचा येथील पद्मावतीच्या जैन देवळांतून बाहेर आलेल्या झाडास लक्केगिड म्हणतात, ह्याला जिन दत्तानें आपला घोडा बांधला होता, म्हणून तो पूज्य मानतात. झाडाच्या पूज्यतेबद्दल शत्रुंजय महात्म्यांत सांगितलें आहे. बोधी झाडाखालीं बसून बुद्धानें धर्मचिंतन केलें म्हणून तें पूज्य मानितात. हीं प्रत्येक बुद्धाचीं निरनिराळीं आहेत; तथापि हरिवंश

---

१. अश्वत्थवट चूताद्या यवव्रीहितृणादयः । पंचदशी । चित्रदीप ॥ २०७ ॥

( १७–१६–२४–७३ ) येथें वर्णन केलेल्या चार झाडांना विशेष मान आहे. "तिबेटमध्यें[1] कमळाच्या आंत रहाणाऱ्या देवाची पूजा हाच प्रचलित धर्म आहे." जपानमध्यें प्रत्येक बागेंत देवदारु पाहिजेच असतो. तें शुभसूचक आणि दीर्घायुदर्शक आहे, अशी समजूत आहे.

"खजुराची बी देखील ऊं मारण्यास घेऊं नये, खजुरीच्या झाडाला मान दे, ती तुझी मावशी आहे, अशी महंमदाची आज्ञा आहे." "इजिप्त[3]-मधील मुसलमानांच्या स्मशानांत ताडाच्या फांद्या थडग्यांत खोंचलेल्या जिकडे तिकडे दृष्टीस पडतात." "उज्झां[4] येथें एका झाडाची पूजा होत असून त्याचें एक देऊळ होतें, त्याची पूजा होत होती, पण महंमदाच्या हुकमानें तें झाड काढून टाकलें." पार्शी लोकांत 'होम' झाडाची-वनपस्तीची जरूर लागते. "इराणमध्यें[5] 'फतिमा' नांवाचें एक देवझाड होतें, त्याला कपडे नेसवीत, त्याच्यावर तोडगे करीत, आणि तें संतुष्ट करण्यासाठीं अनेकप्रकारचे पूजासाहित्य अर्पण करीत.

यहुदी लोक एक देवभक्त होते, तरी मूर्तिपूजेकडे त्यांचा कल असे. ते सायक्यामोर ( एक जातीचा वड ) झाडाला पूज्य मानीत." ह्या वृक्षपूजनापैकीं धार्मिकपणा पूर्वी होता असें लेव्ह. २३-४० वरून दिसतें. त्यांत

1. At present in Tibet worship of the divinity in lotus is the dominant religion. P. 304. Abode of Snow. By Mr. Wilson.

२. पान १९८ भौतिक धर्म. म्याक्समुलर साहेबांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

3. At the present time "a wreath of palm branches stuck in the grave" is common in a Moslem cemetary in Egypt P, 23 Ceremonial Institutions By Herbert Spencer.

4. At Ouzza was a sacred tree, with a chapel built over it, which continued to be worshipped until destroyed by the orders of Mahomed P. 350 The Story of Man By J. W. Buel.

5. The Persians had their sacred tree of Fatima upon which they hung clothes, and amulets, and which they propitiated by offerings. Even among the Hebrews, a monotheistic people, though very prone to frequent idolatry, the sycamore was regarded as sacred. P. 171 Ibid.

असें म्हटलें आहे कीं, चांगल्या झाडांच्या फांद्या, ताडाचीं पानें घेऊन नाचावें, आणि स्वर्गामध्यें देवाची सेवा करण्याचें भाग्य मिळालेल्या लोकांच्या वर्णनांत त्यांच्या हातीं ताडाचीं पानें असल्याचें वर्णन आहे. "यहुदी, खिस्ती आणि महंमदी धर्मांनीं इतकी खटपट केली तरी प्यालेस्टाईनमध्यें झाडांच्या बद्दलची पूज्यबुद्धि गेली नाहीं. त्या भागांत प्रवास करीत असतांना आडवाटेला असलेल्या झाडांवर त्यांची वरचेवर पूजा होत असल्याच्या खुणा दिसतात. अनेकप्रकारच्या कापडाचे तुकडे आणि चिंध्या झाडांवर लोंबत असतात. ताप जावा म्हणून आणि दुसऱ्या कांहीं रोगांच्या निवारणार्थ हे कापडाचे तुकडे आरब आणि सीरियन लोक फांद्यांला बांधितात." मोखाडा पेठ्यांतील रानांतल्या झाडांना फांदोफांदी चिंध्यांचीं बाहुलीं टांगलेलीं दिसतात, आणि त्यामुळें कित्येक झाडांना चिंध्या देवी असें नांव पडलेलें असतें. "तुळशीचीं रोपें आरोग्यकारक म्हणून सिसिलीमध्यें प्रत्येक घराच्या खिडकींत असतात, असें यूलसाहेबांनीं मॉनियर वुइल्यम्स साहेबांस सांगितल्याचें त्यांनीं नमूद केलें आहे. "मार्च महिन्याच्या सतरा तारखेला प्याट्रिक साधूची पुण्य-

1. In spite of Judaism, Christianity and Islamism, the veneration of trees has remained persistent in Palestine. Travellers have always seen some of these isolated trees, to which the inhabitants paid a regular worship. It is not rare in this country to come across trees all covered with rags and strips of various stuffs. These have been hung on the branches by Arabs or Syrians in order to drive away fevers or to obtain the cure of certain diseases. P. 67 The Religion of Israel By Jules Sourey Translated by Annie Besant.

2. Sir H. Yule informed me that Basil is venerated in Sicily for its sanitary properties. The inhabitants keep it in the windows of their houses. P. 333 Foot note. Brahmanism and Hinduism By Sir Monier Williams.

3. St. Patrick's day (March 17) the Shamrock is worn in all parts of Ireland on this day—because the saint made use of this plant bearing three leaves upon one stem, as a symbol of the great mystery (the doctrine of trinity) P. 136 British Popular Customs By the Rev. T. F. Thistleton Dyer.

तीथ असते. त्या दिवशीं आयर्लंडमध्यें प्रत्येक ठिकाणीं शामराक ( त्रिदळपानें असलेलें झाड ) च्या फांद्या ज्याच्या त्याच्या हातांत दिसूं लागतात. आयर्लंडचे लोकांना त्रिमूर्तीची कल्पना देण्याला प्याट्रिक साधून ह्या त्रिदळाचा उपयोग केल्यामुळें ही चाल पडली आहे." "ईस्टरमध्यें आक्सफोर्डच्या विश्वविद्यालयांत एक झाड मैदानांत लावतात, आणि त्याचा कांहीं भाग प्रत्येक विद्यार्थी तोडून घेतो." "प्युरिटेन लोकांची सत्ता होण्याच्यापूर्वीं लंडनमध्यें पुष्कळ ठिकाणीं "मेदांडी" करीत; ती उंच आणि शोभिवंत करण्यांत चढाओढ लागत असे. सेंटपालच्या देवळाजवळच्या 'बिझिंगलेन' मध्यें एक उंच मेदांडी होती." "मे च्या दुसऱ्या तारखेला हेलनच्या पुण्यतिथीच्या दिवशीं रोवन झाडाच्या फांद्या तोडून आणून दारांवर लावतात. त्याचे तुकडे खिशांत किंवा पिशवींत ठेवल्यास भूत, चेटूक यांची बाधा होत नाहीं, अशी समज आहे; तेवीस जूनला जान साधूच्या पुण्यतिथीच्या दिवशीं 'सेंटजानवार्ट' नांवाच्या झाडाच्या फांद्या दरवाज्यावर, खिडक्यांवर, बांधितात. त्यानें घर शुचिर्भूत होतें आणि भूत पिशाच्चें निघून जातात, अशी समज आहे."

1. At the University College, Oxford, on this day (Easter-March 22) the representations of a tree, dressed with ever greens and flowers is placed on a turf close to the buttery and every member there resident, as he leaves the Hall after dinner, chops at the tree with a cleaver P. 167. Ibid.

2. London boasted several May poles before the days of Puritanism. Many parishes vied with each other .in the height and adornment of their own. One formidable Maypole stood in the Basing Lane near St. Pall's Cathedral P. 247 Ibid.

3. On May 2, St. Helen's day-Rowan-tree day-at Cleve land in Yorkshire some member cuts a supply of branches from a rowan tree, returns to the house by a different way than which he went out and the twigs are stuck at every door. A piece is always borne by many in their pockets or purses, as a prophylactic against witching......On the Eve of St. John the Baptist (June 23) they fix the sprigs of the plant called St. John's wort over their doors and some times over their windows in order to purify their houses and by that means drive away all feiends and evil Spirits. P. 320 British Popular Customs By T. F. Tistleton Dyer.

" सेंट लारिन्समधील आजिबवे लोक देवदाराला बळी वगैरे देतात." " सीरियामधील वृक्षपूजनाची चाल नुक्तीच बंद झाली." " डोडोनाचा कौल देणारा ' ओक, ' शुक्राचें मरटल, हरमीसचा पापलर, ब्रिटनमधील ड्रुइड लोकांचे ओक, टासिटसनें सांगितलेल्या जर्मनीमधील वृक्षराई, स्कायबेटांतील ओकराई, ह्यांची माहिती ( युरोपांत ) बहुतेकांना आहेच. ही वृक्षपूजा ग्रीस, फ्रान्स, पोलंड, असीरिया, आफ्रिका, अमेरिका, पोलेनेशिया वगैरे ठिकाणीं सर्वत्र होती." आतां कायद्याच्या भीतिनें, शेजाऱ्याच्या लाजेनें, स्नेही हंसतील वगैरे कारणांनीं ही वृक्षपूजा बंद झाली तरी पूज्य भावना अद्याप कायम आहेच. " प्लीनी म्हणतो कीं, पूर्वी देऊळ वगैरे कांहीं नव्हतें, तेव्हां झाडाखालींच देवाची पूजा होत असे; आणि त्यामुळेंच चर्च, कर्क, करकस वगैरे शब्दांचीं रूपें वृक्षबोधक मूळ शब्दांचीं आहेत, असें कित्येक म्हणतात. " ह्या वृक्षांचें पूजन होत नसलें तरी त्यांच्याविषयीं आवड नावड ख्रिस्ती राष्ट्रांत आहेच. " नाताळेच्या सणांत देवळाच्या

1. The Ojibways of St. Lawrence offer sacrifices to a pine tree P. 615 The Story of Man By J. W. Buel.

2. The worship of trees only disappeared in Syria at a very late date. P. 66 The Religion of Israel By Jules Sourey.

3. Every one is familiar with such instances as the prophetic oak of Dodona, the myrtle of Venus, the poplar sacred to the Hermes, the oaks of the British Druids and the sacred groves of Germany mentioned by Tacitus......The Oak copse in the Island of Skye. It ( the tree worship ) was once common in Greece, France, Poland, Assyria, Africa, America and Polynessia. P. 330 Brahmanism and Hinduism By Sir Monier Williams.

4. Pliny asserts that tha earliest form of temple or church was a tree and some think that the word kirk is cognate with quercus. Ibid.

5. The favourite plants for church decoration at Christmas are holy, bay, rosemary and laurel. Ivy is rather objectionable from its associations having anciently been sacred to Bacchus. Cypress seems inappropriate from its funeral relations. One plant, in special, is excluded—the mistletoe. P. 458 British Popular Customs. By the Rev. T. F. Thistleton Dyer.

शोभेसाठीं कांहीं झाडें लागतात, कांहींना बंदी आहे. होली, बे, रोजमेरी, लारल ह्यांचा उपयोग करितात; इव्ही झाडाचा संबंध पूर्वीच्या बाकस ( कामदेव ) पूजनाशीं येतो; म्हणून तें नको असतें. सुरूचा उपयोग प्रेतकार्यांत होतो, म्हणून त्याला बंदी; बांडगूळ किंवा अंबरवेलीचा तर विटाळच होतो. " " पण हीच अंबरवेल स्वयंपाक घरांत शिरून तेथें तिची मोठी प्रतिष्ठा आहे. तिचा उपयोग ड्रुइड लोकांच्या विधर्मी पूजेमध्यें होत असल्यामुळें देवळांत तिला कधींच येऊं दिली नाहीं. " " हेझल झाडास अजूनही इंग्लंडांत पूज्य मानितात. "

ह्याच्या जवळ जवळ ह्मणजे नवान्न इष्टि आणि नवरात्रांत घटाच्या-जवळ धान्य पेरून त्याचे तुरे दसऱ्याचे दिवशीं मराठे वगैरे इतर जातींत पागोट्यांत खोंवतात, तो प्रकार होय. असलाच प्रकार " सिसिलीमध्यें बायका करितात. ईस्टरच्या सुमारास बशांमध्यें गहु, हरभरे वगैरे रुजत घालितात आणि त्या बशा अंधेरांत ठेऊन दर दोन दिवसांआड त्यांला पाणी घालितात, आणि ख्रिस्ताच्या मूर्तीजवळ स्थंडिलावर हीं रोपें ठेऊन मिरवणूक काढितात. " आपल्या इकडे हळद-कुंकु मांडितात, त्यावेळीं अगोदरपासून अशीं शेतें करण्याची चाल पुष्कळ बायकांची होती; आतां ती मोडत चालली आहे. " सॉर्डिनियामध्यें

1. Brand thinks that mistletœ was never put in churches......for it was heathenish or profane plant as having been of such distinction in the pagan rites of Druidism and it had its place therefore assigned to it in kitchen, where it was hung in great state. P. 459 British Popular Customs.

2. Free worship in Englanu remains for hazel nut P, 22 Vol. I. Asiatic Studies By Sir Alfred Lyall.

3. At the approach of Easter, Sicilian women sow wheat, lentils and canary seed in plates, which are kept in the dark and watered every two days. These plants are put with the effigies of Christ on altars and carried in procession Book III Ibid.

4. In Sardinia, gardens of Adonis are still planted in connection with the great midsummer festival of St. John. The Maypole in Sweeden and Bohemia ;and straw Kupalo in Russia are examples of tree worship. P. 126 Vol. II The Golden Bough By M. Fraser.

उन्हाळ्यांत जानसाधूच्या पुण्यतिथीला अशींच शेतें किंवा अडोनिसच्या बागा मिरवणूकींत काढितात. स्वीडनमधील मेपोल आणि रशियामधील गवती कुपोलो हीं वृक्षपूजेचींच उदाहरणें आहेत. "

झाडाचीं वाढ, फुलें, फळें दृष्टीस पडतात, तीं मरतांना आपण पहातों; परंतु पर्वत कसे झाले हें सांगतां येत नाहीं. झाडापेक्षां दुर्ज्ञेयत्व आणि म्हणूनच भीति पर्वताविषयीं अधिक वाटते. पर्वताची निव्वळ पूजा विशेष कोठें नाहीं. हिमालय हें शंकराचें स्थान मानितात, पुष्कळ पर्वतांवर शंकराचें देवालय असतें, पेठेकडच्या डोंगरावर कांहींच नसतें; परंतु जावली तालुक्यांत किंवा बहुतेक सातारा जिल्ह्यांत डोंगरावर शिब-मंदिर आणि पाणी हें सांपडतेंच. चित्रकूटावर राम राहिले होते; म्हणून त्याची यात्रा, शिखर शिंगणापुरावर महादेवाची यात्रा वगैरे पुष्कळ डोंग-रांवरच्या देवालयांवरून त्या डोंगरांना महत्त्व आलें आहे. गिरनार वगैरे

**पर्वतपूजा.**

पर्वतांना सुद्धां त्यांवरील जैन लोकांच्या देवळांमुळेंच थोरवी आली आहे. " सांतळ लोक आपल्या देवांस मरंग बोरु म्हणतात, आणि त्याचा अर्थ विचारला तर मोठा पर्वत असें सांगतात. इंद्राची पूजा गोकुळांत होती; त्या इंद्राचें महत्व कमी दाख-विण्यासाठीं गोवर्धन पर्वत हाच आपला देव, आपण वनांत रहातों त्यांची उपजीविका त्याच्यावर चालते. इंद्र पाऊस पाडीत नाहीं, आकाशांत ढग येऊन त्यांपासून पाऊस पडतो " अशी विचारसरणी गोपालकृष्णानें नंदापुढें मांडली व ती त्यांना पटली आणि त्यांनीं गोवर्धन पर्वताची पूजा केली.

---

1. A Santal could only explain Marang Boru 'the great mountain' as Dev. P. 216 The People of India By Sir Herbert Risley.

२. रजसा चोदिता मेघा वर्षन्त्यंबूनि सर्वतः । प्रजास्तैरेव सिध्यन्ति महेंद्रः किं करिष्यति ॥ न नः पुरो जनपदा न ग्रामा न गृहा वयं । वनौकसस्तात नित्यं वनशैलनिवासिनः ॥ तस्माद्गवां ब्राह्मणानामद्रेश्चारभ्यतां मखः ॥ भागवत ॥ १०।२४।२३।२६.

मेक्सिकोमधील लोक मोठमोठ्या पर्वतांना देव म्हणून पूजीत असत, आणि पेरू प्रांतांत बर्फमय पर्वतांची पूजा होत असे. " ज्यूलोकांच्या दंतकथेवरून बर्फमय हरमान हा देवच झाला होता, असें दिसतें. लेबनन पर्वताला हिब्रूलोक खरोखर देव म्हणून पूजीत असत. खिस्त शकाच्या पहिल्या शतकापर्यंत कार्मेल पर्वतावर कौल देणारा देव होता, त्यामुळें टासिटस म्हणतो कीं, तो पर्वत म्हणून आणि देव म्हणून दोन्ही भावना कायम होत्या "

देव म्हणून पर्वताची भावना असो, किंवा नसो; पण त्यापासून उत्पन्न होणारी नदी, ओढा, पाण्याचा प्रवाह, लहान मोठा असला तरी अन्ना-पेक्षांहि जीवनास आधार जें जीवन देणारी वस्तु तिच्याविषयीं पूज्य बुद्धि लहान खेड्यापाड्यापासून तों शहरांतील रहिवाशापर्यंत आढळते.

**नदीपूजा.** ऋग्वेदांत गंगा, यमुना, सरस्वती, शुतुद्रि, परुष्णि ( इरावती ) असिक्नी, मरुद्वृधा, वितस्ता, आर्जिकीया ( विपाशा ), सुषोमा; त्या प्रमाणेंच शरयू आणि सिंधु; आणि तृष्टामा, रसा, श्वेति, कुभा, गोमति, क्रुमु इतक्या नद्या सांगितल्या आहेत. त्यांपैकीं मनूनें ( ८-९२ ) गंगा आणि यमुना येवढ्याच दोन आणि प्रभास आणि पुष्कर हीं तीर्थें पवित्र धरिलीं आहेत;

---

1. P. 365 the Data of Socialogy By Herbert Spencer.

2. In Jewish traditions the mountain (the snowy Hermon) became a kind of Brocken. The Hebrews certainly worshipped Lebanon as a God. Carmel where a celebrated oracle still existed in the first century A. D. was at once, as Taicitus tells us, a mountain and a God. P. 77 The Religion of Israel By Jules Sourey translated by Annie Besant.

३. इमंमे गंगे यमुने सरस्वती शुतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ॥ असिक्न्या मरुद्वृधे वितस्तयार्जीकीये शृणुह्या सुषोमया ( मं. १०-७५-६ )

४. सरस्वती सरयुः सिन्धुरूर्मिभिर्महो महीरवसाऽऽयज्जुवक्षणीः । मडं. १०-६४-९.

५. तृष्टा मया प्रथमं यातवे सजूः सुसर्त्वा रसयाश्वेत्यातमा । त्वं सिंधो कुभया गौमतीं क्रमुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे ( मं. १०-७५-७. )

तथापि दुसऱ्या पुष्कळ मोठमोठ्या नद्यांच्या यात्रा वगैरे होतात. दोन नद्यांचा संगम आणि तो प्रीतिसंगम असला कीं तें पुण्यक्षेत्र समजून पर्वणीला तेथें आसपासचे लोक स्नानाला जमतात. गंगा, यमुना, सरस्वती, कृष्णा, गोदावरी, नर्मदा, कावेरी, शरयू, सिंधु, वगैरे मोठमोठ्या नद्या आहेत, त्यांपैकीं गंगा नदीच्या मूर्ति नाशीक वगैरे ठिकाणीं आहेत. कृष्णाबाईचें देऊळ महाबळेश्वरीं आहे, सिंधुनदीचा देव ' दर्यापीर ' नांवाचा लोहाणा जातीच्या प्रत्येक गांवीं असतो, आणि त्याच्यापुढें नंदादीप जळत असतो ( P. 55 Vol. I Gazzetteer Cutch, Palanpur and Mahikantha )

अशा नद्यांच्या स्नानानें पापनिवारण होऊन पुण्य जोडतें, ही समजूत असल्यामुळें " यात्रा[1] व मेळे भरतात, ह्याला हंसणारांनीं ब्रेटनच्या पापक्षालन पत्रिका खिस्ती राष्ट्रांत चालू आहेत तें लक्षांत आणावें." केलेल्या दुष्ट कर्माचें निरसन दुसऱ्या कोणच्यातरी मार्गानें करण्याचे हे प्रयत्न आहेत. " काय काशी करिती गंगा। भीतरी चांगा नाहीं तो ॥ ' असल्या तुकारामाच्या उक्तीचा तडाखा ह्या यात्रांवर आहे, आणि " उपेक्ष्य तत्तीर्थयात्रादीञषादी तेव कुर्वता। पिंडं समुत्सृज्य करंलेढीति न्याय आपतेत् ॥ पंचदशी ॥ ध्यानदीप ॥ ३० ॥ ब्रह्मचिंतन करण्याचें सोडून यात्रा वगैरे हिंडणाऱ्या लोकांनीं हातचा घांस टाकून नुसता हात चाटण्यासारखें आहे, असें विद्यारण्य वगैरे म्हणत आले असूनही लोकभ्रम कायमच आहे.

कांहीं ठिकाणचें महात्म्य केवळ आरोग्यकारक गुणांनीं वाढलेलें असतें. जिल्हा रत्नागिरी, तालुका वेंगुर्लें, मुक्काम वेतुरें येथील सातेरा देवीच्या देवालयाजवळच्या विहीरींतील पाण्यानें ५।७ स्नानें केल्यास पाल, कोळी, उंदीर अगर फुरसें ह्यांचें वीष उतरतें. म्हणतात. ( राष्ट्रमत–तारीख १४ चे आगष्ट सन १९०९ चे अंकावरून ) समुद्रस्नानाचें महात्म्य फार मोठें समजतात, त्यांत रामेश्वर, द्वारका आणि

1. Fairs and Melas resemble nothing so much as the pardens of Bretagne. P. 275. The Religions of India By A. Barth.

जगन्नाथ हीं तीन धामें समुद्रकाठचीं आहेत. खुद्द रामेश्वरास समुद्र नाहीं, तरी सेतू घेण्यासाठीं धनुष्कोटीस समुद्रतीरावर स्नानास जावें लागतें. "[1] एस्किमो लोक समुद्राचा 'टोरुगाक' नांवचा देव समजून त्याची पूजा करितात." ग्रीक आणि रोमन लोकांत समुद्राचा देव नेपच्यून म्हणून त्याची पूजा असे. "[2] पेरूमधील लोक सियेरावरून मैदानांत येतात, ते समुद्राची पूजा करितात, त्याला भुवयांचे केस वाहतात, आणि आरोग्य मागतात." व्हेनिसच्या लोकांमध्यें आणि व्यापारी वर्गामध्यें समुद्राचें महात्म्य फार आहे, यांत नवल काय ? समुद्राचा पावसाळ्यांतील उच्छृंखलपणा कमी होऊन जहाजें सुरक्षित जाण्याची सुरवात होते म्हणून नारळीपूर्णिमेस समुद्रपूजन करितात. नदीला अपरंपार पूर आला म्हणजे तिचीही खणनारळांनीं ओटी भरतात. '[3] फिलिस्टाईन लोकांचा बहुतेक व्यवहार समुद्राशीं असल्यामुळें त्यांचाही 'डेगन' म्हणून समुद्र देव होता.'

मक्केस नदी नाहीं; परंतु तेथील झमझम नांवाच्या विहीरीचें पाणी खारट असूनही त्यांतील पाण्याचा स्पर्श सुद्धां पुण्यकारक समजतात. "[4] मक्केच्या कब्बाची यात्रा, तेथील काळ्या दगडाचें चुंबन, शाफा आणि

---

1. The Esquimau worship or rather recognize a god of the sea called Torugok P. 401 The Story of Man By J. W. Buel.

2. The Peruvians who descend from the Sierra to the plains, worship the sea, when they approach it and pull ouf the hair of their eyebrows and offer it and pray not to get sick. P. 367 The Data of Sociology By Herbert Spencer.

3. The Philistines, a seafaring people the chief object of their worship was a sea god Dagon. P. 17 Outlines of History By Thomas Knightley.

4. The pilgrimage of Kábah of Mekkah, the kissing of the black stone, the running (naked) between Cafa and Merwah, the throwing of stones, the sacrificing of cattle &c. were in use long before the time of Mahomed and as is well known only retained and assimilated to Islamism but not introduced by him. Article III Delivered 11th March 1876 By E. Rahatsek in Vol. XII No. XXXII of the Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society,

मेरवा टेकड्यांमध्यें सात वेळ नागव्यानें फेऱ्या घालणें, दगड फेंकणें, नानाप्रकारचे बळी देणें वगैरे प्रकार महंमदाचे अगोदरपासून चालू आहेत, तेच महंमदानें कायम ठेऊन आपल्या धर्मांत गोंवून घेतले, त्यानें नवे काढले नाहींत. " पार्शीलोक समुद्राची पूजा करतात, हें सर्वांस ठाऊक आहे. टायबर नदीला रोमचे रहिवाशी किती मान देतात, ह्याचें वर्णन वाचलें म्हणजे गंगा वगैरे नद्यांच्या स्तोत्रांचें नवल वाटत नाहीं. " कार्सिका जिंकणारा मासो ह्यानें एका लहानशा झऱ्यावर देऊळ बांधविलें होतें. टायबर, स्पायनो, अल्मो, नोडिनस आणि दुसऱ्या नद्या यांचीं स्तोत्रें नित्य पाठांत होतीं."[1]

" ख्रिस्ताचें कबरस्थान, जरुसलेम, यांच्या दर्शनानें पवित्र होऊन जोर्डन नदींत देह भिजवून पुण्यसंचय करावा, या हेतूनें रशियांतील यात्रेकरू जातात; परंतु त्यांना मुख्य महत्व वाटत असतें तें अशाचें कीं, ख्रिस्ताच्या पादस्पर्शानें पवित्र झालेल्या दगडांचें चुंबन घ्यावयास सांपडेल; ( क्रूसावर चढविण्यासाठीं ) ख्रिस्ताला ज्या वाटेनें नेलें, व जिला अजूनही ' रडतोंडी ' म्हणतात, त्या वाटेनें जावयास सांपडेल; आणि त्या ( भयंकर ) प्रसंगीं ख्रिस्ताला झालेल्या दुःखाची आठवण करून त्याची कल्पना करावयास मिळेल; गोलगोथा ( अस्थिकुंड ) येथील धूळींत लोळावयाचें भाग्य येईल, आणि मरणाच्या तयारीनें जोर्डन नदींत बुडया मारावयाची संधि येईल, असले विचार त्या यात्रेकरूंच्या मनांत घोळत असतात. "[2]

1. We see that Mass, the conqueror of Corsica, dedicated a temple to a fountain and the names of Tiber, Spino, Almo, Nodinus and other neighbouring rivers are in the prayers of the angers. P. 123 Cicero on the Nature of the Gods By C. D. Young.

2. The idea of acquiring merit for themselves by going to Jarusalem and bathing in the Jordan is a somewhat minor motive; to kiss the stones that He trod, to stagger with all pain along the way of sorrows, to prostrate themselves in the dust of the Golgotha, and to bathe in their death-shrouds in the Jordan—these are ends in themselves. With the Russian Pilgrims to Jarusalem. By Stephen Graham. Review of Times of India dated 25th October 1913.

"डर्बीशायरमधील[1] डोनेडेलपासून जवळ असलेल्या टिसिंगटन गांवीं एप्रिलच्या तीस तारखेस गुरुवारीं विहिरींचा उत्सव होतो. तेथील पांचही विहीरींना माळा घालतात, आणि बायबलांतील वाक्य पठण झाल्यावर त्या विहीरींचीं गाणीं गातात."

राजापुरास गंगा आली म्हणजे यात्रा भरते. कृष्णाबाईच्या देवळांतील पंचगंगेच्या वगैरे आरत्या म्हणतात. वाईस किंवा कृष्णाकांठच्या इतर ठिकाणींही कृष्णेचे उत्सव होतात. त्याप्रमाणेंच "वुरसेस्टरशायरमधील[2] ड्राइटवुइचयेथें एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या तारखेस रिचर्ड साधूच्या पुण्यतिथीला उत्सव होतो, त्या प्रसंगीं तेथील विहीरीवर हिरव्या फांद्यांच्या कमानी उभारून माळा घालतात." "डाउनप्याट्रिकजवळच्या[3] स्टूले येथें जून महिन्याच्या तेवीस तारखेला मध्यरात्रीं उत्सवाला आरंभ होतो. त्या ठिकाणीं प्याट्रिक साधूच्या (आसनाचें) खुर्चीचे दर्शनाचा नवस फेडण्यास लोक येतात. तेथें स्थंडिलासारख्या दगडांच्या राशींतून झरे, ओहोळ निघतात, त्यांत स्नान केल्यानें आपलें व्यंग दुरुस्त होईल, अशा समजुतीनें लंगडे, पांगळे आणि आंधळे लोकांची गर्दी जमत असते."

---

1. One of the present customs is Well dressing on Holy Thursday or Ascensionday (April 30.) They are decorated with flowers arranged in the most beautiful devices. A porion of the scripture is read at each and a psalm or appropriate hymn is sung. P. 211 British Popular Customs. By the Rev. T. F. Thistleton Dyer.

2. At Droitwich in Worcestershire, on the day of St. Richard (Aprii 3) they keep a holiday and dress the well with green boughs and flowers. P. 188 British Popular Customs By T. F. T. Dyer.

3. At Stoole, near Downpatrick, there is a ceremony commencing at 12 O'clock at night on Midsummer Eve (June 23.) A penance is performed at St. Patrik's Chair.........The wells, streams issuing from them (a pile of stones called the Altar) are thronged by crowds of halt, maimed and blind to wash away their infirmities. Pp. 3-22-23 Ibid.

" आयर्लंडमधील कार्काउंटींतील ली नदीच्या उगमाची यात्रा पुष्कळ लोक करितात. त्या वेळीं गंजलेला लोखंडाचा तुकडा एकमेकांस देघे करितात. " हा प्रकार ग्रहणांतल्या ' तांबेदान, लोहदानासारखा असेल काय ? पण त्याचा अर्थ तिथल्याच लोकांना ठाऊक नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. " मानें बेटांत पूर्वीं विधर्मी देवतांची पूजा होती, ती ख्रिस्तीधर्मानें नाहींशी केली, आणि त्याबरोबर तेथील देवळें आणि नद्या ह्यांचें महात्म्य बुडालें, परंतु त्या देवतांच्या ठिकाणीं ख्रिस्ती साधू येऊन तीं देवळें पुनीत झालीं आणि नद्यांतील, झऱ्यांतील पाण्यांत गुण आहेत म्हणून यात्रेकरूंची गर्दी होऊं लागली. लुर्डेचें पाणी बाटल्यांत भरून परगांवीं पाठविण्याचा धडाका चालू आहे. ह्या झऱ्याला कुमारी मेरीनें आशीर्वाद दिल्यानें रोगपरिहारक गुण त्या पाण्यांत आला आहे, तो आहेच असें म्हणतात. " कृमीनाशक गुण भागीरथीच्या पाण्यांत आहे असें हापकिन साहेबांनीं त्या पाण्याचें पृथक्करण करून आपलें मत दिलें आहे. फाघा ( झेलमचा एक भाग ) इलाखा आहे, त्यांतील जलपानानें वांझपण जातें, तसाच दुसरा एक झरा शहामहमदवालजवळ आहे; कोहातपासून दूरदूरचे लोकें येथें येतात.

ह्या वृक्ष, पर्वत, नदी पूजनाचा प्रकार वस्तुपूजनांत पुष्कळ लोक ढकलतात, परंतु थोडा सूक्ष्म विचार केल्यास ह्यांतसुद्धां एकप्रकारचें वशीकरण किंवा सरळ मार्गापासून परावर्तन असतें. औषध न घेतां किंवा

---

1. A pilgrimage to the source of the river Lee is one frequently performed. A piece of rusty iron is passed from one devotee to another with much ceremony P. 329 and 320 Ibid.

2. In the Isle of Man the veneration with which the Pagan deities were regarded having been transferred along with their fanes and fountains to Christian Saints, sanctified and sensative wells became the resort of the pious pilgrim......Lourdes water, bottled and exported, is still held to possess curative virtue on account of the Virgin's original blessing bestowed upon Lourdes spring. P. 164 Human Personality By Myeres.

3. P. 63. Jhelum District Gazetter.

औषधें घेऊन कंटाळल्यावर कशानें तरी रोग जावो म्हणून गंडदोरा बांधावयाचा, त्याप्रमाणेंच ह्या जन्मांत, किंवा जन्मांतरीं केलेल्या पापाची शिक्षा भोगावयास लागूं नये म्हणून स्नान दान, तीर्थयात्रा वगैरे दुसऱ्या कोणच्या तरी उपायांनीं पुण्यसंचय करून त्या पापाशीं वजावाट घालावयाची, हा हेतु त्यांत असतो. नदी उचलून नेतां येत नाहीं म्हणून भागीरथी भरून न्यावयाची, धनुष्कोटीहून समुद्राची रेती फडक्यांत बांधून आणावयाची. देवदर्शन आपल्यास झालें, तें बायकामुलांना झालें नाहीं म्हणून देवाचा निर्माल्य, अंगारा पदरांत बांधावयाचा याचा अर्थ काय होणार ?

आतां "ह्या जड पदार्थांच्यापेक्षां चेतन म्हणजे सजीव पदार्थांची म्हणजे पशुपक्ष्यांची पूजा वरच्या दर्जाची आहे, असें सर्व तज्ज्ञांचें ह्मणणें आहे." त्यामध्यें सर्पपूजा सर्व ठिकाणीं, सर्व देशांत, सर्व कालीं दिसते.

सर्पपूजा. या सर्पासारखा चपल, नेहमीं लपून राहणारा, दंशाबरोबर प्राणांताची वेळ आणणारा प्राणी क्वचितच सांपडेल. ऋग्वेदामध्यें सर्पपूजा नाहीं. तरी पाणी अडविणाऱ्या 'अहि' सर्पाचा नाश इंद्रानें केला; आप्त्याचा पुत्र त्रित ह्यानें अहीशीं युद्ध केलें, आणि सप्तपुच्छ त्रिशिर नागाला मारून पशूंची सुटका केली, अशा कथा आहेत. झेंद अवेस्तामध्यें सुद्धां ह्याच मासल्याच्या गोष्टी आहेत; थ्राओ टाओनोनें त्रिशिर, त्रिकटि, षट्पुच्छ, अनंतवीर्य रोगरूपी सर्पाचा नाश केला, असें पार्शीग्रंथांत आहे. ऋग्वेद अ० ८।८।३८ हें सर्पाचें स्तोत्र आहे असें कोणी म्हणतात; परंतु तें सूर्याचें आहे, ह्यांत संशय नाहीं. अथर्ववेदाच्या आणि ब्राह्मणाच्या कालांत सर्पपूजा आली होती. सूत्रकाळीं सर्पांना आहुति देण्याचा प्रघात पडला होता; देव, औषधी, राक्षस वगैरे यांच्याप्रमाणेंच सर्पांना संतुष्ट करण्याची पद्धत दिसून येते ( पहा. सांख्य ४–९–३; आश्वलायन २–१–९; ३–४–१; पाराशर २–१४–९ ). सर्पांना रक्ताचे अर्घ्य द्यावयाचे असत ( पहा.

1. Animal worship is pronounced by students of comparative religion to be an advance upon fetichism. P. 525 The Story of Man By J. W. Buel.

आश्वलायन ४–८–२७ ). ज्ञानेश्वरांनीं ह्या नागपूजेचा उपहास केला आहे. ' लोक ' जितक्या भक्तीनें एकादशीला विष्णूची तिथि पाळतात, तितक्याच आदरानें श्रावण शुद्ध पंचमीला नागाची पूजा करितात. " ही काय भक्तीची तऱ्हा ! पिंवळ्या गंधानें, हळकुंड उगाळून नागाचें चित्र पाटावर काढावें, छापील नागाचें चित्र भिंतीस लावावें, किंवा तसल्या आकृती भिंतीवर रंगवाव्या, आणि त्यांचें पूजन करावें; वैदु लोक नाग धरून आणितात, त्यांना दूध नैवेद्य द्यावा, कागदाचा किंवा मातीचा नागोबा करून त्याची मिरवणूक काढावी, हे प्रकार महाराष्ट्रांत दिसतात. गुजराथेंत सर्पाच्या वारुळापाशीं जाऊन बायका पूजा करितात; आणि तेथें शेजारच्या किंवा पाणोठ्यांच्या गांवच्या बायकांचा गालिप्रदान प्रकार चालतो असें ह्मणतात. दक्षिणेकडेही वारुळाजवळ नागोबाची पूजा करण्याचा प्रघात आहे. पिंपळाच्या झाडाला टेंकून सर्पाकृति वठविलेले दगड पुष्कळ पारावर ठेवलेले असतात. ह्यांची नित्य पूजा कोणी करीत नाहीं, तरी इतर देवांबरोबर पळी पळी पाणी कोणी यांनाही घालितात. हे दगड मूळ कांहीं नवसाचे असतात. कुर्गप्रांतांत वृश्चिक संक्रांतीच्या दिवसांत ( नाग राहण्याच्या जागा जे नाट त्या ) नाटांच्या जवळ दिवे लावतात; आणि नारळ फोडितात. जनमेजयानें सर्पसत्र केलें, त्याची जागा ह्मैसूर संस्थानांत हिरेमंगळूर येथें दाखवितात. सर्पाचें देऊळ प्रयोगास दारागंजांत आहे, तेथें वासुकी नागाची पूजा होते, पण पुजारी ब्राह्मणेतर असतो. काशीस दशाश्वमेधी राजा वासुकीचें देऊळ झाडीमध्यें आहे.

" काश्मीरप्रांतांत पहिले वसाहत करणारे नागलोक होते. त्यावेळीं

---

१ एकादशीच्या दिवशीं । जे तुला पाड आह्मासी । ते तुलाची नागासी । पंचमीच्या दिवशीं ॥ ज्ञानेश्वरी ॥ १३।१८ ॥

2. P. 124. Vol II Indian Antiquary.

3. They appear as the first inhabitants of the country of Kashmir, at a time when it was all a marsh and even still they inhabit the waters of the valley, of which they are the protectors. P. 25 Seq. Vol. I Rajtarangini.

सगळीकडे दलदली होत्या; आणि अजूनही पाण्याच्या जवळ ते लोक राहतात; ते आपल्यास जलाशयाचे रक्षक ह्मणवितात." "नागपूर[1] आणि मध्यप्रांताचे कांहीं जिल्हे, चंदापूर, भांडक वगैरे येथें कांहीं देवळांची यात्रा मोठी भरत असते. दक्षिण हिंदुस्थानांतील कानडा जिल्ह्यांत बहुतेक सर्वत्र सर्पपूजा आहे." रोहिलखंडांतील रामनगरचें[2] नांव अहिछत्र असें अद्याप आहे. "भुजाच्या किल्ल्यांतील, नागोबाच्या भेटीला रावची स्वारी फार थाटानें काढण्याची जाडेजा लोकांत चाल[3] आहे." उलुपी नागकन्येबरोबर अर्जुनाचें लग्न झालें आणि त्यापासून बभ्रुवाहन झाला, अशी कथा महाभारतांत आहे, ह्यावरून त्या वेळेपासून नागजातीचे लोक असावे, असा पुष्कळांचा तर्क आहे. आसामांत ह्या बभ्रुवाहनाचे वंशज कांहीं लोक ह्मणवितात, आणि त्यावरून जनमेजयाचें सर्पसत्र ह्मणजे ह्या नागलोकांबरोबरचें युद्ध असें कित्येक ह्मणतात. "बुद्ध[4] धर्माच्या प्रसाराबद्दल फर्ग्युसन साहेबांचें असें मत आहे कीं, ज्या लोकांत पूर्वी सर्पपूजा होती असा खात्रीलायक पुरावा मिळतो, त्यांच्याखेरीज

---

1. Other shrines in the neighbourhood of Nagpore and certain districts of the Central Provinces (such as Chandapur, Bhandhak &c.) are much frequented at certain seasons. In Southern India the whole of Kanara may be regarded as steeped in serpent worship. P. 325 Religious Thought and Life in India By Monier Williams.

2. General Cunningham discovered that Ramnagar in Rohilkhand is still known as Ahichhatra. P. 359 Vol. I Ancient Geography.

3. The most gorgeous festival of the year of Jadejas is the Rao's procession to the snake temple in Bhujia Fort. P. 64 Vol. V Gazetteer. Cutch. Palanpur and Mahikantha.

4. In Mr. Fergusson's opinion it is nearly correct to assert that no people adopted Budhism except those among whom serpent worship can certainly be traced as pre-existing, Tree and Serpent Worship 21.

इतर कोणीही बुद्धधर्म स्वीकारिला नाहीं'' "बुद्ध धर्माचे लोक सर्पाला मान देतात आणि त्यांच्या धार्मिक आणि लौकिक ग्रंथांत, महामान व हीनयान दोन्ही पंथांच्या ग्रंथांत त्यांचें बरेंच वर्णन येतें.' तारा ही नागकन्या आहे आणि तिचें बुद्धगयेंतील देऊळ हुएन्त्संग ह्यानें पाहिल्याचें लिहिलें आहे. त्याच्या मनानें ही तारा बोधीसत्वाचाच अवतार आहे. तारा पेन्नु अशी जी खोंड लोकांची देवी आहे ती हीच, आणि ह्मणून तारा ही नागकन्या आणि आकाशांतील तारा झाली. तरस शब्दापासून इंग्रजी शब्द स्टार तारा झाला; पण गोंडभाषेंत त्याचा अर्थ सर्प आहे.'' गोंड लोकांत नागाचा वार्षिक उत्सव होतो; परंतु त्याचा प्रकार फार गुप्त चालतो, त्यामुळें कांहीं माहिती मिळण्यास मार्ग नाहीं. जैन लोक कशाचीच हत्या करीत नाहींत, त्यामुळें ते सर्प मारीत नाहींत; परंतु हंचा वसविणाऱ्या जिनदत्ताचें लग्न नागकन्येशीं झालें होतें असें ह्मणतात. पुत्रप्राप्तीचा नवस करण्यासाठीं किंवा फेडण्यासाठीं सुब्रह्मण्याच्या क्षेत्राला जाण्याचें सामर्थ्य नसल्यास कडप्पा प्रांतांतील लोक गावांतच दगडावर सर्पाची आकृति खोदून त्याचीच पूजा करितात. सुब्रह्मण्याचें वाहन सर्प पुष्कळ ठिकाणीं दाखविलेलें असतें. सातारा जिल्ह्यापैकी खटाव तालुक्यांतल्या बुधगांवीं शिवरात्रीला नागेश्वरचा नाग नदीच्या कांठीं वाळ-

1. They are honoured among the Budhists and they hold equally a prominent place in literature and iconography of the Buddhism of the North as well as the South. P. 266. The Religions of India By A. Barth.

2. Tara is the snake goddess whose shrine at Buddha Gaya is mentioned by Hionen Tsiang. Books VIII and IX Beal's Records of the Western World Vol II pp. 103 and 174 Hionen Tsiang calls her a form of Bodhisatva. She is still worshipped in Orissa by the Khonds as Tara Pennu, the female (pen ) Tara and thus she is a snake and star goddes, for taras, which has become our 'star' is in Gondi a snake. P. 93 Foot Note. The Ruling Races of the Prehistoric Times. By J. F. Hewitt.

3. P. 528. The Religions of India, By E. U. Hopkins.

4. P. 283. Cuddapah Manual. By J. D. B. Gribble.

वंटांत निघतो; त्याचें तुटकें शेंपूट व एक लहान डोळा ही खूण असते; पुण्यासही आंबेकरांच्या बोळांत साठ्यांच्या घरीं असा नाग कित्येक वेळां निघत असे, " विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं उत्तर हिंदुस्थानांत सर्पाचीं ( फारशीं ) देवळें नाहींत; आणि ह्या सर्पांचे पुजारी कोणीतरी ब्राह्मणेतर असतात. "

" अकेडियांतील मुख्य देव इया होता, त्याचें इरिधू येथील मुख्य देवळांत त्याची सर्पाकृती पूजीत असत, आणि इरिधू ह्याच केंद्रापासून चाल्डियांतील सुधारणेचा प्रसार झाल्यामुळें ही सर्पाकृति त्याच्या देवाचें चिन्ह आहे, आणि त्यांचा धर्महीं तसलाच आहे, अशी जिकडे तिकडे समज झाली. झाराथुष्ट्राच्या अनुयायांनीं तुराणी लोकांस जिंकण्यापूर्वी ते पृथ्वीदेवीची पूजा करीत; तिची मूर्ति सर्पाकारच होती; तीच पुढें माझांचा अंग्रमन्यु, सैतान, पृथ्वी आणि लबाडी ह्यांची दर्शक झाली. "

" टेरेबिन्थसच्या शिष्यानें इराणामध्यें सन २६१ मध्यें मनीशियन पंथ स्थापन केला; त्याचें मत असें होतें कीं अडाम आणि इव्ह यांना

1. It is worthy of notice; 1st that temples dedicated to serpents are not found in the North of India; 2nd that the priest of such temples are not Brahmins but belong to the lower castes. P. 296. Foot Note Vedic India. By Zenaide A. Ragozin.

2. The Accadian supreme God Ea was worshipped at his holiest shrine at Eridhu under the form of a serpent and as Eridhu was the centre from which the first Chaldean civilization started and spread, so the serpent symbol was accepted as that of the race and its religion. The Turanian Proto Medes also, before they were conquered by the Aryan followers of Zorathustra worshipped the snake symbol of the Earth, which afterwards was identified by the Eranian Mazdayasnians with Angra Manyu, the evil one, the spirit of Lie and Earth. P. 308.10 Vedic India Ibid.

3. It was about 261 A. D. that the disciple of Terebinthus founded the sect of Manichaeans in Persia; they said that the Christ was the primaeval serpent who enlightened the minds of Adam and Eve. Pp. 200-201 Tanjore Manual.

ज्ञान देणारा जो सर्प तो ख्रिस्तच होय. " " उष्णकटिबंधांतील देशांत ही सर्पपूजा मुख्यत्वेंकरून आढळते. इजिप्तमधील आस्प ह्मणजे तक्षक नाग होय. इजिप्तमधील धार्मिक चित्रांत आणि कोरीव लेण्यांत ह्या सर्पाच्या आकृति फार आहेत, त्यांवरून सर्व इजिप्तभर त्याची पूजा होत असावी असें दिसतें. " " पुरातन इजिप्त धर्मांतील मुख्य देवाची आकृति ह्मणजे बहिरी ससाण्याचें तोंड असलेला वेटोळें घालून बसलेला नाग होय. ईश्वराचें अनाद्यनंतत्व आणि सर्वज्ञत्व ह्यांचें हें द्योतक आहे असें ह्मणतात. " " शेषशाई नारायण किंवा दक्षिणेंतील अनंतशयन ह्या मूर्तींचा असाच अर्थ सांगत असतात. " पोलँड देशांतील कांहीं भागांत एक प्रकारच्या काळ्या नागाला पूज्य बुद्धीनें दूध व अंडीं खायला देतात."

" आफ्रिकेमध्यें हल्लीं सर्पपूजा चालू आहे. वरच्या इजिप्तमध्यें शेख हारदी साधूच्या कबरीवरून शेख हारदी हें नांव पडलेल्या गांवीं अशी पूजा होत असल्याचें प्रसिद्ध आहे. " " ब्यॉबिलोनिया आणि इतर

1. Ophiolatry prevails especially in hot countries. Egyptian asp is a species of cobra. Figuring as it does everywhere in their sacred paintings and sculptures, it was greatly revered throughout Egypt. P. 327 The Data of Sociology. By Herbert Spencer.

2. In the Egyptian religion, the Supreme Being was probably represented by the emblem of a serpent coiled into a circle with the head of a hawk, denoting eternity and omniscience. (Euseb-de: Pracp. Evang. Lile. I. c-10.)

3. In some districts of Poland (in 1762) the peasants are very careful to give milk and eggs to a species of black serpent. P. 638 Ecclesiastical Institutions. By Herbert Spencer.

4. One of the best known examples of modern serpent worship exists in Upper Egypt at a place called Shaik Hardi, from a temple of a Mahomedan Saint whose tomb exists on the spot. P. 32, Tree and Serpent Worship. By James Fergusson,

5. We know that the Babylonians in common with all the great nations of antiquity, worshipped the serpent. Baal means Ab-el-ser-pet God......Ahriman assumed a serpent's form in order to destroy the first of human race, whom he accordingly poisoned. P. 39. The Map of Life. By William Edward Hartpole Leckey.

पुरातन राष्ट्रांमध्यें सर्पपूजा होती. बाल याचा अर्थ नागदेव. ( यहुदी लोक बालची पूजा करीत होते असें जाहवे Hoseaii16 ह्मणतो )- ( पार्शी लोकांच्या ) देवानें निर्माण केलेल्या सृष्टीचा नाश करणारा अहरिमन ( सैतान ) यानें सर्पाचें रूप घेऊन सृष्टीचा विषानें नाश केला, " ही गोष्ट सर्पकल्पनेची साक्ष झाली; परंतु पार्शी लोकांत सर्पपूजा नाहीं. एरव्हीं "सर्प पूजा किंवा सर्पाच्या प्रतिमा, टांक करण्याचा प्रकार जेथें कधींच नव्हता, असा देश सांपडणें विरळा. सिथीयन लोकांचा तर तो देवच होता." "चॉल्डिया, इजिप्त आणि ग्रीस येथील बाल, नेफ आणि अपोलो ह्या सर्व देवांच्या पूजेशीं ह्या सर्प पूजेचा अत्यंत निकट संबंध होता."

" रशियेंतील काव्यग्रंथांत वर्णन केलेल्या कालगणनेंत दुष्ट देव अशी एक देवता येते. तिचा वीर पुरुषाशीं नेहमीं विरोध वर्णन केलेला आहे, आणि तिचें नांव तुगारीन ह्मणजे सर्प असें आहे." हें नांव कसें व कोठून आलें ह्याच्याबद्दल तिकडच्या लौकिकगोष्टी संग्रहकारास मोठें गूढ पडलेलें आहे. त्याचें बीज ह्यां ( पूजा प्रकारां ) तून निघणार नाहीं काय? निदान पार्शी धर्मांतील अहरिमनपासून तरी कांहीं धागा लागेल ह्यांत संशय नाहीं.

---

1. Few countries have been free from the serpent fetichism. Among the Scythians it was god itself. P. 207 Rambles in the Vedant. By B. R. Rajan Ayer.

2. Among the Chaldeans, the Egyptians and the Greeks, the serpent was associated with the worship of the sun gods Bal, Kneph and Apollo. P. 169 The Story of Man. By L. W. Buel.

3. In the Russian Epic cycle there is an evil champion demi-god, the constant enemy of the heroes or bogatyrs, who goes by the name of "Tugarin, the serpent." Our folk-lorists have been greatly puzzled to account for the name and where it came from, might the key be found here. Pp. 328-29 Foot note. The Vedic India. By Zenaid A. Ragozin.

"सर्पाच्या[१] अंगीं कांहीं औषधी आणि जादूचा गुण आहे, असा असीरियन आणि बाबीलियन लोकांचा समज होता. औषध आणि जादू हीं दोन्हीं त्या काळीं एकच स्वरूपाचीं वाटत असत. वाळुकामैदानांत इस्रायल लोकांना सर्प दंश झाला, तो उतरण्यासाठीं मोझेसनें सर्पाच्या प्रतिमेचा उपयोग केला होता, आणि त्या प्रतिमेचा उपयोग जरुशलेमच्या देवळांत हेझेकियाच्या वेळेपर्यंत होत असे. कोणी ह्मणतात कीं, ही मोझेसनें सर्पवीष उत्तरल्याची गोष्ट पुजाऱ्यांनीं आपल्या पदरची काढली असें असेल. इहावेच्या देवळांत ही सर्पाची मूर्ति होती, आणि त्याबद्दल कारण सांगण्याच्या हेतूनें ही गोष्ट रचली असेल; परंतु ह्याचा अर्थ विचक्षण लोक कायतो समजतीलच." असेंच मत व्हीलर साहेबांचें[२] आहे. "हेझेकियानें ही सर्पपूजा बंद केल्यावर ती पुनः यहुदी लोकांत सुरू झाल्याचें दिसत नाहीं; परंतु ख्रिस्ति[३] धर्मातील ओफाइट पंथानें ही पुनः सुरू केली; परंतु हा संस्कार त्यांनीं इराणांतून घेतला असावा; तसेंच निकोलायटन पंथांत ती होती." मर्मीचियन पंथाबद्दल मागें सांगितलेंच आहे. एपिफानियसनें त्या पूजा विधींचें वर्णन दिलें आहे. आइल आफ् म्यानमध्यें[४] पुण्यांतल्यासारखीच सर्पाची मिरवणूक निघते.

1. That they (Assyrians and Babylonians) had faith in its (serpent's) medical and magical knowledge (it was then the same thing) is shown by the brazen serpent which was made by Moses in the desert to heal the Isralites of the serpent bites. (Num. XXI. 4-9; 2 Kings XVIII. 4). The story was but a priestly legend invented to explain the presence of this idol in the temple of Iahaveh, but it does not lack significance. P. 77 The Religion of Israel. By Jules Sourey.

2. P 40 Bible studies. By J. M. Wheeler.

3. Serpent worship cropped up again in the Christian sect of Ophites but probably in this instance the superstition was derived from Persia, also in the sects of Nicolaitons, the Gnostics......Ephiphanius describes these ceremonies. P. 8 Tree and Serpent Worship By James Fergusson.

4. P. 223 Vol. II. Asiatic Studies By A. C. Lyall.

ह्या सर्पपूजेचा उगम खालच्या युफ्राटीसच्या कांठच्या चिखलाच्या भागांतून निघाला आहे; आणि सेमिटिक किंवा आर्यलोकांत ही कधींच आली नाहीं. जुडिया, ग्रीस, स्कांडिनेव्हिया वगैरे ठिकाणीं ती होती; पण शेतांत जसें रानगवत उगवतें त्यांतलाच हा प्रकार होता.

पापाचा या सर्पाशीं प्रत्यक्ष संबंध ख्रिस्तीधर्मानें लाविला आहे, आणि त्या प्राण्याविषयीं वाटणाऱ्या भीतिमुळेंच त्याच्या पूजेला आरंभ झालेला दिसतो. ही पूजा उष्ण हवेच्या प्रदेशांत अधिक प्रमाणावर असली तरी इतर ठिकाणीं ती मुळींच नव्हती, असें म्हणतां येत नाहीं, तसा प्रकार इतर पशुपक्ष्यांबद्दल मात्र नाहीं. देश, काल आणि रूढी याप्रमाणें हा पूजाभेद झालेला दिसतो. एका ठिकाणीं जो प्राणी पूज्य तोच दुसरीकडे तिरस्करणीय झालेला आढळतो. हिंदु लोक गोमातेला पूज्य मानितात. तिचें दूध, तूप, शेण, मूत्र, वगैरे सर्वत्र औषधी असल्यामुळें तींही पवित्र धरिलीं आहेत. ह्यांतच दहीं घातलें ह्मणजे पंचगव्य होतें; तें बहुतेक प्रायश्चित्तांत आरंभाला प्राशन करण्याचा विधि येतो. गाईची पूजा अथर्ववेदांत ( १२–४–५ ) सांगितली आहे. इतर देवांच्या मूर्तीप्रमाणेंच तिची पूजा करण्याबद्दल तैतिरीय ब्राह्मणांत ( ३–२–३–७ ), आपस्तंब धर्मसूत्रांत ( १–३०–२०-२२-१–३१–६–१२ ), गौतम ( ९–१२–२३–२४ ), मनु ( ४–२९ ), याज्ञवल्क्य ( १–१३३ ) येथें सांगितलें आहे. पूर्वी यज्ञांत गाई, बैल यांचें मांस लागत असे, पण तें पुढें बंद झालें ( ऋग्वेद ८–१०१–१५ ) पराशर [1] गृह्यसूत्र ( १–३–२७–२८; ) वाजसनेय संहिता ( ३०–१८ ); पुढें गोहत्या ही पातकांत गणली गेली ( आपस्तंब १–२६–१; गौतम २२–१६; मनु ११–१०८ ). गाईची सेवा करावी असें मनु ( ११–११०–११४ ) ह्मणतो; तिचें गोमय, गोमूत्र पवित्र ठरलें ( आश्वलायन गृह्यसूत्र १-३–१; गोभिल गृह्यसूत्र १–१–९; २–९–२; ३–७–३; मनु ३–२०६; ५–१०५; १२१,१२४;

**इतर प्राणिपूजा.**

1. P. 3 Tree and Serpent Worship By James Fergusson,

११–७८,१०९,२०२,२१२, याज्ञवल्क्य १–१८६; ३–३१५; ऋग्विधान १–७–४ ). कार्तिकशु० १२ ला ( वसुबारस ) स्त्रिया उपवास करितात; आणि सायंकाळी गोरा असलेल्या धेनूची पूजा करितात. गरुड पुराणाचें महात्म्य वाढल्यापासून मृताला यमलोकीं जातांना वैतरणी नदींतून पलीकडे नेण्यास समर्थ गोमाता ह्मणून तिचें दान करितात; वृषोत्सर्ग विधि त्यांतलाच. हे बैल देवाचे समजून त्यांस कोणी बांधून ठेवीत नाहीं. शेतकरी लोक आपल्या शेतकीच्या उपयोगी बैल पडतात, ह्मणून पोळ्याच्या दिवशीं ( श्रावण, भाद्रपद किंवा आश्विन अमावास्येला ) बैलांचीं शिंगें रंगवून त्यांची मिरवणूक काढितात, आणि त्यांची पूजा करितात; मातीचे बैल करून त्यांची ही पूजा करितात.

गाईची पूजा

हा महाराष्ट्रांतील पोळा किंवा दक्षिणेकडील "पोंगल[1] ह्याच्या प्रमाणेंच थासमसाधूच्या पुण्यतिथीला रोम येथें पशूंचें आशीर्वचन करीत असत; आणि ती चाल सुद्धां पुर्वी दर गांवीं पगनेलिया, फेरिने किंवा सेमेन्टिनी ह्मणून जो उत्सव होत असे, त्यांतल्याच प्रकारांतून शिल्लक राहिलेली असावी. आतां जानेवारीच्या तेराव्या तारखेला नांगराचा सोमवार होतो, तो त्याचाच अवशेष आहे." "ह्या[2] बाराव्या किंवा त्या तारखेच्या सुमारास येणाऱ्या सोमवारीं क्याथलिक पंथाचा धर्म इंग्लिश राष्ट्राचा

1. We have some community of origin between the Pongol and the blessing of the cattle at Rome on the day dedicated to St. Thomas which is probably a relique of the Latin village festival Paganalia or Ferine or Sementinal. Plough Monday (13th January) is a palpable relique. Pp. 179–79 Vol. II. Essays and Lectures on the Religion of the Hindus: By H. H. Wilson.

2. Monday after Twelfth-day. In Catholic Times the Ploughmen kept lights burning before certain images in churches to obtain a blessing on their work; they went about gathering money for their plough lights. The Reformation put out the lights but it could not extinguish the festival. The money is now spent in thepublic house. A plough is dressed up in ribbons and other decorations. It is called fool-plough. P. 37 British Popular Customs. By the Rev. T. F. Thistleton Dyer.

धर्म होता; तेव्हां नांगरे लोक ( शेतकरी ) देवळांतल्या विशिष्ट मूर्तीपुढें मेणबत्त्या जळत ठेऊन धंद्यांत बरकत यावी ह्मणून प्रार्थना करून आशीर्वाद मागत आणि नांगरदिव्यासाठीं ( आपल्याइकडे तेलाची वर्गणी किंवा भिक्षा मागतात त्याप्रमाणें ) पैसे मागावयास हिंडत. धर्माच्या सुधारणेमुळें हे दिवे बंद झाले; पण हा उत्सव अद्यापही होतो. त्यांतही भिक्षा मागून गोळा केलेलें द्रव्य पूर्वीप्रमाणें दिवे लावण्याच्या कामीं न लागतां दारूच्या गुत्त्यावर त्या पैशाचा फन्ना उडतो. अजूनही नांगराची मिरवणूक निघते, त्याला गोंडे वगैरे लावून सजवितात; त्याचें नांव वेडा नांगर." " डर्बीशायरमध्यें तर कित्येक शेतकरी " नांगरेबैलां " ची सोंगें घेतात, आणि खांद्यावर जूं घेऊन हिंडतात. " " मेंफिस येथील हपीच्या बैलाला क्यांबिससनें वार केल्यामुळें तो दुसरे दिवशीं मेला, तेव्हां इजिप्शियन लोकांत मोठी चळवळ होऊन त्यांनीं बंड केलें; ( ही बैलाची पूजा होय. ) डान आणि बेथोल येथील अनुक्रमें बालदेवाचा बैल आणि याहेवेचा बैल ही पशुपूजेची उदाहरणें होत. "

**इतर पशूंची पूजा.**

दसऱ्याच्या दिवशीं घोड्याची मिरवणूक काढून त्याची पूजा आपल्याइकडे होते. नंदी हें वाहन शंकराचें, उंदीर गणपतीचें, गरुड विष्णूचें, मारुती रामाचें असल्यामुळें ह्या पशूंच्या मूर्ति त्या त्या देवांच्या देवळांत असतात; परंतु ह्यांपैकीं मारुतीशिवाय दुसऱ्या पशूचें निराळें देऊळ नसतें आणि जन्मोत्सव फक्त मारुतीचा होतो. ह्यांपैकीं एकाही पशूची प्रत्यक्ष पूजा होत नाहीं. ह्यांपैकीं कोणच्याही वाहनपशूचा वध न करण्याबद्दल सरसहा नियम नाहीं. बैलाचें मांस हिंदु लोक खात नाहींत; त्याचें कारण वर सांगितलेली गाईविषयींची पूज्यबुद्धि होय. गरुडाबद्दल कल्पित

1. In Derbyshire young men yoke themselves as "Plough Bullocks." P. 39 Ibid.

2 When the sacred bull of Hopi at Menphis was wounded by Cambyses and died on the following day, the crime was sufficient to impel the Egyptians to revolt. Examples of animal worship—the bulls of Baal and those of Yahive at Dan and Bethel. P. 101 The Sciene of Religion, By C, P. Ticle.

किंवा खऱ्या पक्ष्याबद्दल पूज्यभाव बहुतेक ठिकाणीं आढळतो. " अॅरे-बियन नाईटच्या गोष्टींत तो रूख ह्मणून आहे, झेंडमध्यें तो इरोश झाला, इराणांत सिमरघ, जपानांत किनी, चिनांचा ड्रेगन, युरोपांतील शिंव-लरीच्या काळांत ग्रिफिन तोच होय " " अॅरबांचा अंकु, तुर्कांचा कर-केस, युरोपांतील जुन्या कल्पित गोष्टींतील फीनिक्स, एड्डामधल्या पवित्र वृक्षावर बसणारा पक्षी हाच आणि फेबर ह्मणतो कीं स्वर्गद्वारावर जे देवदूत आहेत ह्मणतात, त्यांची वेडीवांकडी आकृति गरुडाची असते. " वहानें ह्या दृष्टीनेंच पहावयाचें तर सरस्वति आणि सुब्रम्हण्य ( स्कंद ) यांचें मयूर वहान आहे, यमाचा रेडा, मदनाचा पोपट, स्कंद, शनि आणि ( गुजराथेंतील ) बेचराजी यांचा कोंबडा, पार्वतीचा सिंह, शितला देवीचा गर्दभ असें मानतात परंतु ह्यापैकीं कोणाचीही पूजा होत नाहीं. " आंधप्रांत आणि नेपाळ येथें ( कुळदैवत म्हणून नव्हे ) बेडकांच्या पूजेचा प्रचार आहे. ही पूजा आक्टोबर महिन्यांत सुरू होते." आमच्याइकडे कोकिलाव्रत बायका आणि कित्येक ठिकाणीं पुरुषही करितात; कोकिळेचा शब्द ऐकल्यावांचून आणि तिच्या दर्शनाशिवाय अन्न घ्यावयाचें नाहीं असा नियम धरितात. अशीच चाल विलायतेंत पूर्वी होती, आणि हल्लीं कांहीं ठिकाणीं आहे, पण हें व्रत तिकडे पुरुष करितात. कोकिळेचा शब्द ऐकला कीं मजूर वर्ग आपली कामें सोडून सुटी घेतात आणि दारु पिऊन चैन मात्र करितात; ह्याला " कोकि-

1. Garud is the Rukh of the "Arabian nights"; the Erosh of Zend, the Simergh of the Persians, the Kini of the Japanese, the Chinese Dragon and Griffin of Chivalry. P. 817 The Himayalan Districts of the N. W. Provinces. By Edward T. Atkins

2. It is the Anku of the Arabs, the Kerkes of the Turks, the Pœnix of the classical fable, the wise and ancient bird that sits upon the ash Yggdrasil of the Edda and according to Faber is a misrepresentation of the holy cherubim that guard the gate of the Paradise. P. 192-93 Foot note Essays on Sanskrit Literature ( fiction ) By H. H. Wilson.

ळासेवा"चा सण म्हणतात. "विष्णू[2] वगैरे देवादिकांचीं (आणि इतर पंडितांच्या ह्मणण्याप्रमाणें वीर आणि साधु पुरुषांचीं ) वाहनें पूज्य मानण्याची चाल हिंदुस्थानांतच आहे असें नाहीं. तिकडच्या तीन ( मार्क, ल्यूक, जान या ) साधू किंवा धर्मप्रवर्तक पुरुषांच्या संबंधानें सिंह, बैल आणि गरुड ह्यांची आवड लोकांत आहे. " पशूपूजेचीं उदाहरणें फ्रेजर साहेबांनीं आपल्या " गोल्डनबो " ( Golden Bough ) नांवाच्या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत पान ३७५ वर जीं दिलीं आहेत तीं देऊं लागल्यास निबंधाची सीमा वाढेल, यासाठीं त्या पानावरील टीपेंतील तेवढीं उदाहरणें देतों: मलगसी लोक नक्राची, सुमात्रामधील मिनांगकबनेर लोक वाघाची, क्यांबोडियाचे स्टीन लोक हत्तीची पूजा करितात. आमच्याइकडे वैदिक यज्ञकालांतील पशुहिंसेची चाल बुद्धधर्माच्या संस्कारानें बंद पडली आणि पशुपूजेची चाल बुद्धलोकांनीं पाडली नसली तरी प्राणिमात्राविषयीं पूज्यबुद्धि हा त्या धर्माचाच संस्कार आहे, असें फिलिपबाल्डियैस[3]साहेब म्हणतात, तें बरेंच सयुक्तिक दिसतें. बुद्धधर्मामध्यें हत्तीला फार मान आहे.

" यहुदी[4] आणि मुसलमान लोक डुकराचें मांस खात नाहींत, त्या

1. Abbreviated and translated from Foot note on p. 192 of the British Popular Customs By T. F. Thistleton Dyer,

2. The association of great heroes and saints with animals is not confined to India, for we find three of the Evangelists ( St. Mark, St. Luke, St. John ) associated with a lion, ox and eagle respectively. P. 315 Foot note Brahmanism and Hinduism. By Sir Monier Williams.

3. Vide P. 521 Description of Malabar and Coromandel Coasts.

4. The command to abstain from Pork, still in force among the Israelites and Mahomedans, is doubtless due to the myth of Adonis and Taoumuz slain by a wild boar. That this interdict is not the result of a hygienic necessity but the effect of a mythological idea, seems to be proved by the fact that the same custom is prevalent in all nations among whom the worship of Adonis is spread whatever may be the soil and climate, among the Phœnicians and Syrians, as among the Arabs, among the Sabeans as in the Isle of Cyprus. Pp. 59-60 The Religion of Israel By Jules Sowrey transated by Annie Besaant.

मांसानें मशीद बाटली असें त्यांना वाटतें, त्याबद्दल त्यांच्या धर्मात आज्ञा आहे, ह्याचें मूळ डुकरानें ठार मारलेल्या अडोनिस आणि तामूझच्या पौराणिक कथेंत आहे. आरोग्यशास्त्राच्या नियमामुळें ह्या मांसाला बहिष्कार घातला असावा असें ह्मणावें तर तसें नाहीं, केवळ पौराणिक कथेवरून ही चाल पडली असें म्हणण्याला असा पुरावा आहे कीं, देशमान किंवा हवामान ह्याप्रमाणें त्यांत बदल नाहीं; जेथें अडोनिसची पूजा आहे तेथें हा बहिष्कार आहे. फिनीशिया आणि सीरिया, त्याप्रमाणेंच अरबस्थान, आणि सायप्रस बेट ह्यांमध्यें ही चाल आहे." महंमद पैगंबराचे कपडे सरड्यानें चोरले होते म्हणून सरडा पहातांच त्याला मारण्यासाठीं मुसलमान लोक यत्न करितात. महाडच्या ईशान्येस बारा मैलांवर दापोलीच्या खालच्या अंगाला काळनदींत डोह आहे, त्यांतील मासे पवित्र समजून ते कोणास धरूं देत नाहींत. "ह्या माशांच्या आकृतीचा कांहीं जननेंद्रियाच्या द्योतक अर्थ आहे, अशी जेव्हां समजूत होती, त्यावेळच्या चालीचा अवशेष हल्लीं ख्रिस्ती लोकांत शुक्रवारीं मासे खाण्याची चाल आहे." "सीरियामध्येंही[3] माशांची पूजा फार होती, तिचें कारण असें कीं बालची बायको जी अस्चेरा तीच वसंतदेवता होय. ती जागी झाली म्हणजे तिच्या आज्ञेवरून मासे अंडीं घालितात; आणि कबूतरांच्या जोड्याच्या प्रेमाला उकळी येते अशी समज आहे. अद्यापही माशाची पूजा डेश्चन गांवीं आणि त्रिपोलीजवळच्या एका मशिदींत चालू आहे.

1. Vide P. 393 Kolaba Gazeteer.

2. The custom of eating fish on Friday is considered a survival of the days when a peculiar sexual significance was given to the fish. P. 25 Bible Studies By J. M. Wheeler.

3. Aschera, wife of Baal, is nature awakened. She bids the fish breed and increases the ardour of doves. Here is the reason why, even now, the ancient worship of fishes, once very popular throughout Syria, has been preserved in the village of Deschon and in a little Mussalman Mosque near Tripoli. Here is the reason of women recovered of child-birth, lepers and others bringing pigeons and turtle doves to the temple. P. 61 The Religion of Israel By Jules Sourey.

बाळंतीण बायका उठून बावरूं लागल्या म्हणजे त्या, तसेच रक्तपितीचे अजारी लोक वगैरे पारवे किंवा कबूतर घेऊन प्रथम देवळांत येतात, त्याचें कारण ह्यावरून समजण्यासारखें आहे." "लेनान साहेबांचें म्हणणें आहे कीं कबूतरांची भक्ति सर्पाच्या भक्तीच्या जवळ जाऊन तेंही सर्पाप्रमाणें देव बनलें होतें."

"गेल्या मोहिमेंत १९११ भूभ्यंतरशोधांत प्रोफेसर फ्लिंडर्स पेट्री साहेबांना असें दिसून आलें कीं, तेविसाव्या शतकांत जो हनवराचा मनोरा बांधला त्यावेळीं सबक नांवानें सुसरीची देवासारखी पूजा होत असे; त्यानीं मगरमुखाच्या पुष्कळ देवतांच्या मूर्ति उकरून काढल्या आहेत; आजपर्यंत पशूपूजेचें उदाहरण ह्या सुसरी इतकें जुनें आढळांत नाहीं." "रशियांतील कांहीं जंगली लोक "जिव्हाईट" नांवाच्या प्राण्याची देवासारखी पूजा करितात. हा प्राणी काळसर रंगाचा असून पालीसारखे चार पाय त्याला असतात."

मिना लोकांची एक गोष्ट ल्याल साहेबांनीं दिली आहे, तिच्यावरून त्या लोकांत कसें प्राणिपूजेचें रूप राजकारणानें बदललें तें दिसतें. ते लोक पूर्वीं डुकराची पूजा करीत असत; मुसलमान लोकांचा अम्मल होतांच डुकराचा अडाम पितामह झाला; आणि पुनः हिंदुधर्माच्या छायेनें

---

1. Mr. M. Lennan remarks that "the dove, in fact......was almost as great a god as the serpent." P. 328 Data of Sociology. By Herbert Spencer.

2. Professor Flinders Petrie found in the last season's excavations that the crocodile god, Sebek was worshipped for certain in the Hanwara Pyramid built in the 23rd century, for many statues of the crocodile headed divinity were unearthed, all of them being the earliest example of animal gods yet extant. Times of India dated 11-5-1912,

3. Certain Russian Foresters 'cherish as kind of household god, a spices of reptile, which has four short feet like a lizard with a flat black body called ".givoites." P. 328 Data of Sociology By Herbert Spencer.

त्या डुकराचें पूर्वरूप येऊन विष्णूचा वराह अवतार झाला. " इटा-येथील लोकांच्या पिकावर रातकिड्यांनीं हल्ला केला, तेव्हां कावळ्यांनीं गर्दी करून ते कीडे खाऊन टाकले, म्हणून त्या लोकांनीं कावळ्याचा पुतळा बसविला, " असें नुक्तें पक्षीसंरक्षक सभेपुढें पेज क्राफ्टसाहेबांनीं सांगितलें.

" सामोलोकांत पशूपूजेचीं पुष्कळच उदाहरणें आहेत; कुठें माशाची, कुठें नक्राची, कोणी कासवाची, कोणी कुत्र्याची, कांहीं लोक घुबडाची, कांहीं पालीची किंवा आणखी एखाद्या पशूची पूजा करितात. लंका बेटांत हंसाला पूज्य मानितात; सैबिरीयामधील ओस्टियाक लोक अस्वलीस मान देतात; न्यूझीलंडमध्यें कोळी, ग्वायनामध्यें खड्गमत्स्य, आणि सुसर ह्यांची प्रतिष्ठा आहे. टाहिटन लोकांत बगळा, कुंभा, सांडविच बेटांतील लोकांत कावळा, टोंगन लोकांत पाल, सामाइड लोकांत ध्रुवाकडील अस्वल अशा पशूंना देवासारखे मानितात. "

आतांपर्यंतच्या पूजाप्रकारांतील वस्तू काल्पनिक किंवा प्रत्यक्ष, सजीव किंवा निर्जीव प्रकारांतल्या होत्या आणि त्या सर्व भूगोलावर सर्व काळ किंवा कांहीं वेळ असतात, अशी मनुष्याची खात्री झालेली असते. ह्या

1. According to Mr. Page Croft–who spoke in Mail week at the annual meeting of the Royal Asiatic Society for the protection of birds —in Itali they have erected a statue to the crow to commemorate the fact that when their crops were threatened by crickets, a flight of. crows came and devoured the insects. Cutting from the Times of India of 23rd March 1914.

2. The Samous illustrate this animal worship, the gods of one clan being the eel, of another the shark, the dog, the owl, the lizard or some other creature In Ceylon we find the goose regarded as sacred ; among the Ostiaks of Siberia the bear, in New Zealand the spider, in Guinea the sword-fish, and the crocodile The Tahitans regard with veneration the heron and the wood-pecker, the Sandwich Islanders reverence the raven, the Tongan selects the lizard, the Samoyedes substitute the Polar bear. Pp. 526–27 The Story of Man By J. W. Buel.

पुढचें वर्गीकरण खगोलस्थ तारे वगैरे ह्यांच्या पूजाप्रकाराचें होय. ह्या सर्व सृष्ट वस्तूच आहेत आणि ह्मणून त्या वस्तुपूजनाच्या वर्गांतच कित्येक लोक घालितात; परंतु येवढावेळ सांगितलेल्या वशीकरण, वृक्ष, पर्वत, नदी, पशू पक्षी ह्यांच्या पूज्यभावामध्यें यदृच्छाकारणाचा बराच संबंध असतो. ह्या खगोलस्थ वस्तुपूजनांत त्यांच्या नियमित दर्शनानें मनुष्याच्या मनावर

**खगोलस्थपूजा.**

झालेल्या संस्काराचा भाग अधिक असतो. कांहीं ठराविक वेळानें सूर्य उगवतो आणि अस्ताला जातो, तारे वगैरे देशादेशांत भिन्न दिसतात, ग्रहांचें दर्शन ठराविक कालानें होतें, ह्यामुळें त्यांच्याविषयीं झालेला आदर ह्या पूजाप्रकाराचें कारण होतो; त्यांच्याठिकाणीं कांहीं अपूर्व सामर्थ्य असावें, असें मनुष्याला वाटूं लागतें. त्यापैकीं सूर्याची पूजा पुष्कळ देशांत होती. कांहीं विद्वानांनीं वेदांतील इतर सर्व देवतांच्या कल्पना ह्या सूर्यावरून उद्भुत झाल्या असाव्या असें ठरविलें आहे. त्यांच्या विवेचनांत शब्दसादृश्यावर बहुतेक भर दिलेला असल्यामुळें अँड्रलांग साहेबांनीं त्यांची थट्टा करून त्यांस धुडकावून लाविलें आहे; परंतु तसाच केवळ भाग नाहीं. " हिंदुस्थानांतील पुराणकथा, गोष्टी ह्यांतील कित्येक देवता सूर्याच्या कल्पनेपासूनच निघाल्या असाव्या, हें नाकबूल करणारा कोण असणार आहे? ऋग्वेदांत आणि अवेस्तांत येणारा विवस्वत् हा सूर्य किंवा तेजःपुंज आकाश नव्हे, अशी शंका कोणी घेईल काय?" सूर्याची उपासना, ईश्वराचें ब्रह्माचें प्रतीक ह्मणून, जी एकदां हिंदुस्थानांत सुरू झाली ती अद्याप चालू आहे. सूर्याच्या प्रार्थनेंत ती सृष्टि कर्त्याची, त्याच्या व्यक्त स्वरूपाची उपासना आहे, असा बोध होण्यासारखेच शब्द आहेत. त्यांत मूर्तीचा कांहीं संबंध नाहीं. भविष्यपुराणांत सूर्याच्या उपासनेचें महात्म्य

1. Who will deny that in India certain mythological figures are eoiasr or solar in origin ? Can any one question that Viwaswat the 'wide gleaming' is sun or bright sky, as he is represented in the Avesta and Rigweda? P. 11 The Religions of India By E. W. Hopkins.

दिलें आहे. ब्रह्मपुराणांतील उत्कलमहात्म्यांत अध्याय २८ येथें बारा आदित्यांची उत्पत्ति दिली असून सूर्याला संज्ञा-भार्येपासून विवस्वत् झाला असें ह्मटलें आहे. ह्या सूर्याचें जें भग नांव आहे, त्याच्या जवळ जवळ येणार बगेश

**सूर्याची उपासना**

( Bagaios ) ह्याची फ्रीजियन लोकांत पूजा होत असे. भगवंतानीं पूजा करण्याचीं स्थानें उद्धवाला सांगितलीं आहेत, त्यांत सूर्याला अग्रस्थान दिलें आहे. ह्या सूर्याची मूर्ति फारशी कोणी करीत नाहींत. पंचायतनांत सूर्यकांत मणी असतो, त्याच्या अभावीं कोणचा तरी मणी ठेवितात; परंतु मूर्ति पंचायतनांत तरी नसते. सूर्याची विशिष्ट पूजा अंगरोग निवृत्तीसाठीं सांगितली आहे; त्यांतील अर्घ्यप्रदानासाठीं सूर्याचें विधान किंवा यंत्र करितात. सूर्याचें चित्र काढितात, त्यांत आणि बुद्धानुयायांच्या चक्रांत इतकें साम्य आहे कीं, ऐतिहासिक माहितीच्या अभावीं कोणचें कोणच्या पासून निघालें, हें सांगतां येणें कठीण आहे. सर्ववर्म्यानें दिलेली अशीर-गड येथील ताम्रमुद्रा आणि तूसमच्या लेण्यांतील कांहीं आकृति सूर्याच्या ह्मणाव्या किंवा बुद्धचक्राच्या समजाव्या ह्याबद्दल तज्ज्ञांचाही घोंटाळा झालेला आहे. आनंदगिरीकृत शंकरविजयांत सूर्योपासक (सौर) ह्यांचे सहाभेद सांगितले आहेत, त्यांत एकजणाच्या तप्त मुद्रा होत्या असें ह्मटलें आहे.

सूर्याचीं आदित्याचीं देवळें आहेत तीं:—बुलंदशाहर प्रांतांत इंदुर, माळव्यांतील शिवनेच्या कांठीं दशपूर किंवा मंदसर, तमसातीरावर आश्रमक, ग्वाल्हेर, बंगाल्यांत शहाबादजिल्ह्यांत अरहापासून नैर्ऋत्येस पंचवीस मैलांवर वरुणार्क किंवा देववरुणार्क, आणि पाटणा जिल्ह्यांतील बहारच्या नैर्ऋत्येस नऊ मैलांवर साकरी नदीच्या कांठीं शहापुर; इतक्या ठिकाणीं सूर्याचीं देवळें आहेत. ओरिसाप्रांतांत कोनार्कयेथें राजेंद्रलाल नरसिंह देव यानें १२४१ मध्यें बांधलेलें सूर्याचें देऊळ होतें. समुद्र प्रवास करणारे

१. सूर्येतु विद्यया त्रय्या हविषाग्नौ यजेत मां ॥ भागवत ॥ ११।११।४३॥

2. Vol. III. Gupta Inscriptions By M. Fleet.

लोक त्याला काळें देऊळ ( Black Pagoda ) ह्मणत; पण तें आतां मोडलें आहे. गयेस सूर्याचें देऊळ आहे; रत्नागिरी जिल्ह्यांत काशिलीस आहे; इस्लामाबाद किंवा अनंतनागयेथें मार्तंडाचें देऊळ [1] आठव्या शतकांत बांधलेलें आहे. मथुरेमधील ध्रुव टेंकडीवर निंबार्क वैष्णवाचें एक जुनें देऊळ आहे. बोलन[2] भागांत बेलार, महरमधील आदित्यदेव, कालीकुमायुन प्रांतांत रामक, लखनपूरमधील नैनी आणि जगेश्वर येथें आदित्याचीं देवळें आहेत; अलमोराजवळील कटारमार येथें बारा आदित्यांचें, बेल प्रांतांत पाभीनयेथें भौमादित्याचें, जोशी मठांत सूर्यनारायणाचें, अशीं देवळें आहेत. तक्षिलायेथें पूर्वीं सूर्याचें देऊळ पाहिल्याचें अपोलोनियस सांगतो." मुलतानचीं पूर्वींचीं नांवें कष्टपूर, हंसपूर, बागपूर, सांबपूर किंवा सनाबपूर अशीं होतीं; तेथें मुसलमानी अमलापूर्वी सूर्यनारायणाचें देऊळ होतें. रक्तपितिनिवारणासाठीं सांबानें शकद्वीपांतून मग नांवाचे सूर्योपासक आणिले होते, असें भविष्यपुराणांत आहे. त्यानेंच मुलतान येथें सूर्याचें देऊळ बांधिलें. ऋग्वेदांतील ( ८–९१ ) कथेवरून सूर्याची उपासना आरोग्यासाठीं होत असावी, असें दिसतें; आणि मयूरकवीनें सूर्यशतक रचिल्यानें त्याचा अंगरोग गेला, अशी आख्यायिका आहे.

"जरुसलेमयेथें इहावे देवाचीं चिन्हें ह्मणून सूर्याचे घोडे आणि

1. P. 345 Brahmanism and Hinduism By Sir Monier Williams.

2. P. 169 Vol. II Imperial Gazetteer of India.

3. P. 804 Himalayan District of the North Western Provinces By E. T. Atkins.

4. Apollonius of Tyanna saw a sun-temple at Taxila. P. 77 Journal of Royal Asiatic Society (1859).

5. P. 35 Vol. XVIII. Imperial Gazeteer of India.

6. P. 114 Vol. 1. Indian Antiquary.

7. The emblems of the God Iahweh at Jarusalem were those of horses and chariots of the sun, which the kings of Judah had placed at the entrance of the temple. P. 55 The Religion of Israel By Jules Sourey translated by Annie Besant

रथ काढलेले दगड जूडाचे राजांनीं देवळाचे दारापाशीं ठेविले होते ". " मध्येयुगाच्या काळांत सूर्याची उपासना ( पश्चिमेकडे ) होती, तिचा संबंध इराणी संस्काराशीं कांहीं तरी असावा. " प्राचीन काळीं जगांतील सात अपूर्व गोष्टी ह्मणत, त्यांत ( खि. श. पूर्वी ३०० वर्षे ) सूर्याचा पुतळा होता; हा पंचरसी धातूचा असून ह्याची उंची १०५ फूट होती; पुढें ५६ वर्षांनीं भूकंप होऊन हा पुतळा पडून गेला. " हिसकॉस नांवाच्या मेंढक्यांनीं ईजिप्त देशावर स्वारीकरून लुटालुट केली होती; त्यांचा सुटेक किंवा सेट नांवाचा मुख्य देव असून, तो सोन्यासारखा आहे, असें त्यांनीं त्याला नांव दिलें होतें; तो सूर्य-बाल देवच होय. टानिसयेथें त्याचें मोठें देऊळ होतें, आणि पूर्वेकडील भागांत बरेच दिवस त्याचीच पूजा चालू होती. " सूर्योदयाच्या आणि अस्ताच्या वेळीं राक्षस अडविण्यास येतात, त्यांचे निवारणासाठीं अर्घ्य देणें, हा आमच्या संध्येतील एक मुख्य भाग आहे; त्याप्रमाणेंच ब्याबिलोनियन लोकांच्या मंत्रांचा हेतू होता. " त्या राक्षसांचा मुख्य अपेपी असून सूर्य अस्ताच्या वेळीं खालीं जाऊं लागला ह्मणजे त्याच्यावर ते हल्ला करितात; ह्मणून दररोज रात्रीं त्या राक्षसांचीं बाहुलीं करून मंत्र ह्मणून तीं जाळीत. थेबीसच्या देवळांतही ह्या सूर्याला मदत करण्यासाठीं कांहीं विधि ठरलेला असे. " अरबस्थानांत पूर्वी सूर्याची पूजा

1. Perhaps Iranian influences had something to do with the organization of this (sun's) worship during the middle ages. P. 259. The Religion of India. By A. Barth.

2. The Chief God they ( the Hyskos who pillaged Egypt ) worshipped was Sutekh or Set with the surname of "the golden" by which the sun-Baal is understood. They built him a great temple in Tanis and his cult was followed in the Eastern Delta until later times. P. 119 Vol. I. The Historian's History of the World.

2. In Babylonian incantations effigies of fiends were burnt every night when the sun god Ra sunk down as he was assailed by fiends under the leadership of Apepi. To aid the sun god a ceremony was performed in the temple of Thebes. P. 16 Vol. I The Golden Bough By Fraser.

होती; येमेन जातींत सूर्य व आकाश हे देव मानीत; योकतानपासून तिसऱ्या पिढीच्या ( नाहोरच्या समकालीन ) मुख्यानें आपल्याला अब-दुशाम, ह्मणजे सूर्योपासक, हें नांव घेतलें होतें; इतर जातींमध्यें ताऱ्यांची वगैरे पूजा असे; मक्का—( Mecca ) मेकका—( Mah-cadah ) महकडाह ह्मणजे चंद्राचें देऊळ असा अर्थ होतो; पुरातन ग्रीक ग्रंथकारांच्या ह्मणण्याप्रमाणें मसागरें नांवाच्या जातीचे लोक सूर्योपासक होते." अपोलो ( Apollo ) हें मूळ ग्रीक नांव आहे, त्याचा अर्थ सूर्य असाच होतो. श्रेडर ( Schrader ) साहेब ह्मणतात कीं समस ( सूर्य ) ह्मणून जो असीरियांत देव होता; त्याचाच 'बाळ' झाला आणि मलीक—मालक याचाच 'मोलोक' बनला. मकरसंक्रांतीला सूर्य आला ह्मणजे तो आमचेकडे सण आहे; त्यावेळीं बायका सुगड, तिळगुळ देतात. ईस्टरच्या सणांत अंड्याच्या आकारासारखी ( उभंटी गोल ) मेवा मिठाई ( आमच्याकडच्या हलव्याप्रमाणें ) भेटी दाखल पाठवितात. "ह्या ( मकर ) संक्रांतीचे वेळीं रोमन लोकांत नजर भेटी पाठवीत, त्यांना स्ट्रेनी ह्मणत; अद्याप ती चाल फ्रान्समध्यें असून त्या नव्या वर्षाच्या भेटीला आंत्रग्न ( Entrennes ) असें ह्मणतात. पासीडिअन ह्मणजे जानेवारी महिन्यांत ग्रीक लोकांतही असाच सण असे; आणि त्यावेळीं हिंदु लोकांप्रमाणें ते समुद्राची पूजा करीत." ओईस्टर किंवा ओस्टारा या शब्दापासून ईस्टरची उत्पत्ति आहे, असें बीड साहेबांचें मत आहे. "खिस्टमस ( नाताळ ) च्या सणामध्यें यूलच्या

1. P. 42 Vol. I Works of Sir William Jones.

2. The presents made at this period ( the sun's entry into Capricorn ) were called Strenae by the Romans, and the word as well as the practice subsists in the Entrennes of new year's day in France...... The Greeks had a festival in the month of Poseidon or January in which they worshipped Neptune or the sea in like manner as the Hindoos worship the ocean. P. 175 Vol II. Essays and Lectures on the Religion of the Hindoos By H. H. Wilson.

3. The Yule log or block which was burnt on the eve of x'mas day is considered to have been used as an emblem of the return of the sun and the lengthening days. P. 176 Ibid.

ह्मणून लांकडाचा ओंडा ( आमच्या होळींतल्यासारखा ) जळत ठेवण्याची चाल आहे; ती सूर्य परत फिरून दिवस मोठा होऊं लागल्याची दर्शक आहे. " " मकरसंक्रांतीचा सण स्याक्सन लोकांत बारा दिवस चाले व त्या वेळीं सूर्याच्या नांवानें बलिदान होत असे, असें बिशप स्टीलिंग फ्लीट ह्मणतो. सर्व केल्टिक राष्ट्रें सूर्यपूजक होतीं. ह्यावरून उत्तरायणाच्या आरंभाचा हा सण पश्चिमेकडे आहे, हें नाकबूल करतां येईल कसें ? " " डर्बीशायरं मधील मॅट्लाकचे भागांत ' बिल बेरीचा उमाठा ' आहे; त्याच्या माथ्यावर जे इमारतीचे अवशेष हल्लीं दिसतात, त्यावरून पूर्वी सूर्य पूजा होती असें दिसतें. मे महिन्यांतील सूर्योत्सवाचे वेळीं रवीचे उदयास्त दाखविण्यासाठीं कांहीं इमारती बांधलेल्या होत्या. त्यांतील राहिलेले अवशेष " अरबारलो " डव्ह होल्समधील " बैलाचा तळ " आणि आयमसूरवरील " वेटविथिन्स " " होत. "

सूर्य हा सर्व सुखाचें मूळ आहे, असें समजून त्याला देव ह्मणणारे मिन कोपी लोक अंदमानांत आहेत; सुमात्राच्या पश्चिमेकडील एका बेटांत रहाणारे न्यासा लोक सूर्याची पूजा करितात; तो दीर्घायुष्य, सृष्टीचा मालक त्याच्यावर रहातो, अशी त्यांची समज आहे; संताळ, किसन आणि कोलेरियन ह्या जातींमध्यें वनराज ( वाघ ) हा मुख्य देव मानितात, तरी ते सूर्याची पूजा करितात. भूयु ( Bhuiyu ) लोक सूर्याची

1. Bishop Stilling Fleet states in his Origines Britanicae that the ancient Saxons observed twelve days at this period ( sun going into Capricorn ) and sacrificed to the sun. "Mallet states that all the Celtic uations worshipped the sun " This is, an identification too palpable to be denied with Uttarayana. P. 177 Ibid.

2. On the summit of the " Bilburry Knoll " in the district of Matlock, Derbyshire,there are remains of what I believe to have been an important station in prehistoric times, dedicated to the sun worship cult......" Arber Low, " the " Bull ring " at Doveholes and " Wet-Withins " on Eyamsoor were also established to indicate the rising and setting sun in May year feshival. Johan Simpsou in Nature of January 15, *1914*.

3, Vide p. 132 Descriptive Ethnology of Bengal By E. T. Dalton.

पूजा करितात; त्याला ते बोराम ( Boram ) ह्मणतात; ओरावन लोक ही धर्म देवता ह्मणून सूर्याचीच उपासना करितात. खारिया लोकांत सूर्याची पूजा आहे, त्याला ते बेरो ( Bero ) ह्मणतात. " गोंड लोक सूर्याच्या प्रतिमेची पूजा करीत व त्यास मनुष्य बळी देत; हल्लीं ओरावन लोकांप्रमाणेंच गवताचा पुतळा जाळतात. " " गोंड लोकांप्रमाणेंच खोंडही सूर्यपूजक आहेत." "कोल लोक सूर्याची पूजा करितात, आणि चंद्र त्याची बायको, आणि तारे त्यांचीं मुलें आहेत, असें ते मानितात"

" रोमच्या दक्षिणेस मान्टे सिलेयो आणि मान्टे आवेनशियो या डोंगरांच्या पायथ्याशीं कराकलाचे हमामखान्याचेखालीं प्रोफेसर वाले यांचे देखरेखीप्रमाणें खोदण्याचें काम चालू आहे. तेथें मोठें भुयार लागलें असून त्यांत पुष्कळ बोळ आहेत. रस्ते फरशीचे आहेत. त्यांत पूर्वेकडील देवाची आणि सर्वोत्तम मोठीं इराणी देव मिथ्रस ह्मणजे सूर्य ह्यांचीं देवळें सांपडलीं आहेत. शिवाय दुसरे पुष्कळ पुतळे सांपडले आहेत. त्यांत शुक्राचा ही आहे. " " दाबिस्तानमध्यें असें लिहिलें आहे कीं, हुशंगाचें

1. P. 141 Ibid.

2, P, 159 Ibid-

3. Their (Gond's) religion used to consist in adoring a represen. tative of the sun, to which were offered human sacrifices. As among the Oraons, a man of straw is at present day substituted for human victim. P. 526 Religions of India By E. W. Hopkins.

4. Like the Gonds, Khonds worship the sun as chief divinity. P. 528 Ibid.

5. The Koles (pig stickers) worship the sun, but with the moon as his wife and the stars as their children. P. 533 Religions of India By E. W. Hopkins.

6. Excavations in the baths of Caracalla (in the South of Rome at the foot of the Monte Celio and the Monte Aventio) under the direction of Professor Valle have revealed a subteranean Maze of corridors, well passed streets, temples to Eastern Gods (notably one in honour of the Persion God Mithras) and numerous statues including a Venus Cutting from The Times of India. 17th October 1912.

वेळीं पार्शी लोकांत ग्रहनक्षत्रांची पूजा होती. सूर्य व इतर ग्रह ह्यांचीं देवळें व त्यांच्या मूर्ति अमुक वेळोवेळीं त्यांचे उत्सव होत असत.

स्वस्तिक हें सूर्याचें चित्र आहे, असें १८८० मध्यें एडवर्ड टामससाहेबांनीं म्हटलें होतें; पण त्या वेळीं तें कोणास पटलें नाहीं. पुढें १८९२ मध्यें प्रोफेसर परसी गार्डनर ह्यांनीं असें सिद्ध करून दाखविलें कीं, मेगसरेसन मेसेंब्रिया ( मध्यान्हार्कपुरी ) ( Megsresn Mesembria ) थ्रेसमध्यें आहे; तेथें सांपडलेल्या एका नाण्यावर स्वस्तिकाचें चिन्ह असून त्याच्यामागें M. E. S. अशीं अक्षरें आहेत. ह्या स्वस्तिकाची फिरकी पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर म्हणजे हिंदु लोक देवाला प्रदक्षिणा घालतात, त्याप्रमाणें आहे. वेस्टमिनिस्टरमध्यें इंग्लंडच्या राजाराणीस राज्याभिषेक होतो, तेव्हा क्यांटरबरी आर्चबिशप ( मुख्य धर्मगुरू ) अशीच ( सव्य ) प्रदक्षिणा करितात; क्रूसाच्यासारखी फेरी घालीत नाहींत; क्रूसची प्रदक्षिणा असती तर ती उत्तर दक्षिण आणि पूर्व पश्चिम पाहिजे होती. पूरीच्या जगन्नाथाचे देवळाच्या कळसावर विष्णूचें चक्र आहे, तें सुदर्शन चक्र होय, अशी समजूत आहे, पण तें स्वस्तिकाचेंच चिन्ह आहे, असें दिसतें. दारापुढें, देवाच्या खालीं, किंवा कार्यसमारंभांत रांगोळीचें स्वस्तिक घालण्याची चाल हिंदुलोकांमध्यें आहे; तें शुभचिन्ह मानलें जातें.

बान[3] धर्माची स्वस्तिक नांवाची देवता आहे, आणि त्या धर्मीयांमध्यें स्वस्तिकाचा उपयोग करितात; पण त्याला ते लोक युनद्रूण( Yundrun ) ह्मणतात; फरक एवढाच आहे कीं, त्यांच्या चक्राची फेरी हिंदु स्वस्तिकाच्या उलट ह्मणजे डावीकडून आहे; त्या लोकांत देवाची प्रदक्षिणा अशीच उलटी घालितात. डेपरसाहेब लिहितात कीं "आशिया खंडांत मुख्य महात्म्य या लोकीं

1. Vide p. 87 Vol. I Works of Sir William Jones.

2. Abridged and translated from an article By Sir George Birdwood in the Journal of the Royal Society of Arts. Printed in the Times of India, dated 25th March 1912.

3. Vide p. 7 5. The Himalayan Districts of the N. W. Provinces By Edwin Tuite Atkins.

4. In the Society of Asia, nothing is visible but the monarch: in the expanse of heaven, all objects vanish in presence of the sun. P. 16 The History of Conflict between Science and Religion. By John William Draper.

राजाचें आणि आकाशांत सूर्याचें, त्याच्या उदयाबरोबर इतरांचें तेज लुप्त होतें. " ह्यावरून राजा आणि सूर्य ह्यांची पूजा आशियाखंडांत आहे, असें ह्मणण्याचा त्यांचा झोंक आहे; परंतु आह्मीं दिलेल्या उदाहरणावरून ती पूजा सर्वत्र होती, असें दिसून येईल. पेरु देशांतील प्राचीन रहिवाशी इंनकास सूर्योपासक होते. वेदांतील ( ऋ.६-९-१ वगैरे ) पुष्कळ ऋच्यांमध्यें सूर्य हा अग्नि मानिला आहे. ब्राह्मणांत सूर्य हा अग्नीचें तिसरें रूप असें ह्मटलें आहे. वैदिक धर्माशीं ज्यांचा संबंध नाहीं, किंवा नव्हता अशीं विधानें त्या लोकांविषयीं हल्लींच्या विद्वानांस मान्य आहेत, त्या लोकांतही अग्नि आणि सूर्य यांचा निकट संबंध मानीत असत. " ब्रिंटन लिहितो कीं, न्यू मेक्सिको येथील तेझुक लोक सूर्य आणि अग्नि ह्या दोहोंस त हा एकच शब्द लावितात, आणि ब्रिटिश अमेरिकेंतील कोलोश लोक अग्नीला कन् आणि सूर्याला ककन् असें ह्मणतात.....मूलर सांगतो कीं, सूर्याच्या देवालयांत अग्नि सर्वकाल पेटलेला असे....फिन्लंडांतील लोकांत देखील अग्नीची देवता पनु हा सूर्याचा पुत्र अशी कल्पना आहे. " अग्निपूजा हल्लीं ब्राह्मणांत अग्निहोत्र्यांच्या घरीं किंवा कोणी गृहस्थानें धाराग्नि ठेविला असेल, त्याच्या घरीं असते असें म्हणतां येईल; आणि पार्शी लोक तर प्रसिद्ध अग्निपूजक आहेत, ते सूर्याला ही भजतात. पार्शी लोकांप्रमाणेंच ऐनो, अझटेक, पेरु, नाटचेझ, ओजिब्वे वगैरे अमेरिकेंतील लोक आणि आफ्रिकेंतील कांगो व डमरा लोक ह्यांच्यामध्यें सूर्य आणि अग्नि दोन्ही देवच मानीत. " धात्वर्थावरून बर्नफनें असें दाखविलें आहे कीं ख्रिस्तीधर्म हा अग्निपूजाच आहे, आणि

**अग्निपूजेचा सूर्याशीं संबंध**

1. Vide pp. 138-141 The Story of Man By J. W. Buel.

२ पान. ८१-८२ भौक्तिकधर्म. प्रो. म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

3. The Younger Burnouf actually interpretes Christianity, on etymological grounds, to be a fire worship, and the speculations of early Docetism are well-known. P. 47 Buddism By Sir Monier Williams.

डोसेटिझम पंथाच्या लोकांचें हेंच ह्मणणें असे." "उन्हाळ्यांत आयर्लंडमध्यें जान साधूचा जो उत्सव होतो तो ह्या अग्निपूजेचाच अवशेष आहे."

चंद्र अशी देवता वेदांत नाहीं. सोम ह्या वल्लीची पूजा सुरू झाल्यावर सोम ह्याचाच अर्थ चंद्र असल्यामुळें दोन्ही शब्दांचा घोंटाळा झाला आहे.

चंद्राची पूजा.

हिंदु लोकांत सूर्य व चंद्र पुल्लिंगी मानितात. परंतु जर्मन[2]भाषेंत चंद्र पुल्लिंगी आणि सूर्य स्त्रीलिंगी आहे; तसाच प्रकार मुसलमानी धर्मांत आहे. शंकरविजयाचा चवेचाळिसावा अध्याय आणि मुसलमानी ग्रंथकार[3] हे ह्मणतात कीं, चंद्राची पूजा करणारा एक पंथ होता. गाणपत्य लोक दरमहिन्याच्या कृष्णपक्षांतील चतुर्थीला उपवास करितात, तो चंद्रदर्शनाशिवाय सोडीत नाहींत. विक्रमोर्वशीयामध्यें व्रत उद्यापनासाठीं चंद्राची पूजा करण्याचा भाग आला आहे. "सिंहाच्या[4] आकृतीच्या रूपानें चंद्राची पूजा असीरिया, एशिया मायनर, ग्रीस आणि इजिप्त या देशांत होती."

नवग्रहांची देवळें पुष्कळठिकाणीं आहेत; सूर्याचीं निराळीं देवळें वर सांगितलींच आहेत; चंद्राचीं निराळीं देवळें कोठें नाहींत. मंगळाचेंही

---

1. The old pagan fireworship still suruives in Ireland, though nominally in honour of St. John on Midsummer Eve June 23. P. 323 British Popular Customs, Past and Present By the Rev. T. F. Thistleton Dyer.

२ पान २३६ धर्ममीमांसा. प्रो. म्याक्समुल्लर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

3. Katále-al-fihrist in Reianadd's Memoire Sur L'Inde. P. 293 and Shaha rast-anit II. p. 367.

4. It was the moon which was worshipped under the form of the sphinx-as the lion of light-the Sinba in Assiria, Asia Minor, Greece and Egypt. P. 314 The Ruling races of prehistoric times By J. F Hewitt.

निराळें देऊळ नाहीं; परंतु त्याची प्रतिमा किंवा टांक करून त्याची पूजा करितात. वराहमिहिर योगयात्रा ( ६-२-१८ ) येथें ग्रहांच्या प्रतिमांचें वर्णन आहे. ऋग्वेद ( १०-१२७ ), मैत्रायणी

**तारे व ग्रह यांची पूजा**

उपनिषद् (६ १६), मनु ( १-२४-६-१२१ ) येथें ग्रहांचा उल्लेख आहे; परंतु त्यांची प्रार्थना अशी अथर्ववेद ( ९-१९-६,७,१० ) वगैरे ठिकाणीं आहे; शंकरविजय अध्याय ४६ येथें ग्रहपूजकांच्या पंथाबद्दल माहिती दिली आहे. ज्याच्या राशीला जो ग्रह अनिष्ट असेल, त्याचीं दानें व जप करून किंवा करवून पिडा दूर करण्याचे प्रयत्न होतात. शनीचीं देवळें आहेत; कित्येक वेळां मारुतीचाही शनि बनविलेला आहे. ध्रुवाला अढळपदाची जागा मिळाली ती ध्रुवताऱ्यावरच होय. एखादा तारा तुटला ह्मणजे कोणी तरी जीव पुनः गर्भांत आला, अशी हिंदूंची समजूत आहे. शुक्राची पूजा पूर्वी होती; पण ती सौंदर्याची देवता ह्मणून होय. "[1] बीनाथपासून व्हीनस ( ह्मणजे शुक्र ) हा शब्द निघाला असावा. त्या बीनाथची पूजा कार्थेज आणि आफ्रिकेपासून इटलीच्यापर्यंत किनाऱ्यावरील भागांत चालू होती." प्रत्येक ताऱ्याच्या आणि ग्रहाच्या ठिकाणीं एक एक देवता आहे असें कोपर्निकसला वाटत असे. अरुंधतिसहित सप्तऋषींची पूजा सुपाऱ्या मांडून कित्येक वेळां होते; परंतु त्यांची नित्य पूजा कोठें नाहीं.

उषा, अश्विनीकुमार, इंद्र, मरुत, वरुण, वायु, द्यावापृथिवी वगैरे संबंधानें ऋग्वेदांत सूक्तें आहेत; परंतु त्यांच्या मूर्ति किंवा देवळें नाहींत. "[2] इंद्र, वरुण, कुबेर, यम, यांचीं देवळें नाहींत. कोरींव लेण्यांच्या भिंतीं-

---

1. Benoth is possibly derived from Benoth ( Succoth Benothni 2 Kings XVII. 20 ) whose worship was at an early time disseminated from Carthage and other parts of Africa to the shores of Italy. P. 12 Bible Studies By J, M. Wheeler.

2. I have never met with shrines to Indra, Varuna, Kuber or Yama though their images often stand iu the galleries of temples or are carved on the walls of caves. P. 167 Footnote Hinduism By Monier Williams.

इतर खगोलस्थ देवता

वर त्यांचीं कोरलेलीं चित्रें आहेत, " इतर ठिकाणींही त्यांचीं चित्रें काढतात. वरुण हीच मुख्य देवता पूर्वी असावी, आणि ह्या एकेश्वरी भक्तीचा अवशेष ऋग्वेदांतील सूक्तावरून आणि विशेषत: १–२५; २–२८ या सूक्तावरून दिसून येतो, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. हरिश्चंद्रानें पुत्रप्राप्तीसाठीं वरुणाची प्रार्थना केली, वगैरे कथेवरून वरुण हाच एक देव, त्या वेळीं असावा असें कोणी ह्मणतात, ह्याच कथेंतील शुन:शेप तो Cynasuru होय, असें वेबरसाहेब ह्मणतात. ह्या आकाशस्थ किंवा नैसर्गिक दृष्टांतापासून उत्पन्न झालेल्या कांहीं वैदिक देवांचें इतर देशांतील देवांशीं साम्य आहे ह्मणतात, तेवढें नमूद करण्यापेक्षां अधिक उहापोह करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. कित्येक शब्दसाम्यांस इतर देशांत देवता रूपही आलें नव्हतें.

उषस्-उषा-उषना ( पार्शी ) उवर ( U'ar-Greek ) अरोरा ( Aurora-Latin ) अझरा ( Auzra- Lithuanian. )

सूर्य=हेलास ( Heli s-Greek ), सोल ( Sol-Latin ), हॉल ( Haul-Nelsh ) वरूण--युरेनस ( Uranus Greek ) वीरकोचा ( Vira Cocha.-Peruvian )

द्यौ:= ( Zeus-Greek ) झ्यूस,जुपिटर ( Jupiter-Latin ), तिन ( Tin-Teutonic ), डुव ( Duw Celtic ), तिर ( Tyr-Scandanavian ), तिव ( Tia Low German ) झिव ( Ziu-High German )

पर्जन्य--परकूनाश ( Perkunas-Lituanian ) परशुनास (Percunas-old Prussian ) पिरकोनस ( Pirkonas Lettish ) पेरुन ( Perun-Slavonic ) पियोरुन ( Piorun-Polish ) पेराऊन ( Perawun-Bohemian )

परंतु अशा प्रकारें पाश्चिमेकडील आख्यायिका, धार्मिक कथा ह्यांचें मूळ म्याक्समूलर वगैरे विद्वानांच्या मताप्रमाणें हिंदुस्थानांतील संस्कृत काव्यें आणि वेदकाल देवता ह्यांच्या पासून निघत्तें; ही गोष्ट तिकडे पसंत

पडली नाहीं; आणि हा प्रो० म्याक्समुल्लरचा सिद्धांत चुकला आहे असें टेलरसाहबांचें ह्मणणें आहे. "आर्य लोकांच्या राष्ट्रापैकीं सर्वांनीं एकाच नांवानें ज्याची पूजा केली होती, अशी एकही पंचभूतांपैकीं देवता नाहीं." असें ह्मणून आर्यसंस्कृति युरोपांतील आहे, असें टेलरसाहेब ह्मणतात.

ह्याबद्दल निर्णय ठरविणें हा प्रस्तुत निबंधाचा विषय नाहीं; वेदकालीन देवतांच्या मूर्ति असल्या तर त्यांच्या सारख्या इतर देवाबद्दल उल्लेख करणें जरूर पडलें असतें; तेव्हां येवढ्यापुरता पुरावा सांगून हा भाग संपवू. विष्णु हा शब्द ऋग्वेदांत आहे, रुद्राचाच पुढें शंकर झाला. इंद्र आणि अग्नि ह्यांचीं ध्यानें पुष्कळ ठिकाणीं येतात आणि त्यांच्या अवयवांचें वर्णनही आहे. परंतु सूक्तानें त्या देवतेचें आवाहन आणि सूक्तानेंच विसर्जन झाल्यावर जाग्यावर कांहीं उरत नाहीं. अग्नीची पूजा ह्मणून त्याला फुलें वगैरे वहातात; पण तीं बाहेर कुंडावर किंवा वेदीवर ठेवितात, अग्नींत टाकीत नाहींत. वेदांतील ऋचांवरून मूर्तीची कल्पना तरी त्या वेळेला असेल असेंच ह्मणावयाचें असल्यास (ऋग्वेद ८-५;४,-२४-१०) असा कांहीं आधार सापडेल. बोलेनसाहेब ह्मणतात कीं ऋ० १-१४५-४,५ येथील अग्नीच्या ध्यानावरून त्याची मूर्ति असावी; "वेदांमध्यें पिश् धातूचीं रूपें येतात, आणि ह्या पिश्पासून पिक्चर ( Picture ) ह्मणजे चित्र असली कल्पना वेदकालीं होती, असें कित्येक विद्वान् ह्मणतात, परंतु असल्या सर्व उदाहरणांवरून पाहिलें तर कवीच्या ( मंत्रद्रष्ट्याच्या ) मनांतच तें चित्र असेल, आणि त्यानें आपली इष्टदेवता अशाप्रकारानें

1. There is not a single power of nature which can be proved to have been worshipped under the same primeval name by all the Aryan people. P. 308 The Origin of the Aryans By Issac Taylor.

2. Some scholars see in the use of the verb pic, a Vedic picturing of gods; but in all instances where this onurs it may only be the poet's mind-picture adorned with various glorics. P. 374 Footnote. The Religions of India By E. W. Hopkins.

रंगविली असेल " परंतु ह्यावरून तशीं चित्रें किंवा मूर्ति पूजेंत होत्या असें सिद्ध होणार नाहीं. पंजाबांतील दयानंदसरस्वतींनी आर्यसमाज स्थापन केला, त्यांचा मुख्य कटाक्ष ह्या मूर्तिपूजेवर आहे. ती वेदांत नाहीं असें त्यांचें ह्मणणें ' सत्यार्थ-प्रकाश ' नांवाच्या ग्रंथांत त्यांनीं प्रतिपादिलें आहे. त्याच्या खंडणासाठीं पंडित ज्वालाप्रसाद ह्यांनीं 'दया-नंदतिमिरभास्कर, या नांवाचें पुस्तक हिंदुस्थानींत लिहिलें आहे. हा वाद अद्यापही चालू आहे. आर्यसमाजतर्फे धरमपूरचे रुद्रदत्तशर्मा आणि सनातनधर्मसभेतर्फे रामनारायणजी ह्यांचा ह्याबद्दल १९१२ मध्यें वाद झाला, त्या वेळी आर्यसमाजतर्फे यजुर्वेद अध्याय ३१ मधील व्याख्या आणि सनातनधर्माच्या वतीनें शुक्लयजुर्वेदाच्या कात्यायन-सूत्रांतील दुसरी व तिसरी ऋचा आणि शतपथब्राह्मणांतील वाक्यें वगैरे आधार दाखविण्यांत आले होते. हा वाद पुनः नुक्ता अहमदनगरास झाला, परंतु त्याचा निकाल लागला नाहीं, आणि केव्हां लागेल असें वाटत नाहीं.

**वेदकाळीं मूर्ति-पूजा होती किंवा नाहीं.**

" न तस्य प्रतिमा अस्ति " परमेश्वराची प्रतिमा नाही, ह्या एकावाक्या-वरून मूर्तिपूजा वेदकाळीं नव्हती असें दयानंदानीं सिद्ध केलें आहे; परंतु हा उतारा ज्या ऋचेंत आहे, ती पूर्ण अशी आहे:— **नतस्य प्रतिमा अस्ति यस्य नाम महद्यशः । हिरण्यगर्भ इत्येषः मा मा हिंसी-दित्येषा यस्मान्न जात इत्येषः** ॥ यजुर्वेद अ० ३२ मं. ३. ह्या पूर्ण मंत्राचा अर्थ असा आहे कीं त्या ( परमेश्वरा ) च्या बरोबरीची दुसरी वस्तू नाहीं, त्याचें नांव व कीर्ति फार मोठी आहे ( त्याची बरोबरी को-णाला होईल ? ) परंतु ' हिरण्यगर्भः समवर्तताग्रे ' ह्यापासून पुढें चार मंत्रांचा जो अनुवाक आहे, त्याचा अर्थ कळावयास ' मा मा हिंसीत् ' हा मंत्र घ्यावा लागतो, ज्याप्रमाणें सूर्यबिंबाचें रूप सूर्याच्या प्रतिमे-वरून, मोठ्या मण्याचें स्वरूप लहान मण्यावरून, उत्तम सोन्याचें रूप

१. मुमुक्षु ता. ६ जून १९१२

हिणकस सोन्यावरून ओळखण्याचा प्रचार आहे, त्याप्रमाणें इतर वस्तूकडे बोट दाखवून ईश्वरस्वरूप मनांत आणावयाचें आहे. ह्या आधारावरून ज्वालाप्रसादजी आपलेंच ह्मणणें सिद्ध करतात. हीच श्रुति श्वेताश्वरोपनिषदांत आहे, आणि "त्यावरून ब्रह्माच्या बरोबरीचें कांहीं नाहीं" असें सांगितलें आहे. त्याशिवाय **मा असि प्रमा असि प्रतिमा असि** । कृष्णयजुर्वेद तैत्तिरीय आरण्यक प्रपाठक ४ अनुवाक ५॥ ( तूं त्याचें माप आहेस, त्याची तुला उपमा शोभेल, तूं केवळ तोच आहेस ) आणि **संवत्सरस्य प्रतिमां यां त्वा रात्र्युपास्महे । सान आयुष्मतीं प्रजारा यस्पोषेण संसृजः** । अथर्ववेद ।३।१०।१० ॥ (हे देवा, फार झालें तर तुला संवत्सराची उपमा देता येईल, तुझी रात्रंदिवस उपासना आह्मी करितों. तूं आमचीं मुलें बाळें दीर्घायु कर, आह्माला शक्ति, आरोग्य आणि धन दे) **स ऐक्षत प्रजापतिः इमं वाऽआत्मनः प्रतिमा ममृक्षि यत्संवत्सरमितितस्मादाहुः प्रजापति संवत्सर इत्यात्मनोह्येतं प्रतिमामसृजत यदेव चतुरक्षरः संवत्सरश्चतुरक्षरः प्रजापतिस्तेनो हैवास्यैष प्रतिमा** ॥ श० ॥११।१।६।१३॥ ईश्वरानें आपली प्रतिमा ह्मणून संवत्सर उत्पन्न केला असावा, कारण प्रजापति आणि संवत्सर ह्या दोन्ही शब्दांत चार चारच अक्षरें आहेत ) असल्या आधारावरून फार झालें तर प्रतिमा हा शब्द त्या वेळीं होता असें ठरेल परंतु मूर्ति करून त्याची पूजा होत होती, असें ह्मणता येणार नाहीं.

सामवेदाच्या षड्विंशाख्या ब्राह्मणांत 'यदा देवतायतनानि कंपन्ते दैवतप्रतिमा हसन्ति रुदन्ति....साम गायेत' ( देवळें डोलूं लागलीं, मूर्ति हसूं, रडूं लागल्या ) ह्या वरून मूर्तिपूजा वेदकालांत होती असें कोणी ह्मणतात; परंतु हा मंत्र मूळ ऋग्वेदांत नाहीं. तेव्हां 'कासीत्

१ न तस्य प्रतिमास्तीति च ब्रह्मणोऽनुपमानत्वं दर्शयति ॥ ब्रह्मसूत्र २. ३. ७ या वरील शारीरभाष्य.

प्रमा प्रतिमा किं निदानं किमाज्यं किमासीत्परिधिः क आसीच्छन्दः किमासीत् प्रउगं किमुक्थं यद्देवा देवयजन्त विश्वे ॥ ऋग्वेद. अ. ८ अ. ७ व. १८ मं. ३॥ ( प्रमा ह्मo यथार्थ ज्ञान कशाला ह्मणावें, प्रतिमा ह्मणजे मूर्ति कशाला ह्मणावें, जगाचें निदान ह्मणजे कारण कोणतें ? आज्य ह्मणजे तूप यासारखी सारभूत वस्तू कोणती ? दुःखाचें निवारण कशानें होईल ? सुखाची परमावधी कोठें ? जगाचें आवरण काय ? स्वतंत्र वस्तू कोण ? ज्या परमेश्वराची इंद्र वगैरे सर्व देव थोरवी गातात तो तोच होय. हें ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर आहे). ऋग्वेद ( २–३३–९) येथें रुद्राच्या मूर्तीचा उल्लेख येतो, आणि ( १–२५–१३; ५–५२–१५ ह्यावरून कांहीं तरी दृश्य वस्तू सांगण्याचा हेतू दिसतो. परंतु ह्यावरून ही मूर्तिपूजा वेदकाळांत होती असें होत नाहीं.

वेदकालामध्यें " पंचमहाभूतांचें नियमन करणाऱ्या ईश्वरीशक्ति आहेत, असें जरी मत झालें होतें, तरी त्या शक्तीच्या मूर्ति बनल्या नव्हत्या. वेदऋचावरून फार झालें तर असें ह्मणतां येईल कीं, मूर्तीचा कांहीं प्रसंगीं उपयोग झाला असेल पण मूर्तीची पूजा होत होती असा पुरावा सांपडत नाहीं. " " यज्ञांतील तंत्राचे विधि फार गुंतागुंतीचे आहेत; आणि त्यांत किती तरी

---

1. Though the forces of nature were thought of as controlled by divine persons, such persons were not yet idiolized. There is no evidence from the Vedic hymns that images were actually worshipped though they appear to have been occasionally employed. P.11 Religious thought and life. By Monier Williams,

2. Each of the acts of the Vedic ritical is a complex whole addressed to a great number of gods and if of any significance, how. ever little, to the entire pantheon. Their rites did not then admit of images; no more did they admit of holy places. P. 61 The Religions of India By A. Barth.

देवांना आव्हान असतें, आणि त्याकरून हल्लींच्या देवतावर्गाबद्दल कांहींच बोध होण्यासारखा नाहीं ह्मटलें तरी चालेल. ह्या याज्ञिकामध्यें मूर्तीचें कारणच पडत नव्हतें, आणि त्याप्रमाणें क्षेत्रांचाही कांहीं संबंध येत नव्हता " सूत्रांत आणि ब्राह्मणांत देवालयें आणि मूर्ती ह्यांचा उल्लेख येतो; कहोन ( Kahaon ) येथील स्तंभावरील लेखांत पांच इंद्र येतात; ह्या वेळच्या मूर्ति लहान असाव्या; आणि पुजारी लोक त्या आपल्या बरोबर हिंडवीत असावे असें दिसतें; ह्या पुजाऱ्यांना देवळें किंवा देवळकें ह्मणत; अशी माहिती बंगालच्या एशियाटिक सोसायटीच्या जनरलच्या आठव्या भागांत दिली आहे. तथापि ही सार्वजनिक देवळाची पद्धत किंवा तेथें पूजा होणाऱ्या मूर्ति हा प्रकार वेदकाळीं नव्हता, ह्यांत शंका नाहीं.

## भाग ३ रा.

## पितृपूजा.

यदिदं सर्वं मृत्युनाप्तं सर्वं मृत्युनाभिपन्नं केन यजमानो मृत्योराप्तिमतिमुच्यते । वाजसनेयी ब्राह्मणोपनिषत् । पञ्चमे प्रथमं ब्राह्मणं ॥ ३ ॥

Death Changes nothing It is only life that separatys utterly. Myrtte Reed.

थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करोनि पाहाती ।
तैसीच आहे हेही गति । उपासनेची ॥

दासबोध १७।१०।९॥

मागील भागांत केलेल्या विवेचनांत निसर्गाच्या जड आणि जंगम सृष्टीच्या ह्मणजे भौतिक सृष्टीच्या भूगोलाच्या पूजनाचे प्रकार सांगितले आणि नंतर खगोलाच्या पूजनाच्या तऱ्हा नमूद केल्या. येवढा वेळ मनुष्य आपल्याला वगळून इतर सृष्टीचा आणि ईश्वराचा संबंध लावूं पहात असल्याचे प्रकार सांगितले; आतां मनुष्य आपल्या स्वतःचा विचार करूं लागला ह्मणजे काय भावना होतात आणि त्यापासून कोणचे पूजाप्रकार येतात, तें सांगूं. मृत्यूसारखी चमत्कारिक दुर्ज्ञेय भीति देणारी दुसरी कोणचीच गोष्ट नाहीं. मथळ्यांतील संस्कृत उताऱ्याचा अर्थ तोच आहे. मृत्यूच्या तडाख्यांतून सुटेल असें कांहींच दिसत नाहीं, प्रत्येक वस्तूवर त्याची छाया दिसते, मग हा आपल्याला सोडील काय ? असा विचार सहजच येतो. " हा विचार आला कीं वेदांत, तत्वज्ञान ह्याला प्रारंभ झालाच " परंतु ही मृत्यूची कल्पनाच एखाद्या मृत्यू नांवाच्या शत्रूपासून उत्पन्न झाली असली पाहिजे, असें स्पेन्सरसाहेबांचें ह्मणणें आहे; हें ह्मणणें चुकीचें आहे असें म्याक्समुल्लरसाहेब ह्मणतात.

1. Philosophy is mediltation on death. Plato.

स्पेन्सरसाहेबांच्या लेखांतील शब्दशः भाषांतर नसलें तरी त्या मताचा अनुवाद करून प्रो० आगरकरांनीं सुधारकपत्रांत कांहीं मजकूर लिहिला होता. त्यांतील मृत्यूच्या कल्पनेचा उतारा पुढें दिला आहे. ज्याप्रमाणें निजलेल्या मनुष्याचें एकप्रकारचें स्वत्व बंद पडून दुसऱ्या-प्रकारचें स्वत्व पुढें होतें, त्याप्रमाणें मेलेल्या मनुष्याचेंही स्वत्व नाहींसें होऊन दुसऱ्याप्रकारचें स्वत्व येत असावें, व तो एकाप्रकारानें आपणांतून नाहींसा झाला तरी दुसऱ्यातऱ्हेनें तो जिवंत असला पाहिजे, व आपल्या सभोंवतीं ( किंवा कोठें तरी ) वावरत असला पाहिजे, ही कल्पना मनुष्याच्या प्रथमावस्थेंत ( पण हिला सुद्धां बराच विचार लागतो आणि बरीच सुधारणा झालेल्या देशांतही ही गोष्ट कळत नाहीं ) प्रत्येक ठिकाणीं अस्तित्वांत असतें. आपल्या मेलेल्या आत्म्यांचीं शरीरें नाहींशीं झालीं तरी त्यांचे आत्मे नाहींसे झाले नाहींत, हा विश्वास सर्व-ठिकाणच्या रानटी लोकांत आढळून येतो ( परंतु कित्येक विद्वानांना सुद्धां देही व देह भिन्न आहेत, हें खरें वाटत नाहीं ह्याची वाट काय ? ) व याच विश्वासापासून पदार्थपूजा, प्राणिपूजा, वनस्पतिपूजा व विश्वपूजा अस्तित्वांत येतात. जिवंतपणीं ज्यांचें वर्तन आपणास सुखावह झालें असेल ते मरणोत्तरही पिशाचरूपानें आपला निरंतर परामर्ष घेत जातील, अशी कल्पना उत्पन्न होऊन त्यांची मर्जी प्रसन्न ठेवण्यासाठीं, त्यांच्या थडग्यावर किंवा चितेवर, त्यांना प्रियवस्तु अर्पण करणें, त्यांची प्रार्थना करणें कांहीं सकट आलें असतां त्यांचा सल्ला विचारणें, व सहाय मागणें,-सारांश जिवंतपणीं कोणाचीही मर्जी संपादण्याचे जे मार्ग त्यांचें मरणोत्तरही अवलंबन करण्याचा प्रचार पडतो! त्याच्या उलट जे जिवं-तपणीं आपणास प्रतिकूल असतील, ते मेल्यावरही पिशाच रूपानें आपणास त्रास देत राहतील, असें वाटून पंचाक्षऱ्याकडून किंवा मांत्रि-काकडून त्यांना दंडण्याचा व गाडण्याचा प्रयत्न करणें, किंवा ज्या वस्तु त्यांना प्रिय होत्या असें ठाऊक असेल, त्या त्यांना विवक्षितकालीं पोंच-विण्याचें कबूल करून त्यांस वश करून घेण्याची खटपट करणें वगैरे प्रचार अस्तित्वांत येतात ! पुढें अनेक कारणांमुळें हींच पिशाचें वृक्षांच्या

व जनावरांच्या रूपानें आपणास आनंद दणारीं किंवा पीडा देणारीं होतात, असें वाटूं लागून झाडांची व जनावरांची आराधना करण्यास आरंभ होतो. मग पृथ्वीवरील मोठमोठ्या वस्तूंत आपल्या प्रसिद्ध आप्तांनीं मरणोत्तर प्रवेश केला असेल, असें वाटणें साहजिक आहे; व या वाटण्यास आरंभ झाला ह्मणजे प्रथम नद्या, पर्वत, अरण्यें वगैरे वस्तु सचेतन अशा भासूं लागून अखेर चंद्रसूर्यादि तारकागणहि सचेतन वाटूं लागतात, आणि त्याचा आपल्या पूर्वजांशीं संबंध आहे, किंवा ते आपले पूर्वज आहेत, असा विश्वास उत्पन्न होऊन त्यांची पूजा करण्याचा प्रघात पडतो.

सारांश धर्माचें मूळ भूतपूजा किंवा पितृपूजा आहे, असा सिद्धांत प्रो. आगरकरांनीं मांडिला होता. हा वाद ह्या निबंधाशीं अप्रस्तुत आहे. अनेक विद्वानांनीं आपल्या पूर्वग्रहाप्रमाणें ह्या गोष्टीचा विचार केला आहे, तरी मेल्यावर काय होतें, हें सांगणारा कोणी परत येत नाहीं, तोंपर्यंत ही स्थिति अगम्यच रहाणार. मृत्यु येतो कसा ह्याची कल्पनाच पुष्कळ लोकांना नसते. ईश्वरावाचून आमचें अडत नाहीं ह्मणणारे लोकच मृत्यूविषयीं विचार आतांच कशाला पाहिजे ह्मणतात. ह्मणजे मनुष्य आपल्या संबंधाचा विचार करूं लागला कीं, धर्माची आणि ईश्वराची कल्पना बदलूं लागते, असा वास्तविक क्रम असून ड्रेपरसाहेब ह्मणतात कीं "ईश्वरविषयींच्या समजुतीप्रमाणें आत्म्याबद्दलच्या विचाराची दिशा फिरते. पूर्वेकडे ईश्वर अव्यक्त ठरल्यामुळें त्या ईश्वराचे अंश जीव आहेत, आणि त्यांचा अखेर लय त्याच्यांत होणार असें मत निघालें," ह्या विचारसरणीप्रमाणें खिस्तीमतांत तरी झालें असलें पाहिजे. ईश्वर चालती बोलती व्यक्ति आहे, आणि त्याचा पुत्र येशू ह्याच्याशिवाय तारण नाहीं, आणि ठरलेल्या दिवसापर्यंत सर्व माणसें थडग्यांत पडून

1. Ideas respecting the nature of God necessarily influence ideas respect ing the nature of the soul. The Eastern Asiatics had adopted theconception of an Impersonal God and as regards the soul, its necessary consequence the doctrine of emanation and absorption.P. 721 The history of conflict between religion and science By John William Draper.

रहाणार ह्या सारख्या मतांचा प्रसार होऊन, तीं नाकबूल करणें पाप आणि देहांत शिक्षेची तयारी असें ठरल्यामुळें तिकडे आत्म्याचा विचार झाला नाहीं. " बायबलमध्यें ह्मटलें आहे कीं, जो मेला तो झोंपीं गेला; त्याला कांहीं कळत नाहीं. मेल्यावर द्वेष आणि प्रेम हे विकार होण्यास त्याला स्मरण कोठें अ-तें? त्याच्या मुलाबाळांनीं त्याची पूजा वगैरे केली तर त्याला ती कळण्यास मार्ग नाहीं. " लाझेरस मेला तेव्हां स्वत: येशूनें ह्मटलें कीं " आमचा लाझेरस झोंप घेत आहे. " ह्या मतावर गैर विश्वास ठेवतां येत नसल्यामुळें आत्मविचाराचा विकासच ख्रिस्तीधर्मांत झाला नाहीं. ख्रिस्तीलोकांतील अमरत्व ही कल्पनाच वेगळी. आमच्या इकडची कल्पना व्यतिरेक-दुसरा देह धारण करणें त्यावरून कांहीं अंशीं येईल परंतु उपनिषद्कालांतच " मनुष्य मेल्यावर रहातो, असें कोणी ह्मणतात, कोणी तो नसतो ह्मणतात, हे मला समजावून सांगा " असा प्रश्न नाचिकेतानें यमधर्माला केला. ह्या स्थूल देहानंतर जीवाला सूक्ष्म शरीर असतें, ह्या हिंदूंच्या समजुतीप्रमाणेंच " ह्या भौतिक शरीरानंतर दिव्य देह मिळतो ही समजूत बहुतेक ख्रिस्तीलोकांची आहे," असें ब्यूएल साहेब ह्मणतात, परंतु तसा प्रकार असावा असें दिसत नाहीं.

1. The Bible says the dead are asleep. Eccl 9 : 4-6. "The dead know not any thing." He has no memory or power to love or hate after death and sons and daughters come to honour and the parents who have died know it not. Psalms 146 : 3-4 ; 115, 17, 6 . *5* ; Jole 14: 21 ; 1 Cor. 15, *51*, 52 ; Thes. 4 : 14-16 ; John 5 : 28, 29 ; Rev. 14 ; *13*. The Saviour said of Lazarus "Our friend Lazarus sleepeth." What we call immortality is commonly called by them (Imrans) व्यतिरेक. the reaching beyond the body. P, 2 7th system of Vedant By Paul Deussen.

२. ये यं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीति चैके । एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं—॥ कठोपनिषद् ॥१।१।२०॥

3. That a spiritual body succeeds the natural body is the faith of most Christians. P. 312 The story of man By J. W, Buel.

ही समजूत झाल्यावर " प्रेताला सुगंधिक उटणीं लावून ( स्नान वगैरे घालून ) उंची कपडे आणि अलंकार घालावे, ह्मणजे त्यायोगानें त्याला सुख होतें " अशी भावना रहाणार नाहीं.

" मनुष्य[१] मेल्यावर त्याचें शरीर नष्ट होतें, पण तो मरत नाहीं, त्याचा नाश होत नाहीं, तो निराळ्या ठिकाणीं जातो[२] " ही कल्पना आत्म्या-संबंधानें झाली, तेथें श्राद्धें पितृपूजा विशेष अमलांत आली. शिक्षणानें इतर संस्कारांनीं, परिस्थितीप्रमाणें त्याचें स्वरूप बदलेल तरी पण ह्या मृतपूजनाची, त्याला कांहीं तरी देण्याची, श्मशानवैराग्याबरोबर येणारी तऱ्हा रहाणारच. लार्ड पामर्स्टनच्या एका मित्रानें आपल्या हातांतल्या आंगठ्या काढून दफन विधीच्या वेळीं त्या खड्यांत टाकल्या. एका इंग्लिश-कवीनें आपल्या कवितांची बहुमोल लेखी प्रत आपल्या बायकोच्या शवा-बरोबर पुरण्याविषयीं आग्रह धरिला होता, आणि आपल्या लाडक्या पोरांचीं खेळणीं त्याच्याबरोबर पुरण्याबद्दल कित्येक लोक हट्ट घेतात. ह्या वस्तू जर त्याला उपयोगी पडतील, ह्या समजुतीनें दिल्या तर त्यांचा तो उपयोग कोणच्या देहानें कोठें करतो, हा विचार आलाच पाहिजे. त्याचाच विकास होऊन भूत, पिशाच्च, पितर ह्यांचा प्रकार आला. ह्यांत भीती-चाच प्रकार असतो, असें स्पेन्सर साहेब ह्मणतात; परंतु प्रीति आणि कृत-ज्ञता हाच भाग आमच्या मनांत असतो, असें झुलु लोकांनीं बिशप कालावे यास सांगितलें, तो प्रकार विशेष असतो असें दिसतें.

ह्या पितृपूजेचा समावेश मूर्तिपूजेंत कसा होतो, हा प्रश्न साहजिक येतो. श्राद्धें करणें, पिंडदान वगैरे प्रकार हिंदुधर्मांत आहेत तसले प्रकार

---

१. असुराणां ह्येषोपनिषत् प्रेतस्य शरीरं भिक्षया वसनेनालंकारेणेति संस्कुर्वन्त्ये-तेन ह्यमुं लोकं जेष्यन्तो मन्यन्त इति ॥ छांदोग्योपनिषत् ॥८।८।५॥

२. जीवापेतं वाव किल शरीरं म्रियते नसः । इत्यत्र न विमोक्षोऽर्थः किंतु लोकांतरे गतिः ॥ पंचदशी ॥ कूटस्थदीपप्रकरण ॥ ४१ ॥

मूर्तिपूजेंत पितृपूजा

सर्वत्र आहेत, हे पुढें दाखविण्यांत येईल; परंतु ह्या पितृपूजनाचा संबंध मूर्तिपूजेशीं कसा व कोठें येतो तेवढा अगोदर सांगू. "न्यासा लोक सुमात्रा बेटाच्या पश्चिमेकडील एका बेटांत रहातात. ह्यांच्या देवांत पितरांच्या मूर्ति मुख्य असतात. त्या माणसांच्या व सुमारें ७।८ इंच उंच असतात. " व तेलगू वगैरे कित्येक जातीच्या देव्हाऱ्यामध्यें आजी, पंजी वगैरे टांक असतात, व त्यांची इतर देवां बरोबर नित्य पूजा होते. " कुर्ग प्रांतांत पुरुष पितराला कारण आणि बाईला करंची किंवा सोडलिची ह्मणतात. प्रत्येक रहात्या घराशेजारीं कैमड किंवा कैमट्ट ह्मणून लहानसें देऊळ बांधून त्यांत पितरांचे ह्मणून ओबडधोबड छापाचे रूप्याचे टांक, तांब्याच्या, किंवा पंचरसी धातूच्या मूर्ति ठेवलेल्या असतात, त्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्याही असतात, किंवा आकृति खोदलेल्या दगडाच्या शिळा असतात."

" वेदविहित धर्मांतील किंवा हिंदुस्थानांतील पितर, ग्रीक लोकांचे ' थीओईक्लिथोनिसी आणि रोमन लोकांचे " डीई मेन्स " हे अगदीं एकसारखे आहेत. " " रोममध्यें प्रत्येक घरचे पितर असून, प्रत्येक इस-

---

१. पान. १७१. पितृमूलक धर्म. प्रो. म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यानीं केलेलें भाषांतर.

2. The spirit of male ancester is called Kárana, that of female Karanchi or Sodalichi. A small buiding called Kaymada or Kaimatta is erected near the house. Within these Kaymadas to represent the ancestors, are plaud silver plates rudely embossed with figures, copper or bronze images male or female or even a slab of stone with figures sculptured on it. P. 259 Coorg. By Lewis Rice.

3. The Latin " Dii Manes "" The greek Theoi Clithonisi correspond perfectly to the Vedic Pitris. P, 130 Oriental Religions By Samuel Johnsen.

4. Each household had its own Lares, each man his guardian angel who as his genius natalis was worshipped by him on his natal day. P. 224 Religion of ancient Rome By the Rev. James Mac gregor.

माचा कैवारी देवदूत वाढदिवशीं ज्याला त्याला पुजावा लागे." ग्रीक लोकांत देवांचीं स्थंडिलें उंच, पितरांचीं सखल, हिंदूमध्यें देवकार्याला सव्यानें सरळ पाणी द्यावयाचें, तर पितरांना अपसव्यानें वांकडा आंगठा करावा लागतो, देवांची आहुति देतांना 'स्वाहा' ह्मणावयाचें, तर पितरांची देते वेळीं 'स्वधा' अशाप्रकारें पितर आणि देव यांचा फरक होता व आहे.

पितरांचें स्थान व तिकडे जाण्याचा मार्ग

ते पितर, पूर्वज रहातात कोठें, तेथें जाण्याचा मार्ग कसा आहे, ह्या बद्दल कल्पना निघूं लागल्या. इर्वे बेटांत पितरांचें स्थान पश्चिमेस तेपो ( रात्र ) मध्यें मानितात; ग्रीकलोक ह्मणत कीं, मृताची छाया हेडीज मध्यें गेली. आद्य पितर यम ह्याचें स्थान दक्षिण दिशेस आहे, असें हिंदु मानितात. देवयान आणि पितृयान ह्याबद्दलच्या पूर्वीच्या कल्पनांत फरक होऊन आर्चिरादि मार्ग आणि धूममार्ग असे दोन योगाभ्यासांत भेद झाले. परंतु पूर्वीच्या पितृयानाच्या समजुतीमुळें गरुडपुराण स्वतंत्र झालें. जलदानापासून शय्यादानपर्यंत वस्तु ब्रह्मणास दिल्या असता त्या मृताला पितृयानांत उपयोगी पडतील, ही समजूत वाढली, तसतसा वेडाचार वाढत चालला. जीवाला नेण्यासाठीं हिंदूचे यमदूत येतात, त्याप्रमाणें त्या वाटेला ग्रीक लोकांचा हरमेष ( Hermes ) रोमन लोकांचा बुध ( Mecury ) सेमिटिकलोकांचा अझरेल ( Azrail ) असा कोणी तरी ठरला.

यम ( हिंदु ) आणि यिम ( पार्शी ) आणि त्याचे कुत्रे ह्या कल्पना दोन्ही धर्मांत पितृयाना संबंधानें सारख्याच आहेत. ऋग्वेदांत ( १०-२७-५ ) पितरांची प्रार्थना आहे. सूक्त ( १०-१५ ) ह्यांतील ऋचा पितरांना उद्देशूनच आहेत. एका सूक्तांत ( १०-५६-४ ) देवांच्या खालोखाल पितर ह्मटलें आहे. मेलेल्या मनुष्याला वाटेंत नदी लागते, असें एका सूक्तांत ( १०-६३-१० ) आहे, तिचीच गरुडपुराणांत वैतरणी झाली. पुलाचा उल्लेख एका सूक्तांत ( ९-४१-२ ) येतो. 'चिनवत' पुलाजवळ जीव तिसऱ्या दिवशीं जातो, अशी समज पार्शांची आहे.

आणि तेथून मार्ग कठीण लागतो, ह्मणून त्याच्या मदतीसाठीं कांहीं विधि करितात, तो फार महत्वाचा मानलेला आहे. " स्वर्गास जातांना एक पूल ओलांडावा लागतो, व त्याबद्दल कांहीं तरी तजवीज करून ठेविल्याशिवाय भागत नाहीं, असा मुसलमानांचा दृढ विश्वास आहे. त्या पुलाच्या खालीं नरक आहे, आणि तो पूल केंसाहून बारीक आणि खड्गाच्या धारेपेक्षां तीक्ष्ण आहे, पण सद्धर्मी लोकांस तेथें अडचण पडत नाहीं, आणि दुष्ट लोक निसरून नरकांत पडतात. असें ते ह्मणतात. " " ह्या 'एलसराट' नांवाच्या मुसलमानांच्या पुलाची कल्पना व तऱ्हा अगदीं इराणी पुलाच्या धर्तीवर आहे. यार्कशायर मधील शेतकऱ्याला विचारल्यास तो असलाच 'मृताचा पूल' सांगेल. " ह्या काल्पनिक पुलाचें प्रत्यक्षच अनुकरण करण्याच्या बुद्धीनेंच जणूं काय " पंजाबांतील चंबा येथील हिंदूंची चाल आडसले साहेब सांगतात. एका अरुंद बिनकठड्याच्या पुलावरून प्रेतें नेण्याची वहिवाट तेथें आहे. ह्याची रुंदी सारी दीड फूट आहे आणि दुसरी सोपी वाट आहे तरी ह्या पुलावरूनच स्मशानांत प्रेतें नेण्याचा नियम आहे. " खाशिया जातींत मेलेल्या जीवानें परत येण्यासाठीं पूल करून ठेवितात.

1. The Mussalmans firmly believe that no one can get into paradise unless he successfully negotiates to pass the bridge which is laid over the midst of hell and is finer than hair and sharper than the edge of the sword. The faithful will have no difficulty in passing over the bridge but the wicked will soon slip and fall into hell. Extract from the Times of India dated 22nd January 1914.

2. Mahomed's Bridge ElSerat is in inception and execution entirely Persian—The Brig O'Dead of the Yorkshire peasant is wel. known. P. 133 Religion of Persia By the Rev. John Milne in the Religions of the World.

3. An Indian Autiquarian, Mr. Ayusley, states that in thePunjabe the Hindus of Chamba have a custom of taking their dead over a narrow bridge, eighteen inches wide without any protecting balusl trade. All corpses must pass over this on their way to the burning ghat,though there is a much safer way to the same spot. Times of India Ed 22-1-1914.

" भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुत: " देह जळून राख झाल्यावर तो परत कसला येतो, " त्याच्यासाठीं अंत्येष्टी, श्राद्धें वगैरे करणें ही सर्व लबाडी ब्रह्मणांनीं आपल्या पोटाची खळी भरण्यासाठीं उत्पन्न केली आहे " असें ह्मणणाऱ्या चार्वाकासारखेच इतर देशांतही लोक झाले व आहेत. ह्या मूठभर लोकांशिवाय इतर जनसमाजामध्यें जुन्या, मधल्या, अर्वाचीन-पौर्वात्य, पाश्चिमात्य-इजिप्त, इराण, हिंदुस्थान, ग्रीस, रोम-येथील यहुदी, मुसलमानी. खिस्ती धर्मांतील ह्यांची आसिष्ट मेल्यावर रहातात अशी समज आहेच. ते पितर होऊन दिव्यरूपानें स्वर्गांत रहातात, असें कोणी ह्मणतात, तर कोणी त्यांना नीच पिशाचयोनी देतात. " भीतीचा भाग अधिक आला कीं भूत झालें, प्रेम आणि आदर अधिक असला कीं पितर देव झाले. भूत ह्या शब्दाचा अर्थ दिव्य ज्ञानी असा पूर्वी होता, पुढें तो बदलून त्रास देणारा असा झाला. इंग्रजी शब्द डीमन ( Daeman ) ह्याचा अर्थ प्रथम अतींद्रिय ज्ञानी असा होता, आतां पिशाच असा झाला आहे. रेननडोट ( Renandot ) ह्यांचा बोड ( Bod ) शब्द आहे, तो तरी ह्या भूत ( संस्कृत ) शब्दाचा किंवा ( पार्शी ) बूट शब्दाचा अपभ्रंश असावा, असें वुइल्सन साहेब ह्मणतात. रिफेम नांवाचे लोक पूर्वी प्यालेस्टाईनमध्यें होते, त्यांची ओळख बुजून तेच पाताळचे रक्षक किंवा वायुस्वरूप भूतें असावे असें झालें; तशीच गोष्ट टायफोन हा

**पितृपूजा व भूतपूजा**

---

१. मृतानां प्रेतकार्याणि न त्वन्यद्विद्यते क्वचित् । ततश्च जीवनोपायो ब्राह्मणैर्विहितस्त्विह ॥

2. While there has been a sceptical minority, the mass of man kind, in the ancient, medieval and modern world—in the East and the West, in Egypt, Persia, India, Greece, and Rome-Javs Mahomedans Christians,-entertain an expectation that persons persist after death whether in a lower or mre attenuated or in a nobler life than that experienced before they died. P. 311 The story of man. By J. W. Buel.

3. H. H. Wilson. Essays on subjects of Sanscrit literature Vol. III.

राक्षस झाला त्याची आहे, असें ओसबोर्नसाहेब लिहितात. फ्रेंचभाषेंत रेवेना ( Revenant ) हा शब्द भूत वाचक आहे, त्याचा अर्थ परत येणारें असा आहे, त्यावरून मनुष्य मेल्यावर पुनः परत येतो, अशी कल्पना त्यांच्यांत आहे असें दिसतें. हें परत येणारें भूत दुःखदायक व न येणारे पितर सुखकारक असे दोन भेद ह्या मृतासंबंधानें झाले. मृतासाठीं दुःख प्रदर्शित करणें ( सुतक धरणें, काळें फडकें बांधणें, रडणें, ऊर बडविणें वगैरे ) ह्याचा अर्थ मृताची पूजा करणें असाच होतो, अशी गोष्ट एक फ्रेंच भाषेंतील वाक्य वाचून त्यालें साहेबांच्या लक्षांत आली. " कोणी त्यांना अन्न घालितो, श्राद्ध करतो, किंवा त्याच्या पिशाच्यविमोचना-साठीं नारायण नागबळी, किंवा भागवतवाचन, किंवा ईश्वरप्रार्थना करतो, तर कोणी त्याबद्दल एकदम सर्वांसाठीं पापक्षालनार्थ बळी देणारा-वर विश्वास ठेवून मुक्ति मिळेल असें समजतो." हिंदुलोकांत मृताच्या बाराव्या तेराव्याला तेलंगी ब्राह्मण जेवायला घालून पुष्कळ दक्षिणा देतात " तर दफनविधीमध्यें पापभक्षण करणारा कोणी तरी बोलावण्याची चाल हरफर्ड-शायरमध्यें होती " ती नुकतीच बंद झाली. कोल, ओरावन आणि भूमन जातीमध्यें पितृपूजा अशी नाहीं; परंतु मृताला अन्न देऊन त्यानें त्यांत संतुष्ट होऊन परत येऊं नये, अशी तजवीज ते करितात. मृतानें परत येऊं नये ह्मणून प्रेत पुरून आल्यावर कांटे पसरण्याची चाल नेपाळमध्यें आहे. " प्रेत घरांतून बाहेर काढलें ह्मणजे एक तापवून लाल केलेला

1. P. 330 Vol I. Osborne's monumental History of Egypt.

2. P. 309 Asiatic studies Religion and Social By A. C. Lyell.

3. The lowest conception seems to be that of providing food or service to the ghost, the highest is of sin offering or mysterious atonement. P. 311 Ibid.

4. Sin eating at a funeral prevailed not long ago in Herfordshire. P. 224 Asiatic Studies By A. C. Lyall.

5. P. 221 People of India By Sir Herbert Risby.

6. Among the Lappo and Finno a red hot stone is thrown after the deported, when the corpse is carried out of the house, as a charm to prevent his return. P. 213 Lectures on the Sciene of Religions By Prof. F. MaxMuller.

दगड त्याच्या मागें फेंकण्याची चाल लापो आणि फिनो लोकांत आहे, ती तरी मृतानें परत न येण्यासाठीं कुइडें आहे. " बाळंतीण मेली तर हाडळ होते; आणि परत येते, ह्या भीतीनें वाटेंत राळे टाकीत परत येण्याची चाल कित्येक ठिकाणीं आहे. कच्छमधील जारेजा लोकांत अशी चाल आहे कीं, मेलेल्या मनुष्याच्या शेजेवर राजगूर ( उपाध्याय, ब्राह्मण ) निजवून त्याची स्मशानयात्रा काढितात; आणि त्याला धोंडे, माती वगैरे मारण्यास सुरवात करितात; त्या मारानें तो त्रासून पळून गेला ह्मणजे मृताचें भूत पळविलें, तें आतां परत येणार नाहीं, व त्रास देणार नाहीं, अशी त्यांची समजूत आहे. कऱ्हाडे ब्राह्मणांत विष घालण्याची चाल मुळाशीं भूताला बळीं देण्याचाच प्रकार आहे असें वाकरसाहेब ह्मणतात,[2] " ख्रिस्ती भक्तांचे[3] कम्यूनियन आमच्या सपिंडीकरणासारखेंच आहे....हा मृताबद्दलच्या प्रार्थनेचा प्रचार बंद झाल्याबद्दल मेकेन्झी साहेब खेद प्रदर्शित करीत आहेत " " ही बंदी कायद्यानें[4] केली तरी अद्याप ही भूतपूजा ख्रिस्ती धर्मांतून समूळ गेली नाहीं, असें स्पेन्सर साहेब ह्मणतात. फ्रेजरसाहेब तर असें लिहितात कीं "ख्रिस्ती[5] धर्माच्या सफेतीचा हात वरून

1. Abbreviated and translated from p. 347 suppression of female infanticide in Kathiawar By Colonel Alexander Walker.

2. P. 360 Footnote. Suppression of female infanticide in Kathiawar By Colonel Alexander Walker.

3. Shraddha has been compared ,to the communion in the Christian Church......The absems of such setvices for the dead and of ancestral commemorations is a real loss in our own religion. P. 242. A manual of Ethics By John S. Mackenzie.

4. In a capitalary 742 Karloman prohibits sacrefices to the deas ( Baluzins 1:148 )......Nor has it been extinguished by modern Christianity P. 812 Principles of Sociology By Herbert Spencer.

5. In Europe beneath a superficial layer of Christianity a faith in magic and witchcraft, in ghosts and goblins has always survived and even flowrished among the weak and ignorant. P. 49 Vol II. The Golden Bough By Fraser.

वरून फिरला असला तरी जादू, मंत्र, चेटूक, भूतखेतें ह्यावरील विश्वास कायमच आहे; आणि अज्ञ व दुर्बल लोकांत त्यांना भर आला आहे." " यहुदी धर्मग्रंथांत कोठें कोठें पिशाचांचा उल्लेख आहे; व त्या पिशाचांचें पूर्वस्वरूप राहतें, अशीहि समजूत त्या ग्रंथांत दिसतें .... परंतु पिशाचें मानूं नयेत, अशी त्या धर्मांत आज्ञा आहे." " मरणोत्तर आत्मा नष्ट होतो, असें जुन्या करारांत आहे, असें लेर्स, शोपेशनहोर इत्यादिक विद्वान ह्मणतात; परंतु तें खोटें आहे " असें प्रो. म्याक्समुल्लर साहेब म्हणतात; परंतु आत्म्याला अमरत्व नाहीं, असें ज्यांत स्पष्ट आहे, अशी कांहीं वाक्यें पुढें दिलीं आहेत. गीतें. ३९-१४ 'मी येथून गेलों ह्मणजे नाहींसा होईन ' जाब ७-८-१० ' जो मला पहातो त्याच्या डोळयाला मी या पुढें दिसणार नाहीं .... जो खालीं शिआलमध्यें जातो तो पुनः वर येणार नाहीं." तथापि ही मृतांचीच पूजा एकतऱ्हेनें उरलेली आहे. " माम्रेच्या मैदानांत ईश्वर अब्रहामला भेटला तेव्हां त्यानें त्याला चपात्या भाजून दिल्या, त्याचाच नमुना हल्लीं स्थंडिलावर चपाती ठेवतात, ती होय. ती वरचेवर ताजी उन्हून ठेवावी लागते." " ख्रिस्तीलोक ( हिंदु ) जपानी पितृपूजेला नांवें ठेवोत; पण ते तरी पितृपूजकच आहेत. येशू ह्मणतो " हे

---

१--पान. २३६ पितृमूलकधर्म-प्रो. म्याक्समुल्लर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

२. पान. २३९ सदर.

3. We have a complete parallel between the cakes which Abraham bakes to refresh the Lord when he comes to visit him in his tent on the plains of Mamre, and the show bread kept on the altar and from time to time replaced by other bread fresh and hot. ( 1. Sam. XXI. 6) P. 93 Ceremonial Institutions By Herbert Spencer.

4. If the Christian objects to ancestor worship it can be said in reply that Christianity is a species of ancestor worship itself. Jesus said " when you pray say ' our Father &c,' the only difference is that the Christian worships the first ancestor, whereas the Japanese reveres all the ancestors. ( Cutting from the Times of India dated 12th June 1912. )

बाप्पा.... " ही प्रार्थना काय दाखविते? जपानी सर्व पितरांची पूजा करितात तर ख्रिस्ती आद्य पित्याचीच तेवढी पूजा करितात. " हा शब्दच्छल झाला तरी फ्रान्समध्यें साधूच्या पुण्यतिथि ( Masses of saints ) चालूच आहेत. चेटुकावर विश्वास अद्याप अमेरिकेंतील बहुजनसमाजाचा आहे, असें बर्कलेनें म्हटलें आहे. " चेटुकावरचा[1] विश्वास सोडणें ह्मणजे बायबलाची रजा घेण्यासारखेंच आहे, हे जान वेसलेचें ह्मणणें चुकीचें नाहीं, आणि पापनिष्कृति ह्मणून जी ख्रिस्तीधर्माची मुख्य मेढ ती ह्याच विश्वासावर अवलंबून आहे. सैतान असा कोणी नाहीं ह्मटला कीं दंड कोठला आणि पापविमोचन पाहिजे कशाला? "

अहुरमझद् ह्याला सर्व कामांत सहाय्य करणारे प्राचीन इराण देशांत फ्रवशी ( पितर ) होते आणि त्यामुळें फ्रवर्दिन[2] जसॅन हा पार्शांचा सण आमच्या इकडच्या सर्वपित्री आमावास्येसारखा आहे. मुक्तावॅळ[3] ( Muktaol ) सण ह्मणजे पटेटी आणि नवरोझ हे मूळचे पितरासाठींच आहेत. भूतपिशाचें घालवून देण्याचा त्यांचा एक विधि दिजेंबर महिन्यांत येतो. " घर बांधतांना[4] वास्तुशांति किंवा विहीर खोदतांना देवताबळी हिंदुलोकांत देतात, त्याप्रमाणेंच स्थानिक पिशाचशांतीचा प्रयोग पार्शांत ही करितात. ह्या पिशांचाइतकी भीति त्यांना दुसरी कशाची वाटत नाहीं. अबन अरदेसर ही त्यांची जलदेवता ( आसरा ) ह्मणण्यास हरकत नाहीं. कोंबड्याच्या आरवण्यानें पिशाच पळून जातें, ही पार्शांची समजूत असल्यामुळें आरवण्या इतका मोठा कोंबडा झाल्यावर तो मारून

1. John Wesley was consistent when he wrote that "Trowing up the belief in witchcraft was in effect giving up the Bible" and it may be added that giving up belief in the devil is practically giving up belief in the atonement—the central doctrine of Christian faith. P. 30 Pioneers of Evolution from Thales to Huxl·y By Edward Clodd

2. P. 216 Gujarath Gazetteer. Population Vol. IX. Pt, II.

3. P. 218 do. do.

4. Translated from p. 205 do.

खाण्यांत येत नाहीं. जैन लोक श्रीमाळी ब्राह्मणांच्याकडून पितरांची श्राद्धें करवितात. ”

शिंटोधर्म ह्मणजे तर बहुतेक पितृपूजाधर्मच आहे. त्यांच्या देवांचे तीन वर्ग आहेत. १ राजघराण्यांतले पूर्वज २ मोठे, प्रसिद्ध लोक ३ प्रत्येक कुटुंबाचे पूर्वज. पहिल्यांचीं देवळें राजगृहांत असतात, दुसऱ्यांचीं प्रत्येक शहरांत सार्वजनिक असतात; आणि तिसऱ्यांची प्रत्येक घरोघरीं ज्यांची त्यांची निरनिराळीं असतात.

पुनर्जन्माच्या विश्वासामुळें भूतावरील विश्वास उत्पन्न होतो, असा कांहीं विद्वानांचा आक्षेप आहे; परंतु जीव किंवा आत्मा अमर आहे, इतकी सुद्धां ज्यांची कल्पना वाढलेली नाहीं, त्या सिलोन बेटांतील वेड्डा लोकांत आणि ब्रेझिलमधील किंवा अमेझान नदीच्या वरच्या भागांतील कांहीं लोकांत ह्या भूतपिशाचांचा गोंधळ आहेच. भूतपिशाचयोनि आहे किंवा नाहीं ह्याचा वाद ह्या निबंधांत येणें शक्य नाहीं, परंतु त्याबद्दल श्रीसमर्थासारख्या विद्वानांनीं ‘ वाजे पाऊल आपलें । मागें म्हणे कोण आलें ॥ ’ अशा प्रकारानें उपहास, केला असला तरी ही समजूत व त्यांची आराधना सर्वत्र आहे सर चार्लस हाबहाऊस ह्यांच्या जवळ हल्लींच्या गव्हर्नर जनरल साहेबांचे आजे लार्ड हार्डिंज ह्यांनीं हिंदुस्थानांत आगबोटीवर ( १८४४ ) गोष्ट सांगितली, त्यांत बेंजामिन हाबहाऊसचें पिशाच दोन मैलावरून येऊन ठरल्याप्रमाणें जेवायला बसून गेलें असें म्हटलें आहे “ ही गोष्ट कोणी खोटी मानूं नये; कारण आजन्मांत मी जाणून बुजून खोटें बोलल्याचें आठवत नाहीं ” अशी लार्ड हार्डिंजनीं ताकीद दिली होती. चिनामध्यें तर आपल्या पूर्वजांच्या कृपेनें यश आलें म्हणून त्या पूर्वजांना पदवीदानाचा विधि होऊन त्याची प्रसिद्धि तिकडील ग्याझिटांत होते. “ अशी कृपा हान-

1. I demand that people shall belive me, for I have never to my knowledge uttered untruth. Cutting from the Times of India dated 24th January 1914.

2. The Gazette of China of May 1878 contains a decree conferring a great title upon dragon spirit of Hon. Tan Hien. P. 14; Asiatic Studies By A. Lyall.

टान हीननें केली म्हणून त्याला पदवी दिल्याबद्दल १८७८ च्या मे महि-न्याच्या चीनच्या ग्याझिटांत एक राजशासन प्रसिद्ध झालें होतें."

मध्वाचार्यापासून दहावे वैष्णव आचार्य वडिराज ह्यांच्या तरविडी मठांत नारायणभूताचा मुखवटा आहे, व त्याची नित्य पूजा होते. साक्रे-तिसाला साहाय्य करणाऱ्या यक्षाप्रमाणेंच हें भूत वडिराजाला सर्वकामीं सहाय्य करीत असें. वायव्यप्रांतांतील हिमालयाच्या भागांत भोलानाथ आणिं बर्हिणी नांवाच्या भुतांचीं आठ देवळें आहेत. आलमोऱ्याचा राजा उदेचंद ह्याचा वडील मुलगा फंदी होऊन निघून गेला होता, तो परत आल्यावर त्याच्या गादीवर बसलेल्या ज्ञानचंद भावानें एका माळ्या-कडून त्याचा व त्याच्या रखेलीचा खून करविला. त्या भुतांचा गांवाला त्रास होऊं लागला, तेव्हां त्यांचीं देवळें बांधलीं गेलीं; हींच भोलानाथ आणि बर्हिणी होत. पश्चिम गारहवाल प्रांतांत म्हसोबा व जोखिणी ( जखीण ) ह्यांची पूजा चालू आहे. दौतीच्या राजाचा मुलगा भावी बंद बैरागी झाला, तो फिरतांना कृष्ण जोशाच्या स्त्रीवर मोहित झाला. तेव्हां त्या जोशानें झपरूरा नांवाच्या लोहाराकडून त्या दोघांस ठार मारविलें; त्यांचीं भूतें बनलीं आणि तीं गंगनाथ नांव घेऊन डोमांचीं देव झालीं. अडोलीं येथें उत्पन्न झालेला हा गंगनाथ पंथ कुमायून प्रांताभर पसरला आणि टकूरिया, लवाई, नराई वगैरे ठिकाणीं गंगनाथाचीं देवळें झालीं. महेंद्र-सिंगानें ही पूजा सालेममध्यें नेली. आपल्या इकडे स्मशानभूमीला मसण-वटा म्हणतात; परंतु कुमायुन भागांत मसण नांवाचाच भूतदेव आहे. कंडरकणवा परगण्यांत कोशी नदीच्या काठीं काकरी घांट येथें, फल डाकोटास आणि दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं मसण देवाचीं देवळें आहेत. ह्या कुमायुन भागांत खालच्या जातींत फार आवडता गोरिल नांवाचा देव आहे, तो पिशाचच आहे. बासरा प्रांतांत चौर, गरुरा, मनारी; उंच कोटप्रांतांत बसोट; मल्ली दोनी प्रांतांत तारखेत; नयानांत मानील; कालीकुमायुनमध्यें गाली चौर; महरमध्यें कुमुर; कुटपुरमध्यें घागर घोल; ह्याठिकाणीं गोरिलचीं देवळें आहेत. स्थानभेदानें त्याला निरनिराळीं नांवें पडलीं तीं, अशीं:-इरिया कोटगोरिल, हयार्क गोरिल, समन,

1. P 347 Footnote. Canara Gazetteer.

गोरिया, गवाल, गोल वगैरे. केवळ त्रास देतात ह्या भीतीनें कांहीं भूतांची पूजा सुरू झाली, त्याप्रमाणेंच कांहीं भूतें रक्षकगणांत शिरलीं, त्यांना क्षेत्रपाळ किंवा भूमिया म्हणतात. ऐरी, साऊ-भाऊ, कलबीशेत, किंवा काळुबा, चाऊमू, हारु असे अनेक देव व त्यांचीं देवळें आहेत. कोंकणांत आणि देशावरील कोंकणीं किंवा डोंगरी भागांत ह्या भूतांचें फार बंड आहे. नाशिक जिल्ह्यांतील पेठ, कळवण, दिंडोरी तालुक्यांत मोखाडा पेटा वगैरे ठिकाणीं हाच प्रकार दिसतो. मुख्य किंवा खऱ्या देवाची कल्पना बरोबर नसल्यामुळें भूतें देव बनतात, असला सिद्धांत करणारांची चूक दाखविण्यासाठीं खालील उतारा दिला आहे; ब्रह्मदेशांतील खियंग लोकांत पिशाचपूजा आहे, त्याचें कारण ते असें सांगतात कीं, "कोणी[2] ऐक मोठा देव आहे खरा; पण तो अदृश्य असतो, त्यानें जग उत्पन्न केलें, आणि त्याचें नियमन तोच करितो; परंतु सर्वप्रकारांनीं तो चांगला असल्यामुळें त्याच्यापासून आम्हाला त्रास होण्याची भीति नाहीं; आणि म्हणूनच त्याची पूजा (किंवा प्रार्थना) करण्याची आवश्यकता नाहीं. पीडा जी कांहीं होते ती ह्या भूतांपासून; तीं झाडावर असतात, ओढ्याच्या कांठीं फिरतात, टेंकड्यावर, डोंगरावर बसतात, घरांत शिरतात–तेव्हां त्यांची अवकृपा होऊं नये, म्हणून त्यांना खोंग दारू द्यावी, त्यांना बळीचें मांस घालावें म्हणजे झालें. त्यांत दोन मुख्य आहेत: १ ऊ–यू–खून आणि २ मोगोंग. इहलोकीं सुख आणि स्वर्गांत प्रवेश करून दे आणि आगा–थीन नांवाच्या पितृलोकीं पोहोंचीव, असें त्यास सांगून उपचार अर्पण करावे." बंगाल्यांतील मिशमी[3] लोकांना दयाळू परमेश्वर कोणी आहे ही कल्पना नाहीं; परंतु कोणी आजारी पडला किंवा कांहीं संकट आलें कीं, तें भूतानें आणलें असेंच त्यांना वाटतें. जो कोणी भूत झाला त्याच्या जातीप्रमाणें भूतांची नांवेंही निरनिराळीं आहेत. महा-

1 Abbreviated and translated from Himalayan Districts of the North Western Provinces By Edward T. Atkins.

2 Translated from P. 262 British Burmah Gazetteer.

3 P. 16 Descriptive Ethnology of Bengal By Edward Truite Dalton.

राच्या भूताला गिरा म्हणतात; इकडचा वेताळ आणि त्याचे भूतगण ह्यांच्यासारखे जर्मनींत हेलक्वीन, फ्रान्सांत वायूशीं लढणारें भूत, स्पेनमध्यें म्हातार सेना, आणि इंग्लंडांत आर्थरची स्वारी म्हणायला हरकत नाहीं. "ट्रेलसाहेब म्हणतात कीं भूतें हा सगळा दृष्टिभ्रमाचा प्रकार आहे. ह्या (वायव्यप्रांतांतील हिमालयाच्या पायथ्याच्या) भागांत अशा आकृति इतर डोंगराळ भागांतल्याप्रमाणें दृष्टीस पडतात; आणि सूर्य अस्ताला जाऊं लागला म्हणजे श्रीनगरच्या समोरच्या कडयावर असा देखावा दिसतो."

देवळांची बांधणी व कारागिरी पाहिली तर थडग्याचा नमुना मूळचा असावा असें दिसतें. स्विटझरलंडमध्यें देऊळ ह्या अर्थी इंग्रजी चपेल (Chapel) शब्दाच्या समानार्थी शाडेल हान्सा (Shadel Hans) असा जो शब्द आहे, त्याचा अर्थ 'अस्थिगृह' असा होतो, आणि त्या ठिकाणीं मृत मित्र आणि नातेवाईक ह्यांच्याबद्दल प्रार्थना करितात. तेथें थडग्याचा प्रचार नाहीं, तेथें देवळेंही नाहींत. इजिप्तमध्यें देवांच्या देवळापेक्षां प्रेतें पुरण्याचे मनोरेच जगाला दिपविणारे झाले. पार्शीलोकांत प्रेतें पुरीत नाहींत आणि जाळीतही नाहींत, त्यामुळें त्यांच्या अग्यारी (अग्निशाला) एखाद्या रहात्या घराच्यापेक्षां निराळ्या नसतात. हिंदुस्थानांतील मुसलमानीं बादशहांनीं बांधलेल्या मशिदीपेक्षां कबरी कितीतरी भव्य आणि सुंदर आहेत! ताजमहालसारखी इमारत जगांत नाहीं; पण ती कबरच ना?

---

1 Vetal and his tr op seem to correspond with the German Hellquins, who in France is called air-fighting spirit, in Spain the old army and in England Arthur's Hunt. Appendix D. Kolhapur Gazetter.

2 Traill says "the optical illusions and shadows seen in various mountainous countries, are also occasionally visible on some mountains in this province. A hill opposite Shrinagar is celebrated for such shadows when the sun goes down the hosizon. P. 833 Himalayan Districts of the N. W. Provinces. By Edward T. Atkins.

3 P 275 Footnote. Brahmanism and Hinduism By Sir Monier Williams.

भूतांमधील कांहीं चांगलीं असतात; सतीचीं थडगीं बहुतेक त्या दुसऱ्या प्रकारांतलीं आहेत. ही सतीची कल्पना युरोपांत नाहीं तरी ज्या स्त्रीनें आपल्या पतीसाठीं कांहीं महत्कृत्य करून, प्राण खर्चीं घातला ती देवताच झाली असावी; असली कल्पना युरिपाइडीसच्या अलसेस्टीस काव्यांत आहे. यावरून येवढेंच ध्यावयाचें कीं, उत्तम पौष्टिक अन्न कोणचें ह्याचा निर्णय वैद्यांनीं करून तो लोकांपुढें मांडला तरी प्रसंग पडेल त्याप्रमाणें ऐपतीप्रमाणें, कांदाभाकरी खाणारे लोक असणारच. दारु पिण्यापासून द्रव्यहानि, शक्ति-ऱ्हास वगैरे अनर्थ होतात; म्हणून चित्रें दाखवून उपदेश करणाऱ्याच्या कंठशोषाला न जुमानता दारूच्या बाटल्या झोंकणारे प्राणी राहणाराच. हाच प्रकार धर्मसमजुतीचा. असल्या भक्तांची श्रद्धा खरी असली तरी ती तामसी[1] होय, ते भूतप्रेतांची पूजा करितात; त्या देवतांना[2] कोंबडीं, बकरीं लागतात; आणि त्यांची पूजा रात्रीं स्मशानांत वगैरे होते, इतकाच शेरा हिंदुधर्मानें मारला आहे.

ज्याप्रमाणें पितरांची, चांगल्या माणसांची मेल्यावर पूजा सुरू झाली, त्यांत त्या पितरांना देवांत जागा मिळाली; पण तसें होणें ख्रिस्तीधर्मांत शक्य नाहीं. "मनुष्य देव[3] होईल ही कल्पना यहुदी लोकांच्या दृष्टीनें नास्तिकपणाची होती. आदाम याला जहोवानें उत्पन्न केलें; परंतु तो ईश्वराचा पुत्र असें फक्त ल्यूकच्या शुभवर्तमानांत म्हटलें आहे; आणि तें तरी अर्वाचीन दिसतें. येशूनें आपणाला देवाचा पुत्र म्हणविलें, यामुळें त्याला मृत्यूची शिक्षा झाली. ग्रीक लोकांत मिनिलास वगैरे ईश्वराचे पुत्र होते; तसे जहोवाला पुत्रच नव्हते. आब्राहाम हा त्याचा मित्र, मोझेस त्याचा सेवक होता. त्यांनाही देवाचें अथवा सामिदेवाचें पद मिळालें

१. प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः । भगवद्गीता ॥ अ. १७ । श्लो. ४ ।

२. जीववधें साधूनि बळी । भूतप्रेत कुळें मेळीं । स्मशानीं संध्याकाळी । पूजिती जे ॥ ज्ञानेश्वरी ॥ १७ ॥ ८० ॥

३. पान.२४१. पितृमूलकधर्म. प्रो. म्याक्समूल्लर यांच्या व्याख्यानाचें रा. शं. बा. दीक्षित यांनीं केलेलें भाषांतर.

नाहीं, मग सामान्य माणसांची काय कथा? ख्रिस्ती धर्मांत येशू देवाचा मुलगा झाला; व तो पुढें त्याच्या बरोबरीचा ठरला, सेंटजान १०-३० वगैरे वाक्यावरून पितापुत्र एक झाले, तरी दुसऱ्या मनुष्याला ही साम्यता, स्वरूपता येणें नाहीं, असें त्या धर्माचें ठरलेलें मत आहे. मुसलमानी धर्मानें हें येशूचें देवपुत्रत्व झुगारून दिलें तरी "देवदूतांची मालिका त्यास कबूल झाली. इराणी आणि यहुदीधर्मांचा हा संस्कार आहे, असें म्हणतात. मुसलमानांचे देवदूत वायुरूप असून त्यांना खायला प्यायला लागत नाहीं, ते ईश्वराच्या सिंहासनाजवळ असतात; आणि मनुष्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवून त्यांच्या बऱ्यावाईट कर्मांची नोंद ठेवितात-जेब्रियल ईश्वराचा मुख्य लाडका दूत, मिकायल यहुद्याचा कैवारी, अझरेल यमदूत, इंद्राफेल पुनरुत्थानाचा मालक. शिवाय जिनी म्हणून पिशाच्यांसारखा वर्ग आहे, तो निराळाच. इबलिस हा सैतान आणि मंकर व नाकू हे थडग्यांत शिरून तेथील व्यवस्था पहातात." देवाच्या खालोखाल ह्या देवदूतांचा सन्मान त्यांच्यांत आहेच. महंमदाची मुलगी फतिमा हिला कंदुरी देतात.

राम, कृष्ण वगैरे वीर शूर पुरुषांची पूजा व देवळें बुद्धाच्या पूर्वी नव्हती, आणि "शैव आणि वैष्णव पंथ इ स. पूर्वी सहाव्या शतकाच्या समाप्तीच्या अगोदर झाले असावेत. त्या नंतर लवकरच शिव व विष्णु यांची विशिष्ट पूजा सुरू झाली असावी ह्याबद्दल कोणी असें म्हणतात कीं

1. The Angeology of the 'Quran is very definite in character. It is a reflexion of Persian ideas, largely coloured from the Talmedic sources. Angels are beings of pure and airial nature, who neither eat nor drink, who minister at the throne of God, watch the conduct of men and record their actions for judgment. Gabriel the Holy spirit God's special messenger, Michael the protector of the Jews; Azrael the angel of death and Idrafael the angel of resurrection. A race of beings called gin or genii also exist. Iblis is the devil. Munker and Naku visit the graves. P. 382 Mahomedanism By the Rev. James Cameron Lees, in the faiths of world.

2. It is possible however that both the Vishnaite and Civaite sects were formed before the end of the sixth century B. C. Not long after this the divinities Shiva and Vishnu receive special honour. P. 281 The religions of India By Edward Washburn Hopkins.

अग्नि, इंद्र आणि मित्र किंवा अग्नि, वरुण आणि मित्र असें त्रिकूट पूर्वी होतें, त्यांतील अद्याक्षरें अ+उ (व)+म् हीं घेऊन उपनिषत्—कालीं एकेश्वरी मताच्या प्रयत्नांत ॐ कार, प्रणव किंवा ब्रह्म असें निर्गुणरूप ईश्वराला देण्यांत आलें. पृथ्वी आकाश आणि स्वर्ग ह्यांच्या देवता अग्नि, वायु आणि मित्र ( सूर्य ) असा प्रकार ऋग्वेदकालानंतर तैतिरीयसंहिता ( ६–६–८–९ ), तैतिरीय आरण्यक ( १–११–१ ) शतपथ ब्राह्मण ( ४–५–४ ) ह्यामध्यें आहे; परंतु पुढें ही तऱ्हा बदलून हल्लीचे त्रिमूर्तीचे तीन देव ब्रह्मदेव, विष्णु आणि शिव झाले. ब्रह्मदेव हा शब्द ऋग्वेदांत नाहीं. प्रजापति असा शब्द येतो पण त्यांत ब्रह्मदेवाची इतर कल्पना नाहीं. विष्णु असें नांव स्पष्ट येतें, पण त्याचा विशेष संबंध सूर्याशीं येतो; आणि रुद्रदेवता ऋग्वेदांत आहे तिचा शंकर, शिव झाला असावा. त्यापैकीं—

ब्रह्मदेवपूजा

ब्रह्मदेवाची पूजा बहुतेक कोठें उरली नाहीं. ब्रह्मदेवानें आपली कन्या सरस्वती हिच्याविषयीं पापवासना धरल्यामुळें तो देवत्वापासून भ्रष्ट पावला, किंवा शिवपार्वतीच्या लग्नसमयीं पार्वतीच्या नखदर्शनानें मोहित झालेल्या ब्रह्मदेवाचें चवथें मस्तक शंकरानें तोडिलें; आणि त्यास पूजेस गर्ह्य ठरविलें; ह्या दोहोंपैकीं एक किंवा दोन्ही कथा खऱ्या असोत किंवा नसोत, ब्रह्मदेव मागें पडला एवढें खरें. कोणी म्हणतात इंद्राचाच ब्रह्मदेव झाला असावा. गंगेच्या कांठीं बिठुर, राजपुतान्यांत पुष्कर, ईडरमध्यें खेडब्रह्मा, बुंदेल खंडांत दुदही आणि मलबारांत कोडक्काल इतक्या ठिकाणीं ब्रह्मदेवाचीं देवळें आहेत. कुंभकोणं[1] येथें ब्रह्मदेवाचें देऊळ आहे. राजपुतान्यांत अंबरला जातांना वाटेवरील दोन देवळें शंकराचीं समजतात, परंतु तेथील मूर्ति चार तोंडाच्या आहेत; म्हणून तीं ब्रह्मदेवाचीं देवळें असावीं, असें मानियर वुइल्यम साहेब[2] म्हणता. "सृष्टि[3] करण्याचें काम पुरें झाल्यावर ब्रह्मदेवानें

1 P. 20 Vol. XVI Imperial Gazetteer of India.

2 P. 186 Footnote Brahmanism and Hinduism.

3 P. 71 Cawnpore Account By F. N. Wright.

बिठुरास अश्वमेधयज्ञ केला, त्याची साक्ष तेथील घाटाच्या पायऱ्यावरील नालाची देतात. त्याची पूजा होते; आणि हिंवाळ्यांत तेथें उत्सवाच्या वेळीं मोठी यात्रा भरते. बदामीच्या नैऋत्येस नऊ मैलावर बेल्लूर येथें जखनाचार्य नारायणाचें देऊळ आहे. तेथील तलावाच्या कांठीं ब्रह्मा, विष्णु आणि महेश अशा तीन मूर्ति आहेत. ब्रह्मदेवाच्या पूजेचें महात्म्य भविष्यपुराणांत सांगितलें आहे. ब्रह्मदेवानेंच वराहाचें रूप घेतलें होतें; असें लिंगपुराणांत ( १-४-५९ ) आहे, तें विष्णूला गौणत्व आणू पहाणाऱ्या शैवभक्तांचें म्हणणें आहे.

"ब्रह्मदेव हा जसा सृष्टिकर्ता म्हणतात तसा ब्यॉबिलोनियन लोकांचा ( जगनिर्माण करणारा ) देव होता. त्यानें विश्वरचना करून सर्व गोष्टीला नियम लावून दिले; परंतु पुढें ( कांहीं अपराधामुळें ) त्याचें शिर तुटून पडलें आणि त्यापासून नवीन पशू बनले. ही कथा ब्रह्मदेवाच्या कथे जवळ जवळ येते.

त्रिमूर्तीपैकीं राहिलेले दोन विष्णु आणि शंकर. ह्यांपैकीं शंकराच्या मूर्ति बहुतेक नाहींतच. पंचायतनांत घरोघरीं बाणाची पूजा होते, त्याप्रमाणेंच शंकराच्या देवळांत लिंगाची पूजा होते. रुद्र देवता ऋग्वेदांत येते त्याचें रूपांतर शंकर झाले, असा तर्क पुष्कळ जणांचा आहे. परंतु

शिवपूजा

ऋग्वेदांत ( १-७-३-८ ) अग्नीला पूर्वेकडील लोकांत शर्व, बाह्लीक लोकांत भव, पशुपति, रुद्र हीं नांवें लाविलीं आहेत. त्याप्रमाणेंच त्र्यंबक हें शंकराचें नांवही ऋग्वेदांत ( ७-५९-१२ ) आढळतें. शंकराच्या अभिषेकांत शतरुद्रीयाचा उपयोग करितात, ते मंत्र सारे यजुर्वेदांतले आहेत. शतपथब्राह्मणांत ( ६-१-३-१० ) अग्नि आणि रुद्र यांचें ऐक्य दाखविलें आहे. तैतिरीय संहिता ( १-४-३६ ) आणि तैरिरीय आरण्यक ( ३-२१ )

---

1 P. 566 Bijapore Gazetteer.

2 Bramhadeo corresponds with the God of Babylonians who reduced the universe to order and lost his head with the blood of which new animalsneer instantly formed. P. 253 Vedic India By Zenaide A. Rogozin.

यांत अग्नीला शिव म्हटलें आहे. आश्वलायन गृह्यसूत्र ( २-२-२; ४-८-९,१९,२९;३२ ) आणि ऐतरेय ब्राह्मण ( ३-१४ ) येथें रुद्राला सृष्टिसंहारकर्ता, हर, मृड, शर्व, शिव, भव, महादेव, उग्र, भीम, पशुपति, शंकर, ईशान वगैरे नांवें लाविलीं आहेत. परंतु लिंगपूजा वेदकाळीं नव्हती, असें वुईल्सनसाहेब म्हणतात. ही पूजा सुरू झाल्यावरचा संबंध दाखविणारी तऱ्हा ऋग्वेदांत ( ८-१-३४ येथें ) असावी आणि ऋग्वेद ( ७-२१-३-५ आणि १०-९९-१ ३ ) येथील शिश्नदेव म्हणजे लिंगी ब्राह्मण असावे, असा कांहीं लोकांचा तर्क आहे. परंतु ( शिश्नेन दीव्यंति असा विग्रह करून ) सायनाचार्य ते लोक विषयलंपट होते, असा अर्थ करितात; त्यांनाच राथसाहेब शेंपूटवाले राक्षस ( tailed demons ) म्हणतात.

भारतकालीं ( ७-२०-६९ ) शिवाच्या हातांत आणि गळ्यांत रुद्राक्ष माला आली. ' रुद्राणां शंकरश्चास्मि ' असा भगवद्गीतेंत ( १०-२३ ) विष्णुशंकर यांचें ऐक्य दाखविण्याचा प्रयत्न आहे पतंजलीनें पूजेसाठीं शिवमूर्ति असल्याबद्दल म्हटलें आहे. शंकर हा ब्राह्मणांचा देव, विष्णु क्षत्रियांचा, ब्रह्मदेव वैश्यांचा आणि गणपति शूद्रांचा अशा अर्थाचा एक श्लोक मनूचा म्हणून आधारास देतात परंतु तो मनुस्मृतींत कोठें आढळत नाहीं, आणि अशी देवांची व जातींची सांगड कशी कोणी घातली हें समजत नाहीं. उलट शंकर हाच शूद्रांचा देव दिसतो पुराणांत दक्षयज्ञाचा विध्वंस शंकरानें करविला, शंकराला पूर्वी हविर्भाग नव्हता वगैरे गोष्टी आहेत, त्यावरून तो ब्राह्मणांचा देव नसावा, ह्याच तर्कास पुष्टि येते. शंकराच्या देवळाचा रक्षक, गुरव वगैरे कोणी तरी ब्राह्मणेतर बहुतेक ठिकाणीं आहे, शंकराची प्रक्षालपूजा गुरवाशिवाय होत नाहीं, शिवालयांत तीर्थ घेत नाहींत, शिवाच्या पुढें ठेविलेलें द्रव्य, तांदूळ, नैवेद्य वगैरे ब्राह्मण घेत नाहींत, ह्या सर्व नियमांचा विचार केला तर तो ब्राह्मणांचा मूळचा देव नसावा असेंच वाटतें.

1 Introduction to translation of ऋग्वेद By H. H. Wilson.

२. विप्राणां दैवतं शंभुः क्षत्रियाणां तु माधवः । वैश्यानां तु भवेद्ब्रह्मा शूद्राणां गणनायकः ॥

" शंकराच्या उपासनेला ऋग्वेदांतील रुद्राचीं सूक्तें वगैरे दाखवा, किंवा दुसऱ्या दंतकथा सांगा, परंतु बंगालच्या खालच्या भागांत जी शिवाची ( लिंगरूपानें ) पूजा हल्लीं होत आहे, ती आर्यलोकांच्या उपासनेच्या स्वरूपाच्या उलट प्रकारची असून कृष्णवर्ण मूळच्या लोकांतील अज्ञानपणाची दर्शक आहे " जणूं काय त्रिमूर्तीची सांखळी जुळविण्यासाठींच विशानी आणि शिव असे लोक तृत्सूंचे मदतीस होते, असा दाखला मिळतो. शिव नांव तुर्गजातीचें असावें असें म्हणतात आणि ते तुर्गलोक फार जुन्या काळीं द्राविडी लोक होते, त्यांना आर्य लोक " नागपुत्र " म्हणत. ह्या तुर्ग लोकांनीं पुढें शिवनांवानेंच नागस्वरूप शिव किंवा सर्पभूषण शिव असा देव काढिला असावा" असें रागोझीनें साहेब म्हणतात, तर त्याच्या उलट बार्थ साहेबानीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, " शिवें हा अनार्य किंवा द्रविडी देव असावा, असें मत वर्म साहेबानीं पुनः काढलें आहे, तें कबूल करतां येत नाहीं. फार झालें तर इतकें म्हणा कीं, पूर्वीच्या मूळ रहिवाशांतल्या देवाची जागा महादेवानें बळकाविली आहे."

---

1 Whatever mythology Shiva or Rudra may originally have belonged to, there can be no dout that Shiva worship as performed in Lower Bengal, is the reverse of the Aryan spirit of devotion and represents the superstition of the black races. P. 127 Thes annals of Rural Bengal By W. W. Hunter.

2. As though to complete the connection, we find in the list of Tritsu allies, the Vishan in bracketed with Shiva, which is thought to be a name of Turga, one of the oldest aboriginal Dravidian peoples. when the Aryans had especially nicknamed " sons of the serpent " and who, under the religions designation of Shiva, were very probably the originators of the worship of Shiva under the form or with the attributes of snake, Pp. 328-29 Vedic India By Zenaide A. Rogozin.

3. The hyp thesis recently revived by Wurm, Geschi chte der Indischen Religio, that Shiva is a non-Aryan deity or to be more precise, a Dravidian, is inadmissible. All we can say is that more than one local Mahadeo has concealed an old aboriginal worship. P. 163 Footnote. The Religions of India By A. Barth.

लिंगपूजा. मूर्तिपूजेचा प्रकार बुद्धापूर्वी आढळत नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या लिंगपूजेचा विचार आहे. "यज्ञयागाचें थोतांड माजून ब्राह्मणांचें वर्चस्व झालेलें (क्षत्रियकुलोत्पन्न) बुद्धाला न खपल्यामुळें त्यानें नवीन धर्माचें बंडच उभारिलें होतें, त्यांत ब्राह्मणजाती वर मोठा कटाक्ष नव्हता, पण यज्ञद्वारें पूजा होत होती, त्यावर हल्ला होता. त्या धर्माचा भूतपिशाचपूजकाशीं संबंध आल्यावर त्याचा इलाज चालेना; आणि त्यामुळें त्याच्या स्वरूपांत विकृति होऊन त्याला हीनावस्था आली, आणि ब्राह्मणीधर्मानें वर डोकें काढतांच त्याच्या भक्षस्थानीं बुद्धधर्म पडला. त्या दोन धर्मांनीं जनमनरंजनासाठीं अज्ञानी लोकांच्या मनाला मोह पाडण्यासारख्या गुप्ताचार, जादूचे प्रयोग, अमानुष्य सामर्थ्य वगैरे गोष्टींचें अवलंबन केलें, आणि ब्राह्मणी धर्मानें बुद्ध धर्मास पोटांत घेऊन गिळून जिरवून टाकिलें. बुद्धांच्या इमारतींची शिवालयें झालीं, बुद्धभिक्षु शंकरोपासक संन्यासी किंवा देवपुजारी बनले; हल्लींच्या पूजाप्रकारांची आणि उपचारांची मीमांसा करूं लागल्यास ते सर्व ह्या दोन्ही धर्माचें भ्रष्टरूप आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं." बुद्धधर्म आटपत नाहीं, आणि लिंगपूजादि संस्कारानें तो विषासारखा कडू झाला आहे, पण तो गिळल्याशिवाय इलाज नाहीं, असें पाहून शुद्धस्वरूप ब्राह्मणी धर्मानें मूर्तिपूजाप्रकारासह तो गिळला, ह्याचेंच रूप शंकरानें विष गिळिलें ही कथा झाली असावी. त्या विषानें शंकराचा

1. Buddism was originally a protest against sacirdotalism, not necessarily against Brahmanical caste, but it too succumbeal to dæmonistic influences and degraded and corrupted, fell an easy prey to its rival Brahmanism. Both sought the popular favour by pandering to the vulger love of mystery, magical mummies, superhuman power and the like and Brahmanism absorbed Budhism rather than destroyed it. The Budhist fanes became shiva temples and the Bhudhist priests became Shiva ascetics and served the Shiva tamples and at the present day the forms and practices in actual use may be traced back as readily to corrupted Budhism as to corrupted Brahmanism. P. 760 The Himalayan Districts of the North Western Provinces By Edwin F. Atkins.

दाह झाला त्याप्रमाणेंच ब्राह्मणी धर्माचें स्वरूप फिरलें पण शंकराला नीलकंठ हें भूषण झालें तसा भक्तिप्रकार वाढला. आतां त्या विषाप्रमाणेंच ही मूर्तिपूजा हिंदुधर्मांतून टाकतां येणें शक्य नाहीं. भूतखेताची पूजा आणि लिंगार्चन बुद्धधर्मानें अगोदरच आपल्यांत घेतलें होतें, ह्याची साक्ष योगाचार्यभूमिशास्त्र नांवाच्या ग्रंथांत आहे. "वसुबंधु वैभाषिक याचा भाऊ आर्यसंग नांवाचा होता, तो पेशावर येथें रहात असे; त्यानें हा ग्रंथ केला आहे, आणि बुद्धांच्या पूजा प्रकारांत भूतांची पूजा आणि शैवाचे आचार[1] वर्णन केले आहेत". अडाणी लोकांमधील देव हे बुद्धाचे भक्त असून ते त्यास सर्वप्रकारचें सहाय्य करितात, त्या देवांच्या शक्ति देवता बुद्धाच्या दासी आहेत, असें म्हणून बुद्धदेवतांच्या कोनाड्यांत[2] ( बुद्धाचें वर्चस्व आणि त्या देवतांचा कमीपणा दाखविण्याच्या हेतूनें ) त्या देवदेवींची स्थापना आर्यसंगानेंच केली. सुवर्णप्रभास, सरोदयंत्र आणि मुख्यत्वेंकरून महाकालतंत्र हे ग्रंथ वाचणारास बुद्धधर्माची शैवमताशीं किति सांगड झाली होती, हें सहज दिसून येईल. शैवमताचा पाशुपत म्हणून जो पोटभेद समजतात, किंवा कापालिक या नांवानें ज्याची निराळी गणना होतें, त्यांना बुद्धाप्रमाणेंच वेद कबूल नाहींत. हीं दोन्ही मतें किंवा पंथ भरभराटींत असतांना बहुजनसमाजाला ग्राह्य झालेलीं असावीं, आणि त्यांनीं वैष्णवपंथाच्या पाडावासाठीं जूट केली असावी. यामुळेंच कापालिकमताचें मुख्य दैवत जो भैरवनाथ त्यालाही सन्मान देणें निदान त्याच्या भक्तांना गोटांत ओढण्यासाठीं त्या नाथाला ब्राह्मणांच्या इतर देवांत स्थल देणें भाग पडलें असावें. याचीं उदाहरणें:- काशींतील शिवालयाचा द्वारपाळ भैरव आहे, आलमोराच्या पलीकडील जगेश्वराच्या द्वारापाशीं क्षेत्रपाळ उभा आहे, बद्रिनाथाच्या दारापाशीं घंटाकर्ण आहे, केदारनाथीं भैरव आणि तुंगनाथीं कुलभैरव हे सर्व शंकराचे द्वारपाळ बनविले आहेत. केदार येथील ज्योतिर्लिंगाचा इतिहास पाहिला तर असें दिसून येईल कीं, बुद्ध आणि ब्राह्मण ह्यांच्या भांडाभाडीचा फायदा घेऊन शैवमत पुढें सरसावलें आणि लोकांच्या आवडीसारखें रूप

1. Translated from P. 754 Ibid.
2. Abridged and translated from ph, 754, 759 and 764 Ibid.

धारण करून त्यानें आपलें वर्चस्व स्थापन केलें असावें. स्टिव्हेनसन साहेब म्हणतात कीं, केदार हेंच शिवाचें मूळचें नांव आहे. केदार शब्द संस्कृत नाहीं.

शंकराचीं देवळें बहुतेक ठिकाणीं आहेत; परंतु त्यापैकीं बारा ज्योतिर्लिंगें फार पवित्र म्हणून त्यांचे श्लोक कित्येकांच्या नित्य पाठांत आहेत; ह्या बारा लिंगाची उपलब्ध माहिती अशी आहे:—(१) सोरटी सोमनाथ गुजराथेंत आहे, परंतु तेथील पहिलें लिंग महंमूद गिजनवी यानें फोडिलें आहे. (२) मोगलाईत कडप्पा प्रांतांत मल्लिकार्जुन आहे. तिकडची वाट केवळ जंगलांतून असल्यामुळें महाशिवरात्रीशिवाय त्याच्या दर्शनास जाऊं देत नाहींत. (३) महाकाल हल्लीं उज्जयिनीस दाखवितात; परंतु येथील मूळलिंग अलतमश बादशहानें १२३१ मध्यें दिल्लीस नेऊन फोडविलें. (४) ओंकारमांधाता नर्मदाकाठीं आणि अमरेश्वर उज्जनीजवळच्या टेंकडीवर अशीं हीं दोन लिंगें असावीं- असें वुईल्सन साहेब म्हणतात. (५) परळी वैजनाथ—हा विद्यानाथ समजून किंवा तसा पाठ घेऊन बंगाल्यांत देवगडास आहे, असें वुईल्सनसाहेब म्हणतात तें बरोबर नाहीं. ६) भीमशंकर राजमहेंद्री तालुक्यांतील द्राचलं तोच भीमशंकर अशी टीप वुईल्सन साहेब देतात (७) दक्षिणेस रामेश्वर प्रसिद्धच आहे. (८) नागेशाबद्दल गौतमेश असा पाठ घेऊन त्याची माहिती मिळत नाहीं, असें वुईल्सन साहेब म्हणतात. (९) काशीचा विश्वेश्वर प्रसिद्धच आहे. तेथील पहिलें लिंग औरंगजेबानें फोडिलें, तेव्हां विश्वेश्वरानीं मणिकर्णिका घाटावर गंगेंत उडी घेतली; म्हणून अभिषेक वगैरे गंगेवरच होतात. (१०) गौतमीबद्दल गोमती पाठ घेतल्यामुळें

1. Vide p. 739 The Himalayan Districts of the North Western Provinces By E. T. Atkins.

२. सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनं । उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरं । परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरं ॥ सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने । वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ॥ हिमालये तु केदारं घृष्णेशं तु शिवालये । एतानि ज्योतिर्लिंगानि.

नाशीक जवळचा त्र्यंबकेश्वर वुईल्सन साहेबांच्या लक्षांत आला नसेल. ( ११ ) गंगोत्रीकडील बद्री केदार प्रसिद्धच आहे. ( १२ ) घृष्णेश हा वुईल्सन साहेबांच्या टीपेंत नाहींच; ( ४ ) येथील दोन लिंगें केल्यामुळें बाराची भरती झाली असावी. वेरुळ लेण्याच्या खालच्या अंगास हा घृष्णेश्वर आहे.

उत्तर हिंदुस्तानांत आणि दक्षिणेकडे शिवालयांचा भरणा फार आहे. म्हणून महाराष्ट्रांत शिवालयें नाहींत असें नव्हें, पण जीं आहेत तीं विशेष प्रसिद्ध नाहींत, आणि त्यांतही जुनीं म्हणजे ७।८ शतकापूर्वींचीं तर नाहींतच. हेमाडपंती देवळांसंबंधानें तीं फार जुनीं असावीं असा पुष्कळांचा गैरसमज आहे, परंतु हेमाडपंतच बाराव्या शतकांतले आहेत. "[1] पिशाचपूजा आणि ग्रामदेवतांची भक्ति ह्यांच्याप्रमाणेंच शिवभक्तीचें महात्म्य मूळरहिवाशांच्या संख्येच्या प्रमाणावर अवलंबून असलेलें पाहिलें म्हणजे चमत्कार वाटल्यावांचून रहात नाहीं" "बरभूम[2] भागांतील पिशाचपूजा आणि बहार प्रांतांतील मलीक बाया वगैरे देवत्व पावलेल्या लोकांसाठीं होणारें बलिदान, ह्याचेंच जरा सौम्यरूप शिवपूजा आहे." ह्यांच्यामध्यें एक पायरी बुद्धधर्माची होऊन ती पडून गेली असावी असें ओरडून सांगणारे बीरभूमच्या डोंगरी भागांत पुष्कळ इमारतींचे अवशेष आहेत. औधप्रांतांतील गोल[3] येथील महादेवाची पिंडी हा बुद्धाच्या स्तूपाचा एखादा दगड असावा असें वाटतें, त्या देवळाच्या कमानींत, कोनाड्यांत अद्यापही बुद्धाचे अवशेष सांपडतात. हिंदुस्थानच्या दक्षिण भागांत बौद्ध आणि शैव ह्यांचा असाच मिलाफ झालेला असावा, असें साईक[4] साहेब म्हणतात.

---

1. It is curious to notice that Shiva worship like demon worship and the adoration of village gods has a hold on the people always in proportion to the strength of the original element. P. 132. The anuals of rural Bengal By W. W. Hunter.

2. From the ghost worship in Burleboom jungle and the sacrifices to Malik Baya and similar deified personages in Bihar, the worship of Shiva is only a step. P. 138 Ibid.

3. P. A Gazetteer of the Provinces of Oudh.

4. Vide Major dyke's Report on the Land Tenures of the Deccn

" बुद्धाच्या स्मारकासाठीं त्याची मूर्ति असलेलीं देवळें वगैरे हिंदूंनीं पूजेस घेतलीं; आणि अशोकानें आपलें अनुशासन कोरून उभारलेले स्तंभाचींच लिंगें झालीं " ह्यांत विशेष नवल नाहीं, असें सगळीकडेच होतें. युरोपांत खिस्तीधर्मानें हेंच केलें " बिशप न्यूटन म्हणतो कीं, ज्युपिटर आणि त्याच्यासारखेच जे इतर तुच्छ देव होते त्यांचीं देवळें व त्यांच्या मूर्ति ह्यांचींच कुमारी मेरीचीं आणि इतर साधु पुरुषांचीं देवळें झालीं ....सारांश, विधर्मी लोकांच्या सर्व कांहीं पूज्य वस्तूंचा उपयोग पोपसाहेबांच्या व त्यांच्या मताचा थाटमाट वाढविण्यासाठींच झाला."

नेपाळमधील बुद्धधर्मी लोकांत लिंगपूजा आहे. परंतु त्याची उपपत्ति निराळी लावितात. आदीबुद्ध कमलामधून ज्योतिरूपानें प्रगट झाला, त्याचें दर्शक ही लिंगपूजा आहे असें म्हणतात. तिबेटमध्यें वज्रयंत्र याणीं ह्याचें मोठें महत्त्व जादुगारामध्यें आहे, तो अवलोकितेश्वर ( नामरूपा ) बुद्धाचा अवतार मानितात. जादुगार आणि मांत्रिक लोक ज्या आकृति काढि- तात, त्यांत अग्निनाथ, अवलोकितेश्वर यांचीं नांवें प्रधान असतात; ह्यावरून बुद्धधर्माचा आणि वीरमांत्रिकांचा व शैवांचा किती निकटसंबंध आणि गुंतागुंत झाली होती, हें समजणार आहे.

सारांश, " ही लिंगपूजा कशी प्रारंभास आली, ह्याचा पत्ता लागत नाहीं. क्रीझरसाहेब म्हणतात कीं त्रिमूर्तीची पूजा जेव्हां सुरू झाली;

1. Many figured monuments of Buddha have now become Hindu fetishe; and the pillars erected long ago by Ashok to keep alive the memory of his edicts, are now transferred into Lings. A. Cunningham, Archæological survey. i. 67, 74.

2. Bishop Newton says:—" the very some temples, the very same images which were once consecrated to Jupitor and the other demons, are now consecrated to Virgin Mary and the other saints ...... In short almost the whole of pagainsim is convested and applied to popery. P. 57. The History of the conflict between religion and science By J. W. Draper.

3. The origin of the worship of the Ling is hid in obscurity. Cruzer represented it as, next to that of Trinity, the most ancient religious form of India, and it may be in point of fact that, like the

तेव्हांपासून ती असावी, परंतु एवढें मात्र सांगता येईल; इतर वस्तूंचें पूजन सुरू झालें, त्यांच्याबरोबरच ती पहिल्यापासूनच असावी. इतकी जरी पुरातनकालची ती ठरली; तरी वेदकालीं तिचा प्रचार नव्हता एवढें खरें. त्या वेळीं जरी लिंगाच्या कल्पना व तसले शब्द, मंत्र, होते तरी लिंगाची पूजा नव्हती. द्राविडी लोकांतून ही पूजा घेतली, असें म्हणणारांचें खंडण एफ्. किटेलसाहेबांनीं केलें आहे." येथें एवढी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, लिंग शब्दाच्या उच्चाराबरोबर ज्या अभद्र विचारांची प्रतिमा मनांत येण्याचा संभव आहे, तसला प्रकार शिवदर्शनाचे वेळीं तेथील पिंडी पाहून कधींही उत्पन्न होत नाहीं. "शंकरांची शाळुंका व तिच्यांतील बाण मिळून जें चिन्ह शिवालयांत असतें, ती मूर्ति नव्हे; इतर ठिकाणीं जसला प्रकार आढळतो तसला म्हणजे इटली, ग्रीस वगैरे देशांत पूर्वीं ज्या लिंगाची अथवा त्या अवयवाची पूजा होई तो वेडाचार हिंदुस्थानांत नाहीं." बायबलचा जजेस ( III. 7 ) हा भाग लिहिला तेव्हां लिंगपूजा असावी.

दाबिस्तानमध्यें ( २ ७ ) महंमदीस्थंडिलाची योजना शिवपंथपर कशी लाविली आहे, ती मनन करण्या योग्य आहे. "मशिदीमध्यें मक्केच्या बाजूची म्हणजे पश्चिमेकडची जी भिंत असते, तिला मधोमध एक मेह-

popular practices of fetichisow, it goes back to the most remote period But it certainly did not penetrate into the great religions of the Vider where there are many phallic ideas and rites lent no worship of the phallus, the origin has been sought for among the Dravidians but refuted by F. Kittel Nelurder Niepring Ling a Kultus iu Indience. p. 46. From quotation By A. Barth in the Religions of India.

1. The appearance they ( Shiva Lings ) are pure symbo's, in no respect images, as we meet with elsewhere; in Itals Gocecian antiquity for instance. P. 262. The religions of India By A. Both.

2. The (arched ) niche and the minaret date so late as the date of Al Walid, the sixth Umaiyad ( 705-715 ) Sir Richard Bartin ( Arbian Nights I. 166-167 ) thinks the niche to be the symbal of Venus and the minaret the symbal of Priapus or the Hindu Ling and Yoni. P. 131 Footnote. Gujarat Gazettur.

राब ( कमान ) असते; ती आणि बाहेरील शिखर ह्या गोष्टी अलवलीद ( ७०५–७१५ ) ह्याच्या वेळेपासून आहेत सर रिचर्ड बर्टिन म्हणतात कीं ही मेहराब शुक्र देवतेचें चिन्ह आणि शिखर तें प्रायपस ( उपस्थ ) दर्शक होय, म्हणजे योनि आणि लिंग मिळून जो हिंदूचा देव त्याचाच प्रकार आहे. " सुंता केल्याशिवाय म्हणजे उपस्थेंद्रियाची शुद्धि केल्याशिवाय मनुष्य देवदर्शनास लायक होत नाहीं, हा नियम तरी लिंगपूजेचाच दर्शक होय.[1]

" डॉक्टर उटे साहेबांच्या ग्रंथावर टीपा देतांना बिशप कोलेन्सो म्हणतात, कीं अशेरा ( मूळधातू अशर म्हणजे सरळ, ताठ होणें, ताठणें उठविणें ) ही देवता हिंदूंच्या लिंगासारखीच होती, ह्यांत शंका नाहीं. डयुटेरानमध्यें ज्या मूर्तींच्या पूजेची बंदी केली आहे, ती हीच होय. यहुदी लोक ब्याबिलोनमध्यें अडकून पडेपर्यंत त्यांच्यांत फार पूर्वींपासून एक प्रकारची लिंगपूजा होती, हें उघड आहे.[2] सेंटऑगस्टिन ( L. 7. C 21 de civitate Dei ) म्हणतो कीं बाकस ( Bacchus ) देवाची मिरवणूक काढीत तेव्हां पूजा प्रायपसची होई म्हणजे त्या मूर्तींच्या उपस्थाला बायका माळा घालीत. गोंव्यांतील लोक ह्या प्रायपस देवाकडे आपल्या बायका पाठवितात आणि त्याच्या आलिंगनानें स्त्रियांच्या प्रथम संभोगांतील दोष जातो, अशी त्यांची समजूत आहे.[3] ह्या प्रायपसचे जागींच यहुदी लोकांचा बालफेगर ( Baalphegor ) आला. प्राफेट होफियाच्या लेखावरील टीकेंत जेरोम म्हणतो कीं, ह्या बालफेगरची भक्ति यहुदी बायकांमध्येंच फार असे.

1. P. 32 Bible studies By J. M. Wheeler.

2- Bishop Colenso in his notes to Dr. Oort's work remarks . " It seems plain that the Aschera ( from as her-to be straight, to erect ) was in reality a phallus like the Ling of the Hindoos. " These images. are alluded tend prohibited in Deut. IV. 16 It is thus evident that some form of phallic worship lasted among the Jews from the earliest times until their captivity in Babylon ph. 9-11 Bible studies By J. M. Wheeler

3. P. 831 A description of East India coast of Malabar and Coro mandel By Philip Baldæus

शंकराला त्रिनेत्र, त्र्यंबक अशी संज्ञा आहे, त्याचा अर्थ तीन डोळे असलेला असा करितात. तसा तिसरा डोळा असलेला झ्यूस ( Zeus ) देवाचा एक पुतळा सांपडला आहे, त्याच्याही कपाळावरच तिसरा डोळा आहे; हा पुतळा ट्रायच्या लढाईच्या वेळचा आहे. ( Zeus ) झ्यूस ह्याचें मूळ नांव ( Zv ) झेव-शेव--शिव असें असावें. असें कोणी म्हणतात. ह्युईटसाहेब ह्या शब्दाचा विग्रह तीन अंबा म्हणजे स्त्रिया आहेत ज्याला असा करितात; आणि गोंड लोकांतील त्रिशूळाकृति फारसीपेन देवाशीं साम्य दाखवितात. शतपथ ब्राह्मणांत त्र्यंबक ह्याचा विग्रह स्त्रीसह असणारा, अर्धांगी पार्वती असलेला असा केला आहे.

शंकराची स्त्री म्हणूनच देवीची उपासना प्रथम सुरू झाली असावी. ईश ( शंकर ) आणि ईशी ( पार्वती ) हेंच दंपत्य ईजिप्सियन लोकांच्या ऑसिरस आणि ईसिस ( Osiris and Isis ) सारखें समजतात. शंकराचार्यांनीं शिवोऽहं हे योगमार्गास सहाय्यभूत आणि अद्वैत सिद्धांतास समर्थक असें शिवपूजन वाढविलें, तरी खुद्द शृंगेरी पीठांत अंबिकेच्या पूजेसच जास्त महत्त्व आहे. लिंगपूजेबरोबर योनिपूजा किंवा भगपूजा प्रचारांत येऊन वाममार्गी शाक्त देवीच्या उपासनेच्या छत्राखालीं नांदूं लागले. ही देवीपूजा कशी प्रथम आली, ह्याचा निर्णय होत नाहीं, तथापि ती बंगालप्रांतांत फार असल्यामुळें तिचा उगम तिकडेच पूर्वेकडील देशांत झाला असावा; असें समजण्यास हरकत नाहीं. " ह्या शैवांचें तांत्रिक आणि शाक्त असें जें विकृतरूप झालें, त्याचा

1. Vide p. 255 Works of Sir William Jones.

2. Triambak is Rudra with three wives and corresponds to the Gond God Pharsi Pen -who as the male God the shaft of the trident has three wives, the famale bamboo, Manko Rayetal and Jongs Rayetal P. 196 The Ruling runs of prehistoric times By J. F- *Hewitt*.

3. P. 259 Works of Sir William Jones.

4 Wilson in his preface to the Vishnu Puran observes: It is a singular as yet uninvestigated circumstance that Assam or at least the North East of Bengal ( i. e. kamarupa ) seems to have been in a great degree the source from which the Tantric and Shakta corruptions of religion proceded.

उगम बऱ्याच अंशानें आसामांत किंवा बंगालच्या ईशान्येस ( कामरूप प्रदेशांत ) झाला असावा, ही गोष्ट चमत्कारिक आहे; पण त्याचा चांगला शोध कोणी लावला नाहीं. " तिबेटच्या पूर्व भागांत वानपो ( Banp , ) नांवाच्या धर्माचे मोठमोठे मठ आहेत. त्यांच्यांतील देवतांचीं चित्रें हाग्सन साहेबांनीं दिलीं आहेत, तीं चित्रें व यंत्रें कालीभक्ताच्या पंथांतल्यासारखीं आहेत हिमालयाच्या पायथ्याच्या भागांत ह्या वानपो धर्माचे मठ नाहींत; परंतु ह्या भागांत भूतपिशाचें काढणारे मुरमुरी ( Murmuries ) आणि सनवार ( Sunwars ) ह्मणून जे लोक आहेत, त्यांच्या मंत्रांत ह्या धर्माचें नांव येतें, ह्या बानपो-धर्मांतील कांहीं आचार दक्षिण हिंदुस्थानांतील भट ब्राह्मणांत आणि सीलोन, ब्रह्मदेश श्याम आणि जावा येथील बुद्धधर्मी लोकांत अद्याप चालू आहेत. मूळ नांवाच्या फ्रेंच शोधकानें त्या धर्माच्या आचारांतील एक अवतरण दिलें आहे, त्यावरून हाबान धर्म ( ह्यालाच फ्रेंच मिशनरी प्यून-बो ह्मणतात तो ) आणि शाक्तपंथ ह्यांचा उगम एकाच ठिकाणा-पासून झाला असावा.

देवीपूजा.

उमा हें नांव तलवकार किंवा केन उपनिषदांत ( ३–११.१२; ४–१.२ येथे ) येतें, तेथे तिला उमा हैमवती म्हणजे हिमालयाची मुलगी असे म्हटलें आहे. दुर्गा हें नांव ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळाच्या १२७ व्या सूक्तापुढें जें खिल आहे त्यांत येतें, तेथें दुर्गेची ३स्तुति आहे. अग्नीच्या सप्त जिह्वा म्हणून ज्या मुण्डकोपनिषदांत सांगितल्या आहेत,

1. P. 764 The Himalayan Districts of the North Western Provinces By Edwin Tuite Atkins.

2. P. 766 Ibid.

३ स्तोष्यामि प्रयतो देवीं शरण्यां बह्वृचप्रियां । सहस्रसंमितां दुर्गां जातवेदसे सुनवाम सोमम् ॥ ५ ॥

४ काली कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधूम्रवर्णा । स्फुलिंगिनी विश्वरूपा च देवी लेलायमाना इति सप्त जिव्हाः ॥ मुण्डक ॥ १ ॥ २ ॥ ४ ॥

तींच नांवें व त्याच अर्थाचीं देवीचीं नांवें आलीं आहेत. तैत्तिरीय आरण्यकांतही देवीची दुर्गेची प्रार्थना आहे. महाभारतांत युद्धांत विजय दे, म्हणून अर्जुनानें कालीची प्रार्थना केली आहे. "ह्या दुर्गेची पूजा अनार्य आहे; आणि ती विंध्यपर्वताच्या बाजूनें बंगाल्यांत आली, असें मुझुमदारानीं म्हटलें आहे." बंगाल्यांतील तीन चतुर्थांश लोक काली व दुर्गा ह्यांचे भक्त आहेत. नवरात्राची पूजा सगळीकडे आहे; परंतु पंजाब आणि उत्तरबंगालमध्यें ती घरोघर आहे. "तिबेटांतही पूजा आहे, आणि ल्हासा येथें श्रीदेवीचें देऊळ आहे."

ह्या देवीच्या देवळांत मात्र अनेक पशूंचे बळी पडतात, आणि मांसाहार, अनाचार, सुरापान ह्या गोष्टी हिच्या भक्तांत विशेष आहेत. कोल्हापुर वगैरे ठिकाणीं देवींचीं देवळें आहेत, तेथें उत्तरेकडच्या प्रमाणें देवीचें भयंकर रूप नाहीं. "दाबिस्तानमध्यें सांगितलें आहे कीं, दुर्गेची सोन्याची मूर्ति होती, तिला मनुष्यबळी देत असत. अजूनही कोहिस्तान आणि नंद-

१ तां अग्नि वर्णां तपसा ज्वलंतीं वैरोचनीं कर्मफलेषु जुष्टां । दुर्गां देवीं शरणमहं प्रपद्ये सुतरसि तरसे नमः ॥

2. A short article by Mr. M. B. C. Muzumdar on the origin and history of Durga purporting to show that the goddess was of non-Aryan origin and that her worship was introduced into Bengal from the Vindhya mountains appeared in the Journal of the R A. Society for April 1906.

3. Rai Sarat Chunder Das Sen Bahadur in a lecture on Tibet delivered in April 1904 at Calacutta, mentioned that the goddess Kali was worshipped by the Tibetans and that there is a temple at Lhassa dedicated to that goddess under the name of Shridevi. P. 25 Footnote The Brahmins, the theists and Mosbims of India By John Camplull Oman.

4. After mentioning a gold idol of Durga ( to whom men were sacrificed yearly ) the authors adds "even now they sacrifice in every village of Kohistan, of Nandapur and the country adjacent, a man of good family." P. 490 Footnote. The religions of India By Edward Wadeburn Hopkins.

पूरच्या प्रत्येक गावांत असें बलिदान होत असतें." पेलेनीसच्या आर्टे-मिसची आकृति अशीच भयंकर असे, कोणी तर ह्मणतात कीं अरटेमिस हीच काली; आणि तिची पूजा एशिया मायनरच्या मार्गानें ग्रीस आणि रोमपर्यंत येऊन थडकली होती" जैनांच्या देवळांत भैरव आणि भैरविणी यांची पूजा आहेच. सरस्वती आणि देवी ह्यांची आराधना ते करितात, कार्ले येथील लेण्याच्या बाहेर एकविरा देवी आहे, ती द्राविडी लोकांच्या अक्कवेयरपासून घेतली असावी, असा तर्क आहे. ह्या शक्तीच्या उपासने पासून तांत्रिक प्रकार निघाला आणि त्यांतील यंत्रांचें वगैरे अनुकरण पुष्कळ धर्मांत होत आहे फ्रीमेझन ( Free Mazon ) पंथांत वगैरे असला प्रकार फार आहे; परंतु ह्यांत गोपन कारभार फार असल्यामुळें त्या गोष्टी बाहेर येणें शक्य नाहीं.

त्रिमुर्तीपैकीं विष्णु हें नांव ऋग्वेदांत येतें. तथापि सूर्याचींच पुष्कळ विशेषणें त्याला लाविलीं आहेत. स्वतंत्र विष्णूला अशीं फार थोडीं सूक्तें आहेत, आणि त्याच्या त्रिपद आक्रमण करण्याच्या गोष्टीचेंच महत्व ठिकठिकाणीं गाईलें आहे. विष्णुसूक्तांत ( ऋग्वेद III-1-1-9 ) सूर्याचा उदय, माथ्यावर येणें आणि मावळणें हीं विष्णूचीं तीन पाउलें असें ह्मटलें आहे, ह्यावरूनच पुढें वामन अवताराची, तीन पावलें भूमि मागून बळीचें राज्य घेऊन इंद्राला दिल्याची कथा विस्तार पावली असावी. सामवेदांतील ( २-१०-२४ ) यतो विष्णुर्विचक्रमे पृथिव्या अधिसानवी। हें वाक्य त्रिपदाच्या कथेचेंच द्योतक आहे. शतपथ ब्राह्मणांत ( १.२-५-१७ ) हीच त्रिपदाची गोष्ट आहे. 'वि+स्नु' ह्या धातुवरून ( पृथ्वीच्या ) पाठीवरून जाणारा हें विशेषण प्रथम सूर्याला लावीत होते, तेंच विष्णूचें स्वरूप होऊन बसलें. परंतु तो

विष्णू पूजा.

1. It is true that terrible forms like that of Artemis of Pellene were not unknown, but some my mythologists find the same Artemis to be no other them Kali herself and believe or imagine, they can trace the dread goddess of Bengal through Asia Minor and Greece to Imperial Rome ph. 165-172. The Gnostics and the remains By C. W. King. Quoted at p. 12. Brahmis and C. By J. C. Oman.

श्रेष्ठ देव होता ही कल्पना ऋग्वेदकाळीं नव्हती. ऋग्वेदांत ( ६-६९ ७-९९ ) विष्णु आणि इंद्र हे जगाचे अधिपति ह्मटले आहेत; परंतु ( ४-१८ ११; ८-८९-१२ येथें ) विष्णूवर इंद्राची सत्ता चालते असा अर्थ निघतो. वामन अवतार तरी इंद्राचा धाकटा भाऊच आहे. ऋग्वेदांत ( २-१-३ ) विष्णु आणि अग्नि एकरूपच आहेत; असें वर्णन आहे. गृह्यसूत्रांत ( ७-६९-१०; ६-६९ ) विश्वामित्रकुळांत विष्णूची प्रतिष्ठा नाहीं, इंद्राचा मित्र ह्मणून तो कण्वकुळाला फार प्रिय झाला होता, असें ह्मटलें आहे सारांश " ऋग्वेद ' आणि ब्राह्मण वगैरे ह्यांतील विष्णु हा देवांपैकीं हा एक देव आहे, असें आहे तरी त्याला श्रेष्ठता आलेली नाहीं.निरुक्तामध्यें त्रिमूर्तीचे देव मानले आहेत;पण त्यांमध्यें विष्णु नाहीं. "

विष्णूचे अवतार अनेक व तितक्यांच्या मूर्ती आणि देवळें हा प्रकार झालेला आहे प्रथम ( मत्स्यपुराणांत ) विष्णूचे सात अवतार, नंतर दहा आणि पुढें ( भागवतांत ) बावीस अशी संख्या आहे. भक्तांच्या संकट-काळीं अनेक अवतार विष्णूनें घेतले ते निराळेच. प्रसिद्ध अवतार दहा-पैकीं मत्स्य, कूर्म, वराह हे प्राणीवर्गांतले पशूंपैकीं आहेत; पण त्यांची निराळी ह्मणजे विष्णुरूपानें पूजा कोठें नाहीं. चवथा अवतार नृसिंहाचा-ह्याच्या मूर्ती व देवळें आहेत, त्याचा जन्मोत्सव वैशाख शुद्ध चतुर्दशीस होतो. वामनअवताराची पूजा फारशी कोठें नाहीं विष्णुकांचीस वामन अवताराचें चित्र भिंतीवर खोदलेलें आहे पण तें यात्रेकरूस दाखविण्या पलीकडे दुसऱ्या उपयोगाचें नसावें. दहांपैकीं वामन आणि परशुराम हे दोनच अवतार ब्राह्मणांत झाले परशुरामाचीं देवळें आहेत, परंतु त्या देवळांचे मालक किंवा उपासक कऱ्हाडे ब्राह्मण फार आहेत. राम आणि कृष्ण हे पूर्ण अवतार समजतात, आणि ते क्षत्रिय कुळांत झाले, तरी ब्राह्मणही त्यांचे उपासक बनले बुद्धाला जरी नववा अवतार मानला

1. Vishnu is regarded in Rigweda and Brahman only as one of the Gods and not as superior to the rest Nirukta ( VII-5 ) regarded the deities represented by the Trimurti but Vishnu is not one of them P. 131, Vol IV. Sanskrit Texts By J. Muir.

तरी त्याच्या मूर्तींची पूजा हिंदु लोक करीत नाहींत; कलंकी अवतार अद्याप व्हावयाचा ह्मणून कीं काय त्याची पूजा नाहीं.

वैष्णव पंथ केव्हांपासून होता, रामाची भक्ति आणि कृष्णभक्ति ह्यांपैकीं अगोदर कोणची सुरू झाली वगैरे विषय सांगूं लागल्यास निबंधाची मर्यादा उल्लंघन होईलच, आणि प्रस्तुत विषयाशीं त्यांचा निकट संबंधही नाहीं. परंतु "असीरिया मधून ह्या वैष्णव पंथांतल्या पुष्कळ गोष्टी आल्या असाव्या. गरुड हा तर असीरियांतील कोरीव मूर्तीत पुष्कळ परिचयाचा आहे. मत्स्यावतार तर असीरियांतला मत्स्यदेव; नरसिंहाचा प्रचार हिंदुस्थानातल्यासारखा तिकडे नाहीं, आणि इतर मूर्ति जरी तिकडे ओळखण्यासारख्या आढळल्या नाहींत तरी पश्चिमेकडेच ह्याचें मूळ असावें, निदान बळी ह्या नांवावरून तरी तसा पक्का संशय येतो." हे फर्ग्यूसन साहेबांचे तर्क आहेत, परंतु कृष्णाचें नांव छांदोग्य उपनिषदांत आहे, तेथें त्यास देवकीचा मुलगा असें ह्मटलें आहे, आणि भारतकालाच्या निर्णयावरून फर्ग्यूसनसाहेबाच्या अनुमानाचें खंडण होण्यासारखें आहे; परंतु हा विषय येथें अप्रस्तुत आहे.

ह्या शैव आणि वैष्णव पंथाचा तंटा दक्षिणेंत फार झाला व अद्यापही आहे, त्यामुळें त्यांच्या एकीकरणाचे प्रयत्न तिकडे होऊन कुडलूर येथें गुहासुराला मारण्यासाठीं हरिहराचा संयुक्त अवतार झाला, त्याची मूर्ति

1. Mr. Fergusson speculates as follows:—Recent discoveries in Assyria seem to point to that country as the origin of much that we find underlying the local colouring of the Vaishnav faith. Garud seems dentical with the figure now as familiar to us in Assyrian sculpturne, probably representing Ohmazd. The fish god of the Assyrians, Dagon, prefigures Matsyavatar. Narashinha is not more familiar to us in Assyria than in India and tradition generally points to the West for the figures scarcely so easily recognized, more especially Bali, whose name alone is an index to his origin. Ind. Arch. 324.

२. तद्धैतद् घोर आङ्गिरसः कृष्णाय देवकीपुत्रायोक्त्वो वाचाऽपिपास एव स बभूव ॥ छांदोग्य उपनिषद् ॥ प्रपा ३ खण्ड १७ वाक्य ६॥

हरिहरक्षेत्रीं आहे. कानडा जिल्ह्यांतील शंकरनारायणाची[1] मूर्ति असल्याच एकीकरणाचें फळ आहे. उपासनाभिमानानें कृष्णालाच त्रिमूर्ति म्हटलें किंवा नृसिंहतापिनी उपनिषदांत नरहरीला तेंच स्थान दिलें असलें तरी विद्यानगर[2] ( विजयानगर ) येथील राजानें पंधराव्या शतकांत बांधलेलें त्रिमूर्तीचें देऊळ म्हैसूर प्रांतांत आहे. त्रिमूर्तीचे तीन बालक होऊन अनुसूयेच्या प्रभावाची साक्ष म्हणून अत्रिऋषीच्या आश्रमांत दत्तात्रयरूपानें विष्णु राहिले. म्हैसूर संस्थानपैकीं तुमकूर जिल्ह्यांत बाबाबूढण पर्वत आहे; येथील गुहेंत दत्तात्रय गुप्त झाले म्हणतात[3]. शिवाच्याप्रमाणेंच दत्ताचे पुजारीसुद्धां ब्राम्हणेतरच बहुतेक असतात; चौलच्या दत्ताची पूजक गुरवीण आहे. हे दत्त तरी एकीकरणाच्या प्रयत्नाची साक्ष आहे.

पंचायतनामध्यें शंकराचा बाण आणि विष्णूचा शाळिग्राम असतो; गणपति, देवी आणि सूर्य हे त्या पंचायतनाचे बाकीचे देव आहेत; ह्यांपैकीं फक्त गणपतीची पूजा सांगावयाची राहिली. गणपतीचे सूक्त अथर्वशीर्ष हें होय. ऋग्वेदांतील ( २–२३–१ ) गणानां अधिपतिः ह्या शब्दावरून ऋग्वेदांतही गणपति असल्याबद्दल कोणी आधार दाखवितात. हेंच वाक्य यजुर्वेद वाजसनेयी संहितेंत ( २३–१९ ) आलें आहे,

गणेशपूजा.

परंतु दोन्हीठिकाणीं त्याचा अर्थ गणांचा अधिपति ह्यापेक्षां अधिक नाहीं. शंकरविजयांत ( १५–१७ ) गाणपत्यपंथाचें वर्णन आहे, तेथें महागणपति, हरिद्रागणपति, उच्छिष्टगणपति, नवनीतगणपति, सुवर्णगणपति, सन्तानगणपति असे सहा प्रकार दिले आहेत. अष्टसिद्धि विनायकांचीं बरींचशीं देवळें महाराष्ट्रांत आहेत. काशींतील धुंडिराजविनायकाचें दर्शन घेऊन यात्रासिद्धि मागण्याचा

1. Vide P. 382 Mysore Gazetteer.
2. Vide P. 181 The Religions of India By A. Bur'<sup></sup>
3. Vide P. 147 Tumkur District Gazetteer.
4. Vide P. 303 Kolaba Gazetteer.

प्रघात आहे. ब्रम्हवैवर्त, भविष्य आणि गणेश ह्या पुराणांतून गजाननाचे गोडवे गाईले आहेत. वाईंत गणपतिघाटावर शिडी लावून पूजा करावी लागते एवढा मोठा गणपति आहे, तें देऊळ १७६२ मधलें आहे; तशीच मोठी मूर्ति त्रिचनापल्लीच्या डोंगरावर आहे. कारोमांडेलच्या किनाऱ्यावर गणपतीचे भक्त पुष्कळ आहेत, असें सानेराटसाहेब ( Sounerat ) ह्मणतात. प्रत्येक कार्यारंभीं गणपतिपूजन ( सुपारी मांडून ) करावें लागतें, आणि काव्यारंभीं गणपतीला नमन असतें; परंतु भारतांत तसें नाहीं, ह्याचें कारण भारताचा लेखक गणपति होता हें असेल; त्या वेळीं गणपतीची भार्या सरस्वती अशी कल्पना असती तर तिला नमन भारतकारांनीं गणपतीचें हातून करविलें नसतें.

ह्या गणपतिसारखा पश्चिमेस जेनस ( Janus जनेश-गणेश ) देव होय; त्याचीं नांवें व वर्णन सलपिटियसच्या ( Sulpitius ) काव्यांत आहे. पिता जेनस, सर्वसाक्षी जेनस, वाचस्पति, विद्याधिपति, अशीं विशेषणें त्याला लाविलीं आहेत; कांहीं ठिकाणीं जेनसची मूर्ति दोन तोंडाची आहे, आणि हेट्रुस्कन चालीची फलिसी ( Falisci ) येथील मूर्ति चार तोंडाची आहे, असला भिन्न प्रकार दिसला तरी त्यांत उणीव येत नाहीं. आपल्या इकडे घराच्या दारावर गणपतीची मूर्ति लांकडांत कोरतात, त्याप्रमाणें ह्या जेनसवरून तिकडच्या दारांनाच जेनुइ ( Januoe) म्हणतात, हा जेनसच्या पूजेचाच अवशेष आहे. पूर्वीं रोमन वर्षाचा आरंभ मार्च पासून होत असे,[1] तो बदलून ( दहाचे ऐवजीं बारा महिन्याचें वर्ष झालें तेव्हां ) पहिला महिना जानुवारी ( जानस जेनसचा ) झाला; जेनसनेंच इटली देशांत प्रथम देवळें उभविलीं आणि धर्माचार सुरू केले असें म्हणतात. मेक्सिको मधील मेसायाचें अवतारापैकीं एकाला हत्तीसारखी सोंड होती असें वर्णन आहे; अमेरिकेंत हत्ती हा प्राणी

1. Vide ph. 233–235. Sir William Jone's works.

माहीत नव्हता. ह्यावरून हा मेसाया गणपति असावा, असा कोणी तर्क करितात.

मारुतीची उपासना रामदासांनीं वाढविली. निदान महाराष्ट्रांत तरी बहुतेक गांवांना ग्रामदेवता मारुति आहेच, पण पेठ तालुक्यांत ह्या नियमाला अपवाद पुष्कळ गांवीं सांपडतो. पुण्यास तर दर पेठेला मारुति असून त्यांचीं नांवें इतर लोकांस विचित्र वाटण्यासारखीं आहेत. सोन्या, गवत्या, भांग्या, बटाट्या, पासोड्या, डुल्या, पगड्या अशीं नांवें हंसू आणल्यावांचून रहात नाहींत. पुण्यास पंचमुखी मारुति आहे; मोहोळास चार मुखी आहे; ह्याचे पूजकही ब्राह्मणेतर असतात.

**हनुमानपूजा**

हनुमान हा रुद्राचा अवतार मानितात. मग त्याला सोमऐवजीं शनिवार कसा प्रिय झाला कोण जाणें ? कित्येक ठिकाणीं मारुतीचाच शनि बनला आहे.

गणपति हा शंकराचा मुलगा मानितात, त्याप्रमाणेंच कार्तिकस्वामी हा दुसरा मुलगा आहे. ह्याचीं देवळें महाराष्ट्रांत फारशीं नाहींत; आणि कपिलाषष्ठीच्या योगाशिवाय त्याचे दर्शनास कोणी जात नाहींत. स्त्रियांस तर त्याच्या दर्शनाची बंदी आहे, असें दर्शन घेणाऱ्या स्त्रीला सात जन्म विधवापण येईल अशी समजूत आहे. पश्चिम किनाऱ्यावर आणि पुळने येथें कार्तिकस्वामीचीं देवळें आहेत. दक्षिणेकडे ह्याचें नांव सुब्रह्मण्य होऊन त्याचीं पुष्कळ देवळें आहेत. म्हैसुराजवळील नंजन गुडास सुब्रह्मण्याचें मोठें देवस्थान आहे. इजिप्तमधील आलआरगस ( Al Argus ) किंवा ओरस ( Orus ) हा कार्तिकेया सारखा मानितात.

**कार्तिकस्वामी-पूजा.**

---

1. Humboldt cited by Doone 537. Vide Article on Kaliyuga By the Hon'ble Alex Del Mar in the Indian Review of April 1913.

ह्याप्रमाणें देवांनीं मनुष्यजन्म घेऊन ह्या भूलोकांतील लोकांच्या कल्याणासाठीं अनेक दिव्यकृत्यें केलीं म्हणून त्यांची पूजा हिंदुलोक करितात; परंतु हेच पूर्वीं कोणी ऐतिहासिक पुरुष होऊन गेले, त्यांस हिंदूंनीं देव बनविले, असे इतर म्हणणार. बुद्धधर्माच्या पाडावासाठीं ही युक्ति ब्राम्हणी धर्माच्या पुरस्कर्त्यांनीं योजिली असावी, असा त्यांचा तर्क आहे महाभारतावरून आणि पाणिनि ( ४ ३–९८ ) पाहून असें वाटतें कीं कृष्णाच्या पूजेप्रमाणेंच कृष्णसखा अर्जुन ह्याच्या उपासकांचा पंथ एकाकालीं असावा. ही नरनारायणाची जोडी पुराणकालीं आदरणीय होती, तरी त्यांची एकत्र पूजा अशी क्वचितच आढळेल. पंढरीच्या विठोबाची भक्ति हल्लीं महाराष्ट्रांत फार आहे. आणि मारुतीच्याप्रमाणेंच कटीकर विठोबा परंतु भार्या रुक्मिणी जवळ उभी असलेले विठोबा गांवोगावीं झाले आहेत; पण ही मूर्ति ख्रिस्तशकापूर्वीं तिसऱ्या शकाच्या मागच्या कारागीरींतली. नाहीं, असें खास ठरलें आहे; तिच्यासारख्या मूर्ति दोनेंच ठिकाणीं–उदयगिरी आणि भिलसा येथें–आहेत हे सर्व विठोबा, खंडोबा ह्मसोबा, वाघोबा वगैरे "बा" नें अंत पावणारे देव बौद्धधर्माच्या संस्काराचे असावे, असा बळकट संशय घेण्यास जागा आहे. विठोबाच्या देवळांतील लेख बाराव्या शतकाच्या पूर्वींचे नाहींत. आणि नामदेव ज्ञानेश्वर इत्यादिकांनीं ह्या देवाला हातीं धरीपर्यंत त्याची प्रसिद्धिही नव्हती. आसाममधील एका देवळांत बुद्ध किंवा शाक्यमुनि याची मूर्ति बसविलेली आहे, तिच्या दर्शनासाठीं भूतान व तिबेट मधून लोक येतात, पण पुष्कळ हिंदु लोकही तेथें दर्शनास जातात. आणि हा आमचा माधोबा ( Modhoba ) आहे ह्मणतात. कार्लें येथील लेण्यांत जो दगडी खांब आहे, त्याला ढगोबा किंवा धगोबा ( Dagoba ) ह्मणतात. ह्या विठोबाच्या दर्शनास फक्त अंत्यजांना बंदी आहे, ह्यावरूनही ब्राह्मणेतरांतलाच तो

1. P. 424 Sholapur Gazetteer.

2. P. 86. Descriptive Ethnology of Bengal By Edward Tuite Atkins.

देव असावा; असाच पण त्याच्यापुढें जातिभेदराहित्यांत गेलेला देव पुरीचा जगन्नाथ आहे, तेथें वर देवळांत शिजविलेला प्रसाद कोणाच्याही स्पर्शाचा असला तरी ब्राह्मणासमुद्धां चालतो; आणि रामानुजांस तिरुक्कुतार ( अंत्यज ) यांनीं संकटसमयीं मदत केल्यामुळें यादवगिरीवरील नारायणाचे देवळांत अंत्यजांनाही आंत प्रवेश करण्याची परवानगी आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

सारांश ह्या वरिपूजेच्या कल्पनेंत ( इकडे ) " पूर्वेकडे देव अवतार घेऊन स्वर्गांतून खालीं येत आणि मनुष्यांत जन्म घेत; आणि ( तिकडे ) पश्चिमेस मनुष्य देवलोकांत जाऊन त्यांनीं तेथें जागा पटकावली. " असला फरक आहे; परंतु दुसऱ्या प्रकारचीं उदाहणें हीं इकडे आहेत. महाराष्ट्रांत मराठेशाहीची स्थापना करणाऱ्या शिवरायाचें देऊळ रत्नागिरी जिल्ह्यांत मालवणास आहे, त्याचे पुजारी गौडजातींचे कोळी आहेत. पतियालांतील हकिम सिंहाचा देव झाला आहे. मध्य हिंदुस्थानांत प्राणनाथ नांवाच्या क्षत्रियाचें १७२५ मध्यें बांधलेलें देऊळ आहे. उदेपूर येथें मिराबाईचें देऊळ आहे; आणि रणछोड देवाबरोबर तिच्या मूर्तीची पूजा होते. गोरखनाथ आणि कपिल यांचीं देवळें श्रीनगरास आहेत. सारांश जेथें कांहीं अलौकीक गुण, शौर्य, शुचिता, व तेज पराक्रम दृष्टीस

1. P.217 Vol VI Imperial Gazetteer of India..

2. In the East Gods descended from Heaven and were incarnated in man; in the West men ascended from earth and took their seat among the gods. P. 35. The History of conflict between religion and science By John W. Draper.

3. P. 220. The people of India By Herbert Risley.

4. P. 404 Vol XIX. Imperial Gazetteer of India,

5. P. 138 Essays and lectures on Hindu Religion Vol I. By H. H. Wilson.

6. P. 792 Himalayan Districts of the North Western Provinces By Edwin T. Atkins.

७. यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभव ॥
भगवद्गीता ॥ १० ॥ ४१ ॥

पडेल, ती व्यक्ति माझा ( परमेश्वराचा ) अंश आहे. ह्या वचनावरून हे देव्हारे माजविण्याचा हिंदूंचा स्वभावच बनला; आणि तो एकप्रकारचा रोग आहे; असलें नांव ठेऊन घेण्यास आह्मी पात्र झालों आहों.

ह्याला कर्लाइल वीरपूजा ( Heroworship ) ह्मणतो. ह्या वीरांची थोर पुरुषांची संख्या मागील कालाइतकी हल्लीं नाही. आणि राजाला विष्णूचा अवतार मानण्याची तऱ्हा बंद झाल्यामुळें. वीरपूजा नाहींशी झाली. "[1] राजनिष्ठा ईश्वरपूजेची बहीण आहे. किंग या राजवाचक इंग्रजी शब्दाचा मूळ अर्थ सर्वांत शहाणा असा होता." उरवीमठ आणि

नृपपूजा

जगेश्वर येथें युवनाश्वपुत्र राजा मांधाता यांचीं देवळें आहेत. जपानांत मिकाडोला देवासारखा मानतात. मल्लजातीवर विजय मिळविणारा कोणी वीर पुरुष मल्लारी, मल्हारी, खंडोबा झाला; व त्यालाच पुढें शिवाचा अवतार समजूं लागले. जेजुरी येथील मल्लारीच्याप्रमाणेंच मैलार ( Mailar ) हडगल्ली, जिल्हा बेल्लारी-मद्रास-येथें मल्हार[2] देवाचें देऊळ आहे.

अलेक्झांडरच्या मनांत हिंदु देवगणांत जागा पटकवावी असें होतें, इतकी ही गोष्ट सोपी झाली आहे. लिबियाच्या आमनच्या देवानें कौल दिला होता कीं अलेक्झांडर हा देवाच्या पोटचा[3] आहे. ऱ्होडसच्या वेढ्याच्या वेळीं टालेमी लोकांच्या उपयोगी पडल्यामुळें त्यांनीं त्याला सोटॅर नांवाचा देव बनविला होता.

---

1. Loyalty is akin to religions faith. King is Kon-ning-Kanning-man that knows or cans. Hero as Divinity By Carlyle.

2. Ph. 30-31 Vol XVII. Imperial Gazetteer of India.

3. Ph. 8-9. History of conflict between Religion and science By John William Draper.

4. P. 17. Ibid.

" फिजी लोकांत मोठ्या राजास दुसऱ्या प्रतीच्या देवतांच्या इतका मान असे. आफ्रिकेंतील बेनिन लोकांचा राजा हा देवांचा प्रतिनिधि किंबहुना देवच मानितात. लोंआंगोचा राजा देवाप्रमाणें मानितात. अमेरिकेंत व्हायना या राजास इतके भीत कीं त्याला देव मानीत. पेरू देशांत राजा मरतांच तो देव झाला असें मानितात. न्यूझीलंड येथील मोठमोठे सरदार मरतांच त्यांना देवाप्रमाणेंच मानीत. " सोसायटी बेटांतील राजा टामट्र (Tamatra) ह्याची पूजा होत असे" आणि मार्केसस् (Marqueses) मध्यें कित्येक साधारण लोकांसही ईश्वराचे अवतार समजत; ताहिति (Tabiti) मधील राणीचे नांवांतील अक्षरासारखा उच्चारही करण्याची मनाई आहे. व्हिक्टरटास ह्यानें म्हटलें आहे कीं इजिप्तमध्यें राजे हयात असतांनाच त्यांना देवासारखा मान असे. " ग्रीक लोकांत ह्यां मानव देवांची टांकसाळच होती, अलाबंदू, तेनेस, इनोडर्फ ल्यूकोथिया, तिचा पुत्र पलेमान, हरक्युलिस, एस्क्यालिपस, तिनडेरिडी, ह्यांना सर्व ग्रीस राष्ट्र देव ह्मणत; आम्ही ( रोमन लोक ) रोम्युलसला देव मानतोच." अठराव्या शतकांतल्या बासवेल साहेबाला जानसन हा देवासारखा वाटे. फ्रान्सांत धर्मश्रद्धा बहुतेक नाहींशी झाली आहे तरी त्यांनीं व्हालटेयरचे किति देव्हारे माजविले !

असल्या राजे आणि " वीरपुरुषांच्या देवगणांतील जागांचाही उंचनीच

१. पान ७९ पितृमूलकधर्म प्रो. म्याक्समुलर यांच्या व्याख्यानांचें रा. रां. बा. दीक्षित यानीं केलेले भाषांतर.

2. Vide p. 355 Origin of Civilization By Sir J. Lubbock.

3. The Greeks deified many men; as Alabandus at Alabandæ. Tenes at Tenedos; and all Greece pay divine honours to Lencotheai who was before called Ino, to her son Palæmen, to Hercules, to Æscalipus, and to Tyndaridae our own people to Romulus. P. 118 Cicero on the nature of God. By C. D.—Young.

1. Society everywhere is some representation, not insupportably inaccurate, of a graduated worship of heroes—they are all banknotes, We can do with some forged false notes but not with all. Hero as divinity By Carlyle.

असा क्रम लावण्याला समाजाची तयारी असते, आणि त्यांत मोठीशी चूकही होत नाहीं. हे देव चलनी नोटासारखे असतात. कितीही दक्षता ठेविली तरी त्यांत कांहीं बनावट, खोट्या नोटा मिसळणारच; आणि तेवढ्यानें समाजाचें फारसें नुकसान होत नाहीं. परंतु सगळ्याच नोटा खोट्या निघाल्या तर मात्र चालणार नाहीं. त्याची लगेच ओरड होते.' असा प्रकार गुरुपूजेचा झाला आहे. गुरूचा आदर, मान पूर्वींपासून असला तरी त्यांच्या पादुकांची पूजा, जिवंतपणीं त्यांच्या आरत्या, धुपारत्या, मंत्रपुष्प पूर्वीं नव्हते. सांदीपनी गुरूच्या घरीं कृष्ण विद्या शिकले, गुरुदक्षणा म्हणून त्यांचा मृतपुत्र आणून देण्यासारखी भक्ति कृष्णानीं दाखविली, तरी त्या गुरूची नित्य पूजा, किंवा वार्षिक पूजा सुद्धां त्यानीं केली नाहीं. रामचंद्राच्या घरीं कुलगुरु वशिष्ठ होते, पण त्यांना कोणी देव बनविले नव्हते. उपनिषदांत गुरु करण्याबद्दल सांगितलें आहे; परंतु तो केव्हां, व कोणी करावा ह्याचा निर्णय दिला आहे तो असा -" यां जगांतील व्यवहार, प्रपंच पाहून करून मन विटल्यामुळें आतां ह्याच उपद्व्यापांत पुढील आयुष्य व्यर्थ घालविणें बरें नव्हे, अशी ज्याची खात्री पटली, त्यानें मोक्षसाधनासाठीं गुरूला शरण जावें. श्रुतिशास्त्रसंपन्न आणि ब्रह्मज्ञानी योग्य पुरुष पाहून त्याला उपयुक्त पदार्थ—समिधा वगैरे घेऊन त्यांच्यापाशीं जाऊन रहावें. " अशाच अर्थाचीं वाक्यें आश्वलायन गृह्यसूत्र ३ ४-४, आपस्तंभ धर्मसूत्र १-१-१३-१७, मनु २-१४४-१४६, निरुक्त २-४ वगैरे ठिकाणीं सांपडतात; परंतु गुरूला देव बनविण्याची तऱ्हा जी ज्ञानेश्वरकालांत भरांत आली, ती मूळांत कोठें नाहीं. गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करावा; परंतु ब्रह्मचर्य आश्रम संपविल्यावर गुरुसेवेचें कारण नाहीं, असें आपस्तंब धर्मसूत्रांत १-१३-५,-१८-२१ येथें आहे. तशीच तयारी असेल तर जन्मभर

गुरुपूजा.

---

१. परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन । तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं ॥ मुण्डक ॥ १।२।१२

गुरुगृहीं रहाण्याबद्दल गौतम ( ३-५ ); मनु ( २-२४३-२४४ ) सांगतात; तथापि संन्यासाश्रम स्वीकारण्याची तयारी असल्याशिवाय गुरु केल्याचीं उदाहरणें श्रीमच्छंकराचार्यांच्या काळापर्यंत सांपडणार नाहींत. महंमदी धर्माशीं सहवास घडण्यापूर्वींच बंगाल्यांत वगैरे तांत्रिक प्रकार सुरू होते; आणि त्यांत गुरूचें महत्त्व आहे हें खरें, तथापि बाराव्या शतकापर्यंत महाराष्ट्रांत हें गुरूचें बंड नव्हतें. " मुसलमानामध्यें खालच्या सर्व लोकांत प्रत्येक जमानीचा पीर किंवा मुरशिद असलाच पाहिजे; आणि अशिक्षित लोकांत ह्या पीरक्षुधेची येवढी खाखा आहे कीं, बेपीर ही एक प्रकारची शिवी झाली आहे." ह्याचें अनुकरणानें अडाणी लोकांत हें बंड शिरलें असावें. नामदेवाच्या डोक्यावर थापटणें मारून हा निगुऱ्या ह्मणजे कच्चा आहे, असें गोऱ्या कुंभारानें ह्मटल्याची कथा संतमंडळांत प्रचलित आहे.

धर्मशासन लावण्याच्या हेतूनें श्रीमच्छंकराचार्यांनीं चार दिशेला चार मठ स्थापन केले आणि धर्माचार्य ठरविले;परंतु ते पसंत न पडून रामानुज, रामानंद, मध्व, बसव, वल्लभ, चैतन्य,नानक, कबीर वगैरे अनेक पुरुषांनीं आपआपल्या मताचे पंथ वाढवून एकप्रकारची तिबेटांतल्या सारखी लामेगिरी काढिली आणि देवाच्या ऐवजीं गुरूला देव बनविला, आणि नाथाजी म्हणतो कीं, " भक्ति भक्त भगवंत गुरु चतुर्नाम वपु एक " इतकी एकीकरणाची मजल गेली. आपल्या ब्रह्मणपणाचा अभिमान झाला ह्मणजे कांहीं अपूर्वता मिळविण्याची खटपट सुरू होते. " ह्याप्रमाणें आपण धरलेल्या पक्षाचा, अंगीकार केलेल्या पंथाचा, सांप्रदायाचा ओढा धरून

1. Among lower classes each has its pir or murshid and so far do the uneducated classes carry the idea of the necessity of having a pir that *be-pir* is a term of Scorn. P. 127 Footnote. Gazetteer. Gujrat Population Part II.

२. एवमन्ये स्वपक्षाभिमानेनान्यथाऽन्यथा । मंत्रार्थवादकल्पादीनाश्रित्य प्रतिपेदिरे ॥ पंचदशी ॥ चित्रदीप ॥ १२० ॥

वेगवेगळीं उपास्यें, मंत्र, अर्थवाद ह्यांचा सुळसुळाट झाला " आणि त्यामुळें मूर्तिभेदही वाढले. ह्या गुरुपूजनांत जातिभेद बहुतेक नाहींसा झाला आहे; मुसलमान गुरु ब्राम्हणांस चालतो; पतीशिवाय इतरांचें उच्छिष्ट न खाणाऱ्या बायकासुद्धां गुरूची थुंकी गिळतात, असा अतिरेक झाला आहे—

युरोपांतही पोपचें बंड होतें व अद्यापही आहे. तेरव्या शतकांत " मुक्तात्मे बंधु-भगिनी " चा जो पंथ होता, ते आपल्यास जीवन्मुक्त मानीत आणि खिस्ताच्या दिव्य तेजांत मिसळून जाण्यासाठीं गुरुपूजा करीत. आलबेजेनासिस पंथांत तर इकडच्या वारकऱ्याप्रमाणें प्रत्येकजण दुसऱ्याच्या पायां पडतो; सेंट कोलंबियाच्या पंथांत हाच प्रकार आहे. " खिस्ताच्या[2] जन्मापूर्वीच टियानाचा अपोलोनियस ह्यानें तसला धर्म काढिला होता; त्याच्या भक्तमंडळांत प्रचलित असलेल्या कथा, गोष्टी वगैरे बहुतेक साऱ्या खिस्तभक्तांनीं नाहींशा केल्या आहेत. " " अपोलोनियस[3] मेल्यावर पुढें चारशें वर्षें त्याला देव ह्मणून लोक मानीत होते. टियाना येथें त्याचें देऊळ होतें; आणि धर्मसंबंधानें पवित्र मानलेल्या शहराला जे माफीचे हक्क असत ते सर्व ह्या शहराला रोमन लोकांनीं दिले होते. त्याचा पुतळा त्यांनीं आपल्या देवांत मांडिला आणि त्याच्या नांवांत दिव्य सामर्थ्य आहे, अशा कल्पनेनें अनेक लोक त्याला नवस वगैरे करीत."

---

1. Pp. 149-150 Vol I. The Golden Bough By Mr. Frazer.

2. Apollonius of Tyanna is an exponent of the pre-Christian Christianity. Christian fanatics have zealously destroyed the greatest part of the legends which his admirers told of him. P. 225 Budhism and its Christian critics. By Dr. Paul Baird.

3. After his death Apollonius was worshipped with divone honours for a period of four centuries A temple was raised to him at Tyanna, which obtained from the Romans the immunity of a sacred city. His statue was placed among those of the gods and hi name was invoked as a being possessed of superhuman power P. 169, Vol II, Encyclopaedia Britanica

सारांश, ह्या सर्व मूर्तिपूजेंतील इंगित शहाण्या लोकांस माहीत नव्हतें, असें नाहीं. " शहाण्या सुर्त्या लोकांनीं हिला कित्येक वेळां उत्तेजन दिलें आहे; ह्मणून देवाला मनुष्याचा आकार देऊन भलतेच देव्हारे माजविणारे लोक मूर्खच होते असें समजूं नका. अज्ञ लोकांच्या बुद्धीचा कल अनीतिच्या आचाराकडे असतो; तिकडून त्यांचीं मनें फिरवून कशीतरी देव पूजेला लावावीं, हा हेतू त्यांचा होता, ही गोष्ट लपण्यासारखी आहे काय ? कोणी असें ह्मणतील कीं, त्यांना धर्माची समजूत नीट झालेली नव्हती, किंवा त्यांना खरा मार्ग कळला नव्हता, पण अशाप्रकारें मूर्तीची कां होईना पण पूजा घडते, असली पूजा केल्यानें देवाची पूजा आपण करतों, असली समजूत इतर लोकांची झाली, ही कांहीं वाईट गोष्ट नव्हे." राजकीय दृष्टीनें युरोपांत त्याचा उपयोग झाला, धार्मिकरीतीनें तो प्रकार हिंदुधर्माच्या पथ्यावर पडला.

1. Who was ever so blind as not to see that the Gods were represented in human form, either by the particular advice of wise men, who thought by those means the more easily to turn the minds of the ignorant from a dipravity of manners, to the worship of the Gods; or through superstition, which was the cause of their believing that when they were payiny adoration to these images, they were approaching the gods themselves. P. 27 Cicers on the nature of the gods. By C. D. Young.

# भाग ४ था.

## मूर्तिपूजामंडण.

वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलता लक्ष्यांश जाणावा । निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेन योगें ॥ दासबोध ॥ १७।१०।११ ॥

Correct the portrait by the living face
Man's God by the God's god in the mind.

Browning. Ringaud book.

झालेल्या विवेचनावरून आणि नमूद केलेल्या मूर्तिपूजेच्या प्रकारा वरून धर्मविचाराचा आरंभ एकाच तऱ्हेनें झाला असावा असें म्हणणाऱ्यांचा आग्रह दिसून येतो, आणि त्यांत क्रम किंवा उच्चनीच भाव लावणारांचें मत तर चुकीचें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. " मनुष्याला आपली न्यूनता, पंगुपणा किंवा सांतत्व याची झालेली जाणीव आणि त्यापासून उत्पन्न होणारी भीति ह्या दोहोंपासून सर्वधर्मांचा उगम झाला आहे, हें प्लीनीचें म्हणणें तर " कबूल होणारच नाहीं. शिवाय " हर्बर्ट स्पेन्सर साहेबांनीं आपल्या समाजशास्त्रावरील पुस्तकांत धर्मोत्पत्तीच्या उदाहरणांचें विवेचन केलें आहे, तो प्रयत्न हल्लींच्या उत्क्रांतिशास्त्राप्रमाणें आहे, असें म्हणतां येत नाहीं. भूतें आणि पितर यांच्या पूजना-

---

1. One may not be ready to say with Pliny that all religions are the offspring of human •weakness and fear. P. 4 Philosophy of Theism. By Alexander Fraser.

2. Even the attempt made by Mr Herbert Spencer in his socio. logy to deal with the phenomena of religions can scarcely be said to be conceived in the spirit of evolutionary science as now under stood. It is hard to follow the author in his theories of the development of religious beliefs from ghosts and ancestor worship- without a continual feeling of disappointment, and even impatience at the trivility and comparative insignificance of explanations offered to account for the development of such an imposing class of social phenomena, P. 22 Wocial Evolutions By Benjamin. Kidd.

पासून धर्मभावना वाढत गेली, असा त्यांनीं केलेला उपन्यास वाचीत असतांना मन खट्टू होतें; आणि सामाजिक गोष्टीपैकीं इतक्या गंभीर आणि महत्वाच्या भागाविषयीं उपपत्ति लावतांना त्यांनीं दिलेलीं कारणें त्या विषयाच्या भारदस्तपणाला न शोभेशीं, क्षुल्लक व पोरकट आहेत, असें पाहून पुढें वाचूं नये असें सुद्धां वाटतें." ग्रुपच्या मतानें धर्म हेंच एक वेड आहे. राष्ट्रें आणि मनुष्यें ह्यांच्या आयुष्यांत असले वेडाचे झटके येतच असतात, त्यापैकींच मूर्तिपूजा हें वेड आहे असें कोणी म्हणतात. हें वेड इतर धर्मांत पूर्वीं होतें, त्यांतून तें काढून टाकण्याचा, बंद करण्याचा प्रयत्न होऊन सुधारणा झाली तरी तें अद्याप आहेच. त्याचें धार्मिक स्वरूप पुसट झालें, तरी समाजांतील चाली व रूढी पाहिल्या तर मूर्तिपूजाप्रकार अद्याप चालूच आहेत, ही गोष्ट भाग २ व ३ ह्यांतील उदाहरणावरून लक्षांत येईलच. आमच्या इकडेही मूर्तिपूजा काढून टाकण्याचे प्रयत्न झाले आहेत. कबिरानें मूर्तिपूजा काढून टाकली पण रामोपासना बळकट ठेविली, हल्लीं त्या पंथाच्या कांहीं लोकांत ती चालू आहेच. राममोहनराय, पंडित दयानंद, वगैरे मंडळींना ह्या मूर्तिपूजेची लाज वाटून ब्रम्हो, नवीन, समाज, भारतसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज वगैरे पंथ ख्रिस्तीधर्माच्या अनुकरणानें त्यांनीं काढले, तेवढे निराळे झाले; पण त्यानें हिंदुधर्मांत कांहीं फरक पडला नाहीं, पण त्यांच्यांतही वीरपूजा, वृक्षपूजा हल्लीं शिरत आहे.

अदितवारीं, सुटीच्या दिवशीं नियमित वेळेला एखाद्या स्थळीं एकत्र जमून प्रार्थना करणाऱ्या मंडळीला विचारिलें तर त्यांचें ध्यान कांहीं तरी देशकालविशिष्ट पुरुषाचें असून त्याची आकृति चर्मचक्षूपुढें नसली तरी अंतश्चक्षूपुढें तरी असते, असें त्यांना प्रामाणिकपणानें कबूल करावें लागेल. निराकाराचें ध्यानच संभवणार नाहीं. सतारीमध्यें सर्व सूर भरलेले असतात तरी ती नुसती हातांत घेतल्यानें मनरंजन होत नाहीं; ती वाजविणारा वस्ताद तारांचा मेळ लावून एक एक गति वाजवाल, तसा

आनंद दुणावत जाईल. कित्येकांच्या अंगीं एखादीच गत वाजविण्याचें ज्ञान असेल, कोणाला दहापांच गति येत असतील, कोणाला पद वाजविल्याशिवाय समजणार नाहीं. अशा प्रसंगीं अमूकच गत वाजविणारास परवानगी ठेवावी, बाकीचे लोक त्या जागेंतून हाकलून द्यावे, असें म्हणणारांचें हसूं होणार नाहीं काय? वेदान्तमत प्रमाणें ब्रम्हसाक्षात्कार झालेल्या लोकांस पूजाप्रकाराची जरूर भासली नाहीं तरी तितक्या वरच्या पायरीवर सर्वच लोक असणें किंवा पोहोंचणें केव्हांच शक्य नाहीं. तेव्हां ब्रह्मध्यानाच्या खालचे प्रार्थनेचे किंवा पूजाप्रकाराचे सर्व मार्ग सगुणोपासना या सदराखालींच गणले जाणार. हृदयस्थ मूर्तींचें ( सांठवीला राहे हृदय संपुष्टी ) ध्यान केलें किंवा आकाशस्थ पित्याला हाक मारून भाजी भाकरीची याचना केली, तरी तें सर्व मूर्तीपूजेंतच येणार. आमच्या हिंदुलोकांच्या ग्रंथांत श्रेष्ठ तत्वज्ञान आहे येवढ्यानें जसें आमचें मूर्तिपूजकत्व नाहींसें होत नाहीं, त्याप्रमाणेंच इतर धर्मांत जो कांहीं पूजाविधानाचा थोडाबहुत प्रकार आहे तेवढ्यानेंच त्यांना हिंदूलोक मूर्तिपूजकत्व सहज लावतील हें त्यांनाही कबूल करावेंच लागेल.

"[1] ज्ञानप्रसार होईल त्याप्रमाणें, नवीन प्रसंग येतात. त्याबरोबरच नवीन विचार, आचार आणि कर्तव्याची दिशा निघत असते; जी गोष्ट पुरातन काळीं चांगली, सुंदर वाटली तीच पुढें वाईट, बेढब दिसूं लागते. परिमित सामर्थ्याचीं इंद्रियें आणि विचारशक्ति असलेल्या मनुष्यानें आपल्या कल्पनेनें अनंत जो ईश्वर त्याला निरनिराळ्या काळीं जीं नांवें ठेविलीं, जे गुण लावले, त्यावरून धर्मविकासाचे सिद्धांत मांडूं लागल्यास चूक होणार आहे. तीं नांवें व रूपें त्या कालाला योग्य व सार्थ होतीं; आणि त्या स्थितींतल्या मनुष्याच्या दृष्टीनें तीं केव्हांही तशींच सार्थ रहातील. द्यौ किंवा झ्यूस ( Zeus ) ह्या शब्दाचा अर्थ प्रकाश असो किंवा चर्मचक्षूंना आहेसें वाटणारें आकाश असो, त्या शब्दाचा अर्थ मूर्त, वस्तुरूप आकाश असा कधींच नव्हता. चीन देशांत आकाशवाचक शब्द तीएन असा असला तरी त्याच चिनी शब्दांतच आकाशांतील देव ही कल्पना अंतर्भूत आहे. इंग्रजी शब्द हेवन ( Heaven or Haven ) ह्याचा अर्थ आकाश व

1. New vecasions teach new duties Time makes an ancient good uncouth Loncell.

ईश्वर असा दोन्हींचा द्योतक आहे. भावना एकच असेल, बोध्यवस्तु तीच असेल तोंपर्यंत नामभेदानें काय फरक होणार ? पेरुदेशांतील ( इंकाला ) रहिवाशाला सूर्य हाच खरा देव वाटत होता, त्यांत त्याचें समाधान होत होतें. त्याला तुम्ही आपली देवाची कल्पना देऊं लागल्यास, ती अगोदर समजणार नाहीं, आणि थोडीबहुत समजलीच तर त्याचें पहिलें समाधान मात्र नाहींसें होईल. देव आपला पिता असें कोणी म्हणो, कर्ता, प्रभु, नियामक, स्वामी कोणचेंही विशेषण त्याला लावो, पण त्या शब्दांत ईश्वर सामावला, तेवढ्या शब्दानें ईश्वराचा बोध होतो, असें ठरवून टाकलें कीं विचारी पुरुषाला अडवणूक होऊं लागतेच. शंकराची पिंडी हाच देव ही समजूत झाली कीं त्याच्यावर चढून बेलाच्या पानावरील अक्षता खाणाऱ्या उंदराचा स्वैरसंचार पहातांच पंडित दयानंदजीला जी अस्वस्थता वाटली ह्मणतात, ती कोणालाही वाटणार; हे असले नामरूपानें ठरविलेले ईश्वराचे सर्व प्रकार संकोचितच असणार. " ईश्वराचें ज्ञान करून घेण्याचे इतर सर्व मार्ग निरुपयोगी आहेत. अंतर्मुख होऊन आपला आपण विचार करणें, आपल्याठिकाणीं असणाऱ्या परमात्म्याची ओळख करून घेणें येवढाच एक मार्ग पूर्ण आहे. बाकीच्या कल्पना एकपक्षीं, अपूर्ण आहेत; खरोखर ईश्वर अलक्ष ह्मणजे ह्या स्थूल इंद्रियांना गोचर न होणारा आहे, त्याचें संबोधन शक्य नाहीं." परंतु असल्या विचाराला, समजुतीला, साक्षात्काराला, अनुभवाला बुद्धिसामर्थ्य लागतें. "ईश्वर आपल्यामध्येंच आहे एवढ्याच कल्पनेनें सत्यापर्यंत जाऊन पोहोंचता येईल, परंतु त्यामुळें ( त्या कल्पनेच्या उच्च प्रकारामुळें ) ह्या शांत मनाला पुष्कळ ताण दिल्यावांचून तसली उमज पडत नाहीं." जगांत ईश्वर आहे, आणि ईश्वरांत जग आहे, एवढ्यानें सिद्धांतपूर्णता येत नाहीं; आणि देव अशी व्यक्ति मानल्यानें अज्ञ लोकांचें समाधान झालें तरी विचाराची धांव मुद्दाम खुंटविल्याशिवाय थांबत नाहीं.

१. मार्ग होय परि अंतरिक्ष । जेथें सर्वही पूर्वपक्ष । पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ॥दासबोध ४।४।१३

2. The idea of indwelling God is an attempt to reach out towards the reality, and as such it taxes the powers of the infinite mind. P. 93. The idea of God. By John Fiske.

परंतु साधारण मनुष्यप्राणी प्रेमाचा भुकेला असतो, तेव्हां तें प्रेम करण्यास त्यास कोणीतरी पाहिजे असतें, एरवीं त्याला चैन पडत नाहीं. ब्रह्मचिंतन नीरस वाटल्यामुळेंच रामानुज, वगैरे लोकांनीं उचल घेऊन पूर्वींच्या भागवतधर्माचें प्रस्थ माजविलें. पण ह्यांत असें झालें कीं "हातावर भाताचा घास ठेवला होता तो हाताला बुळबुळीत वाटून तो टाकून देऊन त्याचा अवशेष जें तूप हाताला लागलें तें चाटीत बसण्याची जणूं काय हौस येऊन तीर्थयात्रा[1] करीत हिंडणें, नामजपाच्या माळांची संख्या भरून काढणें" असल्या कवाइती रामानंद चैतन्य वगैरे ग्रंथ काढणारांनीं सुरू केल्या. त्यानीं भक्तिप्रकार वाढविले पण त्याबरोबरच पूर्वींचें न मोडण्याच्या बुद्धीनें किंवा तसली बंदी करण्याचा अधिकार नसल्यानें मूर्तिपूजा कायमच ठेविली. ह्या भक्तप्रकारांत भागवतकारानीं तीन पायऱ्या लाविल्या आणि कनिष्ठ भक्ताची व्याख्या अशी दिली कीं "जो कोणी आपल्या[2] इष्ट देवाची मूर्ति मांडून मोठ्या भक्तीनें तिची पूजा षोडशोपचारयुक्त करण्यांत सर्वस्व मानील, ईश्वराच्या इतर भक्तांची आणि इतर माणसांची पर्वा करणार नाहीं, त्यांच्याबद्दल आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे, असें मनांतसुद्धां आणणार नाहीं, तो भक्त अगदीं खालच्या कोटींतला समजावा." "ही दगडाची[3] (किंवा कशाची केली असेल त्याची) मूर्ति समोर आहे, हीच देव अशी समजूत असेल तर ती कोती होय" असें एकनाथसुद्धां ह्मणतात; परंतु त्या मूर्तीपासून होणारी एकप्रकारची कामगिरी लक्षांत आणून

**मूर्तिपूजेवरील आक्षेप आणि खंडण.**

१. उपेक्ष्य तत्तीर्थयात्रा जपादीनेव कुर्वताम् । पिण्डं समुत्सृज्य करं लेढीति न्याय आपतेत् ॥ पंचदशी । ध्यानदीप ॥ १३० ॥

२. अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते । न तद्भक्तेषु चान्येषु स भक्तः प्राकृतः स्मृतः ॥ भागवत ॥ ११।२।४७ ॥

३. पाषाण प्रतिमा हाचि देवो । तेथेंचि ज्यांचा पूर्ण भावो ॥ एकनाथी भागवत ॥ २।६४४ ॥

तिचा नाश कोणीही सांगितला नाहीं. "[1] लांकडांत, मातींत, दगडांत देव नसतो. देवाला एक अत्यंत भक्ति पाहिजे, यासाठीं उत्तम भक्ति करावी ही कोटी हिंदु लोकांना नवीन शिकावयाची नव्हती; परंतु "ज्याला जी दे[2]वता आवडत असेल, त्याला ज्याप्रकारच्या ध्यानानें अधिक समाधान होईल, ती तशी पूर्ण करणारा मीच आहे" ह्या भगवंताच्या वचनामुळें कोणीही मूर्तिपूजेची वंचना केली नाहीं. त्यामुळें ह्या मूर्तिपूजेवर आक्षेप येत आहेत, त्यापैकीं एक असा आहे कीं, जर ही मूर्तिपूजा कनिष्ठ ह्मणजे अर्थात् अनावश्यक, निरुपयोगी आहे, तर ती तशीच चालू ठेवून बुद्धीचा व कालाचा अपव्यय कां करावा ?

ह्यांत पूजाप्रकारावर जो आक्षेप आहे, तो विशेष नाहीं. मूर्ति नसली तरी प्रार्थना करावी असें ह्मणण्यांत सुद्धां पूजाप्रकार येणारच. आतां मूर्ति ह्मणजे काय याची व्याख्या काय करावयाची ? ह्यावर ह्या आक्षेपाचें उत्तर अवलंबून आहे. विशिष्ट नांव आणि विशिष्ट आकृति ह्यांच्या समुदायाला मूर्ति ह्मणावें, तर सर्व जगच नामरूपात्मक आहे. नामरूपाशिवाय कोणच्याच पदार्थाचा, ज्ञेय वस्तूचा बोध होत नाहीं. "हें ना[3]म आणि रूप ह्या दोन उपाधि आहेत, गुणद्योतक विशेषणें आहेत, तीं त्या परमेश्वराला लावल्याशिवाय त्या प्रभूचा बोध होणार नाहीं, त्याचें ज्ञान वाणीनें, शब्दानें सांगतां येणार नाहीं, दुसऱ्याला समजणार नाहीं. ह्या दोहोंपैकीं एकानें भागेल किंवा नाहीं, ह्मणजे ह्यांपैकीं कोणाची योग्यता श्रेष्ठ आहे ? ह्याचा निर्णय करतां येण्यासारखा नाहीं... वास्तविक पहातां रूप हें नां-

---

१. न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये । भावे हि विद्यते देवो तस्माद्भावो हि कारणं ॥ स्मृतिः ॥

२. यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति । तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विद्धाम्यहं ॥ भगवद्गीता ॥ ७।२१ ॥

३. नामरूप दुई ईस उपाधी अकथ अनादि सुसामुझि साधी ॥ १ ॥ को बड छोट कहत अपराधू । सुनि गुणभेद समुझिहहि साधू ॥ २ ॥ देखि अहि नाम रूप अधीना । रूप ज्ञान नहि नाम बिहीना ॥ ३ ॥ रूप विसेष नाम बिनु जाने । करतल

वाच्या स्वाधीन आहे; ह्मणजे नुसत्या रूपवर्णनानें चटकन् ओळख पटत नाहीं, नांव सांगतांच त्या व्यक्तीचें गुणरूप प्रत्यक्ष दिसल्यासारखें होतें. देव सगुण आहे, किंवा निर्गुण आहे, साकार आहे कां निराकार आहे, ह्याचा वाद करण्यापासून फायदा नाहीं, दोन्हीं विशेषणें एकाच प्रभूचीं द्योतक आहेत. परंतु दोन व्यक्तीमध्यें संभाषण होण्यास ज्याप्रमाणें त्या दोघांची एक भाषा होईपर्यंत दुभाष्याची जरूर लागते, त्याप्रमाणें नाम आणि रूप ह्या दुभाष्यांच्या मार्फतच ईश्वराशीं बोलण्याची सुरवात करावी लागते." पुढें ईश्वराबरोबर बोलण्याचें सामर्थ्य आलें असेल त्याला दुभाष्याची जरूर लागत नाहीं; ह्मणून तेंच उदाहरण सगळयांना लावून चालणार नाहीं. ईश्वराचें ध्यान आह्मांला साधूं लागलें ह्मणजे मग मूर्ति पुढें ठेवण्याचें कारण उरणार नाहीं. दोन स्टेशनामध्यें विजेची तार जोडल्यावर एका यंत्रावर वाजविलेले ठोके दुसऱ्या ठिकाणीं ऐकूं येतात, पण त्याला ही जोडणारी तार जरूर लागते त्याप्रमाणें मूर्ति ही तार आहे. आतां बिनतारेचे संदेश पाठवितां येऊं लागले तरी विशिष्ट ठिकाणीं तो प्रकार होईल; पण तारायंत्र कायमच ठेवावें लागेल, किंवा दोन ठिकाणच्या यंत्रांतील रचना ही तरी तेंच काम बजावणारी ह्मणून त्या जागीं आली तरी कांहीं तरी मूर्त दृश्य पदार्थ दोन ठिकाणीं ठेवावा लागणारच, तोच अनुभव मूर्तीचा.

"जगांत सर्वत्र[1] परमात्मा भरलेला आहे, अशी भावना ज्याची होईल त्याचें भाग्य थोर होय, असले पुरुष विरळा सांपडतात." परंतु ध्येय नेहमीं अत्युच्च असलें पाहिजे; असली भावना प्रत्येकाला उत्पन्न झाली पाहिजे, परंतु "[2] तशाप्रकारें सर्व प्राणिमात्रांच्या सृष्टपदार्थांच्या ठिकाणीं

---

गत न परहि पहिचाने ॥ ४ ॥ सुमिरिय नामरूप बिनु देखे ॥ आवत हृदय सनेह बिसेखे ॥ ५ ॥ अगुन सगुन बिच नाम सुसाखी । उभय प्रबोधक चतुर दुभाखी ॥ तुळसीदास रामायण ॥ बालकांड ॥ २६ ॥

१. वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ भगवद्गीता ॥ ७।१९ ॥

२. यावत्सर्वेषु भूतेषु मद्भावो नोपजायते । तावदेवमुपासीत वाङ्मनःकायवृत्तिभिः ॥ भागवत ॥ ११।२९।१७ ॥

ईश्वर पहाण्याची दृष्टि उत्पन्न झाली नाहीं, तोंपर्यंत कायावाचामनानें, सर्व भावानें ईश्वराची उपासनाच केली पाहिजे." "जग हें निराळें, आम्हास दिसतें एवढें हें आहे, ह्याच्यापेक्षां ह्याचा कर्ता ईश्वर निराळा आहे, तो दूर कोठें तरी रहातो, आणि तेथून हें कसें चालतें, लय पावतें, पुनः उत्पन्न होतें, ही घडामोड करवितो" अशी ज्याची समजूत असेल त्याला मात्र जगांतल्या वस्तूनीं, मूर्तीनीं ईश्वराचें संबोधन, आठवण कशी येईल ? अशी शंका येईल. "वाणीला आणि मनाला परमेश्वराचें गुणवर्णन शक्य नाहीं, ह्मणून त्याची उपासनाच करूं नये, त्याची पूजा करतां येणार नाहीं, त्याची मूर्ति ठेऊन ध्यान होणार नाहीं असें कोणी ह्मणेल तर त्याचें संवेदन तरी कसें होईल," डोळे मिटून ध्यान तरी कसें करणार ? जर मूर्ति केल्यानें भक्ति होत नाहीं तर तो फार थोर आहे, असें ह्मटल्यानें भक्ति होते, हें ह्मणणें संयुक्तिक नव्हे. माया, प्रेम, व कृपा करण्याचा गुण आमच्या मानवी कल्पनेसारखा ईश्वराला लाविला तर तो अत्युच्च, अगम्य वगैरे कसा होईल ? मनुष्याच्या देहांत, ह्या स्थूल शरीरांत, पंचभूतांच्या मिश्रणानें झालेल्या पदार्थांत, ईश्वरांश, ईश्वराची साक्ष किंवा सर्वेश्वरत्व राहूं शकतें, तर त्यासारखाच पदार्थ जो मूर्ति तिच्यांत देव येत नाहीं, हें ह्मणणें कसें शोभेल ?

"मूर्ति ह्मणजे[3] नामरूपविशिष्ट पदार्थ, आकृति डोळ्याला दिसणारी

---

१. इदं हि विश्वं भगवानिवेतरो यतो जगत्स्थाननिरोधसंभवाः ॥ भागवत ॥ १ ॥ ५ ॥ २० ॥

२. अवाङ्मनसगम्यं तन्नोपास्यमिति चेत्तदा । अवाङ्मनसगम्यस्य वेदनं न च संभवेत् ॥ पंचदशी ॥ ध्यानदीप ॥ ५६ ॥

3. Idol is *Eidolon*, a thing seen, a symbol. It is not God but a symbol of God; and perhaps one may question whether any of the most benighted mortal ever took it more than a symbol? I fancy, he did not think that the mere image, his own hands had made, *was* God; but that God was emblamed by it, that God was in it someway or other. And now in this sense, one may ask, is not all worship whatever a worship by symbols, by *eidola* or things seen? Whether seen, rendered

खूण चिन्ह होय. त्या मूर्तीला कोणी देव ह्मणत नाहीं, ती देवाचें चिन्ह आहे; मूर्ति पाहिल्याबरोबर देवाची आठवण होते, येवढेंच काय तें; ह्यापेक्षां त्या मूर्तीला जास्त किंमत कोणी देत असेल असें वाटत नाहीं, निदान अगदीं अज्ञानांधःकाराच्या कोपऱ्यांत दडलेल्या मानवाशिवाय दुसऱ्या कोणाचीही असली समजूत असतच नाहीं. ही मूर्ति, ही मी आपल्या हातानें बनविली, किंवा दुसऱ्या कोणाकडून करविली, हें ठाऊक असून तीच देव असें कोणी ह्मणणार नाहीं; देवाची आठवण त्या मूर्तीनें होते, कोणच्या तरी प्रकारानें ईश्वर तिच्यांत येऊन राहतो, येवढें फार झालें तर तो मानीत असतो. हा अर्थ लक्षांत ठेविला ह्मणजे असा सहजच प्रश्न येतो कीं, पूजाप्रकार जेथें आला, तेथें त्याला कांहींतरी खूण, जड, मूर्त, दृश्य वस्तू ह्यांचा उपयोग केल्याशिवाय चालेल कसें ? ती दृश्य वस्तू ह्या चर्मचक्षूंना दिसणारी मूर्ति, प्रतिमा, किंवा चित्र असेल किंवा अंतर्दृष्टीला, कल्पनेला, बुद्धीला गोचर होणारें स्वरूप असेल; ह्या दोहोंमध्यें वास्तविक फरक कांहींच नाहीं, असला तर तो फक्त वरवरचा आहे. दोन्ही प्रकारांत दृश्यवस्तु, ईश्वराची खूण, कल्पना कांहीं असली तरी ती मूर्तिच होय. खिस्ती धर्मांतील प्युरिटन पंथाला नियमनिष्ठुर मनुष्य घेतला तरी त्याचा "धर्मश्रद्धेचा कबूलीजबाब," आणि बुद्धिनिष्ठ ईश्वरभावना असतातच आणि ह्या मार्गानें तो देवाची उपासना पूजा करतो; ह्यांच्याशिवाय त्याला पूजन करावयास साधनच उरलेलें नसतें. सारांश, सर्व ठराविक मतें, प्रार्थनापुस्तकें, स्तोत्रें, धार्मिक विधि,

---

visible as an image or picture to the bodily eye, or visible only to the inward eye, to the imagination, to the intellect; this maker a superficial, but no substantial difference. It is still a thing seen, significant of God head, an idol. The most rigorous Puritan has the carfession of Faith, and intellectual Refresstation of the Divine and worships thereby is worship made possible for him. All creeds, liturgies, religious forms, conceptions that fitly invest religious feelings, are in this sense *eidola*, things seen. All worship whatever must procud by symbols, by Idols. We may say all idolatry is comparative, and the most idolatry is only more idolatrons barlyle.

आचार, विचार, जें कांहीं धार्मिक भावनेला अनुरूप असेल तें सर्व, ह्या अर्थानें मूर्त, दृश्यवस्तूच होय. पूजा ह्मटली कीं, तेथें कांहींतरी चिन्हें, आकृति, मूर्ति येणारच. तेव्हां मूर्तिपूजा ही सर्वत्र आहेच, त्यांत कमी-जास्त प्रमाण सापेक्षत्वानें येत असेल, आणि अगदीं निंद्य, गर्हणीय मूर्तिपूजा ह्मटली तर त्यांत पूजनप्रकार फार येवढाच फरक दृष्टीस पडेल. "

मूर्तीची पूजा केली तर ती ईश्वराला पोंहोंचणार कशी ? डोक्याला झालेलें दुःख पायाला औषध लावून बरें करण्यासारखा हा प्रकार आहे. असा उपहास कांहीं लोक करितात. परंतु ते लोक आपण इतर वेळीं काय आचरण करितात, ते मनन करून पहात नाहींत. बादशहाच्या किंवा इतर कोणाच्या जन्मदिवशीं किंवा उत्सवप्रसंगीं त्या त्या व्यक्तीची तसबीर उच्चस्थानीं मांडून तिला हार घालितात. तो हार त्या व्यक्तीच्या गळ्यांत पडतो काय ? त्या प्रसंगीं तोफा उडविल्यास त्या त्या व्यक्तीला ऐकूं जातात काय ? डोळे मिटून ईश्वराचे गुणानुवाद सुस्वर वाद्याच्या सुरांत गाईले किंवा भक्तीची कवाईत करून उभ्यानें ईश्वराचें स्तोत्र ह्मटलें तर तें ईश्वराला ऐकूं जाण्याइतकें ईश्वराचें कर्णेंद्रिय व्यापक असेल, तर पूजोपचारही त्याला पोहोंचण्याइतका तो भक्ताच्या सन्निध असतो, असें ह्मणावयास काय हरकत आहे ? ईश्वर जर सर्वठिकाणीं आहे, तो जेथें नाहीं अशी जागाच जर सांपडणार नाहीं, " कोणच्याही[1] दुसऱ्या देवाची पूजा केली तरी ती मलाच पोहोंचते " असें भगवंताचें आश्वासन आहे, तर मग कोठच्याही ठिकाणीं पूजा केली तरी ती ईश्वरालाच पोहोंचली पाहिजे. मूर्तीवर भक्ताची इतकी भिस्त नसते, हें सांगावयास नको. कुराणांत सुद्धां " ईश्वर सर्वव्यापी[2] आहे " असें ह्मटलें आहे " हृदय[3] हा आरसा आहे, त्याच्यांत ईश्वराचें प्रतिबिंब पडतें, जरा खालीं मान करून

१. येऽप्यन्यदेवता भक्ता यजंते श्रद्धयान्विताः । तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ।। भगवद्गीता ।। ९ ।। २३ ।।

२. अर्ता अकरबो एलेका मिन हब्लील वरीद ।

३. दिलके आईने मे है तसबीरे यारगरदन झुकाई दे । जब जरा

नम्र होऊन निरीक्षण करून पहा" ह्मणजे सर्व कांहीं साधेल. "पुढें असलेल्या मूर्तीचें ध्यान करतां करितां ईश्वरस्वरूप सर्वत्र भरून राहिलें आहे, त्यांत भक्त आपल्या स्वतःस विसरूं लागला, ह्मणजे उत्तम भक्ति झाली, मग मूर्तीचें गौणत्व कोठें उरलें ? " अंतःकरणांत ईश्वरस्वरूप भरून जाऊन दुसऱ्या भावनेला जागाच राहिली नाहीं, ही स्थिति भक्तीचें लक्षण होय. " परमेश्वर सर्वत्र आहे तर मग तेवढ्या मूर्तींत तो नाहीं असें कसें ह्मणतां येईल ? " पृथ्वीच्या आधारावर सर्व प्राणिमात्र वागत असतात, तेव्हां त्यानीं कोठेंही पाऊल टाकिलें तर तें पृथ्वीशिवाय दुसरें कोठें कसें पडेल ? किंवा " आकाशांतून खालीं पडणारें पाणी पृथ्वीच्या कोणच्याही भागावर पडलें तरी तें शेवटीं समुद्रास जाऊन मिळाल्याशिवाय रहात नाहीं, त्याप्रमाणें कोणच्याही देवाच्या नांवानें नमस्कार केला तरी तो परमेश्वरालाच पोहोंचतो. "

" क्याथालिक पंथांतील स्पष्ट पूजाविधान, आणि लोकांत प्रचलित असलेल्या प्राटेस्टंट पंथाच्या ईश्वरासंबंधाच्या मानसिक आणि डोळ्यांस न दिसणाऱ्या कल्पना, मूर्ति, ह्यांची बरोबरी ईश्वराशीं केली, आणि धार्मिक भावनेला पुष्टी देणारीं तीं साधनें आहेत, ह्याचा विसर पडला, तर खऱ्या भक्ताला तीं दोन्हीं त्याज्यच वाटणार. " ही कल्पना पुरुषविशिष्ट परमेश्वर मानणाऱ्या धर्माची होय; परंतु व्यवहार कांहीं असा चालत नाहीं,

१. मूर्तिध्यानें तन्मयस्थिति । ऐक्यत्वें राहे निश्चळ मति । याचि नांवें मुख्य भक्ति ॥ एकनाथीभगवत ॥

२. भजनं अंतःकरणस्य परमात्माकारतापादनरूपं भक्तिः ।

३. कथमयथा भवंति भुवि दत्तपदानि नृणां ॥ भागवत ॥ वेदस्तुति ॥ १० । ८७ । १५ ॥

४. आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं । सर्व देवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥

5. The visible ritual of Leatholiasm and not less the visible mental images of God in popular Protestantism, when regarded as symbols adequate to God, and mot merely as helps to religions devotion in men, are rejected by the worshipper. P. 160 Philosophy Theism. By A. C. Fraser.

हें हिंदुधर्मांतील महात्म्यांना ठाऊक असल्यामुळें साधारण लोकांसाठीं त्यांनीं मूर्तिपूजा गौणत्व देऊन तरी कायम ठेविली आहे. “ वेदान्तमताप्रमाणें ब्रह्म तेवढेंच उपास्य आहे, आणि तें ब्रह्म केवळ ज्ञानस्वरूप, आनंदमय, स्वसंवेद्य आहे, असें ठरलें तरी साधारण बुद्धीच्या माणसांची समजूत पडण्यासाठीं, त्याच्या धोरणानेंच त्याची उन्नति व्हावी, ह्मणून नामरूपानें सजलेल्या सगुणाचीच उपासना करण्याविषयीं उपदेश केला आहे, तो बरोबर आहे. ब्रह्माची व्याप्ति सर्वठिकाणीं असल्यामुळें विशिष्ट स्थलाच्या ठिकाणीं ह्मणजे पुण्यक्षेत्रांत किंवा शालग्राम वगैरे मूर्तींच्या ठिकाणीं विष्णूची भावना करण्याबद्दल सांगण्यांत येतें तेंही योग्यच आहे.”

मूर्तीमध्यें परमेश्वर आला, त्याचें आवाहन मूर्तीमध्यें केलें, असें ह्मटल्यानें परमेश्वर संकुचित होतो, किंवा तसें मानणाऱ्या भक्तानें आपली बुद्धि कोती करून घेतली, असा आक्षेप घेणाराचें ह्मणणेंही बरोबर नाहीं. नामरूपाची मदत घेतल्यानें सच्चिदानंद प्रभूचें स्मरण कमी न होतां उलट त्या दृश्य मूर्तीच्या दर्शनाबरोबर ईश्वरस्मरण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आपल्यासन्निध नसलेल्या मित्राचे, प्रियकराचे फोटो, चित्रें पाहून त्या व्यक्तीचें स्मरण वारंवार होतें, हा सर्वांचा अनुभव आहे, मग ईश्वराच्या मूर्तीनें त्याच्या ध्यानास अडथळा येईल, हें ह्मणणाऱ्याचें भाषण सयुक्तिक आहे, असें कसें ह्मणावें ? भाव, विश्वास बसावयाला ती गोष्ट अगोदर पाहिलेली पाहिजे. “ पूर्वी इंद्रियगोचर झालेली नाहीं, अशी कोणतीही गोष्ट श्रद्धेचा विषय होणार नाहीं.” परमेश्वराचे गुणानुवाद गावयाचे, त्याजपाशीं आपलीं संकटें निवेदन करावयाचीं, त्याला भक्त-

---

१. “ तस्योदिति नाम हिरण्यश्मश्रुः ” इत्यादि निर्गुणमपि सत् ब्रह्म नामरूपगतैः गुणैः सगुणमुपासनार्थं तत्र तत्रोपदिश्यते इत्येतदप्युक्तमेव । सर्वगतस्यापि ब्रह्मण उपलब्ध्यर्थं स्थानविशेषो न विरुध्यते शालग्राम इव विष्णोरित्येतदप्युक्तमेव ॥ ब्रह्मसूत्र ॥ १ । २ । १४ वरील भाष्य शंकराचार्यांचें ॥

२ पान ६६ नैसर्गिकधर्म—प्रोफेसर म्याक्समूलर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बाळ्दीक्षित यानीं केलेलें भाषांतर.

कैवारी ह्मणावयाचा, तर तसला गुणविशिष्ट, संकटनिवारणसमर्थ असणारा पुरुष मनांत आणिल्यावांचून तोंडातून शब्द काढणें ढोंग होणार आहे. फुलाच्या सुवासाचें स्मरण होतांच तसलें फूल अंतश्चक्षूपुढें आल्यावांचून कसें राहील ? " आपल्यास वाटेल कीं, प्रत्येक झाडामध्यें जें कांहीं विशेष असेल तें टाकून देऊन सामान्यतः झाडाची प्रतिमा मनांत आणूं. परंतु अनुभव घेऊन पहा, ह्मणजे ती गोष्ट अशक्य आहे असें दिसून येईल. झाड ह्मटलें कीं कोणच्या तरी झाडाची व्यक्ति डोळ्यापुढें येतेच. "[1]

पूजा शब्दच द्वैतद्योतक आहे; त्या शब्दाबरोबर पूज्य, पूजक आणि पूजाविधि अशी त्रिपुटी मनांत येते. पूजेचा उच्च प्रकार कोणचाही ठरविला तरी कांहीं कालानें त्याची तऱ्हा कमी अधिक झाल्याशिवाय रहात नाहीं. डीसेंटर पंथाचे लोक सर्व पूजाविधीस फांटा देऊन प्रार्थना करितांना टोपीसुद्धां काढीत नाहींत, आणि इंग्लंडांतील राष्ट्रमान्य धर्माच्या देवळांतील स्थंडिलाचीं वस्त्रें वरचेवर पालटावीं लागतात, तेव्हां एक धर्म टोपींत आणि एक धर्म चादरींत उरला आहे, अशी कोणी त्यांची थट्टा करितात. शिलालेखाचें कौतुक ह्यावरील लिपी समजेल त्याला, बाकीच्यांना त्या दगडांत आणि इतर दगडांत फरक वाटेल कसा ? भूर्जपत्रावरील जुन्या लेखाचें महत्व तसला शोध करणाराला, बाकीच्यांना तीं ताडाचीं पानेंच. सारांश देशपरत्वें चालीप्रमाणें मनांत फेर पडेल तसा धर्माच्या दुराग्रहानुरूप पूजाप्रकार कमी अधिक लांबीरुंदीचे असले तरी पूजक ह्मटला कीं पूज्य देव आलाच, मग तो प्रत्यक्ष पुढें जडपदार्थानें बोध्य असला तरी सारखाच आणि मनानें मानावयाचा असला तरी तो मूर्तिरूपच. निर्गुण, निराकार परमेश्वर दुर्ज्ञेय आहे, " अव्यक्त स्वरूपाचें ज्ञान करून घ्यावयास फार कष्ट पडतात. " ह्मणून परमेश्वराला अज्ञेयांत

---

१. पान. २५१ नैसर्गिक धर्म. प्रोफेसर म्याक्समुलर यांच्या व्याख्यानांचें रा. शं. बा. दीक्षित यानीं केलेलें भाषांतर.

ढकलणाऱ्यांच्या शहाणपणाची सीमा आणि मूर्तींच्यामुळें परमेश्वराकडे हीनत्व येतें असें समजणाऱ्याचें अज्ञान एकाच मापानें मोजण्यास हरकत नाहीं.

परमेश्वर एक व्यक्ति (personal) आहे ह्मटला कीं, तो कोठें रहातो हें सांगितलें पाहिजे. " तें स्थल ठरविलें कीं, मग देवाचें स्वरूपही सांगण्याचें क्रमानें येणारच. बुद्धीचें सामर्थ्य आणि सद्गुणाचा ठेवा ह्याचीच एक मानवी मूर्ति आपण बनवितों, हा आपला अनुभव आहे, कदाचित् ही फुशारकी आहे, असें आपल्याला वाटत असतें, ह्यांतील मुद्दा एकच; सद्गुणाचा पुतळा आणि बुद्धीचा सांठा एका व्यक्तीला दिला कीं, तेथें आकार हा आलाच. जगांत विद्युच्छक्ति सर्वत्र भरलेली आहे, पण तिचा अनुभव येण्यास कांहीं ठराविक उपकरणें घ्यावीं लागतात, त्यांचा एका विवक्षित प्रकारानें उपयोग करावा लागतो, त्याप्रमाणें परमेश्वर सर्वत्र भरून उरला आहे, पण त्याचा साक्षात्कार होण्यास कांहीं एक सामुग्री तयार ठेविली पाहिजे, त्यांपैकीं मूर्ति एक होय. वीज उत्पन्न करण्याचें सामर्थ्य कांहीं थोडक्या लोकांना कदाचित् साधलें तरी साधारण लोक विजेच्या यंत्राचा किंवा पेटीचाच उपयोग करितात. " चैतन्यरूप, अद्वितीय, निर्गुण, निराकार परमात्मा आहे खरा, परंतु भक्तांच्या कामासाठीं, त्यांना पूजा करतां यावी ह्मणून मूर्ति असावी लागते. " अज्ञानी लोकाच्यापुढें कांहीं नसतांना देवाची प्रार्थना करावयास सांगितली तर त्याचें समाधान होणार नाहीं येवढेंच नव्हे, तर आकाशांतील गडगडाट कशाचा आहे, हें लहान मुलानें विचारल्यास ह्मातारी दळीत

१. चिन्मयस्याद्वितीयस्य निष्कलस्याशरीरिणः । उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना ॥ रघुनंदनधृतवचनम् ॥

2. Gibbon remarks " If we define the place, we must describe the figure of the deity. Our experience, perhaps, our vanity, represents the powers of reason and virtue under a human figure." Decline and and fall &c. Vol VIII. P. 268.

आहे, वगैरे उत्तराशिवाय त्याचें समाधान करण्यास त्या वेळीं उपाय नसतो, हें लक्षांत ठेविलें पाहिजे, आणि तसला अरेरावीपणा धर्मबाबतींत करावा लागेल, तो इष्ट नाहीं. हें विसरतां कामा नये. रसायनशास्त्र शिकावयास आरंभ करणाऱ्या विद्यार्थ्यानें प्रयोगशाळेंत पाऊल टाकल्याबरोबर त्यास एखाद्या क्षाराचें पृथक्करण करावयास सांगितल्याप्रमाणें मूर्तीशिवाय ध्यान करावयास शिकविणारांचा शहाणपणा दिसल्याशिवाय रहाणार नाहीं.

ह्या मूर्तिपूजा काढून प्रचारांत आणणाऱ्या लोकांस जो दोष देतात तसला दोष प्लेटोनें सांगितलेल्या गोष्टींत आहे. " स्मरणशक्तीला औषध ( मदत ) ह्मणून फीड्स देवानें अक्षरवर्ण उत्पन्न केले. त्याला बजाविण्यांत आलें कीं, ह्या योगानें बुद्धिसामर्थ्य कमी होईल, ह्या खुणावर, चिन्हावरच भिस्त पडेल, लोक लक्षांत ठेवण्याचा प्रयत्न सोडून देतील " ह्यासारखेंच ह्या मूर्तीपूजेनें देवाची भावना कमी होईल हें ह्मणणें आहे. ज्यांना अक्षराची ओळखसुद्धां नाहीं त्यानें चष्मा लावून वाचावयाचा प्रयत्न करावा, ह्मणण्याप्रमाणेंच ईश्वराकडे लक्षही न देणाऱ्या मनुष्याला देवळांत जाऊन मूर्तीच्या पाया कशाला पडतोस, एखादे दिवशीं डोळे मिटून ईश्वरप्रार्थना ह्मण ह्मणजेच फळ मिळेल, ईश्वर पावेल, असें सांगणें होणार आहे. मिराबाईच्या भक्तीचा अतिरेक होण्यास रणछोडसारखा, नामदेवाच्या विनवणीसाठीं हट्टाकरितां नैवेद्य भक्षण करणारा, भोळ्या रामाच्या समजुतीसाठीं रामपंचायतन मारुतीच्या खांद्यावर घेऊन काशीस गेलें, त्यासारखा ईश्वर बनल्याखेरीज सात्विक अष्टभाव उत्पन्न होण्यास दुसरा मार्गच नाहीं. " परमात्मा सर्वतोपरी पूर्ण आहे, त्यांतून

---

1. Plato's Egyptian myth in the Paedrus. the god who invents letters as a medicine for memory, told that he is doing detriment to the mind by teaching men to remember outwardly by meas of forteign marks, instead of inwardly by their faculties. P. 157 Oriental Religion By Samuel Johnson.

२. पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमदुच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्ण मेवावशिष्यते ॥

कांहीं काढून त्याचा साकार बनविल्यानें त्याच्यांत कमीपणा येणार नाहीं, त्याच्यांत दुसऱ्याची कशाची आपल्या समजुतीनें भर घातली तरी त्या परमात्म्याचे स्वरूपांत अधीकपण होत नाहीं. " अशा परमात्म्याची मूर्ति बनविली तरी परमेश्वराला कलंक लागणार नाहीं, त्याच्यापुढें ख्रिस्त किंवा महंमदी धर्माप्रमाणें दीन होऊन मान वाकविली तरी त्याच्या वैभवाला तुमच्या हातून पुष्टि देण्याचें काम साधत नाहीं.

ह्या सर्व आक्षेपांत मुळाशीं एक समजूत आहे ती चुकीची आहे, असें दाखविलें ह्मणजे सर्व प्रश्न आपोआप मिटतात. धर्मप्रकारांत, आचारविचारांत कायदा असावा, एकसारखेपणा पाहिजे, एकछत्री कारभार असल्याशिवाय भागणार नाहीं, असला आग्रह धरणाऱ्यांना ह्या मूर्तिपूजेनें उत्पन्न झालेली विविधता जाचक होत असते. धर्मबाबतींत एकच उद्देश असला तरी निरनिराळे मार्ग नसावेत, असें ह्मणणारांना धर्म तर समजलेलाच नसतो, परंतु व्यवहार आणि समाजशास्त्र ह्यांचाही भाग कळलेला नसतो, असें ह्मणावें लागतें. भूक लागली असतां तिची शांति करणें हा एकच उद्देश सर्व खाद्य पदार्थांचा आहे, मग ईश्वरानेंच इतक्या प्रकारच्या भाज्या, धान्याचे प्रकार निर्माण न करितां एक धान्य व एक भाजी सर्व देशांत उत्पन्न कां केली नाहीं ! आहेत तितके प्रकार पुरे न वाटून आणखी तऱ्हा करणाऱ्यांची शिफारस कां होते ! पदार्थांपैकीं लोकांमध्यें आवडनिवड कां असावी ? किंवा सर्व प्रकार एकाच भांड्यांत घालून एकदम शिजवून किंवा नुसते तसेच कच्चे कां खात नाहींत, आणि तसे करणारास रानवट, अशिक्षित, अडाणी कां ह्मणतात ? उत्तर हिंदुस्थानांत डाळपुरी, कोंकणांत ताकभात, दक्षिणेंत सारभात; मांसाहारी लोकांत कोणी गाईचें, तर कोणी घोड्याचें किंवा सशाचें मांस मागतो, असा भेद कां असावा ! थंडी, ऊन, पाऊस ह्यापासून देहरक्षण करण्याचें एकच काम कपड्याचें आहे, मग कोणी कोट, तर कोणी आंगरखा,

एकजण बंडी, तर दुसरा सदरा घालणारा, कोणाला उपरणें, पाहिजे तर दुसऱ्याचें हातरुमालावर भागतें, तिसऱ्याला दुहेरी धोतर लागतें; कोणाला कांठाचें धोतर हावें, तर कोणीं साधेंच वापरणार, तर कोणाला तुमान किंवा पाटलोण पाहिजे; नाग किंवा लंगे गोसावी दिगंबरच रहातात. फ्रान्सांत कपड्याची रोज नवीन तऱ्हा निघते, किंवा राजा राणीच्या लहरीप्रमाणें पोषाखांत झालेला बदल इतरांना अनुकरणीय वाटतो, असा प्रकार कां राहूं द्यावा ? सुखानें झोंप यावी येवढाच उद्देश अंथरुणाचा असून, कोणी नुसत्या जमिनीवर, कोणी गादीवर, कोणी पलंगावर असा प्रत्येकाचा मनोदय वेगळा कां रहावा !

अनियंत्रित राजाचा अंमल कमी होत जाणें, बलात्काराचें, दुराग्रहाचें, अरेरावीचें तत्व लयास जाऊन त्याच्याजागीं इतर जनांच्या इच्छेला मान देणें ह्या मताची प्रगति जगांत होणें ह्याचा हल्लीं काल आहे, व हीच सुधारणा समजली जात आहे. प्रत्येकानें वन्यपशूप्रमाणें मनास वाटेल तसें रानोमाळ फिरावें, ह्यापेक्षां समाजरचना होऊन एक कोणी तरी सात्राधीश ठरवून बाकीच्यानीं त्याची आज्ञा पाळणें बरें, त्याप्रमाणें अनेक देवताराधन किंवा निसर्ग देवतापूजन यापेक्षां एक देव मानणें बरें; परंतु त्या एका देवाच्या जुलमांत रहाणें, एकाच तऱ्हेनें त्याची उपासना करणें, हें मत भक्त व भज्य दोन्ही पक्षास बरें दिसत नाहीं. एकसारखेपणा हा शिष्टसंमत नाहीं, विचारवैचित्र्याप्रमाणें, आचारवैचित्र्य, व्यवहारवैचित्र्य असणें हेंच स्वतंत्रतेचें लक्षण समजलें जात आहे. "एकदा एक धर्म ठरवून[1] त्याच्यांत पुनः बदल होऊं न देण्याची कोणाचीही कितीही प्रबल

1. The fact of diverse judgments abaut religious phenomena is entirely unescapable, whatever may be one's own desire to attend the irrevrrsible. Ought all men to have the same religion? Ought they to approve the same frints and follow the same leadings? Are they so like in their inner needs that, for hard & soft, for proud and humble, for stremons and lazy, for healthy minded & despairing, exactly the same incentives are required? P. 333 Varities of religions experience. By William Jenes.

इच्छा असली तरी धार्मिक गोष्टीबद्दल निरनिराळीं मतें होण्याची गोष्ट चुकविता येणें शक्य नाहीं. पृथ्वीवरील सर्व लोकांचा धर्म एकच असणें अवश्य आहे काय ? सर्व लोकांनीं एकाच पुरुषार्थाची, सारख्याच फलाची इच्छा धरावी, आणि सर्वांनीं एकाच गुरूच्या मार्गाप्रमाणें चाललें पाहिजे. ह्याशिवाय भागणार नाहीं काय ? कोणाचें मन हळवें तर कोणी वज्राप्रमाणें कठोर हृदयाचा, कोणी सदोदित आपल्याच ताब्यांत रहाणारा तर कोणी अत्यंत नम्र, कोणाला कांहीं तरी काम केल्याशिवाय चैन पडत नाहीं, तर कोणाला जागचें हालावें असें सुद्धां वाटत नाहीं. कोणी नेहमीं प्रसन्नचित्त तर कोणी सदा कुरकुरणारा, अशा निरनिराळ्या प्रकृतीच्या, स्वभावाच्या माणसांना "चोदनालक्षण धर्म" अगदीं सारखाच असणें हें जरूर आहे म्हणतां येईल काय ? ह्याचें उत्तरच असें कीं, ही गोष्ट सयुक्तिक नाहीं, आजपर्यंत असें झालें नाहीं. धर्मजागृति, धर्मवासना किंवा ईश्वराच्याविषयीं जाणीव ही सर्वत्र एकसारखी भरलेली आहे. परंतु पाण्याचा मोठा तलाव तुडुंब भरला असतांना त्यांतील पाणी प्रत्येक मनुष्य आपआपल्या हातांतील भांड्याच्या मानानें भरून घेतो किंवा त्याला पाहिजे तेवढा उपयोग करतो, परंतु त्या तलावांत पाणी भरावयास येणाऱ्या माणसानीं अमक्याच एका वाटेनें आलें पाहिजे, किंवा अमूकच एक आकाराचें भांडें प्रत्येकानें आणिलें पाहिजे, असला आग्रह धरणाऱ्याचें म्हणणें निदान सुधारणेच्या कालांत शोभणार नाहीं.

इतकेंच नव्हे तर प्रत्येकानें विचार करणें, परप्रत्ययनेय न होणें, दुसऱ्याच्या तोंडानें न जेवणें हें सुधारणेचें लक्षण मानलें जातें. एक साच्याच्या अगदीं पाल्याकाटक्याच्या झोंपड्या रानटी लोकांत सांपडतात परंतु शहरामध्यें घरें बांधण्याच्या तऱ्हा अनेक असतात. परगांवाहून मुंबईस गेलेल्या मनुष्याला सगळेच रस्ते व घरें सारखीं वाटून भांबावल्यासारखें होतें,

१. यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।। भगवद्गीता ॥ २ ॥ ४६

पण प्रत्येक घरांत कांहीं निराळेपणा असतोच, तसाच प्रकार सर्व धर्मांत असतो. एकतत्वीं, एकगुरुनिष्ठ ह्मणविणाऱ्या ख्रिस्ती धर्मांत किती पंथ आहेत. धर्मांच्या जखडबंद नियमांनीं मनवैचित्र्याला बंदी केली तर कदाचित् फ्रान्समधील एकदर्शनीं गृहासारखी छाती बाहेरून येईल, परंतु दाराच्या आंत वेगळा प्रकार रहाणारच. ब्राडलेसाहेब म्हणतात कीं, " अनेक वस्तूंचा संग्रह करण्याची इच्छा असणें हा मानवी स्वभावच आहे, " त्याला एकंकारानें चैन पडत नाहीं. एक साच्याच्या धर्माची कल्पना कधींच टिकत नाहीं, हें जाणून, उमजून, अनुभवानें ओळखून हिंदूधर्मानें मूर्तिपूजेला अवसर दिला आहे. ह्या धर्मातल्या इतके उच्च विचार दुसरीकडे क्वचितच सांपडतील; " परंतु त्याची उपपत्ति तें शास्त्र समजण्याची मजल मारणारे, कष्ट करणारे लोक फार थोडे असतात. बहुजन-समाजाला तितकें काम झेंपत नाहीं. विचाराची कांहीं तरी एक दिशा किंवा तऱ्हा असली म्हणजे त्यांना पुरे होतें, त्या भावनेचा विशेष खल करीत ते बसत नाहींत. कांहीं मतें पत्करावीं, कांहीं सोडून द्यावीं, असली त्यांना संवयच लागलेली असते, तसा त्यांचा स्वभाव बनून त्यांच्यावर त्याचा अम्मल त्यांना नकळतच बसतो. कांहीं तरी अन्न पोटांत कोंबावें, त्यांतलें कांहीं आपोआप पचेल, कांहीं विष्ठेच्या वाटेनें पडून जाईल, असलाच कारभार त्यांच्या धर्मग्रंथ श्रवणाचा वगैरे चालतो. "

---

Mr. Brdley says " there never was any one who did not desire many things for their own sake " Ethical studies. P. 237.

2. Systems are and muat be, for the few. The majority of mankind are content with a mood or temper of thought, an impulse not fully reasoned out, a habit guiding then to the acceptance and assimilation of some opinions and the rejection of others, which acts almost as antomotically, as the process of physical digestion. P. 167 The foundations of Belief. By the Right Hon'ble Balfour.

मूर्तिपूजेला वेदान्तमतानें योग्य किंमत ठरवून दिलेली आहेच, हें एकप्रकारचें वेड आहे, धर्मभ्रांति आहे असें म्हणण्यापर्यंत मजल गेली; तरी पण तें घालविण्याचा प्रयत्न करण्यांत शहाणपण नाहीं असें हिंदु-धर्माभिमान्यांनीं ओळखिलें आहे. "¹कांहीं वेडाचे प्रकार असे असतात कीं, त्या वेडापासून त्या मनुष्याला सुखच होत असतें आणि त्या वेडेपणांतून त्या मनुष्याला बरें करण्यांत त्याच्या सुखाचा मोबदला देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्याला ताळ्यावर आणण्यांत एकप्रकारचा दुष्टपणाचा दोष येण्याचा संभव असतो. तें त्याचें वेड घालविलें तर तो दुःखाचा भागिदार होऊन त्या बरें करणारास दोष देऊं लागतो " मूर्तिपूजा करणें म्हणजे राखेमध्यें²आहुति दिल्यासारखें आहे, असें भागवतांत म्हटलें आहे तरी "³अज्ञानी लोकांची आसक्ति कर्मावर असते, आरती धुपारति वगैरे उपचार नसल्यावर भक्तीचें काम नीरस होतें, यासाठीं असल्या मनुष्याच्या मनांत उगीच भलते विचार भरविण्याचा प्रयत्न करूं नये; उच्च ध्येयाचें मनन ठेवून तींच कर्में उत्तम प्रकारानें आचरण ( नेत्या पुरुषांनीं ) करून दाखवावीं आणि हळुहळू शिक्षण देऊन आपोआप इतरांना उच्च मार्गाचें वळण लावावें " असला उपदेश भगवंतानीं केला आहे. परमेश्वर साक्षात्कारापर्यंत मजल गांठून अद्वैताचा उपदेश करणाऱ्या श्रीसमर्थ रामदासासारख्या साधूनीं बजावून सांगितलें कीं " सगुण भजन हें कधींच सोडूं नये. " तें सोडून देणारा ज्ञानी असला तरी अपेशी, अपयश देणारा,

---

1. There are some sorts of pleasing madness of which it would be cruelty to care a man. By bringing him to his senses you make him miserable. Ockley's History of the Sarancens.

२. भस्मन्येव जुहोतिसः ॥

३. न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनां । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ भगवद्गीता ॥ ३।२६ ॥

परीक्षेंत नापास झालेला समजावा, " त्याचा हेतू दुष्टपणाचा असावा असें समजण्यास हरकत नाहीं." हें असलें मूर्तिपूजेचें एक साधन आहे, " हें सुद्धां ज्याला कबूल नाहीं, त्याला खरा मार्ग सांपडलाच नाहीं किंवा तो लोकांशीं लपंडाव करीत आहे; आणि म्हणून त्याचें सिद्धपण वाया गेलें; आणि साधारण जनाप्रमाणेंच त्याच्या कपटी वर्तनानें तो बद्ध झाला " असें ह्मणावें. " अन्नें हें मोठ्या मनुष्याला पुष्टिकारक होतें; परंतु तें लहान मुलाला कधीं कोणी देईल काय ?" सारांश फार दूरवर दृष्टी ठेऊन ही मूर्तिपूजा हिंदुधर्मानें आपलीशी करून घेतली आहे " सर्व मनुष्यांना एकसारखें शिक्षण मिळालेलें नसतें, कांहींचें ज्ञान फार तर कांहींचें कमी असतें, आणि ह्यासाठीं आपल्या भोंवतीं दिसणाऱ्या धार्मिक बुद्धीवर विनाकारण आपण घांव घालतां कामां नये, ही गोष्ट कधींही विसरूं नये. " असला उपदेश इतर देशातल्यांप्रमाणेंच येथेंही आहे.

उपासना म्हणजेच दोहोंमध्यें--उपास्य आणि उपासक यामध्यें--एकसारखा ओळखीचा प्रवाह वाहण्यास लावणें होय. त्या प्रकारचा प्रवाह वाहूं लागण्यास उपासकाला एक प्रकारची तयारी करावी लागते. ओळखीचा, मनाच्या जाणिवेचा प्रवाह सुरू होण्यास किंवा सुरू झाल्यावर तो तसाच कायम टिकण्यास शरीराचीही स्थिति एका विशिष्ट प्रकारची ठेवणें

१. सांडील सगुणभजनासी । तो ज्ञाता पर्ण अपेशी ॥ दासबोध ॥ १०।७।१४॥

२. साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध झाला ॥ ५।६।७ ॥

3. Iranæus says " An infant cannot receive the food which is meant for full grown men.

4. We must bear in mind that the majority of men are imperfectly educated, and hence we must not needlessly offend the religious ideas of our age, P. 24 The History of conflict between religion and science. By John William Draper.

५. उपासनं नाम समानप्रत्ययप्रवाहकरणं ॥ ब्रह्मसूत्र ४।१।७ ह्यावरील शारीरभाष्य

जरूर पडतें. आसनावर बसावें लागतें; धांवताना, चालतांना चित्त फाकलेलें असतें, उभे राहिल्यास पेंग येण्याचा संभव असतो, ह्मणून उपास्याविषयीं तंद्री लागण्यास ही शरीराची ठेवण उपयोगी पडत नाहीं. उपास्याच्या सन्निध जितकें जाववेल तितकें बरें असतें. त्या उपास्याचें स्थान निश्चित असेल तर तेथें आपण गेलें पाहिजे. नाहीं तर त्याला आपल्याजवळ आणण्यासाठीं त्याची खूण आपल्याजवळ ठेविली पाहिजे. "ब्रह्माची उपासना करावी, ती न साधेल तर सूर्य, मन वगैरे प्रतीक कल्पून त्यांच्या चिंतनांत रममाण व्हावें, तें कठीण वाटेल, साध्य नसेल तर विष्णु वगैरे देवतांच्या मूर्ति बसवून त्यांच्या सन्निध राहून तन्मय व्हावें." अशा प्रकारच्या पायऱ्यांचा मार्गच योग्य आहे, असली सवड पाहिजे आहे, आणि ती हिंदुधर्माशिवाय इतर धर्मांत नाहीं, हें त्यास दूषण नसून भूषण आहे.

"धारणाद्धर्ममित्याहुः" सर्वांचा समावेश करणारा, सर्वांच्या समाधानास तयार असणारा, प्रगतिला अनुकूल होणारा तो धर्म होय. ही धर्माची व्याख्या हिंदुधर्माशिवाय इतर कोणच्याही धर्माला-निदान हल्लीं प्रचलित असलेल्या धर्माला-लागू पडत नाहीं. ते धर्म ह्मणजे विशिष्ट मतें आहेत, विशेषनामें आहेत, सामान्यनामें नाहींत. मूर्तिपूजा इतर धर्मांना पचत नाहीं; ह्मणून ती त्यांना नको आहे. ती पचविण्याचें, इतर खाद्य पदार्थांबरोबर तीहि पोटांत गेली तरी तोंड वांकडें न होऊं देण्याचें सामर्थ्य हिंदुधर्माचें असल्यामुळें त्यांतून तिचें उच्चाटण करण्याचा प्रयत्नच झाला नाहीं. हिंदुधर्माची दृष्टि ज्ञानाकडे विशेष आहे; ज्या ज्या धर्माशीं त्याचा संबंध आला आहे, त्यांतील जें कांहीं विशिष्ट प्रकारानें उद्दीपित झालेलें

---

१. ईदृशश्चात्र ब्रह्मण उपास्यत्वं यत्प्रतीकेषु तद्दृष्ट्यध्यारोपणं प्रतिमादिष्विव विष्ण्वादीनाम्। ब्रह्मसूत्र ४।१।५ यावरील शारीरभाष्य.

ज्ञान असेल, तें त्यानें गृहण केलें आहे. पण त्यामुळें आपल्यास ग्रहण लागू दिलें नाहीं; आणि ह्या निबंधासारख्या चिकित्सक बुद्धीचा चिमटा इतर धर्मीयांना कदाचित थोडासा भासला तरी तो हिंदुधर्माला उलट उज्ज्वलितच करणार आहे, व त्याची खरी योग्यता दाखविणार आहे. इतर धर्मांची प्रार्थना अशी असते कीं, " जें ज्ञानें मला मिळत आहे, तें तितक्या योग्यतेचें असलें ह्मणजे बरें " त्याच्याऐवजीं हिंदु ह्मणणार कीं, " ज्यानें हीं इंद्रियांची हापाप शमेल तें ज्ञान होय, आणि उपनिषदामध्यें ज्याचा निर्णय करून ठेविला आहे तें ( ब्रह्मच ) उपास्य होय. "

1. *Da mihi, Dominae. Scire quod sciendum est.* " Imitation of Christ. ( Grant that the knowlodge I get, may be the knowledge worth having. Mathew Arnold's version. )

२. तज्ज्ञानं प्रशमकरं यदिंद्रियाणां । तज्ज्ञेयं यदुपनिषत्सु निश्चितार्थं ॥ धन्याष्टक ॥

## उपसंहार.

सारांश, कोणीहि कितिही प्रयत्न केला तरी शुद्ध परमेश्वरस्वरूपाची कल्पना करणें प्रकृतिस्वभावामुळें प्रायः पुष्कळ लोकांस शक्य असत नाहीं. परमेश्वर व्यक्त झाला म्हणणेंच चुकीचें आहे. 'अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः । भगवद्गीता ७. २४' ख्रिस्तस्वरूप असो किंवा कृष्णस्वरूप असो, तें कांहीं ईश्वराचें खरें रूप नाहीं. कारण मनानें त्याचें गृहणच होत नाहीं. त्याच्या मननशक्तींतच मन आहे ( यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो- मतम् । केन । १।५।। ) प्रतीक कोणचेंही घेतलें तरी ईश्वर कांहीं तें प्रतीक नव्हे (न प्रतीके न हि सः । वे.सू.४।१।४) तें प्रतीक म्हणजे नाम- रूपाचेंच बाहुलें—व्यक्त होणार. म्हणून ह्याच्या पलीकडे दृष्टि पोहोंचवावी तेव्हांच ईश्वरस्वरूप समजणार आहे. भक्तीनें, श्रद्धेनें, विश्वासानें, आरंभ करण्यासाठीं जें कांहीं घ्याल तें सर्व मायावीच, मग ते चार दगड मांड- लेले असोत, धातूच्या मूर्ति असोत, सुंदर पाषाणाच्या मूर्ति स्थापना केलेलें देवालय असो, किंवा मूर्ति नसलेले आर्यसमाज मंदीर, ख्रिस्तीचर्च

अगर मुसलमानी मशीद असो, हीं सर्व मन विरंगुळण्याचीं साधनें आहेत. लहान मुलाच्या पांगुळगाड्याप्रमाणें आहेत. पण त्यांत उच्चनीचभाव असला तरी साधन या दृष्टीनें एकाच वर्गांत मोडणारीं आहेत. भक्तीच्या सामर्थ्यानें तरून गेल्याचीं जीं उदाहरणें प्रत्येक धर्मांत आहेत, तें सामर्थ्य त्यांतील सजीव किंवा निर्जीव मूर्तीचें नसून ईश्वरभावनेंत तारकत्व आहे. मग त्या प्रतीकाबद्दल भांडणें करण्यांत काय अर्थ आहे ? एकाला अंगरखा आवडला किंवा दुसऱ्याला कोट पाहिजे असला, थंड देशांत बूट घालावे लागले, आणि उष्ण प्रदेशांत जोड्यावर भागत असलें, तर ह्यांत बरेंवाईटाचा प्रश्न येतच नाहीं. परमेश्वर सर्वव्यापी सर्वसाक्षी आहे, हीं जाणीव कायम राहिली म्हणजे उपासनेचें कार्य झालें. देशकालाचे नियमन घातलेल्या व्यक्तीच्या अभिमानानें, नामरूपयुक्त प्रतीकाच्या वेडानें दुसऱ्या मनुष्यप्राण्याचे प्राण घेण्याची मजल यावी इतका शोचनीय मूर्खपणा आतां जरी होत नसला, तरी अज्ञानाचे चष्म डोळ्यांस लावून आपलेंच ह्मणणें दुसऱ्याकडून अनेक तऱ्हेनें, लाडीगुडीनें, लाचलुचपतीनें, भाषणसमारंभाच्या पकडीनें कबूल करविणें ही दिशाभूल केव्हां जाणार तेंच कळत नाहीं. स्वातंत्र्याचा टेंभा इतर ठिकाणीं-राजकारणांत सुद्धां मिरविणार असल्यावर धर्माच्या प्रतीकाबद्दल इतकी बाचाबाची आतां तरी पुरे होईल अशी आशा आहे. उदरनिर्वाहास प्रत्येकजण कांहीं तरी दोन घांस खाल्याशिवाय रहात नाहीं. तोंपर्यंत मांसाहारच श्रेष्ठ आहे कीं नाहीं हें जसें प्रत्येकाच्या इच्छेवर ठेवणेंच भाग पडतें, त्याप्रमाणें मोक्षाच्या मार्गाला लागण्याची क्रिया होत असेल तर साधनाची निंदा करणें वेडेपणा होय मनुष्याच्या मनाचा स्वाभाविक ओढा प्रत्यक्षाकडे, नामरूप. मूर्त स्वरूपाकडे असतो. त्याची आणि तत्त्वज्ञानाच्या गहन सिद्धांताची एकवाक्यता करण्याची हिंदुधर्माची शैली इतर कोणच्याही धर्मांत आढळून येत नाहीं. परंतु तत्त्वज्ञान व श्रद्धेचा भक्तिमार्ग ह्यांचा जेथें भेद कायमच आहे, ते आमच्या मूर्तिपूजेला व त्यांतील भावनेला नांवें ठेवणारच; पण त्याला काय इलाज ? खोट्या समजुतीनें मन ग्रासल्यावर त्याला खरेंही पटेनासें होतें—

**अथवाभिनिविष्टबुद्धिषु । व्रजति व्यर्थकतां सुभाषितम् ॥**